# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/०२/२०१८

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/०२/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

**३**

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार, दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ६ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३० | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३१ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३२ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३३ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३४ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३५ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १२ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहोता | ३६ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १३ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ३७ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३८ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३९ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १६ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४० | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४१ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४२ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| १९ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ४३ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २० | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ४४ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २१ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २२ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २३ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ४७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २४ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ४८ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| २५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१.श्री. जीवन चंद्रभान इदनानी, २. श्रीमती पुजा सचिन भोईर, ३. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड, ४. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ५. श्रीमती पंचम उमेश कालानी, ६. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ७.श्रीमती गीता लालचंद साधनानी, ८. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ९. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १०. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ११.श्रीमती शुभांगीनी निकम, १२. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १३. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १४. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, १५. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १६. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १७. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, १८. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, १९. श्रीमती कविता लाल पंजाबी, २०. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), २१. श्री. सुमित सागर सोनकांबळे, २२. श्रीमती ज्योती शामराव माने, २३. श्री. रमेश महादेव चव्हाण, २४. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, २५. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, २६. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २७. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २८. श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना, २९. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), ३०.श्री. प्रमोद नामदेव टाले, ३१. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ३२.श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, ३३. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३४. श्री. विजय चाहु पाटील, ३५. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
४. श्री. मिलींद सोनवणे, नगररचनाकार
६. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. संतोष जाधव, सहाय्यक मुख्य लेखाधिकारी
८. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
१०. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
११.श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त
१२. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त
१३. श्री. गणेश शिंपी, प्र.सहा. आयुक्त
१४.श्री. भगवान कुमावत, प्र.सहा. आयुक्त
१५. श्री. नंदलाल सामतानी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१७. श्री. तिजोरे, शाखा अभियंता
१८. श्री. सोनावणे, शाखा अभियंता
१९. श्रीमती. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२०. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२१. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२२. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
२३. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२४. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
२५. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

या वेळी मा. आयुक्तांच्या स्थानी अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे या आसनस्थ होत्या.

दुपारी १२.२० वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त महोदय, मी एक सूचना देतो श्रध्दांजलीसाठी की आपल्या महानगरपालिकेचे सुरक्षा रक्षक श्री. रविंद्र संरासे यांचे निधन झाले आहे तर त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करावी.

**महापालिका सचिव :—**कृपया दोन मिनिटे मौन पाळावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—डॉ. प्रकाश नाथानी

**शोक प्रस्ताव**

महापालिकेचे सुरक्षा रक्षक श्री. रविंद्र सरासे यांचे निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५९ ज** **दिनांक:— २०/२/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. रविंद्र सरासे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १:—** स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

---

**सदस्य श्री अरुण आशान:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, विशेष सभा सुरु होण्यापुर्वी गेल्या महासभेमध्ये आयुक्त साहेबांनी सांगितले होते की पाणी प्रश्नावर तोडगा काढुन त्याची ठोस उपाययोजना व टॅकरद्वारे पाणी पुरवठा करु असे सांगितले होते. मागच्या महासभेला आयुक्त साहेब कुठल्या कारणास्तव उपस्थित नव्हते. मा. महापौर महोदया आपण सांगितले होते, आधी पाण्याविषयी निर्णय घेवुन मग महासभा सुरु करण्यांत येईल. कृपया आपण सभागृहास सांगावे की आमच्या प्रभागात पाण्याची समस्या आहे. आपण त्यावेळी सांगितले होते की कमीत कमी टॅकर तरी सुरु करणार. पाण्याची समस्या आता सुध्दा आहे, शहरातील मुलभुत सुविधा देण्याकामी महापौर महोदया जरा लक्ष दयावे. त्यानंतरच आपण कोणताही निर्णय दया. जशी आज साफसफाई चालली आहे, कोठे कोठे तर पाण्याची अशी अवस्था आहे, माझ्या प्रभागात दोन दिवस पाणी नाही. तेथे स्लम एरिया आहे, तेथे जर टॅकरद्वारे पाणी आले असते तर कमीत कमी आम्ही बोललो असतो काही ना काही व्यवस्था केलेली आहे. पंधरा पंधरा दिवस, महिना महिना जातो, महासभा लागत नाही आणि लागली तर विषय होत नाही व जर विषय झाले तर त्यावर अंमलबजावणी होत नाही. तर महापौरजी मी विनंती करतो की ही सभा सुरु होण्यापुर्वी आयुक्त महोदयांनी जे आश्वासन दिले होते, आपण आपल्या कॅबिनमध्ये जे आश्वासन दिले होते, आधी त्याची पुर्तता करा मगच ही महासभा सुरु करा.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे ::—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, जसे श्री. अरुण भाऊ यांनी पाण्याविषयी सांगितले की समस्या आहे. त्यांच्या बाजुलाच माझा प्रभाग आहे. पाण्यासाठी तुम्ही टॅकर तर देत नाही परंतु माझी अशी सूचना आहे, ज्या आपण बोरींग चालु केल्या त्या सुध्दा बंद आहेत. आम्ही कुठले तरी एक तुम्हांला सुचवित आहोत की, टॅकर, बोरींग नाहीतर काहीतरी, कशाही पध्दतीने तुम्ही पाणी पोहचवा, बुधवार पासुन आम्हांला पाणी नाही. खरच साहेब फोन बंद असतात, लाईन तुटली तर श्री. सेलवन साहेब आम्हांला वॉट्सअपवर फोटो सुध्दा पाठवितात, आम्ही दाखवितो लोकांना. परंतु लोक काय म्हणतात की ज्या दिवशी आले तर बाजुला पाणी आहे, येथे आहे तेथे आहे आम्हांला का नाही असे म्हणतात तर आम्ही किती जणांना काय उत्तर दयायचे? तर ज्या ज्या प्रभागात तुम्ही बोरींग दिलेल्या आहेत, माझ्या मते आम्ही तुम्हांला उपाय सांगत आहोत की बोरींग चालु करा, जेथे टॅकर देता येईल तेथे दया, काहीतरी उपाय करा. कारण आता हा फेब्रुवारी महिना आहे, मार्च, एप्रिल, मे तीन महिने आम्हांला पुर्णपणे क्रायसेस मध्ये आणि बुधवार ते रविवार पर्यंत आम्हांला फोन घ्यावासाच वाटत नाही. एवढा त्रास आहे तर कृपया जे अरुण भाऊंनी सांगितले तेच मी सांगते, माझ्या प्रभागात तीन चार बोरींग झालेल्या आहेत, कोठे मोटर जळल्या, पाणी येत नाही तर ते करुन ते चालु करा. नाहीतर आपली लेव्हल वाढवुन आहे तसे पाणी दया. कुठल्याही परिस्थितीत आम्हां दोघांच्याही प्रभागात पाणी देण्याची कृपा करा.

**सदस्या श्रीमती जोत्स्ना जाधव :—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आमच्या प्रभाग १३ मध्ये जी पाण्याची टाकी बनविली आहे, कोणत्या कारणासाठी ते काम थांबले आहे आणि त्यामुळे लोकांच्या तोंडाला आम्हांला सामोरे जावे लागत आहे. आम्ही रविवारी स्वच्छता मोहिम काढली होती. त्याच्यामध्ये आमच्या येथे येवुन कचरा लोकांनी टाकला की तुम्ही स्वच्छता मोहिम काय सुरु करत आहात आमच्याकडे चार—चार, आठ, आठ दिवस पाणी येत नाही त्याकडे तुम्ही लक्ष देत नाहीत. म्हणजे त्यावेळी आम्हांला ही लाजीरवाणी गोष्ट वाटली होती. आठ आठ दिवस तेथे पाणी येत नाही आणि त्या पाण्याच्या टाकीमुळे काम थांबलेले आहे. आयुक्त साहेब, लक्ष दया काम थांबलेले आहे.

**सदस्य श्री. सुरेंद्र सावंत :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, पाण्याचा प्रश्न बिकट आहे, याबाबत नगरसेवक व सभासदांनी आंदोलन केलेले आहे. आपण या शहरात विहीरी खोदा दोनचार दिवसांपुर्वी आंदोलन करुन, आयुक्त साहेब मी काय म्हणतो त्यावर लक्ष दया या शहरात काय काय घडते त्यावर लक्ष दया. विहीर खोदुन लोकांनी टाऊन हॉल समोर, नगरपालिकासमोर निषेध केला होता. दोन दिवसांपुर्वीचीच गोष्ट आहे, भर रस्त्यात त्यांनी विहिर खोदली व आंदोलन केले, महापालिकेचा निषेध केला. मी म्हणतो जर आपणाकडे पैसे नसतील तर विहीर खोदा. लोकांना पाणी दया, पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे, आमचे काही ठिकाणी प्रकल्प आहेत तुम्ही येवुन पहा, लोक खड्डे खोदतात, वेळ काढा आणि पहा. लोक खड्डा खोदुन झ—यातुन पाणी काढत आहेत. लोक खड्डा खोदतात हे श्री. सुनिल सुर्वे यांना माहित असेल, लोक खड्डा खोदुन झ—यातुन पाणी काढुन मग ते वापरतात. आपली आज ड वर्ग महापालिका आहे आणि आपण लोकांना पाणी देवु शकत नसाल, तर येथे बसून आमचा काय उपयोग. फक्त आश्वासन देत असतात असे करु, तसे करु पुढील सभेपर्यंत पाणी देवु. काही होत नाही, बोरींगचा प्रश्न आहे, बोरींग आपण रिपेरींग करु शकत नाहीत, तर विहीरी खोदा जर ही सूचनाच मान्य नसेल तर महापालिका बंद करा. आम्हांला पाण्याचा प्रश्न महत्वाचा असून आम्हांला पाणी दया. धन्यवाद।

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**मा. महापौर महोदया, पॅनल नं. १७ अ मध्ये पाण्याचा त्रास आहे. जर आपण तेथे जे काम बाकी आहे ते केले तर पाण्याची समस्या मिटेल, तेथे ब—याचशा इमारती आहेत. गरीबांची वस्ती आहे, तेथे पाण्याची तंगी आहे व वारंवार तेथुन फोन येत आहे. याकडे लक्ष देवुन सहकार्य करावे, धन्यवाद।

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपण पाहत असाल की प्रत्येक महासभेला पाण्याचा प्रश्न येतो, आमच्याकडे पाण्याचा प्रश्न अजुनही सुटला नाही. आमच्या येथील जो प्रभाग आहे तेथे अत्यंत बिकट परिस्थिती आहे, तीन दिवसाआड पाणी येते, तिस—या दिवसी पाणी आल्यामुळे काय झाले की तो प्रभाग शेवटी पडतो. अगोदरच्या लोकांना पाणी मिळते व शेवटी येईपर्यंत ते बंदच करत नाही कारण तीन दिवसानंतर पाणी येते, आणि घरातील कपडे, भांडी व इतर कामे राहिलेली असतात. आज नगरसेवक जे सांगत आहे तर अख्या उल्हासनगरमध्ये परिस्थिती खराब आहे. माझी आपणांस वारंवार विनंती होती, मागील वेळेस आपण महापौरांकडे सभा होती तेव्हा सांगितले, अधिका—यांनी डिटेल दयावी की कोठे टॅकर्स लागतील, की ताबडतोब टॅकर्सची व्यवस्था करतो, दुर्देवाने अधिका—यांना आम्ही पत्र दिले, दुस—या दिवशीच पत्र दिले, पत्र दिल्यानंतर सांगितले की जावुन तुम्ही चौकशी करा. मी तुम्हांला मागे पण सांगितले की अलंकार बिल्डींग ७२ फ्लॅट आहेत. त्यांनी रविवारी सभा घेतली ११.०० वाजता आम्हांला बोलाविले. अक्षरक्ष: त्यांनी टॅकरचे ८० हजार रुपये बिल काढुन दाखविले. आपण त्यांच्याकडुन टॅक्स वसुल करतो, पाण्याचे बिल वसुल करतो. आणि लगभग लोकांनी कर भरलेला आहे. आता आकडा जो कराचा आहे तो ब—याच अंशी खोटा आहे. त्याला कारण असे की दुबार नोंद आलेली आहे, त्याला भाडोत्री लागली आहे. आजच मी एक पत्र दिले आहे, २००२ पासुन ती व्यक्ती भाडोत्री नाही म्हणुन पत्र दिलेले आहे. २०१७ मध्ये पंधरा वर्ष झाली तरी भाडोत्रीची आकारणी कमी होत नाही, जे त्रस्त आहे ते त्रस्त आहेत व जे चोरी करत आहे ते करतच आहेत. आजच्या सभेच्या अनुषंगाने तुम्ही विषय तो चांगला आहे, खर्च आहे व खर्चाच्या अनुषंगाने इतर गोष्टी आहेत. आम्ही श्री. सेलवन साहेबांना विचारले की आम्हांला किती टॅकर लागतील वगैरे तुम्ही सांगा, श्री. सोनावणे म्हणाले जरा अडचणीत आहे, श्री. रहेजा यांच्याकडे पाठविले आहे. किती टॅकर लागतील ते साहेबांपर्यंत दया, मी काल श्री. सेलवन साहेबांना सुध्दा सांगितले. कमीत कमी एक पर्यायी व्यवस्था त्यामध्ये साहेब असे करा मी तुम्हांला सूचना देतो जेव्हा ४ नंबरला पाणी असेल तर ५ नंबरला टॅकर्सद्वारे पाणी पुरवा आणि ज्यावेळेस ५ नंबरला पाणी असेल तर ४ नंबरला टॅकरर्सद्वारे पाणी पुरवा. त्यांना एक दिवसाआड जरी मिळाले तरी त्यास रिलीफ मिळेल. काही तरी व्यवस्था केल्याशिवाय काहीही होणार नाही. तुम्ही मागणी करता बरोबर आहे, तुम्हीपण आम्हांला समजु शकता. दोन वर्ष बिजी अभावी सर्वीच अडचण झालेली आहे, त्यामुळे नगरसेवकांचा अधिका—यांशी भांडणे वाढायचे कारण तेच आहे. तुम्हांला एक गोष्ट सांगतो साहेब, या राज्य सरकारचे ५ कोटीचे कर्ज आहे. तरी सुध्दा ते काम करण्याकरीता कर्ज उचलतात. आमच्यावर काहीही कर्ज नाही असेल तर १०० कोटी कर्ज असेल. पर्यायी पण दुसरे सुध्दा आहे. ज्या गोष्टी तुम्हांला निदर्शनास आणतो, तुम्ही सुध्दा अंमलबजावणी करु शकतो याची सुध्दा आम्हांला खात्री आहे. आता तुम्ही एक गोष्ट पाहिली असेल तर रस्त्यावरील हातगाडया उचलण्याकामी दंडवगैरे आकारला, कोणताही नगरसेवक मध्ये आला नाही, तुम्ही दंड आकारणी केली आम्ही काहीही म्हटले नाही. चुक असेल तर दंड आकारणी करा आमचे काहीही म्हणणे नाही. परंतु त्याकरीता प्रशासनाने सुध्दा काम केले पाहिजे. एवढेच तुम्हांला निवेदन करतो.

**सदस्या श्रीमती सुरेखा आव्हाड :—**पाण्यासाठी प्रत्येक महासभेत चर्चा झाली तरी अदयापपर्यंत त्यास उपाययोजना झालेली नाही. साध्या रिपेरींगचे काम होत नाही. गटार खोदुन ठेवले आहे त्या गटारायचे साचलेले पाणी परत रस्त्यावर येते. कमीत कमी दुरुस्तीचे काम व्हायला पाहिजे ना, कमीत कमी रिप्लेस आहे ते काम

व्हायला पाहिजे ना. आम्ही बोलतो तर आमच्या बोलण्यास अर्थच नाही. त्यासाठी आम्ही कोणाकडे गेलो तर त्याचे उत्तर आम्हांला मिळतच नाही. पाण्यासाठी काय होणार आहे काही तरी आम्हांला सांगा आम्ही लोकांना काय सांगणार.

**सदस्य श्री. अरुण आशान :–**आयुक्त साहेब, वारंवार हा प्रश्न उपस्थित होतो. श्री. सेलवन साहेब येथरेम उपस्थित आहेत, काही नगरसेवकांनी प्राकलन बनविले ते सुध्दा सादर झाला? किती बोरींग चालु झाल्या किती बोरींग बंद पडले आहेत, त्याचा काही तपशिलवार खुलासा येथे महासभेत होईल का? छोटया छोटया गोष्टी, लाख दोन लाखाचे कामे असतात त्यासुध्दा तुमच्यासमोर सादर होत नाहीत. ही शोकांतिका आहे, आपण सांगता प्रशासनाला परंतु प्रशासन काहीही करत नाही, प्रत्येक मिनिटा मिनिटाला आयुक्तांनी सांगितले तरी आयुक्तांचे आदेश किती पाळत आहे प्रशासन? आपणच मागील वेळेस सभा झाली तेव्हा सांगितले की जे काही छोटया छोटया एस्टिमेट असतील त्या आणा. मी करुन देतो परंतु ते सुध्दा आठ–दहा दिवस झाले त्याच्यावर सुध्दा अंमलबजावणी होत नाही मग हा विषय किती दिवस चालवायचा पाण्याचा? महासभा संपल्यावर महापौर महोदया आपण बैठक बोलावल्यावर तेथे चर्चा झाल्यानंतर सुध्दा त्यावर काही होत नाही. तर मग हे किती दिवस चालणार की पाण्यासाठी आम्हांस उठुन उभे रहावे लागेल. किती अश्रु गाळणार महापौरजी, किती विषय आणतो शहरासाठी त्या शहरासाठी तर विचार करा. सफाई कशी करणार, सफाईसाठी पाण्याची आवश्यकता आहे तर मी आपणांस यावर काय खुले सांगणार, कृपया गंभीरता घ्या, पाण्याचा कोणताही विषय नाही घेणार तर यापुढे सभा नाही होणार. आम्हांला आजच निर्णय दया की बोरींगचे काय होणार, टॅकरचे काय होणार. पाण्याच्या समस्येचे काय होणार, जी बिले नगरसेवकांनी प्रभागासाठी दिले आहेत त्याचे काय होणार, कृपया आयुक्त साहेब तुम्ही यावर तपशिलवार सांगा. पुढच्या महासभेपर्यंत आम्हांला निर्णय नको, आज जे होईल ते आजच.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिवजी, माय फिथ रिमायंडर टु कमिशनर जनरल बॉडी मिटींग फेस टु फेस ॲण्ड फेस टु मिटींग, बिटवीन रिमायंडर ॲण्ड डिपार्टमेंट अल्सो. आपणांस मी सांगतो प्रत्येक वेळेस माझी एक अडचण असायची पाण्याविषयी. मी पाण्यासाठी लढतो, मी जिंकेल तर पाण्यासाठी आणि हारतो तर पाण्यासाठीच. मला वाटते हे षड्यंत्र करत आहेत की पाणी जर नाही दिले प्रभागात तर लोकांचा मार खाऊ व हारणार. रतनगार्ड एरिया, साईबाबा सोसायटी, मधुसुदन एरिया, मी किती वेळा सांगितले आहे, आपण हो म्हटले आहे व आपण हे सुध्दा म्हटलेम आहे, जेव्हा कोणताही विषय असतो किंवा महासभा असतो तर संबंधीत विभाग प्रमुख आले पाहिजे आपण हजेरी पहा की किती अधिकारी आले आहेत, ही गोष्ट मागील वेळ उचलण्यात आली होती व शिवसेनेचे लोक खाली बसले होते त्यावेळी महापौर महोदया यांनी म्हटले होते पुढील महासभेच्या वेळी माझ्या दालनात या मी सर्व गोष्टी सोडवुन देते त्यावेळी २० नंबर प्रभागाचे लोक मोर्चा घेवुन आले होते. महापौर महोदया आपणच सांगा की किती लोक आपणाकडे आले होते. मी शहराच्या हिताविषयी बोलत आहे व माझ्या प्रभागाचे तर सहावे स्मरण असेल हे. माझ्या प्रभागातुन सुध्दा आपणांस फोन येतात की नाही येत, मोर्चा येतो की नाही येत. मी म्हणतो फेब्रुवारीमध्येच एवढी पाण्याची समस्या झालेली आहे, आता आमचे श्री. अरुण भाऊ म्हणाले, आमच्या श्री. बोडारे महोदया म्हणाल्या अताच एवढी पाण्याची समस्या आहे तर पुढे चालुन काय होणार, याचा कोणी निर्णच घेवु इच्छित नाही. कोणासाठी काय करता काय नाही करत ते आपणांस माहित आहे. आम्हांस जनता हेच म्हणते की जेवढा कर भरतो तेवढी सुविधा आम्हांस मिळते काय, आम्ही जनतेकडे कसे जाणार, आता सपना गार्डन असो, गोल मैदान असो आम्ही तेथे चालु शकत नाही. चालायला जातो तर अडवितात डॉक्टर साहेब हे काम करा. निधी नाही तर मी काही करु शकत नाही. काम होत नाही, शहरात कोठे लपावे हे तर सांगा. घरात लपु नाही शकत, दवाखान्यात लपु नाही शकत, गार्डनमध्ये लपु नाही शकत. जाणार तर कोठे जाणार. महासभेत लपुन यावे लागते. हा एरिया किती दिवस कोरडा राहणार, श्री. सेलवन आपणांस माहित असणार हा एरिया किती कोरडा आहे ते.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे::–**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, पाण्याचा त्रास हा दिवसेंदिवस गंभीरच होत आहे. स्वच्छता अभियानाअंतर्गत जे शक्यच नाही तेवढे प्रश्न आम्हांला लोक विचारत आहेत. सुभाष टेकडी येथे तर पाण्याचा एवढा त्रास आहे तेथे नियमित पाणी येतच नाही. पाणी येते १५–२० मिनिटे त्यातल्या त्यात वेळ बिल्कुल नाही. सगळया महिला कामगार आहेत तर त्यांनी पाणी भरण्यासाठी घरीच थांबायचे का कामावर जायचे. काम सोडुन त्या घरी येतात की चला ३.०० वाजता पाणी येणार आहे परंतु पाणी २.०० वाजताच येवुन जाते. दुसरी गोष्ट लिकेजचा एवढा त्रास आहे की मी पंधरा दिवस झाले सांगितले आहे येथे येथे लिकेज आहेत परंतु अदयाप त्यावर काहीही झाले नाही. ४ नंबरचा जो कामगार वर्ग आहे तो कमी आहे तर तेथिल स्टॉफ तरी वाढवुन दया तुम्ही. कारण अतिशय त्रास आहे. माझ्या घरासमोरील लिकेज दुरुस्त करत नाही वारंवार फोन करुन सुध्दा आणि पाणी किती लिकेज होत असते. न्यु पाईप लाईन असेल तर त्यात सुध्दा कडक धोरण अवलंबिले पाहिजे, ज्या जुन्या पाईप लाईन आहेत ते बंद करुन नविन सुरु करावे. कारण लोकांनी ते

पाईप मोकळे सोडुन दिले आहे. किती लोकांना ते कडक दंड म्हणुन वसुल केला आहे. आता आमच्याकडे चार दिवस पाणी नव्हते. तसेच पाण्याची काही वेळ नाही. पंधरा मिनिटे फक्त पाणी येते तर लोकांनी काय करायचे, लग्नात सुध्दा गेले तर तोच प्रश्न असतो पाणी कधी येणार आहे.

**सदस्या श्रीमती कांचन लुंड :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा पाण्याचा विषय गंभीर विषय आहे, माझ्या प्रभागात सुध्दा पाणी पाच सहा दिवसांपासुन बंद आहे, शुक्रवारी तर पाणी येतच नाही, आणि त्यामुळे शनिवार, रविवार त्या पाण्याचा परिणाम होतो, लिकेज तर एवढया आहेत त्या दुरुस्त करण्यास कोणी येतच नाही. तर सर्वांना विनंती आहे की जे शुक्रवारी पाणी बंद असते ते सुरु करण्यात यावे, एमआयडीसी यांना सांगुन. लोक ऐकत नाहीत, आम्ही त्यांना पाच, पाच दिवस, सहा, सहा दिवस पाणी नाही देणार तर कसे होणार साहेब.

**सदस्या श्रीमती सविता तोरणे:—**आदरणीय महापौर आणि आयुक्त साहेब, बुधवारपासुन प्रभागात पाणी नाही, मी फोन केला होता आणि श्री. पाटील साहेब तर प्रश्नाचे उत्तर देतच नाही. त्यांना तर व्यवस्थीतपणे उत्तर देताच येत नाह म्हणुन मी तुम्हांला रविवारी फोन केला, त्यांनी फोन केला तर ते म्हणतात तुमचा मोबाईन नंबर नाही आहे हा, तुमच्या मिस्टरांचा आहे, त्यावरुन तुम्ही फोन करता, पण फोन केला ना मी तुम्हांला. लिकेज तर भरपुर आहेत. जेव्हा आम्ही स्वच्छता अभियानासाठी फिरतो तर लोक आम्हांला प्रश्न विचारतात. पाण्याचा वेळ निश्चीत नाही फक्त २० मिनिटे पाणी येते. महाराणा प्रताप चौकाचीही हीच व्यथा आहे, पाणीच नाही तेथे.

**सदस्या श्रीमती शुभांगिनी निकम :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, इलेक्शन झाल्यापासुन आम्ही लोकांना हेच उत्तर देतो की एमआयडीसीकडुन पाण्याचा त्रास आहे म्हणुन आता लोकांना आमच्यावर विश्वास राहिलेला नाही. एमआयडीसीची जी अडचण आहे ते आपणांस माहित आहे पण लोकांना माहित नाही. त्यासाठी काहीतरी आपण तरतुद करावी जेणेकरुन लोकांना सुध्दा कळेल की नक्की काय अडचण आहे ती. लोकांचा आमच्यावरील विश्वास उडाला आहे. आता जशा श्रीमती साळवे मॅडम म्हणाल्या की आम्ही लग्नाला गेलो तरी लोक आम्हांला विचारतात आम्हांला लोकांना उत्तर दयावे लागते. लोक विचारतात पाण्याचे काय आहे आम्ही तीन तीन चार चार दिवस कसे पाणी आणणार. जर हा त्रास आहे तर महापालिकेने लक्ष दयावे ना. लोकांना वाटते की यांच्या तोंडाला हे एकच उत्तर भेटलेले आहे की एमआयडीसीचा प्राब्लेम आहे. आणि आम्हांला सुध्दा लाज वाटते की आम्ही लोकांना किती दिवस काय उत्तर दयावे.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो पाण्याचा विषय आहे, फारच गंभीर विषय आहे, शहरातील कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असो जर प्रभागात पाणी आले नाही तर लोक त्रास देत असतात. मागील वेळेस महासभेत आयुक्त साहेबांनी पाण्यासंदर्भात म्हटले आहे की कोणताही अडचणी असेल तर मी आहे. आता आमच्या सदस्या बसल्या आहेत त्यांच्या ६ लाखाची अडचण आहे, प्राकलन बनविले आहे ते जर बनविले तर त्यांच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. आयुक्त साहेबांना विनंती आहे जेथे जेथे पाण्याचा त्रास आहे तर तेथे बोअरवेल व पंप लावले तर प्रश्न सुटेल लोकांना पिण्यासाठी नाही तर वापरण्यासाठी ते पाणी कामात येईल. ब—याच वर्षापुर्वी असे काही बोअरवेल लावण्यात आले होते त्यात पाणी नव्हते. तर दुस—या जागेत बोअरवेल व जेटपंप लावले तर त्या एरियाचा त्रास कमी होईल असे मला वाटते. दुसरे म्हणजे संपुर्ण उल्हासनगरच्या पाण्याची वेळ फिक्स नाही. त्यासाठी मी सहा—आठ महिन्यापुर्वी एक अर्ज दिला आहे. ज्यांच्या प्रभागात जर प्रथम पाणी येणार असेल तर सायरन वाजले पाहिजे, तेथिल एरियाच्या लोकांना माहित पडेल पाणी येते ते. जसे प्रेमनगर टेकडीच्या एरियात मी पाहतो, ३ नंबर येथिल दसेरा मैदान येथे पाहतो तर जेव्हा केव्हा ते संपाचे पाणी सोडता तर सायरन वाजतो. तर गोल मैदान येथे ब—याच जागी साहेब सायरन लावण्यात आलेला आहे. आता जश्या श्रीमती कांचन महोदया यांनी सांगितले कधी लाईन तुटते, कधी शुक्रवारी पाणी न आल्याने त्याचा परिणाम शनिवार व रविवारी होतो. एमआयडीसी यांच्यावर अवलंबुन असल्यामुळे कोणतीही वेळ फिक्स नाही. सायरन लावला तर लोकांना कळेल तरी की पाणी येत आहे नाहीतर संपुर्ण दिवस लोकांना वाट पाहावी लागते. आयुक्त महोदयांनी स्वच्छता अभियांनाबाबत जसे लक्ष दिले त्याचा परिणाम सुध्दा आला आहे. आज सुध्दा समिती उल्हासनगरमध्ये त्याचा सर्व्हे करत आहेत, त्यासाठी आयुक्तांची प्रशंसा केली पाहिजे की त्यांनी उल्हासनगरसाठी एवढा विचार केला आहे. कमीत कमी उल्हासनगरमध्ये एक पॅनल ८० लाख, दुसरे ४० लाख व तिसरे ५० लाख, जो कोणता पॅनल जिंकणार तर कमीत कमी त्या प्रभागाचा विकास होईल. जसे आपले स्वच्छतेबाबत इम्पलीमेंट झाले तसेच आपल्या पाणी पुरवठयाकडे लक्ष दिले, छोटे मोठे एस्टीमेट असो किंवा जेटपंप लावणे वगैरे तर मला असे वाटते उल्हासनगरची जी समस्या आहे सुटु शकेल. धन्यवाद।

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. सेलवनजी मी गेल्या सात ते आठ महिने आपणांशी पत्रव्यवहार करत आहे. एस्टिमेट मला वाटते आठ ते नऊ महिने झाले असतील, तुम्ही कुठली ॲक्शन घेत नाही. हनुमान नगरचा प्रश्न असो किंवा कुठल्या लिकेजचा मी पाठपुरावा करत आहे, मी निवेदनही दिले अदयापपर्यंत काहीही कारवाई केली नाही किती दिवस वाट पहावे लागणार आहे, तेथे पाण्याची सुविधाच नाही. या नविन वस्तीला

गेली चार महिने पाणी जात नाही. खाली येवुन पाणी भरतात तेथे प्रायव्हेट टॅकर मागवितात. आठ ते नऊ महिने एस्टिमेट बनवुन झाले त्यावर काही कार्यवाही नाही, कोठे पाण्याचे लिकेज आहेत, काम होत नाही, मान्यता मिळत नाही, का मान्यता मिळत नाही. लवकरात लवकर काम सुरु केले तर माझ्या प्रभागातील रामदेव नगर व हनुमान नगरचा पट्टा आहे तेथे तरी पाणी येईल.

**<u>सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u>**मा. महापौरजी, उप–महापौरजी, उल्हासनगर महापालिका अस्तित्वात आल्यापासुन मला वाटते आजपर्यंत पाण्याचा जो प्रश्न आहे तो ज्वलंत असा प्रश्न कायम स्वरुपी आहे. उल्हासनगर महानगरपालिका अस्त्विात आली त्यावेळेस प्रशासनाने एक प्रस्ताव टाकला होता उल्हासनगर शहरातील प्रत्येक माणुस पाणी पितो त्याने पाण्याचे बिल दिले पाहिजे, भलेही त्याच्याकडे लाईट असो अथवा नसो, आम्ही मान्यता दिली प्रत्येक नागरीकाला पाण्याचे बिल भरावे लागते, जो बिसलरी बिल असो तेही भरावे लागते. प्रत्येक नागरीक कर भरतो त्याला पाण्याचे बिल भरावेच लागते. एवढे असुन सुध्दा आजपर्यंत आपणाला पाण्याच्या प्रश्नासाठी झगडावेच लागते. मध्ये आपण कोणार्कची ३०० कोटीची योजना आणली. काहीही झाले नाही आजही पाण्यासाठी वणवण भटकत आहोत. दर आठवडयाला कमीत कमी चार ते पााच दिवस पाणी नसते जनता आम्हांला सर्वांना शिव्या देते आम्ही किती लोकांना सांभाळायचे आम्ही त्यावेळेस विनंती केली होती की ज्या ज्या लोकांना पाणी येत नाही त्यांची पाणी पट्टी माफ करावी आजही आमची तीच मागणी आहे. दुसरी मागणी या शहरात येणा–या मार्च, एप्रिल व मे यामध्ये लग्नसराई वगैरे असतात अशा वेळेस पाण्याची गरज असते. जेथे पाणी येत नाही तेथे टॅकरची व्यवस्था करावी. माझ्या प्रभागात बोअरवेल आहे खराब आहेत, खराब परिस्थितीत आहे, वारंवार सांगुनही काहीच होत नाही. आम्हांला आमच्या स्वतःच्या पैश्याने करावे लागते दुरुस्ती करावी लागते आणि ही वस्तुस्थिती माझ्याच प्रभागात नाही तर संपुर्ण शहरात आहे तर आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे बोअरवेल व टॅकरची व्यवस्था करावी, जेथे जेथे कार्यक्रम असतात तेथे बोअरवेलची व्यवस्था करावी धन्यवाद।

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>**उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा हा एमआयडीसीकडुन होतो, स्वतःचे स्त्रोत नाही. इतर ठिकाणी कल्याण आहे, भिवंडी आहे यांना स्वतःचे स्त्रोत आहे, त्यामुळे पुढील नियोजन करुन ते पाणी घेवु शकतात. एमआयडीसी शुक्रवारी पाणी देत नसल्याने ते गुरुवारी रात्रीच पाणी पुरवठा बंद करतात, पहाटे पाणी येण्याची आशा असते. परंतु कोठेतरी पाण्याची पाईप लाईन फुटली तर रविवारी सुध्दा आपणांस पाणी येत नाही. शुक्रवारचे पाणी आम्हांस स्टोरेज करुन सोमवारपर्यंत पुरवावे लागते त्यामुळे ते काही भागात जाते काही नाही जात. तीन दिवस पाणी पुरवठा विस्कळीत होवुन जातो. पालवरुन येणारी एमआयडीसे पाईप तुटले असल्याने पाणी नव्हते याबाबत मी वॉटसअपवर सुध्दा दिले होते. तसेच काही भागात जेएनएनयुआरएमतर्फे तसेच जुन्या लाईनने सुध्दा काही भागात पाणी पुरवठा करावा लागतो. वितरण व्यवस्थेचे जे कनेक्शन आहे ते ब–याच ठिकाणी तुटुन गेलेले असते. नविन लाईनवरुन कनेक्शन घेतात तर जुन्या लाईनचे कनेक्शन बंद करत नाही त्यामुळे त्याच्यामध्ये आम्हांला दुरुस्ती करण्यास बराच वेळ जातो. काही ठिकाणी पाईपलाईनची जी गळती आहे ती जुन्या लाईनची आहे. नविन कनेक्शन लोक घेतात व जुनी लाईन बंद करत नाही त्यामुळे गळती वाढते.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :–</u>**मा. महापौरजी, हे गोलमोल करुन फिरुन फिरुन गोष्ट सांगत आहेत. श्री. सेलवन तीन दिवस शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होतो म्हणुन तुम्ही सांगता एका साईडला पाणी पुरवठा प्रती दर १ रुपये ४८ पैसे. प्रती व्यक्ती, प्रति कुटुंब, प्रति महिना ४४ रुपये, ४४ पैसे, ज्या दिवशी पाणी येत नाही त्यादिवशी बिलातुन पैसे कमी करणार का? हे कोणाला दाखविता? कोणाला रोजच्या रोज गोष्ट सांगता, आम्हांला कोठुन पाणी येते आणि कोठुन येत नाही हे सांगु नका, पाण्याची अंमलबजावणी तुम्ही कशी करणार ते सांगा. महोदया, बॅनरवर लिहिले होते आम्हांला गोष्ट नको तर पाणी पाहिजे. आम्हांला स्टोरी नाही पाहिजे. एका जागी आपण लिहिता ३ रुपये ४८ पैसे प्रति व्यक्ती, प्रति दिवस प्रत्येक व्यक्तीचा कर मिळत असतो. जर ३० दिवस पाणी येत नाही तर काय त्याचा कर कमी करणार? हे काय आहे, रोज रोज फिरवुन फिरवुन गोष्ट सांगता, मराठीमध्ये म्हण आहे फिरुन भोपळे चौकात. भोपळयाची भाजी आम्हांला नको, पाण्याचा जोपर्यंत ठोस निर्णय होणार नाही, तोपर्यंत महासभा चालु देणार नाही. हा सभागृहाचा प्रश्न नाही तर संपुर्ण उल्हासनगरचा प्रश्न आहे, महापौर महोदया, आपण सुध्दा म्हणाला होतात की माझ्या येथे पाणी नाही. आपण विचारा, आयुक्त साहेब बसले आहे, पाण्यासाठी काय करणार, आम्हांला कुठलाही बहाणा नको आहे. टॅकरने पाणी कसे देणार, पाण्याची व्यवस्था कशी करणार आणि ज्या दिवशी पाणी राहणार नाही त्यादिवशी शहरात कशी व्यवस्था होणार? श्री. सेलवन साहेब, त्यादिवशी श्री. अंकुश म्हस्के यांनी तुमच्याकडे फाईल आणली होती मी तुम्हांला सांगितले होते की स्वाक्षरी करा, परंतु त्यादिवशी तुम्ही मला दिवसभर फिरविले. आयुक्त साहेब येथे उपस्थित आहे तुम्ही उत्तर दया आताच्या आता. या स्टोरी बंद करा, तुम्ही सभागृहाला गोल गोल फिरविता. तुम्ही आठ आठ दिवस पाणी देत नाहीत. महिला नगरसेविकांना प्रभागात किती त्रास आहे, तुमच्या घराचा पत्ता दया सगळयांना तेथे पाठवितो मग समजेल कशा शिव्या देतात ती लोक. हे काय आहे, तुम्ही

म्हस्करी लावली, प्रत्येक नगरसेवकाने आपली भावना व्यक्त केली. तुम्ही स्टोरी सांगतात की, एमआयडीसीकडुन पाणी कसे येते व तीन दिवस कसे बंद पडते. हे बरोबर नाही. पाणी कसे देणार?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**साहेब, स्टोरी नाही आहे ही. तुम्हांला वस्तुस्थिती माहित आहे.

**सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—**तुम्ही लिकेजसाठी काय करणार, एक पाईप जर चेंज करायचा असेल तर तुम्ही आयुक्त साहेबांना भेटायला सांगता.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**त्यासाठी दोन प्राकलने मंजुर केलेले आहे. तुमच्या प्रभागात काम सुरु आहे.

**सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—**माझ्या प्रभागात जरी काम सुरु असले तरी आमचा पुर्ण प्रभाग निवडून आलेला आहे. प्रभागातील लोकांना काय उत्तर दयायचे.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**आयुक्त साहेबांनी सांगितल्या नंतर, त्यादिवशी आयुक्त साहेब गंभीर विषयासाठी पालकमंत्री यांच्याकडे दौरा चालु असतांना सुध्दा, त्या दौ—याच्या विषयाची सभा खंडीत करुन तुम्हांला ताबडतोब श्री. देहेरकरांना भेटुन ते प्राकलन तयार करायला सांगितले होते. उत्तर दया, आयुक्त साहेबांनी दिलेला शब्द तुम्ही पाळला का?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**प्राकलन आमच्याकडे आलेले आहे ते रिवाईज्ड करायला सबमिशन तयार केले.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**तुम्ही आजपर्यंत तरी केले का? आतापर्यंत दाखवा. सर्व सभागृहाला दाखवा. आयुक्त साहेब, अशा अधिका—यावर कारवाई करा. ठोस कारवाई करा. हे काय आहे? महापौरांचे ऐकायचे नाही, आयुक्तांचे ऐकायचे नाही, नगरसेवकांनी डोकेफोडी केली तर त्यांचे ऐकायचे नाही. ही मनमानी किती दिवस चालेल. अजीबात चालु देणार नाही. पाणी कधी देणार तेवढेच सांगा बाकी आम्हांला काही सांगायचे नाही.

**सदस्या श्रीमती सुरेखा आव्हाड :—**श्री. सेलवन साहेब, तुम्ही एक मुद्दा मांडला की लोक जुने कनेक्शन कट करतात व नविन कनेक्शन घेतात. मग तेथे पाणी गळती होते. मला काय सांगायचे आहे, ज्या लाईनला पाणी आहे, लोकांना जेथुन पाणी मिळते तर त्यांनी खर्च करावा याची त्यांना हौस आहे का? ज्या लोकांना कर भरायची ताकद नसते तर ती लोकांना हौस आहे का, जुने कनेक्शन काढुन नविन ठिकाणी खर्च करायचा. त्यांना कोणी मोफत लावुन देतात काय? ते का दुसरीकडे कनेक्शन घेत असतील? तर ज्या लाईनला पाणीच नाही तर ते कनेक्शन घेवुन करणार काय? ज्या ठिकाणी गळती होते तेथे जेव्हा आपण रिपेरींग करायला येतो, त्या पाण्याला प्रेशर नसते. ते पाणी गटारात जाते आणि पुन्हा ते पाणी पाईपलाईनमध्ये शिरते. ते दुषित पाणी लोक पितात.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, आजची ही विशेष महासभा उपभोक्ता कर या विषयासाठी बोलाविण्यात आलेली आहे, सभा सुरु होण्यापुर्वी सभागृहाची जी भावना आहे, जो सर्वांना त्रास आहे, थंडीच्या वेळी सुध्दा पाण्याचा त्रास आहे. एक वर्षापुर्वी उदया २१ तारीख आहे तर उदयाच्या दिवशी एक वर्षापुर्वी निवडणूक झाली होती. तर एप्रिलमध्ये पहिल्या सभेत महापौर बसल्या होत्या व मला नाही वाटत की त्या एप्रिल महिन्यापासुन आतापर्यंत जेवढया महासभा झाल्या त्यात पाण्याचा विषय झाला नसेल. तो भलेही अजेंडावर असो अगर नसो तर तो विषय झाला नसेल. पाण्याविषय १० नगरसेवक व नगरसेविकांतर्फे आरडाओरड चालु आहे एवढा त्रास आहे, दु:ख आहे, ख—या अर्थाने काही त्रास आहे म्हणुनच हे दु:ख व त्रास व्यक्त केला जात आहे, ही काही बनावट नाही, हा काही दिखावा नाही. तर थंडीच्या दिवसात पाण्याचा एवढा त्रास आम्ही झेलत आहोत, येणा—या मार्च महिन्यात किंवा एप्रिल महिन्यात, हवामान खात्याचा अंदाज आहे की सर्वात जास्त उन्हाळा एप्रिल महिन्यात सुरु होईल, ती पुढे ऑगस्टपर्यंत असेल. तसेच ३९ ते ४० तापमान आपल्या कोकण विभागात असणार असा हवामान खात्याचा चार दिवसाचा अंदाज आहे. तर आपणाकडे कसा हाल होणार ते पहा. आज सभागृहात बरेचसे सदस्य उपस्थित नाहीत काहींच्या घरात लग्न आहे, काहींच्या घरात मृत्यु झाला आहे, कोणी हरिद्वारे येथे गेले आहेत. पाण्याविषयी प्रत्येक महासभेत आम्ही ओरडलो परंतु कुठलाही ठोस निर्णय आम्हांस मिळत नाही. आपण प्रत्येक वेळेस म्ळणतो की येणा—या महासभेत आपण याचा निर्णय घेवु. आयुक्त महोदय आपण जबाबदारी घ्या, संबंधीत अधिकारी आपण जबाबदारी घ्या. या गोष्टीचे उत्तर दया परंतु उत्तर आजपर्यंत सुध्दा मिळत नाही. सभागृहाच्या भावना पाहुन मी आपणांस विनंती करतो मा. महापौरजी, जोपर्यंत पाण्याविषयी ठोस निर्णय मिळत नाही तोपर्यंत

या महासभेस ॲडजॉन करण्यात यावे. यावेळी महासभा तात्काळ अनिश्चित कालावधीसाठी ॲडजॉन करण्यात यावी. जसे संपुर्ण शहरात मिडीयामार्फत एक संदेश गेला पाहिजे की भविष्यात किती गंभीर समस्या येईल, धन्यवाद।

**सदस्या श्रीमती ज्योत्सना जाधव :—**मा. आयुक्त साहेब, माझी विनंती आहे की श्री. सेलवन साहेबांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दयावे. श्री. सेलवन साहेब, सिध्दार्थ नगर लेपरसीची जी पाण्याची टाकी आहे, तीन वर्ष झाले ती बंद आहे, चालु होत नाही, तर त्याचे कारण काय आहे मा. महापौरांनी आयुक्त साहेबांना त्यांच्यासमोर विचारा की ते का चालु होत नाही अजुन.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**सिध्दार्थ नगर, लालचक्की येथे ईएसआर म्हणतात ते अमृत योजनेअंतर्गत त्या टाक्या आम्ही कमिशन केलेले आहे. बरेच ठिकाणी ज्या गॅपहोल्स आहेत, त्या त्या ठिकाणी ते काढुन आम्ही पाणी सोडले होते. जुनी आणि नविन लाईन सोडा म्हणुन लोकांची मागणी आहे. त्यामुळे त्या टाकीवरुन पुर्णपणे कमिशन करता येत नाही. टाकीवरुन सोडले तर लोकांना व्यवस्थित पाणी मिळते. आपण ते जुन्या लाईनला कमिशन केलेले आहे ते.

**सदस्या श्रीमती ज्योत्सना जाधव :—**परंतु ते कधी होणार?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**महोदया, ते कमीशनींग चालु आहे ना आता. आम्ही ते दोन्ही लाईनवरुन पाणी देतो.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**त्या जुन्या लाईन बंद करा असे त्यांचे अजिबात म्हणणे नाही साहेब. ती टाकी कमिशनींग करुन जर लवकर चालु केली तर लवकर पाणी मिळेल, एण्ड पर्यंत मिळत नाही. त्यामुळे जर लवकर जे काही काम आहे ते किती दिवसात होईल, दोन दिवसात होईल, आठ दिवसात होईल. कारण मागील वेळेस सुध्दा श्री. रमेश चव्हाण यांनी हा प्रश्न आयुक्त महोदयांना केला होता. दोन महिन्यात होईल म्हणुन त्या गोष्टीला आता पाच ते सहा महिने झाले आहे. ही जी वेळ तुम्ही देत आहात ना ती कधी होईल ती त्यांना अपेक्षित आहे.

**सदस्या श्रीमती ज्योत्सना जाधव :—**मागील वेळेस श्री. सुधाकर शिंदे आयुक्त साहेब असतांना हा प्रश्न मी त्यावेळेस केला होता. तेव्हापासुन अजुनपर्यंत हा प्रश्न चालुच आहे. ती पाण्याची टाकी कधी चालु होणार.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**त्या टाकीवरुन कधी दरवाजा आपण सोडतो काही भागातील पाणी सोडतो काही भागात दोन्ही जुनी व नविन लाईन सोडावे लागते. एकच लाईन सोडायचे म्हटले तर काही लोकांना ते पाणी मिळत नाही. पुढच्या विभागात पाईप लाईन टाकण्यासाठी आम्ही प्रस्ताव तयार केलेला आहे.

**सदस्या श्रीमती ज्योत्सना जाधव :—**नुसता प्रस्ताव ठेवुन चालणार नाही ना साहेब. यावर काही तरी नियोजनबध्द काम झाले पाहिजे ना आपले त्या पध्दतीचे.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत जे गॅपहोलसाठी आम्ही तरतुद केलेली आहे. ज्या ज्या एरियामध्ये गॅपहोल आहेत ते लाईन आम्ही करणार आहोत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**म्हणजे हा प्रश्न आहे तो कुठपर्यंत सुटणारच नाही. आता सन्माननिय श्री. मनोज यांनी सांगितले, पाण्याचा प्रश्न पुढे एवढा गंभीर होणार हे आजच दिसत आहे. त्यानंतर बजेट वगैरे होणार, कोण काय टाकायचे वगैरे वगैरे, तुमचा बजेट तुमच्याकडेच नाही. तो सार्वजनिक बांधकाम विभागात आहे, मग तुमचा माणुस तेथे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जाणार. साहेब, या ज्या गोष्टी आहेत ना त्या अक्षरक्ष: शुक्राचार्यसारख्या आहेत. कारण असे का म्हणतात माहित आहे का की ज्याच्या विभागाचे काम आहे ना ते त्या विभागात नाही आहे. बजेट एन्ट्री झाल्याशिवाय पुढच्या गोष्टी होणारच नाही. म्हणजे मे, जुन, जुलै, ऑगस्ट होईल. त्यानंतर निविदाप्रक्रियेस आणखीन तीन महिने लागतील. त्या महिला नगरसेविका वारंवार बोलत आहेत त्यांना काय उत्तर देणार तुम्ही. मराठी माणुस बोलतो तर त्याला तुम्ही व्यवस्थित सांगा ना.? मा. आयुक्त साहेब, बजेट पास होणार नाही तोपर्यंत काय होणार. ज्यादिवशी बजेट पास होईल त्यानंतर एक महिन्याने त्याची पुर्तता होईल मग ते बजेट सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जाते, पाणी पुरवठयाचे पाणी पुरवठयात नाही जात, तेथिल कॉम्पुटरमधुन ते डिलीट होत नाही. हे सर्व उलटे धंदे आहेत, एकाचे दुस—याकडे, दुस—याचे तिस—याकडे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**मा. आयुक्त साहेब, सचिव महोदया, आता जे श्री. लासी यांनी सांगितले की विपक्ष असो किंवा सत्ताधारी पक्षवाले असो, सपुंर्णपणे या गोष्टीने व्यथीत आहेत की प्रत्येक वेळेस पाण्याचामुद्दा, पाण्याचा मुद्दा असतो आणि कितीतरी वेळा विपक्षवाले खाली जमिनीवर बसले आहेत. महापौर

महोदया, आयुक्त साहेबांच्या दालनात बैठक झाली होती. ज्या गोष्टी येथे काढल्या जात होत्या त्याबाबत आयुक्त महोदयांनी त्यास समाधानकारक उत्तर दिले होते. परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे आयुक्त साहेबांनी जे समाधानकारक उत्तर दिले त्याची अंमलबजावणी होत नाही. आपणच सांगितले होते आपल्या दालनात माझ्यासमोर की लिकेजसाठी एक विशेषसाठी पथक बनेल. त्याच्याकडे सर्व सामान असेल, त्याच्याकडे सर्व मशिन असेल. लेबर असतील. जेथे जेथे लिकेज असतील तेथे डिपार्टमेंट तर्फे नाही तर व्यक्तीगत पध्दतीने ते केले जाणार. परंतु दु:ख आहे की त्यावर अदयाप काहीच अंमलबजावणी झालेली नाही. आपण श्री. सेलवन यांना सांगितले की जेवढी बोरींग आहे त्याची चाचणी करा, आपणाकडे फार मोठे इन्फ्रास्ट्रक्चर आहे त्यास फक्त दुरुस्ती करायची आहे, कोठे काय गेले आहे, कोठे काय, कोठे मिटर लाईट नाही. मेंटेनन्ससाठी काही नाही. एका वर्षापासुन त्यावर काहीच कारवाई झालेली नाही. आपण येथे फक्त बोलत असतो साहेब. आपला विभाग आपल्या नियंत्रणात आहे की नाही. हा प्रश्न चिन्ह आहे. सभागृहात त्यावेळी सर्व निर्णय ठरले होते. आपण टॅकरविषयी सुध्दा म्हणाला होता की जेथे आवश्यक असेल तेथे मी टॅकर सप्लाय करणार. याचाच अर्थ असा आहे की आपली काम करण्याची इच्छा आहे परंतु आपला स्टाफ आपणांस सहकार्य करीत नाही. महापौर महोदया जर श्री. लासी यांनी प्रस्ताव केला आहे. जोपर्यंत पाणी नाही, आम्ही मनुष्य आहोत, एक मुलभुत सुविधेचे आपण समाधान नाही करु शकत. या महासभेत काय उत्तर देणार, या सभेस स्थगित करा व येथे एक आदेश दया की पाण्याची समस्या ज्या दिवशी आयुक्त महोदय म्हटले त्याचे इतिवृत्त आहे तर जोपर्यंत पाण्याचे समाधान होत नाही तोपर्यंत महासभा होणार नाही.

**सदस्य श्री. अरुण आशान:—**मा. महापौररजी, आठ दिवसात काय करणार. आजच एवढा त्रास आहे. आयुक्त महोदयांनी आपल्या दालनात सांगितले होते की जोपर्यंत पाण्याचे सिस्टम बरोबर होत नाही जेथे जेथे त्रास आहे तेथे टॅकरने पाणी देणार. तात्पुरता का होईना त्यांना दिलासा मिळतो आज सोसायटीवाले स्वत:च्या स्वखर्चाने टॅकर मागवितात. अत्यावश्यक सेवा म्हणुन पाणी पुरवठा याचा उल्लेख केला जातो. पण ही एकच महापालिका आहे की तेथे अत्यावश्यक सेवा बंद आहे. आपणास सांगितले की त्याचा सर्व्हे करा, कोठे कोठे कमी आहे, कोठे पाणी येत नाही, तेथे २०—२५ टॅकर दिवसाला, प्रभागांमध्ये गेले पाहिजे. ना लिकेजबाबत, ना टॅकरबाबत, ना पाण्याच्या समस्येबाबत सांगीतल्यानंतर काहीच केले नाही. कुठल्या प्रभागात पाणी कमी येते.

**सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—**तुम्ही एक घ्या, सभा पाहिजे की पाणी पाहिजे.

या वेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण नेमके काय म्हणत होते हे समजून येत नव्हते.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**जोपर्यंत पाण्याचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत सभा घेणार नाही, ही सभा स्थगित करा.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**श्री. अरुणभाऊ याबाबत आता खुप चर्चा झाली यावर काही बोलुन अर्थ नाही. आाम्ही खुप चर्चा केली, चर्चा करुन पाहिली, सभा केल्या, परत आता चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही. जोपर्यंत काम होत नाही तोपर्यंत सभा करु नका.

या वेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण नेमके काय म्हणत होते हे समजून येत नव्हते.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**सभागृहनेताजी आपण सुध्दा बोला.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**सन्माननिय सदस्य, जोपर्यंत पाण्याची अडचण सुटत नाही तोपर्यंत सभा होणार नाही.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**धन्यवाद, धन्यवाद।

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**मी आयुक्तांना आदेश देते की, पाण्याचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत सभा होणार नाही. स्थायी समितीबाबत मी काहीच बोलणार नाही.

**सदस्य श्री. विजय पाटील:—**स्थायी समितीत काही काम नाही येणार.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**येणार ना ५(२)(२) मध्ये तर येणार ना.

या वेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण नेमके काय म्हणत होते हे समजून येत नव्हते.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**महापौर महोदया काय आदेश देत आहे ते ऐकुन घ्या.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**मी आदेश देते की आजपासुन आतापासुन पाण्याच्या समस्या सुटण्याचा प्रयत्न करणार व जे अधिकारी सभेत उपस्थित नाहीत तर त्यांना नोटिस देण्यास आयुक्त साहेबांना सांगते. धन्यवाद। ही सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :– श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.५९ ह** **दिनांक : २०/०२/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी २.१५ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः—०८/०३/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०८/०३/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

## ३—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा मंगळवार दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३३ | श्रीमती शुभागी मनोहर बेहनवाल |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ११ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४१ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४२ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४३ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४४ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४५ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १६ | श्रीमती सुरेखा अनुमंत आव्हाड | ४६ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १७ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४७ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १८ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ४८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १९ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४९ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५० | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २१ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५१ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५२ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५६ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५७ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २८ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २९ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५९ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३० | श्री. अजित प्रभूनाथ गुप्ता | ६० | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३१ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६१ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३२ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, २. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ३. श्रीम. महेश पहिलराज सुखरामनी, ४. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ५. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ६.श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ७. श्री. रवि किशनचंद जग्यासी, ८. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, ९. श्रीमती कविता लाल पंजाबी, १०. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, ११. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), १२. श्री. चंद्रशेखर केशव यादव, १३. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १४. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, १५. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, १६.श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १७. श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), १८. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, १९. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, २०. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २१.श्री. विजय चाहु पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
६. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
७. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
९. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
११. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
१२. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१३. श्री. प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त
१४. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्रीमती. छाया डांगळे, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता
१७. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१८. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
२२. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

२३. श्री. मनोज जाधव, प्र. मुख्य लिपीक
२४. श्री. राजा बुलानी, लिपीक
तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

या वेळी मा. महापौरांच्या स्थानी, उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ होते.

या वेळी मा. आयुक्तांच्या स्थानी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे या आसनस्थ होत्या.

दुपारी २.४२ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** हि विशेष महासभा आहे, दिनांक ८/३/२०१८ रोजी स्थगित झालेली. विषय क्रमांक १ स्थायी समिती...

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सन्माननिय सदस्य, आज ८ मार्च जागतीक महीला दिवस आहे. संपुर्ण सभागृहातर्फे, संपुर्ण उल्हासनगर शहरवासियांना जेवढया पण महीला, माता आहेत, त्या कोणत्याही फिल्डमध्ये काम करीत असतील, राजनैतिक असतील, गृहणी असतील किंवा डॉक्टर, वकिल, इंजिनियर असतील या सगळयांना आज ८ मार्च रोजी जागतीक महीला दिनाच्या मनापासून हार्दिक शुभेच्छा आणि आजच्या दिवशी सगळया महीलांना, या सभागृहामध्ये जेवढया पण महीला आहेत, आपल्या नगरसेविका आहेत, महापौर आहेत, आयुक्त असतील, सचिव असतील, अधिकारी असतील व कर्मचारी असतील आज जागतीक महीला दिना निमित्त मी दोन शब्द सांगतो, “कोमल है, कमजोर नही तु शक्ती का नाम ही नारी है। जग को जीवन देने वाली मौत भी तुम से हारी है।” तर आजच्या दिवशी जेवढया पण इथे महीला आहेत, त्यांना सगळयांना नमन करून सगळयांकडून संयोग, कामना, इच्छिा जेवढे पण सदस्य बसले आहेत, ज्या प्रकारे संयोग, प्रेम, सहकार्य मिळाले आहे. अशाच प्रकारे पुढे येणा—या दिवसासाठी शहराच्या विकासासाठी, शहराच्या उन्नतीसाठी आणि महीलांसाठी खास करून सुरक्षा आणि उन्नतीसाठी आपले संयोग मिळत राहील, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती पुजा भोईर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्या, श्रीम. ज्योत्सना जाधवः—** मा. महापौर, आयुक्त साहेब, आजच्या महीला दिना निमित्त मी इथे सभागृहामध्ये उपस्थित सर्व महीलांना हार्दिक शुभकामना देत आहे आणि मला एक प्रश्न आहे, काल मी सचिव मॅडमला केला होता. तो आताही माझ्या मनामध्ये आहे की, आज ८ तारखेला महीला दिवस असतांना सुध्दा मा.महापौरांनी टाऊन हॉलला कार्यक्रम ठेवला आहे, त्याच्यामध्ये सगळया मान्यवरांना त्यांनी आमंत्रित केलेले आहे. महीला माजी महापौरांना पण त्यांनी बोलवले आहे, सगळयांना बोलवले असतांना देखील त्यांनी इथे मिटींग सुध्दा ठेवली आहे आणि मला तो प्रश्न होता की, या दोन्ही गोष्टी त्या कसे काय ॲडजेस्ट करणार आहेत? जर त्या टाऊन हॉलला उद्घाटन करण्यासाठी गेल्या नाहीत तर मान्यवरांचा अपमान करणार होत्या आणि त्या इथून मध्येच उठून गेल्या तर इथल्या उपस्थित सदस्यांचा अपमान करणार होत्या. आज तर त्या जागेवरच नाहीत, त्यांना जर माहीती होते, तर त्यांनी मिटींग का ठेवली होती? हा माझा प्रश्न आहे. मला उत्तर दयावे त्यांना माहीती होते की, ८ तारखेला महीला दिना निमित्त त्यांनी कार्यक्रम ठेवला आहे, मग असे असतांना देखील त्यांनी महासभा का ठेवली होती? म्हणजे इथे ते सगळया सदस्यांचाच अपमान करीत आहेत. त्यांना माहीती असतांना तरी महासभा ठेवली आहे, ती पण तातपुरती न ठेवता तीन महासभा ठेवल्या आहेत. तया कसे ॲडजेस्ट करणार आहेत?

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मा. महापौरांनी, कंठे मॅडमला शुभेच्छा देण्यासाठी यायला पाहीजे होत्या.

**सदस्या, श्रीम. ज्योत्सना जाधवः—** मा. महापौर, आयुक्त साहेब, आपण उत्तर दयावे काही तरी, मा. महापौरांना माहीती असतांना देखील....

या वेळी सदस्या, श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** प्रश्न तुम्हांला नाही, प्रश्न त्यांना आहे, उत्तर ते देतील.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:—** मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आज विशेष महासभा लावलेली आहे, तर ८ मार्च महीला दिवस आहे आणि हा नियोजित असतो. आजच काही ऑल रेडी झालेला नाही, अचानक आलेला दिवस नाही, अचानक आलेली घटना नाही. तर मग एवढे माहीती असतांना सुध्दा प्रशासनाचे आणि महापौरांचे काय नियोजन आहे? त्यातली त्यात त्यांनी आज विशेष महासभा पण बोलवली आहे.

**सदस्या, श्रीम. ज्योत्सना जाधव:—** स्वत: उपस्थित नाहीत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, आमच्या सर्व महीला सदस्यांचे बोलणे बिलकुल बरोबर आहे. ही जी महासभा ठेवली आहे. त्यामध्ये दुपारी २.०० वाजे पासून तर सायंकाळी ६.०० वाजे पर्यंत टाऊन हॉलमध्ये मा. महापौरांनी आज जागतीक महीला दिनानिमित्त कार्यक्रम ठेवला आहे. ते तिथे आहेत, तर मला वाटते की, सभागृहाने आज दोन मिनीट, एक मिनीट डिस्कशन न करता लवकरात लवकर तिन्ही महासभा पुर्ण केली तर प्रॉग्रॅम अॅटेंन्ड करू शकतो. आम्हांला सुध्दा तिथे जायाचे आहे, तर रमेश चव्हाणजी आपण संयोग देणार ना? तर दोन दोन मिनीटमध्ये विषय होऊन जातील. आपण विषयाला जास्त वाढवणार नाहीत, अर्ध्या अर्ध्या मिनीटामध्ये एक एक विषय पास होऊन जाईल. तिन्ही मिटींग पंधरा मिनीटमध्ये होऊन जातील. तर पंधरा मिनीटात मिटींग पुर्ण करून संपुर्ण सदन टाऊन हॉल इथे जावू अशी मी विंनती करतो, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती लक्ष्मी सिंग यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्या, श्रीम. ज्योत्सना जाधव:—** एवढी घाई का आहे? या गोष्टीसाठी जर त्यांना माहीती होते की, आज महासभा आहे, तर मग टाऊन हॉलमध्ये कार्यक्रम ठेवण्याची गरज काय होती?

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** प्रत्येक विषयावर चर्चा व्हायला पाहीजे, एक एक मिनीटाचा हा विषय नाही. आपले जे विषय आहेत, ते एक एक मिनीटांचे नाहीत. जर आपल्याला घाई असेल तर तुम्ही सभागृह सोडून जाऊ शकतात कार्यक्रमाला? मा. महापौर साहेब, त्याच प्रमाणे उप आयुक्त, मॅडम, आता बरीच चर्चा सुरू आहे. महीला दिनानिमित्त मला त्याच्यामध्ये तुमच्याकडून खुलासा मागायचा आहे. आज जो कार्यक्रम टाऊन हॉलमध्ये सुरू आहे, त्याची निमंत्रण पत्रिका सर्व नगरसेवकां पर्यंत पोहचली आहे का? माझ्याकडे ती निमंत्रण पत्रिका आलीच नाही, फक्त मी दुस—याकडून ती वाचून घेतली आजच्या कार्यक्रमाच्या संदर्भातली. दुसरा एक मुद्दा माझा असा आहे की, आपण नगरसेवकांकडून आपल्या प्रभागातील काही विशेष महीलांचा सत्कार करण्यासाठी यादी मागविली होती, त्या यादीचे पत्र आपण नगरसेवकांना महापौरांच्या पत्रावरती दिनांक २६/२/२०१८ अशी तारीख आहे. परंतु ते पत्र मला दिनांक ६/३/२०१८ ला मिळायला पाहीजे होते, मला काल पत्र मिळाले, आणि त्या नंतर मी तुम्हांला माझ्या प्रभागातील महीलांची यादी एका दिवसामध्ये कशी काय देवू शकतो? दुपारी १२.०० वाजता मला पत्र मिळते, दुपारी तुम्हांला यादी दयायची आहे, मी यादी कशी काय देवू शकतो? तरी सुध्दा त्यातल्या त्यात मी माझ्या प्रभागातील सहा, सात महीलांची नावे दिली आणि मला असे वाटले की, त्यांना बोलवतील आणि उपस्थित राहतील. परंतु त्या महीलांनी मी निमंत्रण दिले, त्या महीलांना मी कळवले, तुम्हांला त्यांची नावे तुमच्याकडे दिली, आपल्याकडून त्यांचा सत्कार केला जाईल. परंतु त्या कार्यक्रमाला माझ्या प्रभागातील काही महीलांचा विशेष सत्कार असतांना ज्यांची नावे मी सुचविली आहेत, अशा महालांचा सत्कार करण्यासाठी मी तिथे उपस्थित नाही. मी या सभागृहामध्ये आहे. आपले काय कॉर्डीनेशन आहे? सभागृहामध्ये तुम्हांला काही कळत नाही. असे प्रकार बरेच वेळा होतात, एका दिवशी दोन दोन, तीन तीन कार्यक्रम आखले जातात आणि नगरसेवकांना कल्पानाच नाही.

या वेळी सदस्या, श्रीमती ज्योती माने यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** एक एक करून बोला, तुम्ही तरी बोला नाहीत तर त्यांना तरी बोलू दया. जाधव मॅडम मी आपल्या भावनाची कदर करतो की, आपण जे आम्हांला सांगितले, जो आवाज आपण इथे उठवला, महापौरांची अशी इच्छा नव्हती आणि होणार पण नाही. कारण की आज जागतिक महीला दिवस आहे. सगळयांना महीलांसाठी आदर आहे. तर मी आपल्या भावना मॅडमला अवगत करेल की, पुढे असे काही होणार नाही.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** आजच्या कार्यक्रमाचे नगरसेवकांना आपण निमंत्रण का पाठवले नाहीत?

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** सावंत साहेब, आपल्याला जे पण प्रॉब्लेम आहेत, मिटींगच्या नंतर आपण आयुक्त मॅडमला भेटा आणि जी पण तक्रार आहे, आपल्या तक्रारीचे निवारण होईल.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** महापौर साहेब, आयुक्त मॅडम, सचिव मॅडम, ...

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:–</u>** मिटींग सुरू करा.

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १:–** स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

---

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:–</u>** धोरणात्मक, आपण पुन्हा वाचून दाखवा काय आहे ते? काय वाढ करायची संपुर्ण वाचून दाखवा, नुसता विषय वाचून चालणार नाही.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:–</u>** मा. महापौरजी, आयुक्त मॅडम, सचिव मॅडम, सन्माननिय सदन, आज विशेष महासभेचे आयोजन केले आहे. प्रशासनाकडून जी संपुर्ण देशामध्ये स्वच्छताची मोहीम चालली आहे, हा त्याचा एक पार्ट आहे, त्याचा एक अंश आहे की, इथे एका बाजूने केंद्र आणि राज्य शासनातर्फे लाखो, करोडो रूपयाचे बजेट बनवून या देशाला स्वच्छ आणि स्वस्थ बघायचे आहे. मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदीजींची एक संकल्पना आहे, एक त्यांचे स्वप्न आहे की, हा देश संपुर्ण जगामध्ये लोकतंत्र देश आहे. दि बिगेस्ट डेमोक्रेसी ऑफ दि वर्ल्ड आपला देश स्वच्छ करायचे आहे, स्वस्थ करायचे आहे. त्यासाठी त्यांनी सन २०१४ पासून एक विडा उचलला आहे, एक मिशन चालू केले आहे. स्वच्छ भारत अभियानाचा त्यामध्ये लाखो, करोडो सफाई कर्मचारी /अधिकारी केंद्र व राज्य, महानगरपालिकेचे, नगरपालिका, जिल्हा परिषदेचे कर्मचारी आणि करोडो देशवासियांना पण त्यामध्ये सामिल करून घेतले आहे. कारण की, मा. प्रधान मंत्री यांना माहीत आहे की, जो पर्यंत माझे देशवासी, महीला, पुरूष आपले मिशन समजून या गोष्टी हातामध्ये घेणार नाहीत. तो पर्यंत हा सव्वाशे कोटीचा देश स्वच्छ होणार नाही. आज दुसरी किंवा तिसरीमध्ये शिकणारी मुले असतील किंवा खुप मोठे उद्योगपती असतील, आमदार, खासदार असतील या स्वच्छ भारत अभियानासाठी आपले योगदान दयायचे आहे, आपला सहभाग दयायचा आहे. पाहीजे तर झाडू उचलून किंवा टॅक्सच्या माध्यमातून, कराच्या माध्यमातून कुठे ना कुठे आपल्याला हे मिशन पुर्ण करायचे आहे? हे आपल्या देशाचे एक मोठे मिशन आहे आणि आपल्या या देशाला अजून एक मिशन जोडायचे आहे की, आपला देश स्वच्छ आहे व स्वस्थ आहे. अशाच प्रकारे आपल्या आयुक्तांनी, श्री. राजेंद्र निंबाळकर यांनी कच–यावर, स्वच्छतेवर युझर फि, उपभोक्ता टॅक्स, कर जो आणला आहे, यामध्ये आपल्याला माहीत आहे की, आपले शहर कुठे ना कुठे स्वच्छ दिसत आहे, स्वस्थ दिसत आहे. उल्हासनगर शहर कुठे ना कुठे कच–यामुळे चर्चेत आहे. ते आपल्याला पण स्वच्छ करणेची गरज आहे. मागच्या दोन महीन्यापासून बघाल तर इथे सर्व जे लोकप्रतिनिधी आहेत, जेवढे पण कर्मचारी/अधिकारी आहेत, जेवढे पण आपले सफाई कर्मचारी आहेत, सर्व लोकांनी आपले घर ज्या प्रकारे आपण स्वच्छ ठेवतो तशाच प्रकारे या शहराला पण आपण असे बनवण्याचा एक संकल्प, एक शपथ, एक मिशन करून आपल्या हातामध्ये हे काम घेतले आहे. आपण शोशल मिडीयावर, व्हॉटस ॲप ग्रुपवर फोटो टाकतात.आपण काय करीत आहे? आपण आपल्या नविन आयडीया देत आहेत, वेगवेगळया पध्दती सांगत आहेत, तर याचा अर्थ असा आहे की, आपल्याला वाटते की, आपले शहर चांगले स्वच्छ झाले पाहीजे. उल्हासनगरवर एक डाग होता की, उल्हासनगर शहरातून जात असतांना घाणेरडे वास येत असते, तर याचा अर्थ उल्हासनगर आहे, तर उल्हासनगरचे हे डाग संपवण्याचा आपण सगळयांनी मिळून विडा उचलला आहे. त्यासाठी आपल्या आयुक्तांनी युझर फी आणली आहे. पण जेव्हा या युझर फी वर एक नजर टाकली, आपण बघितले की, याचे ओझे आपल्या सर्वसामान्य जनतेवर, आपल्या व्यापा–यांवर येत तर नाही. तर प्रशानाकडून जो प्रस्ताव आला आहे, तो खुपच जास्त आहे. आज आपल्याला वाटते की, आपला शहर स्वस्थ, स्वच्छ झाले पाहीजे. परंतु कुठे ना कुठे अशा प्रकारे आपण कर लादू शकत नाही? त्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रशासनाकडून युझर फी, टॅक्स लादणार आहेत, तो आपण कुठे ना कुठे तरी अमान्य करीत आहे? आणि आपल्याकडून एक ठराव करून, एक फॉर्मुला आणून त्यामुळे आपल्या शहराला उत्पन्न पण मिळेल आणि उल्हासनगरमध्ये जी सर्वसामान्य जनता आहे, जे करदाता आहेत, जे झोपडपट्टीमध्ये राहणारे आहेत, जे बॅरेकमध्ये राहणारे आहेत, चाळीमध्ये राहणारे आहेत, फ्लॅनलमध्ये राहणारे आहेत, बंगल्यामध्ये राहणारे आहेत, त्यांच्यावर जास्त बोजा पडणार नाही. असा एक फार्मुला आम्ही बनवला आहे, त्या विषयी पुढे आमचे सदस्य सांगतील. तर संपुर्ण सदनला आवाहन करीत आहे की, ज्या प्रकारे आपण स्वत: झाडू, कटका, ब्रश घेऊन रस्त्यावर उतरलो आहे, आपल्या पॅनलमध्ये, आपल्या वार्डमध्ये, क्षेत्रामध्ये, आपल्या शहराला स्वच्छ करण्यासाठी या मुद्दयावर शहरावासियांवर जास्त लोड पडणार नाही, शहराच्या रहिवासियांवर जास्त कराचा बोजा नको आहे, एक नॉमिनल चार्ज त्यामध्ये जास्त फरक नसेल, तो नॉमिनल चार्ज लावून शहरवासियांना पण यामध्ये सवलत देण्यात यावी, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

या वेळी सदस्या, श्रीमती कविता बागुल या सभागृहातून बाहेर गेल्या.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य, मनोज भाईनी आज सुंदर प्रवचन केले. उप भोगक्ता कर (युझर कर) शहरामध्ये लागू व्हायला पाहीजे की, नको? या विषयावर बरेचशे मतमत्तांर असू शकते. उल्हासनगर स्वच्छ झाले पाहीजे, सुंदर झाले पाहीजे. हे प्रत्येकाला वाटते आज आम्ही गेल्या दोन तीन वर्षा पासून सर्व नगरसेवक नाली बनवण्यासाठी, कचरा साफ करण्यासाठी, नाल्या गटारी बनवण्यासाठी, शौचालय बनवण्यासाठी वारंवार निधी मागत आहे. आज पर्यंत मला वाटते की, कुठलाही निधी आपल्याला दिला गेला नाही. आम्ही पण स्वच्छतेच्या कारणासाठीच निधी मागत आहेत. त्याचे कारण प्रशासनाकडून असे दिले जाते की, आमच्याकडे निधी नाही. निधी नसल्यामुळे आमच्या येथे नाल्या बनत नाहीत, शौचालय बनत नाही, शौचालय साफ होत नाहीत. हे सर्व ठिक असतांना, युझर फी असली पाहीजे. इतर महानगरपालिकेमध्ये युझर फी लावल्या गेली आहे की नाही? याचे पण स्पष्टिकरण होणे आवश्यक आहे आणि ही लावली असेल, तर आज प्रशासनाने जे युझर फीचे पॅटन दिलेले आहे. ते पॅटन हे उल्हासनगर वासियांचे कंबरडे मोडणार आहे. त्यामुळे प्रशासनाने आणलेला हा जो प्रस्ताव आहे, त्याला जर जसे मनोज भाई बोलेले की, आम्ही काउंटर प्रस्ताव देतो. तो जर आपल्या संपुर्ण शहरवासियांना जर त्याच्यातून काही आऊटपुट मिळत असेल, त्याच्यातून काही नुकसान होत नसेल किंवा येणा—या कालावधीमध्ये जर तुम्ही युझर फी घेत असाल? तर नगरसेवकांना तुम्ही त्या फंडातून काही देणार आहेत का? त्या फंडातून तो जो उत्पन्न होणार आहे, त्या क्षेत्रातले उत्पन्न होणार, कर रूपाने उत्पन्न होणार आहे. ते आम्हांला तिथल्या विभागामध्ये स्वच्छतेसाठी वापरता येणार आहे का? ते जर येत नसेल, तर युझर फी घेऊन उपयोग नाही आणि त्या दृष्टीकोणतून नगरसेवकांचा फंड वाढला पाहीजे. इथे बाकीच्या स्वच्छतेसाठी जे जे प्रस्ताव आहेत, ते पास झाले पाहीजेत, तर त्या कराचा उपयोग होणार आहे. जे कर लोक देतात, त्या लोकांना त्या स्वच्छतेसाठी वापरला जात नसेल तर त्याचा काही उपयोग होणार नाही. त्या दृष्टीकोणातून काउंटर प्रपोजल जर व्यवस्थित असेल, शहराच्या नागरीकांचे कंबरडे मोडणारे नसेल. तर आपल्याला त्यावर विचार करता येईल, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती शुभांगी बेहनवाल यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

या वेळी सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी हे सभागृहातून बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव मॅडम, आज ही सभा सुरू होण्याच्या पहीले, जागतिक महीला दिनानिमित्त आपण सर्व महीलांचा सन्मान केला गेला. तर मी पण माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या वतीने प्रत्येक नारीला प्रणाम करतो, ज्यांनी या देशामध्ये प्रगती केली आहे, एक बुनियाद रचली, त्याची सुरूवात सावित्रीबाई फुले यांनी केली आणि सावित्रीबाई फुले यांची प्रशंसा करून बोलतो की, त्यांनी एक मुहूर्तमेंढ रचून प्रत्येक नारीला या सभागृहामध्ये पाठवले आहे. तर या सर्व नारी यांना प्रणाम करून, आयुक्त साहेब, मी तुम्हांला एक प्रश्न विचारू इच्छितो की, आपण आज आयुक्त म्हणून सदनामध्ये उपस्थित आहात. मागच्या महासभेमध्ये आपल्याला एक प्रश्न विचारला होता की, आजच्या मिटींगचे जे काही इतिवृत्त होईल, त्याचे अधिकार आपल्याला आहेत का? आज जे काही ठराव पारीत होणार आहेत, आज कुठल्याही गोष्टी या सदनामध्ये तीन तीन महासभेच्या होणार आहेत, तर त्या बददल आपण योग्य तो निर्णय घेणार आहात का? जर का घेणार असाल, तर आम्हांला चर्चा करता येईल. कारण मागच्या मिटींगला आपण आयुक्त मॅडम सांगितले होते की, मी कुठलाही निर्णय घेऊ शकत नाही? परंतु आज आपण इथे उपस्थित आहात, तर आपण आजच्या मिटींगचे सगळे निर्णय, घेणार का नाही घेणार? आपण सांगितले तर पुढची सुरूवात आपण करू.

या वेळी सदस्य, श्री. हरेश जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

**<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u>** मा. महापौर, सर्व सन्माननिय सभागृह आज दिनांक ८/३/२०१८ रोजीच्या ज्या महासभा आहेत, विशेष महासभा आणि इतर दोन्ही होणा—या महासभा यासाठी उपस्थित राहण्या बाबत मा. आयुक्तांनी, अतिरिक्त आयुक्त म्हणून मला मौखिक आदेश दिलेले आहेत आणि ते एका

मिटींगसाठी स्वच्छता अभियानच्या डि.पी.आर. च्या मिटींगसाठी मंत्रालयात मा. सचिव यांच्याकडे गेलेले आहेत. मागील महासभेत मी ज्या वेळस सर्वाना नम्रपणे सांगितले होते की, होय त्या वेळेस मला मा. आयुक्तांकडून कोणताही आदेश नव्हता आणि त्या वेळस फक्त या सभागृहाच्या/सभेच्या सर्व नियमानुसार आयुक्तांच्या असनावरती त्यांचे प्रतिनिधी म्हणून मी उपस्थित होते. परंतु आजच्या सभागृहामध्ये मी सर्वा समोर सांगत आहे की, तसे मा. आयुक्तांनी तसे मौखिक आदेश दिलेले आहेत. लेखी आदेश दिलेले नाही, मी पुन्हा सभागृहाच्या निदर्शनास आणून देते. परंतु त्यांनी मौखिक सांगितले आहे की, तुम्ही आज सभागृहात माझ्या वतीने उपस्थित रहा आणि आज मी इथे सभागृहात उपस्थित आहे.

या वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता व सदस्य, श्री. गजानन शेळके यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—** मॅडम, तुम्हांला नुसते मोघम बसण्यासाठी दिलेले आहे आणि बाकीच्या ज्या चर्चा होणार आहेत, त्या पण मोघम होणार आहेत का?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मोघम चर्चेवर तुम्ही त्या अनुषंगाने निर्णय घेणार का?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—** ही मिटींग मोघम आहे का ते सांगा मॅडम?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मॅडम आजची विशेष महासभा आहे. या विशेष महासभेमध्ये धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे. हा धोरणात्मक निर्णय अंमलात आणण्याची ताकत आयुक्तांकडे असते. ती तुम्ही घेणार आहेत का?

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** मा. सभागृहाला मी पुन्हा तेच रिपीट करते, तेच सांगत आहे की, आजही मला फक्त मौखिक आदेश प्राप्त आहेत, त्यामुळे पुन्हा एकदा...

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मौखिक आदेशावर आपण या कार्यावर अंमलबजावणी करणार का?

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** नाही करणार मग ही मिटींग कशा करीता?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** तुम्ही जर घेणार नसाल...

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** ही मिटींग कशा करीता? जर आयुक्त म्हणून तुम्ही सक्षमपणे कारवाई करणार नसेल तर मग ही मिटींग कशी चालेल?

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** सचिवांना सुध्दा प्रशासनाच्या दुष्टीने कल्पना आहे की, जो पर्यंत...

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मौखिक आदेशावरती महापालिका सदनाचे काम चालेल का?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** महापौरजी, आमची विनंती आहे की, जर हे आयुक्त निर्णय घेऊ शकत नाहीत, विशेष महासभा...

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** मी आपल्याला क्लीअर करतो की, इथे आता जे आयुक्त प्रभारी म्हणून बसले आहेत, त्यांना कोणताही निर्णय या महासभेमध्ये घ्यायचा नाही. महासभेचा निर्णय महासभेनेच घ्यायचा आहे आणि त्यावर जी अंमलबजावणी करायची आहे, ती आयुक्तांनी करायची आहे.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** मा. महापौर, हा प्रस्ताव आणला कोणी?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** आयुक्त नाहीत ना?

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** आयुक्तांनीच त्यांना इथे पाठवले आहे,

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मौखिक आदेश आहेत.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौर महोदय, हा निर्णय आयुक्तांना घ्यायचा आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** आपल्याला माहीती आहे की, सर्व मौखिकवर चालते.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** त्यांनी तसे स्पष्ट करावे, आयुक्तांनी स्पष्ट करावे.

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—** मौखिकवरच सगळ चालते, आपण बसून घ्या.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** नाही नाही आम्हांला तुम्ही स्पष्ट करा. आम्हांला या विषयावर बोलायचे आहे. तुम्ही आम्हांला स्पष्ट केल्या शिवाय आम्ही बसणार नाही. आम्हांला तुमचा आदेश पाहीजे, स्पष्ट करा.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः—** आयुक्तांच्या वतीने....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** महापौर साहेब, हे जे आपल्याला अतिरिक्त आयुक्तांनी असे बोलेले की, मला काही अधिकार नाहीत, हे यांचे बोलणे चुकीचे आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** एकदम बरोबर आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** तुम्ही आयुक्तांच्या खुर्चीवर बसलेले आहेत, तुम्हांला निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** तुमचा निर्णय लागेल, महासभेच्या अधिकाराचे निर्णय आयुक्तांनी घ्यायचे असतात. तुम्ही घेणार नसेल तर कसे चालेल?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** तुम्हांला निर्णय घ्यायचा नाही, जे आम्ही ठराव करू त्याची अंमलबजावणी करायची आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** अंमलबजावणी करणार कोण?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** तुम्ही जर करणार नसाल तर कोणी पण या खुर्चीवर बसेल त्यांना अंमलबजावणी करावी लागेल.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः—** करावीच लागेल, आपण ठराव करणार आहेत, आपण मान्यता देणार आहेत, त्याची अंमलबजावणी करणे प्रशासनाचे काम आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** महासभा जो ठराव करणार आहे, त्याची अंमलबजावणी करणेचे प्रशासनाचे काम आहे. जो कोणी खुर्चीवर बसेल तो त्याच निर्णय घेणार आहे.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः—** परंतु मी सभागृहाला हेच सांगण्याचा प्रयत्न केला, ज्या प्रशाकिय गोष्टी चालल्या आहेत, तुम्हांला सांगण्याचा प्रश्नच येत नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** मॅडम, तुम्ही इथे आयुक्त आहात, आम्ही जे निर्णय घेणार आहेत, त्याची अंमलबजावणी तुम्हांला करायची आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—** प्रदिपजी आपण बसून घ्या, पहीले आपण निर्णय घ्या, अंमलबवणीचे काम नंतर येते.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** महापौर साहेब, ऐकुन घ्या, त्याच्यावरच चर्चा करायची आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—** चर्चा सुरू करा.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** चर्चाच करीत आहेत, चर्चा करण्यासाठी आम्ही उभे आहेत, तर आमचे बोलणे झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** तुम्ही विषयावर चर्चा करा,

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** सन्माननिय सदस्यजी, चर्चा केल्या नंतर त्याचा निर्णय काय होईल?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** माझे मित्र अरूण....

**पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—** चर्चा सुरू करा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** चर्चा सुरू झाल्या नंतर जो निर्णय होईल, ते निर्णय शंभर टक्के घ्यायचा आहे, ते कोणीही असु द्या, हे असु द्या, आयुक्त तुम्ही असे म्हणतात की, मी निर्णय घेणार नाही, तर हा सभागृहाचा अपमान आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मा. आयुक्तांनी कबुल केले आहे,

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** नाही ते असे बोलू शकत नाहीत,

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** त्या दोन मिनीटा पुर्वी बोलेले आहे. त्याची स्पष्टोक्ती करा.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** सन्माननिय सभागृहाने लक्षात घ्यावे, फक्त मी एवढेच सांगितले आहे की, मला मौखिक आदेश प्राप्त आहेत, बाकीचे निर्णय घ्यायचे काम ......

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौरजी बघा, आपल्या समोरच बोलत आहेत की, मौखिक आदेश आहेत. कसे चालणार?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, पहीले तर आज कच—यावर चर्चा होत आहे, काल रात्री टीव्हीवर एक न्युज चालली होती की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आज काय परिस्थिती आहे? तिथे संपुर्ण शहर कच—याने भरलेले आहे. जिथे डंपिंग होत आहे, तिथे ग्रामिण भागाचे लोक हस्तक्षेप करत आहेत. हायकार्टाच्या आदेशान्वये, औरंगाबाद खंड पिठाने तिथे कचरा टाकण्यास विरोध केला आहे. या कारणांना बघून त्यांच्याकडे कचरा टाकण्यासाठी दुसरी जागा नसल्यामुळे शहरामध्ये सगळीकडे कचरा पसरला आहे आणि त्यामुळे आजार पसण्याची तिथे शक्यता आहे. ही परिस्थिती बघितल्या नंतर, अशी परिस्थिती उल्हासनगरमध्ये यायला नको, त्यासाठी आपल्याला सुरूवाती पासूनच काही तरी उपाय करावे लागतील. त्यामध्ये पहीला उपाय हा आहे की, सन २०१६ चे जे नियम आहेत. त्यानुसार ओला कचरा वेगळा करणे आणि सुका कचरा वेगळा करणे. ज्या पण व्यक्ती कचरा करीत आहेत, कचरा घरामध्ये उत्पन्न होते, दुकानामध्ये कचरा उत्पन्न होते, ती कचरा करणा—यांची जबाबदारी आहे की, त्यांनी कचरा वेगवेगळा करायला पाहीजे आणि महानगरपालिकेकडे देण्यात यावे आणि आयुक्त साहेबांनी पण तोच प्रस्ताव दिला आहे की, जो पण व्यक्ती असे करेल, त्यांना शंभर टक्के सुट दिली जाईल. याच कालावधीमध्ये सरकारने एक जी.आर. काढला आहे की, आपण जर ७५ टक्के सेग्रीगेशन करीत नाहीत, तर आपल्याला येणारे सर्व फंड थांबवले जातील. आज उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वत:चे मोठे सोर्स नाही आणि उत्पन्न सोर्स नसल्यामुळे फक्त एकच घरपट्टी आहे आणि त्याची पण वसुली अभय योजना लागू केल्या नंतरही, एवढे पण वसुल झाले नाही की, कर्मचा—याचे पगार देवू शकतो. अशी परिस्थिती बघून माझा असा विचार आहे की, माझे निवेदन आहे आणि त्याच बरोबर दोन दिवस पहीले पण मा. मुख्यमंत्री साहेबांनी विधानसभेमध्ये घोषणा केली होती की, याच्या नंतर कोणत्याही महानगरपालिकेला कचरा टाकण्यासाठी, कचरा डेपोसाठी कुठलाही प्लॉट देण्यात येणार नाही. तर आपल्याकडे असा पर्याय आहे की, कचरा कमी करायचा आहे. मुंबई महानगरपालिकेने अशा प्रकारचे काम चालू केले आहे. जी मी एचओडी ग्रुपवर न्युज पाठवली होती. तिथे सन २०१५ मध्ये, बी.एम.सी.ने साडेनऊ हजार मेट्रीक टन कचरा होत होता. आज ओला कचरा, सुका कच—याची मोहीम राबवल्या नंतर त्यांच्याकडे ७२०० मेट्रीक टन कचरा येत आहे. त्यामुळे त्यांची प्रत्येक दिवसाची बचत आहे आणि त्याच बरोबर त्यांनी शंभर किलो पेक्षा काही सोसायटयांना कंम्पलसरी केले आहे की, जो पण कचरा निघत असेल त्यांनी ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा करायचा आहे. इथे जो प्रस्ताव आयुक्तांनी पाठवला आहे. त्यामध्ये दर खुपच जास्त आहेत. ४५०० रूपये प्रत्येक वर्षी आर.सी.सी. टीयर गटरसाठी, ३३०० एसी सिट ब्रिक्स बांधकामासाठी, २१०० लाकडी, माती बांधकामाच्या झोपडयांसाठी हे खुपच जास्त रेट आहेत. एवढे रेट आपली जनता भरू शकत नाही. जे कमर्शीयल रेट आहेत, आम्ही त्याच्याशी सहमत आहेत. कमर्शीयल चे जे रेट दिले आहेत, १२ हजार आणि ६० हजार ते पण त्यांना जास्तीस वाटतील. त्यामुळे माझे निवेदन आहे की, आर.सी.सी. गटरसाठी प्रती माहीना २०० रूपये आणि एसी.सिट ब्रिक्स बांधकामांसाठी १०० रूपये प्रत्येक महीना आणि लागडी, माती बांधकामाच्या झोपडयासाठी ५० रूपये प्रत्येक महीन्यासाठी शुल्क लावायला पाहीजे आणि कमर्शियलसाठी जे आयुक्तांनी प्रस्ताव दिला आहे, ते मान्य करायला पाहीजे. त्याच बरोबर त्यांनी जी अट दिली आहे की, जी पण व्यक्ती, उपभोक्ता ओला कचरा, सुका कचरा वेगळा करून ओल्या कच—याची विल्हेवाट लावील, तर त्याला शंभर टक्के सुट दिली पाहीजे. यामध्ये आपल्याला एक सिस्टम बनवायला पाहीजे की, या युझर फिमध्ये आपण सुट देणार कसे? तर यामध्ये त्या एरियाचे स्वच्छता निरीक्षक, त्या एरियाची जी व्यक्ती घोषणा करते की, मी माझा ओला कचरा, सुका कचरा वेगळा करतो, तर त्यासाठी तो त्यांचा कचरा आपल्याकडे देत नाही, रोडवर पण फेकत नाही. आपल्या खड्डयामध्ये सुध्दा घेऊन येत नाही. तर त्यासाठी स्वच्छता निरीक्षकाची रायटींगमध्ये अशी सुचना आली पाहीजे आणि स्वच्छता निरीक्षकाकडून हेरीफाय झाले पाहीजे की, बरोबर आहे, ही बिल्डींग, हे घर, हे दुकान ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा करतात आणि ओल्या कच—याची विल्हेवाट लावतात. त्या पासून खत बनवतात किंवा दुसरीकडे त्याचा वापर केला जातो किंवा बायो गॅस बनवतात. तर स्वच्छता निरीक्षकाला सर्टीफाय करायचे आहे आणि त्याला क्रॉस हेरीफिकेशन स्वच्छता निरीक्षकाला करायचे आहे. अशा प्रकारे प्रावधान झाले पाहीजे, आजची जी परिस्थिती आहे आणि पुढची परिस्थिती लक्षात घेऊन आज कमीत कमी आपण इथून सुरूवात केली पाहीजे. ही एक नविन सुरूवात होईल, नविन कामा बरोबर की, पुढे आपल्याला कचरा कसा कमी करता येईल?

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** सॉरी महापौर मॅडम, सो सॉरी सर, सन २००२ पासून महापौर मॅडम बोलण्याची सवय झाली आहे. महीला दिनानिमित्त आपल्याला विचार करावा लागेल की, सन २००२ पासून पिठासिन अधिकारी म्हणून महीलाच बसल्या आहेत, श्रीम. राजश्री चौधरी पिठासिन अधिकारी होत्या, अरूण आशानच्या आई त्यांच्यासाठी सौभाग्य आहे की, त्यांनी अशा पुत्राला जन्म दिले, आई—मुलाचे संगम आहे, आपल्यासाठी आनंदाची गोष्ट आहे की, या सभागृहामध्ये सर्वात जास्त महीला नगरसेविका आहेत. जर जीवन भाई यांचा चेहरा हटवून मिना आयुलानी यांना लावला तर तीन्ही महीलाच दिसतील, आजचा हा जो विषय आहे, या विषयाच्या पहीले माझ्यातर्फे संपुर्ण उल्हासनगरच्या महीलांना, सर्वोच्च पदावर बसलेल्या सचिव मॅडम आणि आयुक्तांच्या स्थानी बसलेल्या कंठे मॅडम, माजी महापौर, श्रीम. राजश्री चौधरी, श्रीम. आशान मॅडम आणि ज्या अनुपस्थित आहेत, श्रीम. मिना आयलानी, श्रीम. आशा इदनानी अशा किती तरी महीला ज्यानी सन २००२ पासून आपल्या शहराच्या आमदार पण महीला आहेत, जर आपण बघितले की, सन २००२ पासून सन २०१८ पर्यंत मागच्या १६ वर्षा पासून आम्ही महापौर साहेब, बोलण्यासाठी उत्सुक आहेत. आज महीला दिनानिमित्त पहील्या वेळेस श्री. जीवन इदनानी यांना बोलावे लागते की, महापौर सर याच्या पहीले आम्हांला महापौर मॅडम बोलण्याची सवय पडली होती. ही चर्चा संपली मला विषयावर बोलायचे आहे. म्हणून मी ही परिचर्चा संपली की, गंभीर मुद्दयावर येणार आहे. आज जो आपल्या समोर आयुक्तांनी मांडलेला घणकचरा व्यवस्थापन उपभोक्ता फि म्हणून त्याची आकारणी वाढवायचे हा प्रस्ताव आमच्या समोर आलेला आहे. त्या अनुषंगाने आमचे नगरसेवक श्री. प्रमोद टाले, जे बोलले ते खुप व्यवस्थित बोलले की, जर काही आम्ही इथे वाढ करीत आहोत, कुठल्याही कर मध्ये तर नगरसेवकांचे जे फंड आहेत, जो निधी आहे, ते नगरसेवक त्याचा स्वच्छतेसाठी त्याचा वापर करीत आहेत. त्यांना निधी मिळाला पाहीजे, हा जो त्यांनी प्रश्न मांडला आहे, त्यांच्या प्रश्नाशी मी सहमत आहे. आयुक्तांनी जो प्रस्ताव आणला आहे,

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** महापौर मॅडम आल्या आहेत, महीला दिनानिमित्त त्यांचे स्वागत आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** महीला दिनानिमित्त महीला महापौर उपस्थित झाल्या आहेत.

या वेळी मा. महापौर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला आणि आसनस्थ झाल्या.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u>** सर्वात पहीले मी उशिरा आल्यामुळे माफी मागते, सर्व महीलांना जागतीक महीला दिनानिमित्त खुप खुप हार्दीक शुभेच्छा आणि मी स्वतंत्रपणे आमंत्रण देते की, याच्या नंतर तुम्हांला सगळयांना टाऊन हॉल येथे यायचे आहे आणि माझे मानसन्मान वाढवण्यासाठी महीलांचा जास्त सहभाग राहीला आहे. परंतु सगळयांना यायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** महापौर मॅडम, आपण इथे जेव्हा अनुपस्थित होत्या, तेव्हा काही महीलांनी या गोष्टीचे प्रश्नचिन्ह लावले होते की, महीला महापौर उपस्थित नाहीत, परंतु आपण इथे आल्यात त्यासाठी आपण महीला महापौर या नात्याने संपुर्ण महीलांना बरोबर दिसत आहे. महापौर महीला, सचिव महीला आणि आयुक्त महीला आज आपण खरोखर जागतीक महीला दिवस साजरा करणार आहोत. तरी सर्व महीलांना भारतीय जनता पार्टीच्या वतीने आणि या सभागृहाच्या वतीने खुप खुप शुभेच्छा. आपण सगळया महीलानी भरपुर विकास करावा आणि प्रत्येक ठिकाणी वर्चस्व असावे, अशी माझी शुभेच्छा आजच्या दिवसाठी आहे. महापौर मॅडम कर वाढवण्यासाठी आयुक्तांनी जो प्रस्ताव दिला आहे. तो खुपच जास्त वाटत आहे, त्यामध्ये ३७५, २७५, १७५ प्रत्येक महीन्याला आर.सी.सी. साठी २७५ रूपय, एसी सिटवर प्रत्येक महीला २७५ रूपये, लाकडी आणि मातीच्या बांधकामाला प्रत्येक महीन्याला १७५ रूपये याच्यासाठी बघितले तर आर.सी.सी. साठी २०० रूपये पाहीजेत आणि एसी सिटवर प्रत्येक महीला १०० रूपये पाहीजेत, लाकडी आणि मातीच्या बांधकामाला प्रत्येक महीन्याला ५० रूपये असायला पाहीजेत आणि त्याच बरोबर लोकप्रतिनिधीचा जो निधी आहे, तो त्वरीत दयायला पाहीजे आणि या सभागृहामध्ये या विषयाला एक मताने पास करण्यासाठी आमची इच्छा असेल आणि मी सर्व सदस्यांना निवेदन करतो की, शहराला स्वच्छ, सुंदर बनवण्यासाठी या शहराची मागच्या तीन वर्षा पासून आम्ही जेव्हा आयुक्तांकडे जात होतो, तेव्हा बोलायचे की, तिजोरी रिकामी आहे. तर त्यासाठी आपण थोडे कर वाढवून आपल्याला जेवढया सेवा लोकांना दयाव्या लागतात, त्यामध्ये नाली असेल, शौचालय दुरूस्ती असेल, स्वच्छता असेल, शौचाल्याची बांधणी असेल या कामांसाठी जर हे कर वाढवले तर आपण हे करण्यासाठी आवश्यक सफल होऊ शकतो, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u>** मा. महापौर मॅडम, आयुक्त मॅडम, आता दोन मिनीटांपुवी श्री. राजेश वदारिया यांनी जी सुचना मांडली होती, संभाजीनगरमध्ये, औरंगाबादच्या शहरामध्ये जो प्रकार झालेला आहे, त्या प्रकाराचा उल्हासनगरच्या टॅक्स विषयी काहीही संबध नाही, हे मी महत्वपुर्ण सांगतो. संभाजीनगरमध्ये काय चालले आहे? तिकडे कच—याचे ढिग का उचलत नाहीत? म्हणून आंदोलन सुरू आहे. परंतु उल्हासनगरमध्ये

अशा प्रकारचे कोणतेही आंदोलन नसतांना फक्त स्वच्छता अभियान राबवण्यासाठी स्वच्छता कर वाढवण्यात येत आहे, अगदी कारणा शिवाय स्वच्छता कर वाढवण्यात येत आहे आणि कोणीही आम्ही सांगितल्या शिवाय ऐकत नाही हा त्याचा अर्थ होतो. परंतु चर्चा तुम्ही बंद करा, महापौर मॅडम काय चालले आहे? आणि इकडे सभागृहामध्ये सदस्य बोलत आहेत, तिकडे कोणाचेच लक्ष नाही. नगरसेवक बोलत आहेत, कृपया मेहरबानी करा आपली चर्चा थांबवा आणि आपल्या जागेवर बसा. औरंगाबादमध्ये जे काही चालले आहे, त्या संबंधीत श्री. राजेश वदारिया सभागृहामध्ये चुकीची माहीती देत आहेत. संभाजीनगरमध्ये वेगळा प्रकार सुरू आहे, तिथे कचरा उचलण्याचा विषय आहे, आपल्याकडे कच—यावर टॅक्स वाढवण्याचा विषय आहे. तर अशा प्रकारचे टॅक्स वाढवून या शहराचे कधीही भले होणार नाही किंवा सर्वसामान्या लोकांचे हित साधले जाणार नाही. आपण दुस—या महानगरपालिकेचे विषय मांडू शकतात, तर मी आज या ठिकाणी आपल्या जवळच्या बदलापुरच्या नगरपालिकेचा विषय इथे मांडत आहे. कालच्या वर्तमानपत्रामध्ये बदलापुर नगरपालिकेने तिकडे हाच कच—यावर युझर टॅक्स वाढवण्यासाठी संपुर्ण विरोध केला आणि तो ठराव फेटाळला गेला आणि बदलापूर नगरपालिकेची संपुर्ण बजेट ४६५ कोटी रूपयाचे आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक ६०० कोटी रूपये पेक्षा जास्त आहे. आयुक्त साहेब, तुमचे लक्ष नाही, महापौर मॅडम सगळया लोकांचे झाले असेल तर आम्ही बोलतो, बदलापूर नगरपालिकेमध्ये त्यांचे वार्षिक अंदाजपत्रक ४६५ कोटी रूपये असतांना सुध्दा ते तिकडे युझर टॅक्स वाढवू शकत नाहीत, त्यांनी तो रद्द केला. तर आपल्या महानगरपालिकेचा अंदाजपत्रक जवळ पास सहाशे कोटी रूपयां पेक्षा जास्त आहे. मागच्या वर्षी मला वाटते की, साडे सातशे कोटी रूपये मांडला होता. नंतर तो का कमी झाला मला माहीत नाही? अशा प्रकारचे अंदाजपत्रक असतांना बदलापूर सारखी छोटी नगरपालिका जर हाऊस टॅक्स वाढवत नाही, कचरा टॅक्स वाढवत नाही. मग आपण का वाढवावा? हा मुख्य मुददा आहे आणि जर अशा प्रकारचा आपण हाऊस टॅक्स वाढवला आणि कारणा शिवाय वाढवला तर लोकांच्या सोयीसुविधा वाढतील, काहीही सोयीसुविधा वाढणार नाहीत, काहीही फरक पडणार नाही लोकांच्या बाबतीत. आपल्याला जर टॅक्सेस वाढवायचे असतील, आपली सत्ता आहे, महापौर मॅडम आपण उल्हासनगर महापालिके पासून तर महाराष्ट्र शासन, दिल्ली गव्हर्नमेंट पर्यंत आपली सत्ता आहे. ज्या वेळेला केंद्र सरकारने सर्व ऑक्ट्रॉय टॅक्स, एल.बी.टी. टॅक्स, जे काही नगरपालिकेचे टॅक्स असतील, जे स्थानिक कर असतील ते सर्व रद्द करून त्यांनी जी.एस.टी. लावला आणि त्या जी.एस.टी. चा पर्याय म्हणून तिकडन काही अनुदान केंद्र शासनाकडून येणार होते, ते अनुदान आपल्याकडे मागच्या वर्षा पासून आलेले नाही का? आले असेल तर त्याची माहीती आम्हांला दयावी आणि त्या प्रमाणे आपण काम करावे. आपल्याला हाऊस टॅक्स वाढवण्याची गरजच नाही, त्यांच्याकडे आपण टॅक्स मागावा, अनुदान मागावे. केंद्र शासन स्वाच्छता मोहीम राबवत आहे, तर मग त्यांच्याकडून कर मागावे, त्यांच्याकडून उपाय मागवा, आर्थिक फंड त्यांच्याकडून मागवा आणि नंतर मग हे काम करा. अशा प्रकारे हाऊस टॅक्स म्हणून कोणत्याही प्रकारचा या शहराचे हित साधले जाणार नाहीत, लोकांच्या समस्या सुटल्या जाणार नाहीत. तर माझे स्पष्ट विरोध आहे की, अशा प्रकारचा टॅक्स, कोणत्याही प्रकारचा वाढविण्यात येऊ नये, धन्यवाद

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, या गोष्टी बददल आपल्याला सांगणे मला आनंद होत आहे की, अॅज अ महीला........

**सदस्या, श्रीम. सविता तोरणे:—** मा.महापौरजी, मा.उप महापौर, मा. आयुक्त व सन्माननिय सभागृह, आज आपण कचरा व्यवस्थापणेसाठी कर वाढवण्या संदर्भात चर्चा करीत आहोत. माझा प्रश्न असा आहे की, उल्हासनगर शहरात आपण जनतेला पाणी मिळावे यासाठी ७० कोटीची योजना १५० कोटीवर नेली व पुढे ३०० कोटीवर एवढेच नाही तर आपण पाणी सेवा कर म्हणून करामध्ये सुध्दा वाढ केली. तरी या शहरामध्ये नागरीकांना पाणी मिळाले का? यासाठी पुन्हा आता ५० कोटींची गरज आहे. तेव्हा पाणी मिळेल आयुक्तजी उल्हासनगर शहर ठाणे जिल्हात क्षेत्रफळामने सर्वात लहान महानगरपालिका आहे. परंतु कचरा उचलण्याचा सर्वात मोठा ठेका आपण दिला आहे. तरी देखील शहरातील कचरा सर्व उचलला जातो का? आज पुन्हा आपण कचरा व्यवस्थापनेसाठी कर वाढवणार आहोत. तर याचा बोजा नागरीकांवर का?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** सन्माननिय महापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब, सर्व प्रथम आज आपण महापौरांचे स्वागत करीत आहेत, तर आज उल्हासनगर शहराच्या प्रथम नागरीक, प्रथम महापौर, तर आजच्या दिवशी मी त्यांना शुभेच्छा देतो की, महापौरजी आजच्या दिवसात महीला सक्षम आहेत, महीला ज्या नारी आहेत, त्या सक्षम आहेत, ताकतवार आहेत, ज्या संपुर्ण संसार चालवत आहेत, घर दार चालवत आहेत. परंतु आज घर दार चालवणा—या महीलेवार टॅक्सचा बोजा वाढणार आहे. त्यांच्या बटवेमधून एक रूपया जाणार आहे. आजच्या दिवसामध्ये त्या आपले घर कसे चालवतील? विचार करण्यासारखे आहे, आजच्या चांगल्या दिवसाच्या विचारामध्ये प्रत्येक दिवस आपण विचार करीत असतो की, माझा शहर चांगला राहीला पाहीजे. परंतु शहर चांगला होण्याच्या नात्याने आजचा जो दिवस आहे, तो महत्वपुर्ण दिवस आहे. मला वाटत नाही की, कोणत्याही नारीवर अन्याय व्हायल पाहीजे, कोणत्याही नारीवर असा बोजा पडेल की, येणा—या दिवसामध्ये

एक रूपया कसे खर्च करणार? त्या विषयी विचार करा. तर आज हा जो प्रस्ताव आपण आणला आहे, महापौरजी, प्रशासनाकडून आपल्याकडे आला आहे. यामध्ये खुप त्रुटी आहेत, यामध्ये चुकीचे शब्द आहेत, चुकीचे दर आहेत, जो बोजा आपण पुर्ण करू शकत नाही. तर महापौरजी आज हा जो उपभोक्ता टॅक्स लावला जाणार आहे, या विषयवर आपण विचार करून आणि सगळयांनी विरोध करा. जर असे आपण टॅक्स लावत आहेत तर शहराला आपण काहीच देत नाही. लोकांना व्यवस्थीत पाणी सुध्दा देवू शकत नाही, पाण्यामुळे किती तरी महासभा स्थगित झाल्या आहेत. चांगल्या प्रकारे रोड बनवण्यासाठी निधी सुध्दा मिळाला नाही आणि काहीच दिले नाही आपण आणि आज टॅक्स वाढवत आहेत. तर महापौरजी आजचा दिवस आपल्यासाठी महत्वाचा दिवस आहे. आज आपली शक्ती समस्थ उल्हासनगरला दाखवून दया की आजच्या नंतर कोणालाही जास्त टॅक्स भरावा लागणार नाही. उलट आपण रद्द करा, काही सवलत दया, करामधील वाढ थांबवा आणि दाखवून दया की, नारी शक्ती उल्हासनगरसाठी काय करू शकत नाही? तरी महापौरजी आजच्या दिवशी टॅक्स लावू नका? टॅक्स माफीची व्योजना असली पाहीजे. भारतीय जनता पार्टीच्या अजेंडामध्ये लिहीले होते की, आम्ही सत्तेमध्ये आल्या नंतर टॅक्स माफ करू. सत्तेमध्ये आल्या नंतर टॅक्स माफ करणे तर सोडा उलट टॅक्स वाढवण्याचे चालले आहे, तर महापौरजी मी संपुर्ण उल्हासनगर शहरातर्फे विनंती करतो की, आजच्या दिवसामध्ये कृपया टॅक्स वाढवण्याचा हा विषय रद्द करण्यात यावा आज आपण नारी शक्ती दाखवून दया की, आज कोणताही टॅक्स लागणार नाही आणि हा टॅक्सचा जो विषय आहे, तो रद्द करण्यात येईल, धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः—</u>** मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त साहेब.....

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—</u>** मा. महापौर, उप महापौर, सचिव मॅडम, आयुक्त मॅडम, आजची सभा कृपया करून चालवा. कारण आज जागतीक महीला दिवस आहे. तुमचे चालले आहे की, ती मिटींग स्थगित करण्याची, तरी कृपया करून ही मिटींग स्थगित न करता ती चालवण्यात यावी.

**<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, माझ्या सहकारी भगिनी यांनी सांगितले आहे की, आपण ५० कोटींची पाणी योजना १५० कोटीवर नेली, १५० कोटीची ३०० कोटीवर नेली. तरीही या शहरामध्ये अशी आवस्था आहे की, लोकांना पाणी मिळत नाही. एक वर्षेभर आम्ही पाणी प्रश्नावर ठाम असूनही आमच्य प्रभागामध्ये आपण पाण्याची व्यवस्था केलेली नाही, अद्याप तरी लोकांना पाणी मिळालेले नाही. नंतर आपण स्वच्छता सर्वेक्षण आणले, आजही प्रभागामध्ये अशी परिस्थिती आहे की, शौचालयांना व्यवस्थित दरवाजे सुध्दा नाहीत. महीला शौचालयामध्ये ती सुध्दा प्रशासनाची जबाबदारी नाही का? आपण स्वच्छता मोहीम राबवतो, तेव्हा आपल्या अधिका—यांनी तेही लक्ष दयायला पाहीजे. त्या नंतर आपण कर वसुलीसाठी अभय योजना दिली, हाऊस टॅक्ससाठी अभय योजना दिल्या नंतर सुध्दा पुरेसा टॅक्स वसुल झालेला नाही, तर त्यामध्ये जे गरीब लोक आहेत, त्यांना आपल्या स्वत:च्या घराची काळजी असते, ज्यांच्याकडे छोटे घर आहे, ते लोक वेळवर टॅक्स भरतात. कारण की त्यांना माहीती आहे, आपले घर जाईल, ते घर वाचवण्यासाठी टॅक्स भरतात. परंतु ज्यांच्याकडे टॅक्स थकित आहे, ते मोठे मोठया प्रॉपर्टीची लोक आहेत, त्यांच्यावर आपण कारवाई केली का? तो टॅक्स वसुल करून आपल्या महापालिकेला त्याच्यातून काही तरी उत्पन्न मिळू शकते. असे असतांनाही आज आपण कच—याचे जे टॅक्स लावणार आहेत, त्याची झळ ही सर्वसामान्य जनतेलाच बसणार आहे. त्या दिवशी एक मुद्दा आणला होता की, पाणी बिलावर एक अभय योजना दयायची, आजही आयुक्त मॅडम मी तुम्हांला सांगते की, पाणी बिल हे सर्वसामान्य जनतेचे थकित बिल नाही आहे. जो सामान्य व्यक्ति आहे, ज्याचे छोटेशे घर आहे, तो पाणी बिल भरतो, त्याचे पाणी बिल अॅड झालेले असते. हे बिल बिल्डर लोकांचे आणि दुकानदारांचेच थकलेले आहेत. आजही आपण कच—यावर कर लावत आहेत. जर सामान्य नागरीकांना त्रास देणार आहेत, तर या कराला माझा पुर्णपणे विरोध आहे. प्रत्येक वेळी आपण सामान्य माणसालाच कात्रीमध्ये पकडून त्यांच्यवरच बोजा टाकू नये? पहीले आपण ज्या लोकांकडे टॅक्स बिल थकित आहे. तो वसुल करण्यासाठी प्रशासनाने पुर्णपणे प्रयत्न केले पाहीजेत. त्यातूनही आपण महापालिकेकडे पैसे उपलब्ध करू शकतो. जर आपण एक वर्षामध्ये जनतेला कुठल्याही सुविधा न देता, अजून त्यांच्यावर टॅक्स लावणार आहोत. तर जनतेच्या अक्रोशाला सामोरे जावे लागणार आहे. याचीही दक्षत प्रशासनाने आणि सभागृहाने घेण्यात यावी, धन्यवाद.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u>** मी तुमच्या भावना समजल्या आहेत, आता मी महीला या नात्याने माझ्या बहीनाना आज जागतीक महीला दिनानिमीत्त टाऊन हॉल इथे साजरा केला जाणार आहे. मी तुम्हांला बरोबर घेऊन जाण्यासाठी आले आहे आणि आशा बाळगते की, आपण माझे म्हणणे मानाल आणि माझ्या बरोबर यायाल तर मला खुप आनंद होईल आणि ही मिटींग आता स्थगित कराल तर खुप चांगले होईल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. महापौरजी, आज महीला दिनानिमीत्त सभागृहातील सर्व महीलांना आणि शहर वासियांना सभागृह नेता यांच्याकडून हार्दिक हार्दिक शुभेच्छा. शास्त्रानुसार लिहीले आहे की, “ यत्र

नारायंते् पुज्यंते् रमनते् तत्र देवत:" जिथे महीलांचा आदर केला जातो, देव सुध्दा तिथेच निवास करीत असतो, तर महीलांचे आदर करीत असतांना जो आपण आज इथे निर्णय घेतला आहे की आजची बैठक स्थगित करून सर्व महीलांना टाऊन हॉलमध्ये घेऊन जाणार आहेत, त्यामुळे मी आपले खुप खुप आभारी आहे की, आपण असा प्रस्ताव दिला आहे, आजच्या या सभा उद्या ३.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यात यावी आणि मी सचिव मॅडमला निवेदन करतो की, ३.०० वाजेची सभा सुरू करून ती पण उद्या ४.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यात यावी आणि सभा सुरू कराल तर मी स्थगनचा प्रस्ताव देतो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ही महासभा उद्या ३.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— डॉ प्रकाश नाथानी

**स्थगित प्रस्ताव**

विशेष महासभा मंगळवार दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ७३ क** **दिनांक : ८/०३/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ८/०३/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज दिनांक ९/३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी ३.३५ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— ९/३/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ९/३/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

**३ —ब**

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा मंगळवार दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक ९/३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३५ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३६ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३७ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ७ | श्रीमती मिना कौर अजितसिंग लबाना | ३९ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४० | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४१ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| १० | श्रीमती आशा नाना बिराडे | ४२ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १२ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४४ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १४ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १५ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४७ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १६ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४८ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १७ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४९ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १८ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५० | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५१ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २१ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५३ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५४ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्रीमती शुभांगिनी निकम | ५५ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २४ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५६ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसूळ | ५७ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५९ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २८ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर | ६० | श्रीमती मिनाक्षी रवि पाटील |
| २९ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६१ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३० | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६३ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६४ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३३ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ३. श्री. महेश पहीलराज सुखरामानी, ४. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ५. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७.श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), ८. श्री. चंद्रशेखर केशव यादव, ९. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, १०. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, ११. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, १२. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, १३. श्री. विजय चाहू पाटील, १४. श्री. आकाश परशुराम पाटील, १५. श्री. मनोज दिलीप सयानी, १६. श्री. अरूण लक्ष्मण आशान

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
७. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
८. श्री. प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त
९. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१०.श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
११.श्री. संतोष जाधव, सहाय्यक लेखा अधिकारी
१२.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
१३.अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
१४.श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता
१५.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१६.श्री. बी.एस. पाटील, शाखा अभियंता
१७. श्री. तिजोरे, शाखा अभियंता
१८.श्री. बाळू नेटक, प्र. सुरक्षा अधिकारी
१९.श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरीक्षक
२०. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरीक्षक
२१. श्रीमती. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२२. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२४. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२५. श्री. अच्युत सासे, मुख्य लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.३० वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** पहीली सभा सुरू होत आहे, ही दिनांक २०/२/२०१८, ८/३/२०१८ रोजीची स्थगित झालेली सभा आहे.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १:—** स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

---

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सर्व प्रथम पाण्याचा विषय हा आमच्याकडे एकदम गंभीर विषय झालेला आहे. परवा पाणी नव्हते, काल एम.आय.डि.सी. ची लाईट गेलेली होती, काल पाणी आले नाही, आज पाणी बंद आहे. जर चार—चार, पाच—पाच दिवस पाणी नसेल तर उन्हाळयामध्ये लोक कसे राहणार? पाणी पुरवठा विभागाचे कोण आहेत? त्यांनी सांगाव, आम्हांला पाण्याची व्यवस्था कोण करून देणार? कोणीही नाही, एवढा गंभीर विषय आहे. काल पाण्याचा दिवस होता, चार तास पण पाणी नव्हते.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** प्रभाग समिती क्र.४ मध्ये पण पाण्याची खुप समस्या आहे आणि सर्व ठिकाणी त्यांनी टाईम टेबल पण बिघडावले आहे. पब्लिक त्रस्त आहे की, त्यांना संपुर्ण दिवस पाण्यासाठी बसून राहावे लागते आणि वेळेवर पाणी येत नाही. पाण्याची जी वेळ ४.०० वाजता आहे, ते ७.०० वाजता, ८.०० वाजता पाणी सोडत आहेत.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** मा. आयुक्त साहेब, याचे उत्तर दयायला कोण आहे? कोणी नाही? एवढया गंभीर विषयावर कोणीही उत्तर दयायला नाही, हा विषय गंभीर नाही.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडेः—** पाण्यापेक्षा कुठलाही विषय गंभीर नाही, लोकांना उन्हाळयात पाणी नाही.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** बाकीचे कुठले विषय गंभीर आहेत?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडेः—** पाण्या शिवाय कुठलाही विषय गंभीर नाही. नंतर कुठलीही चर्चा करा, अगोदर पाण्याच्या विषयावर चर्चा करा.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, पाणी प्रश्नावर जर का परत चर्चा होते, याचाच अर्थ पाणी प्रश्नावर अजून गंभीरतेने आयुक्त साहेबांनी पण विचार केला नाही असे सभागृहाचे मत आहे. परंतु पाणी प्रश्नावर जर का पुन्हा पुन्हा चर्चा होते आणि अधिकारी उपलब्ध नाहीत आणि आपण गहन विषय पाण्या पेक्षा, अतिमहत्वाचा विषय जर दुसरा संबोधतात, याचाच अर्थ संपुर्ण सभागृहाला एकदा तरी कळू दया की, पाण्या पेक्षा सर्वात महत्वाचा विषय काय आहे? पाणी प्रश्न हा ज्वलंत विषय आहे, तो अजून संपलेला नाही. फक्त आपल्या विनंतीनुसार, महापौरजी, आपल्या विनंतीनुसार महासभा चालवली गेली की, आपण पाण्याचा बंदोबस्त कराल. आज तीच समस्या, मी मराठीमध्ये बोलले होतो, फिरून फिरून भोपळेच येतात, परत तिथेच आलो. हे कधी होईल? चर्चा करून विषय संपवण्यासाठी महासभा चालवली जाते, परंतु चर्चेच्या सुरूवातीलाच जर हा विषय येतो, तर तो संपला पाहीजे, नंतर परत दुसरा विषय घ्या. महापौरजी पहीले पाण्याच्या विषयावर चर्चा करा, नंतर दुसरा विषय घ्या.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** महत्वाचा विषय पाण्याचा नाही का? नाही बोलायचे तर मग मिटींग घेऊ नका. तुम्ही बोलणार नाही तर कोण बोलणार?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** आपण ही मिटींग बोलवली आहे आणि मिटींगमध्ये सर्व सदस्य उपस्थितीत आहेत. मागच्या २० फेब्रुवारीची मिटींग, पाण्यामुळे आपण स्थगित केली होती आणि ती मिटींग आज होणार आहे. एक महीन्यामध्ये लोकांना पाणी आले नाही, तेव्हा पाण्याची चर्चा आपण इथे करीत आहेत, नगरसेवक करीत आहेत.

हे जर चुकीचे असेल, तर आपण महासभा बोलावून, एक महीना महासभा उशिरा घेऊन, कोणाला उप आयुक्त म्हणून पाण्याचा चार्ज देवून “क्या पाया, क्या खोया” त्याचा पण विचार होणे गरजेचे आहे ना? जर तुम्ही सिस्टम सुधारण्यासाठी उप आयुक्त दिले, एक महीना झाला, त्यांनी काय केले? त्याचे पण उत्तर मिळाले पाहीजे. पाणी जर लोकांना मिळाले तर लोक काहीच बोलणार नाही. लोकांना का आनंद होतो का इथे येऊन पाण्याच्या विषयावर परत परत विषय आणायचा? पब्लिक आम्हांला शिव्या देतात, तेव्हा आम्ही शिव्या खाऊ इथे सांगायला येतो, तर ते पण सांगू देत नाहीत.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** आम्ही नाटक करतो का? आम्ही प्रश्न विचारत आहेत, चार दिवस पाणी येणार नाही तर आम्ही घरामध्ये बसायचे का?आम्ही नगरसेवक, लोकप्रतीनिधी आहेत, आम्हांला उत्तर दयायचे आहे, उत्तर तुम्हांला दयायचे नाही.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मा. महापौरजी, मागच्या मिटींगमध्ये पाण्या विषयी जेव्हा चर्चा झाली, तेव्हा तुम्ही सक्त आदेश दिले होते की, जो पर्यंत पाण्याची व्यवस्था होत नाही, तो पर्यंत महासभा होणार नाही. त्या नंतरही तुमच्या विनंतीनुसार महासभा झाली. आजही पाण्याचा प्रश्न जशाचा तसाच आहे. त्याच्यावर नेमके तुम्ही आदेश दिले, त्याचे काय झाले? का नाही झाले. पाण्याची समस्या का नाही सुटली? किंवा पाण्याची समस्या सुटली नसेल तर त्याच्यावर काय उपाययोजना केल्या? त्याची तरी माहीती महापौरांनी आम्हांला दयायला पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहाला याच्या पहीले पाण्याच्या विषया बाबत स्थगित केले होते आणि त्याच्या नंतर मा. आयुक्तांनी या विषया बाबत पाऊल पण उचलले होते की, कशा प्रकारे पाण्याची समस्या सुटेल आणि काही ठिकाणी समस्या पण सुटल्या आहेत. आपण असे नाही बोलू शकत नाही की, सफलता मिळाली नाही. काही ठिकाणी सफलता मिळाली नसेल, तर मी मा. आयुक्तांना निवेदन करतो की, त्यांनी जे जे कार्य केले आहेत, पुढे अजून दोन चार दिवसामध्ये जे कार्य करायचे आहेत. त्यासाठी पाणी पुरवठयाच्या अधिका—यांना बोलावून सभागृहाच्या सदस्यांना या विषयी सांगण्यात यावे की, महापालिकेतर्फे काय काय कार्य चालले आहेत आणि पुढे येणा—या दिवसामध्ये उन्हाळा येणार आहे. त्यामुळे पाण्याची समस्या कशा प्रकारे सोडवण्यात येईल, असे पाणी पुरवठा विभागाचे कोणीही अधिकारी, उप आयुक्त किंवा सक्षम अधिकारी जे काम करीत आहेत, त्यांना बोलावून सभागृहाचे समाधान करण्यात यावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** पाणी पुरवठा विभागाचे इंजिनियर मिटींगसाठी गेले आहेत, त्यांच्या जागेवर दुसरे अधिकारी आहेत, त्यांना बोलावले आहे. ते येऊन स्वतः माहीती देतील, मला वाटते की, तो पर्यंत आपण अजेंडावरचा दुसरा विषय घेऊन संपवून टाकू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, जो पर्यंत पाणी पुरवठयाचे अधिकारी या विषयाची माहीती सभागृहाला देण्यासाठी येत आहेत, तो पर्यंत विषय पत्रिकेवर जो विषय आहे, त्यावर चर्चा चालू झाली पाहीजे.

**महापालिका सचिवः—** विषय पुन्हा वाचत आहे.

---

⇨ **विषय क्र. १ः—** स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ‘‘उपभोक्ता फी’’ [User fee] आकारणी करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

---

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** कृपया डिटेल्स वाचून दाखवा.

**महापालिका सचिवः—** गोषवारा दिला होता, संबंधित विभाग माहीती देईल.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** खुप दिवस झाले, मिटींग परत परत स्थगित होत आहे. ते कागद मी आणले नाहीत. तरी कृपया संपुर्ण माहीती दया.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, मा. सभागृह, घनकचरा व्यवस्थापन नियम सन २०१६ अंतर्गत जो खर्च येतो, तो शासनाच्या निर्देशानुसार, मार्गदर्शक सुचनानुसार आपणाला नागरीकांकडून उपभोगक्ताकडून उपभोगक्ता फि म्हणून आकारणीसाठीचा हा प्रस्ताव आहे.

या पुर्वी हा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मंजूर होऊन, सदरचा प्रस्ताव आता महासभे समोर आलेला आहे. घणकचरा व्यवस्थापना अंतर्गत, घणकच—यासाठी जो खर्च आहे, त्या खर्चाच्या अनुषंगाने उपभोगक्ता फि आकारायची आहे. यासाठी येणारा जो खर्च आहे, पगार व भत्तेसाठी ३२ करोड रूपये आहेत, प्रशासकिय खर्च २ रूपये करोड आहेत, कचरा वाहतुक खर्च १६ करोड रूपये आहेत. या प्रमाणे एकुण ७० करोड, ३३ लाख रूपये हा घणकचरा व्यवस्थापनासाठी येत असतो. त्या अनुषंगानेच त्यातून सध्या स्थितीत येणारा मलप्रवाह कर ५ करोड रूपये आहे व विशेष मलप्रवाह कर ८ लाख रूपये आहे. असे टोटल उत्पन्न म्हणून आपल्याला ५ करोड, २३ लाख रूपये येत आहेत. तर ही जी तुट आहे, ती तुट भरून काढण्यासाठी हा उपभोगक्ता कर लावलेला आहे आणि हा उपभोगक्ता कर लावतांना सर्व मालमत्ता धारक, निवासी....

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** उपभोगक्ता कर आहे की, उपभोगक्ता फि आहे.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** उपभोगक्ता फि आहे. तर हा कर नसून ही फि आहे आणि जी व्यक्ती, जी अस्थापना, जी दुकाने आपला दैनंदिन निर्माण होणारा कचरा, त्याची विल्हेवाट जर त्याच ठिकाणी लावत नसेल तर तो कचरा महापालिकेला उचलण्यासाठी देत असेल, तर महापालिकेने त्याच्यासाठी ही फि आकारली आहे. जी अस्थापना, जी घर, जे दुकान, जो व्यवसाय, कारखानदार, असेल त्यांच्या इथे जो कचरा निर्माण होणारा असेल, त्याची विल्हेवाट जर ते स्वत: लावत असतील आणि महापालिकेला तो उचलावा लागत नसेल, तर त्याच्यासाठी १०० टक्के सुट आहे. त्याच्यामुळे जो कचरा निर्माण करणारा आहे, त्याच्यासाठी ही फि आहे. जो त्याच्या कच—याची स्वत: विल्हेवाट लावणार आहे आणि तो कचरा निर्माण करून महापालिकेला उचलावा लागणार नाही, त्याच्यासाठी १०० टक्के सुट आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडून मा. महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** झोपडपट्टी धारकांकडून किती वसुल करणार आहेत? दुकानदाराकडून किती वसुल करणार आहेत? फ्लॅट धारकांकडून किती वसुल करणार आहेत? त्याची पण माहीती दयावी.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** या पुर्वी मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव प्रशासना मार्फत सादर करण्यात आला होता. तो आर.सी.सी. व टिअरगर्डरसाठी प्रती महा ३७५ रूपये, एसी. सिट ब्रिक्स बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्तांसाठी २७५ रूपये, लाकडी मातीचे बांधकाम असलेल्यासाठी मालमत्तांसाठी १७५ रूपये, तसेच तबेले, मंगल कार्यालय, हॉटेल्स व रेस्टारंट यांच्यासाठी ज्यांचे क्षेत्रफळ १००० स्केअर फुट आहे, त्यांच्यासाठी १००० रूपये व ज्या मालमत्ता १००० क्षेत्रफळापेक्षा अधिक आहेत, त्यांना ५००० रूपये, दर महीन्याला. असे एकुण १ लाख, ७३ हजार, ७७५ प्रॉपर्टीज आहेत. सर्व निवासी व बिगर निवासी त्यांच्यावर एकुण ६५ करोड, ७२ लाख ४७५०० रूपये या प्रमाणे उपभोगक्ता फि आकारलेली आहे, हा प्रस्ताव स्थायी समितीकडे गेल्या नंतर स्थायी समितीकडून काही सुधारणा केल्या नंतर सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे आलेला आहे. प्रस्तावाला मालमत्ता फि लावण्यासाठी मंजुरी दयायची आहे. मालमत्ता उपभोगक्ता

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** स्थायी समितीने सुधारणा नाही केली, धोरणात्मक निर्णय असल्यामुळे महासभेपुढे पाठवला आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** निर्णय काहीच नाही झाला, मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आणि सर्व सदस्य, आज उल्हासनगरच्या नागरीकांची परिस्थिती अत्यंत बिकट आणि दयनिय आहे. आज जी.एस.टी. लागल्या नंतर बरेचशे कारखाने आणि कंपन्या बंद झालेल्या आहेत. बेरोजगारी वाढत आहे, उल्हासनगरवासियांनवर हा झिजिया कर, हा झिजिया कर औरंगाजेब यांनी लावला होता. तो आपण लावत आहोत आणि मला वाटत नाही, खरच रामराज्य किंवा आम्हांला जे पाहीजे ते आहे. कारण की, आमच्या ज्या प्रॉपर्टीज आहेत, जें प्रॉपर्टी धारक पैसे भरतात, त्यांच्याकडूनच आपण वसुल करण्याच्या मागे लागलो आहे. परंतु जे प्रापर्टी धारक डिटेक्टेड नाहीत किंवा ॲसेसमेंट करून कमी आलेल्या आहेत. ॲसेसमेंट आणि बाकीच्या गोष्टी म्हणजे आपण इनकम सोर्स हा जो ओरीजनल पाहीजे म्हणजे चारांना मदत करण्यासारखा सोर्स झाला आणि जो सर्वसामान्य नागरीक भरणारा आहे, त्याच्यावर आपण कर लादतो, म्हणून त्याला झिजिया कर म्हणटल मी आणि बाकीचे चोर आहेत. ते प्रॉपर्टीची माहीती देत नाहीत किंवा भाडयांने देतात, त्याच्या मागे न लागता, आपण हे लावणे बरोबर नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की, सदरचा ठराव हा सर्व संमतीने रद्द केला पाहीजे. मी सर्वांना विनंती करतो की, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती कविता पंजाबी व सदस्या, श्रीमती दिपा पंजाबी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, काल याच विषयावर चर्चा झाली होती, ही फी, फीच्या नावाखाली लावला जाणार आहे, टॅक्स, कर, जी युझर फी आहे, ती रद्द केली पाहीजे. कारण की, महापौरजी, या सभागृहामध्ये बसलेले प्रत्येक नगरसेवक ओळखतात की, या वर्षामध्ये, या शहरामध्ये, कोणत्याच प्रभागामध्ये, काहीच काम झाले नाही. जर काही वाढवायचे आहे तर त्या बदल्यात, मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी मिटींग होण्याच्या पहीले सांगितले की, अतिमहत्वाचे काय आहे? आयुक्त साहेबांनी सांगितले की, काही मुद्दयावर चर्चा केल्या नंतर पाण्याच्या विषयवर चर्चा करू, परंतु अतिमहत्वाचे काय आहे? या शहरामध्ये मी एक वर्षा पासून बघत आलो आहे की, अतिमहत्वाचे काम होत नाही. पहीलेच लोकांवर प्रतिमहा महानगरपालिकेतर्फे ६६७ रूपये, ७० पैसे टॅक्स आपण वेगळा घेत आहोत. त्याच्या नंतरही टीयर गटर, आर. सी.सी. चे बांधकाम असणा—यांकडून ३७५ रूपये, म्हणजे एक महीन्यामध्ये एक हजार ४२ रूपये त्या व्यक्तीला भरावे लागेल आणि जे भरत आहेत, एक वर्षात काहीही काम झाले नाही, महापौरजी, आपण पण या सभागृहामध्ये सांगितले आहे की, समस्या आहेत, जे काही कार्य होत आहेत, ते मागच्या वेळचे कार्य अजून चालू आहेत. एका वर्षात, एका वार्डमध्ये एक किलो सिमेंट पण कुठे लावले नाही आणि कुठे पण टीअरगर्डर नाली बनली नाही. आपण शहरवासियांना काहीच देत नाहीत आणि त्यांच्याकडून घ्यायचे चालले आहे. ही कसली राजनिती आहे, नेताजी सुभाषचंद्र बोस बोलेले होते की, “तुम मुझे खुन दो, मै तुम्हे आझादी दुंगा” हे तर रक्त शोषण करीत आहेत, “आझादी कब मिलेगी” आता हा कसला अन्याय आहे? या शहरावासियांवर आपण किती अन्याय कराल? लोक किती सहन करणार? पाण्यासाठी त्रस्त आहेत. पक्षी पाण्या शिवाय मरत आहेत, आपण त्यांच्या विषयी काही करत नाहीत आणि टॅक्स देण्यासाठी बोलत आहेत. आपण कोणत्या तोंडाने वसुली करणार? किती अन्याय कराल? किती हंटर मारणार? परंतु आम्ही सहन करणार नाही. हा अन्यायकारक टॅक्स आम्ही लावून देणार नाही, पहीले आपण कार्य सांगा, पहीले आमच्या वार्डमध्ये कार्य करा, नंतर आम्ही लोकांबरोबर जावू की, हा टॅक्स लावू. महापौरजी खुप दुःखाने सांगावे लागते की, एक वर्षात एक पण कार्य झाले नाही. आम्हांला वाटते की, महापौर आपण आमच्या वार्डमध्ये या आणि उद्घाटन करा. रोड बनले पाहीजेत, नाली बनली पाहीजे, समाज मंदिर बनले पाहीजे, लाईटचे खांबळे बसून लाईट आली पाहीजे, काय केले? संपुर्ण सभागृह सांगेल की, कोणाच्या वार्डमध्ये काम झाले? आणि असे काहीच न करता, आझादिच्या नावाखाली आपणाला काही करावेसे वाटते आणि हे रक्त शोषण केले जात आहे. हे आम्ही होऊन देणार नाही. संपुर्ण सभागृहामध्ये मी या टॅक्सला विरोध करतो. काल सुध्दा मी सांगितले होते की, नारी शक्ती आहे, आणि या शक्तीचे रूप मा. महापौरजी आपण बसल्या आहेत. तर ही शक्ती दाखवून दया की, महत्वाचा विषय पण्याचा आहे, पाणी वाढवा, सगळयांना चांगल्या सुविधा दया. त्याच्या नंतरच हा टॅक्स लावला जाईल. जो पर्यंत या शहरामध्ये काही सुविधा उपलब्ध होणार नाहीत, आम्ही हा अन्याकारक टॅक्स लावून देणार नाही. संपुर्ण सभागृहाला मी विनंती करतो की, आपण जनतेला काय सांगणार? काय सांगणार? एक रूपया वाढवला आहे, दहा रूपये वाढवले आहे. आपण काय दिले आहे? हे सर्व लोकप्रतिनिधी २०, २५, ३० हजार मतानी लोकांच्या संख्या मात्राने निवडून आले आहेत. ते शहराला काय सांगणार? तरी कृपया महापौरजी, आपण या विषयाला गंभीरतेने घेण्यात यावे. हा जो विषय चर्चेला आला आहे, त्याला विरोध करा. मी संपुर्ण सभागृहाला विनंती करतो की, आपण काही दिले नाही, तर आपल्याला घेण्याचा अधिकार नाही. पहीले आपण काही दया, नंतर आपण घेऊ. महापौरजी, आयुक्त साहेब, या शहरामध्ये लोक आमच्याकडे मोठया आशेने बघतात की, नगरसेवक म्हणून तुम्ही काही तरी कराल. गेल्या एक वर्षामध्ये एका पण नगरसेवकाच्या वार्डामध्ये कुठलेही कार्य झाले नाही. महापौरजी हे किती चालेल? वर्ष निघून गेले, दुसरे वर्ष चालू झाले. नविन वर्षाची सुरूवात गुढीपाडव्या पासून होईल. नविन वर्षाची सुरूवात चेटीचंद पासून होईल. परंतु अजून रस्त्यावर खड्डे कायम आहेत. आपण नविन वर्षाचे काय स्वागत करणार? या जनतेला काय सांगणार? मी विनंती करतो की, पहीले आपण काही करून दाखवा, त्याच्या नंतर हा टॅक्स घेऊन या. तो पर्यंत हा अन्यायकारक टॅक्स लावू नका? महापौरजी आपण असे आदेश दया. आपण संपुर्ण सभागृहाला सांगा, संपुर्ण उल्हासनगरला सांगा की नारी शक्ती जी घर चालवणे पण माहीती आहे आणि शहर चालवायला पण माहीत आहे, देश चालवायला माहीत आहे. आपण सांगा की, आपण जर काही कार्य कराल, त्या नंतरच कर वाढवू. मी आपल्याला विनंती करतो की, असा जो अन्यायकारक टॅक्स आहे, तो रद्द केला जावा, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी व सदस्या, श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** मा. महापौर साहेबा, आयुक्त साहेब, सन २०१४ मध्ये भारताचे मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदीजी, प्रधानमंत्री झाले. त्यांनी सर्वसामान्य जनतेला चांगल्या सुविधा देण्यासाठी खुप चांगले मंत्रीगण नियुक्त केले आणि काही वेळा त्यांना चांगल्या प्रकारे ओळखले, मी जे मंत्री बनवले आहेत, ते लोकांना व्यवस्थित सुविधा देताता की नाही, ते व्यवस्थित काम करतात की नाही, जेव्हा त्यांना असे दिसत होते की, काही मंत्री सेवा देण्यासाठी कमी पडत आहेत, तर त्यांना बाजूला सारून त्यांच्या जागेवर असे मंत्री

महोदय नियुक्ती करतात की, जे लोकांना चांगली सुविधा देतील. खुप कालावधी नंतर महाराष्ट्र शासनाकडून आम्ही मागणी केली, इथल्या जनतेने मागणी केली, सर्व लोकप्रतिनीधीनी मागणी केली की, आम्हाला असा कोणी अधिकारी दया की, जे आय.एस. आय. अधिकारी असेल ते शहराला सर्व सुविधा देवू शकतील. महाराष्ट्र शासनाने विचार करून एक चांगले अधिकारी, श्री. निंबाळकर साहेब यांची नियुक्ती केली. आमच्या उल्हासनगरच्या जनतेने सुरूवातील चांगल्या सुविधा मिळतील अशी अशा बाळगली होती. असे दिसून येत होते की, साहेब आल्या नंतर संपुर्ण उल्हासनगरची कायापालट होऊन जाईल. ज्या चांगल्या सुविधा आहेत, त्या सर्व आपल्याला मिळतील, सकाळी ७.०० वाजता स्कुटरवर निघत होते आणि जिथे जिथे समस्या होती, तिथे सुधारणा होत होती. व्हॉटस अॅप वर जे लोक कंम्पलेन्ट करीत होते, त्याची सुनावणी होत होती आणि अचाणक हळू हळू ज्या सेवा होत्या त्या कमी कमी होत गेल्या. कारण उल्हासनगर महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये पैसे खुपच कमी आहेत. संपुर्ण वर्ष भर प्रत्येक वार्डमधून लोकांची मागणी होत होती की, आमच्या वार्डामध्ये नाली बनवा, आमच्या वार्डामध्ये नाल्या तुटून गेल्या आहेत, आमचे समाज मंदिर पडत आहेत, वार्डमधल्या कल्वर्ट तुटत आहेत, रोड खराब झाले आहेत, रोडचे खड्डे भरून दया, संपुर्ण वर्षभर वाट बघितल्या नंतर आम्हांला काहीच सुविधा मिळाल्या नाहीत. कारण तिजोरीमध्ये पैसे कमी होते. त्याच्या नंतर भारताचे पंतप्रधान यांच्या आदेशाने, शहरा विषयी जर चांगली चर्चा चालू झाली, तर त्यांच्याकडून सांगण्यात यावे की, हा जो कर लावायचा आहे, तो रद्द करण्यात यावा, असा त्यांचा विचार असला पाहीजे. आता मी जास्त न बोलता, मी पब्लिकच्या वतीने, व्यापा—याच्या वतीने विनंती करतो की, कराचा जास्त बोजा वाढवू नका? मालमात्ता धारकांचे, घरपट्टीचे बिल राहीले आहेत, इमारती बनल्या नाहीत, त्यांचे बिल निघाले नसतील, तर हे उत्पन्न येणार आहे, ते वाढविण्यात यावेत त्यामुळे शहरामध्ये सुधारणा करू शकतो, बाकी नविन टॅक्स पब्लिकवर लादू नका? कारण की उल्हासनगरची जनता धंदयाच्या उत्पन्नामळे  खुप त्रस्त आहे आणि आपण एक वर्षभर त्यांना काहीच सुविधा दिल्या नाहीत, पहीले आपण त्यांना सुविधा दया, त्याच्या नंतर कर लावण्यासाठी विचार करा, ते चांगले होईल. महापौरजी आपल्याला आणि उप महापौर साहेबांना, आयुक्त साहेबांना आणि सर्व लोकप्रतिनिधींना मी विनंती करतो की, नविन टॅक्स लावू नका, धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाडः—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, कालही याच्यावर चर्चा झालेली आहे आणि आज परत तोच विषय आहे. तर आज पाण्याचा प्रश्न एवढा गहण आहे, आपण जी ५० कोटीची योजना १५० कोटीवर नेली, १५० कोटीची ३०० कोटीवर गेली. तरीही शहरामध्ये व्यवस्थित पाणी पुरवठा झालेला नाही. त्याच बरोबर आज प्रत्येक वार्डमध्ये अशी परिस्थिती आहे की, नाले सफाई नाही, आपण स्वच्छता अभियान राबवले, फक्त घरोघरी कॅम्पलेट वाटून आणि भिंती रंगवून स्वच्छता अभियान होऊ शकत नाही. त्याच्यासाठी मनुष्यबळही हवे आहे. ते आपण त्यांना परवू शकलो नाही, कुठलाही वार्ड हा व्यवस्थितपणे साफसफाईमध्ये पुर्णपणे पुर्णतः झालेला नाही. असे असतांनाही आज आपण हा जो टॅक्स लावणार आहेत, हाऊस टॅक्ससाठी आपण अभय योजना राबवूनही पुर्णपणे आपल्याला वसुल करता आला नाही. त्यामध्ये गोरगरीब लोकांनी पुर्ण टॅक्स भरलेला आहे. कारण ज्याच्याकडे फक्त स्वतः राहण्या पुरता घर आहे, तो माणूस टॅक्स थकीत ठेवून त्याच्या घराच्या किंमती एवढा होई पर्यंत वाट बघत नाही. कारण त्याला त्याचा घर वाचवायचा असतो. तो वेळेमध्ये टॅक्स भरतो, जो टॅक्स थकलेला आहे, हा जवळ पास धनदांडग्या लोकांकडेच थकलेला आहे. तर अभय योजने नंतरही आज पर्यंत आपल्या प्रशासनाने टॅक्स वसुल होण्यासाठी काय कारवाई केलेली आहे? आणि किती लोकांकडून, किती प्रमाणात हा टॅक्स वसुल केलेला आहे? त्याच बरोबर आज आपण जो टॅक्सचा विषय आणलेला आहे, तर या विषयामध्ये सुध्दा हा भार गरीब जनतेवरच पडणार आहे. कारण जे टॅक्स भरतात, ते टॅक्स भरणारी गरीब जनताच आहे. आज जर आपण ही फी वाढवली तर जे भरत नाही, त्यांना त्याच्याशी घेणेदेणेच नाही ना? ते तसेच ठेवणार आहेत आणि पुन्हा आपण गरीबांच्याच खिशाला कात्री लावणार असतो. तर हा जो विषय इथे आणलेला आहे, हा पुर्णपणे गरीबांवर अन्याय करणारा आहे आणि त्यामुळे, त्या विषयासाठी माझा पुर्णपणे विरोध आहे. तर याच्यावर महापौरांनी आणि आयुक्त साहेबांनी पुर्णपणे विचार करावा, शक्यतो जास्तीत जास्त पहीले आपला हाऊस टॅक्स ज्या लोकांकडे थकित आहे, तो वसुल करण्याचा पुर्णतः प्रयत्न करण्यात यावा आणि गरीबांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही, याची आपण काळजी घ्यावी. कारण प्रत्येक वेळी आपण चोराला सोडून जर संन्यासालाच फाशी देणार आहोत, तर गरीब जनतेच्या सुध्दा आक्रोशाला सामोरे जायाला लागणार आहे. कारण बाहेरही सर्व लोक या टॅक्सच्या विरोधामध्ये आहेत, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u>** मा. आयुक्त साहेब, काल या विषयावर बरीच चर्चा झाली, परंतु कालच माझे जे बोलणे झाले, मला वाटते की, त्यावेळी ब—याचशा सदस्यांनी ऐकुन घेतले नाही. कारण त्या वेळेस बराच गोंधळ चालू होता. मी आज पुन्हा त्या विषयावर बोलणार आहे, सन २०१४ साली या देशात एक वेगळीच राजनिती झाली आणि या भारतीय जनता पक्षाचे एक मोठे आणि लोकांना आकर्षक असे सरकार दिल्लीमध्ये स्थापन झाले, लोकांना वाटले की, आता काही तरी आपल्यासाठी हे सरकार करेल आणि त्या वेळेला या

सरकारने सांगितले होते की, “अब अच्छे दिन आयगे” या “अच्छे दिन आयगेच्या” एका वाक्याला लोकांनी भरभरून त्यांना मतदान केले आणि पुन्हा महाराष्ट्रामध्ये पण त्यांची सत्ता आली. परंतु दुर्देवाने मागच्या चार वर्षात लोकांच्या अपेक्षा या सरकारकडून पुर्ण होऊ शकल्या नाहीत. त्या अपेक्षात आणखी, म्हणजे दु:खात भर घालावी त्या प्रमाणे या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एक नविन प्रस्ताव, स्वच्छता कर म्हणून आकारलेला आहे. त्याला कारण सांगतात की, हे दिल्ली सरकारचे काम आहे. दिल्लीत केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान हा कार्यक्रम आम्हांला दिलेला आहे. त्यानुसार आपल्याला तो राबवायचा असेल, तर हा कर आपल्याला लागू करावाच लागेल. मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मी आपल्याला फक्त एकच प्रश्न विचारतो की, जर स्वच्छ भारत अभियान दिल्ली सरकारचे असेल, तर हा कर उल्हासनगरच्या महानगरपालिकेच्या जनतेने का भरावा? मी छोटेसे उदाहरण देतो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या शेजारीच बदलापुर नगरपालिका आहे, त्या ठिकाणी, नगरपालिकेचा बजेट, म्हणजे अर्थसंकल्प फक्त ४६५ कोटींचा आहे आणि त्या मानाने उल्हासगनर महानगरपालिकेचा बजेट ६०० कोटींपेक्षा जास्त आहे. मागच्या वर्षी मला वाटते या सभागृहामध्ये ७०० कोटींचा बजेट सादर केला होता. नंतर काय ताळमेळ झाली किंवा काय चुका झाल्या? माहीत नाही, नंतर ६०० कोटींवर आले. तो विषय भाग वेगळा आहे, परंतु बदलापूर सारखी नगरपालिका ४६५ कोटी रूपयांत आपला कारभार व्यवस्थित चालू शकते, आपली शिल्लकी अंदाजपत्रक जाहीर करू शकते आणि दोन दिवसापुर्वीच त्या नगरपालिकेमध्ये हा स्वच्छता कर आकरण्यासाठी सत्तारूढ पक्षानी ठराव मांडण्यापेक्षा मुख्याधिकारी, चिफ ऑफिसर यांनी ठराव मांडला होता. मी या सभागृतील सर्व भाजपाच्या नगरसेवकांना सांगू इच्छितो की, बदलापूरमध्ये शिवसेना आणि भाजपाच्या नगरसेवकांची युती असून त्यांचे दोघांचे सरकार आहे. इथे फक्त तुमची एकाधिकारशाही आहे आणि त्याएकाधिकारशाहीला लागून तुम्ही हा नविन कर तुम्ही जनतेच्या माथी मारत आहेत. बदलापुरच्या त्या नगरपालिकेमध्ये भाजपा आणि शिवसेना नगरसेवकांचे एकमत झाले आणि दोन्ही नगरसेवकांच्या एकमता नंतर हा स्वच्छता कर तिकडे फेटाळण्यात आला, मुख्याधिका–यांनी जो ठराव मांडला होता, तो फेटाळण्यात आला आणि बदलापूरवासिय, नागरीक या स्वच्छता करापासून मुक्त झाले. माझी हिच नगरसेवकांना विनंती आहे की, जर बदलापूर नगरपालिका हे छोटसे शहर आहे, छोटीशी नगरपालिका आहे, तिथे ४६५ कोटीचा बजेट आहे आणि आपल्याकडे ६०० कोटींचा बजेट असतांना सुध्दा आपण जर नविन कर लागू करू शकतो किंवा महापालिका लागू करीत असेल. तर उल्हासनगरच्या नागरीकांचे मोठे दुदैव म्हणावे लागेल. असेच काम आपल्याकडे चालू आहे, अच्छे दिनच्या ब–याच गप्पा आपण मारल्या पण ते काही आपल्या लोकांना दिसत नाही. तरी सुध्दा आता आपल्याला अच्छे दिन नकोच, जे आमचे पुर्वीचे दिवस आहेत, ते तसेच राहू दया. त्यासाठी हा नविन कर लागू करू नये, अशी मी या सभागृहाला विनंती करत आहे. काल मी माझ्या स्वत:च्या घराचा हिशोब केला, काल मी चौधरी साहेबांना सांगितले, चौधरी साहेब, जमनादास पुरस्वानी साहेब हे आपल्याला समजावून सांगत आहेत की, एका दिवसाला फक्त आपण ५ रूपये वाढवणार आहेत, एका दिवसाला ५ रूपये त्या प्रमाणे महीन्याला १५० रूपये आणि वर्षाला जवळ जवळ ४५०० रूपये प्रत्येक फ्लॅटधारकाला भरावे लागतील, मी इतरांचे काहीच सांगत नाही, फक्त चौधरी साहेबांना सांगितले आहे. हा कर लागू झाल्यापासून मला स्वत:ला वर्षाला ४५०० रूपये एक्स्ट्रा महानगरपालिकेमध्ये भरावे लागतील आणि माझ्या सारखा सर्वसामान्य माणूस हे भरू शकत नाही. तर माझ्या पेक्षा किती तरी गरीब लोक या शहरामध्ये राहत आहेत. जे सकाळी उठून नाक्यावर कामाला हजर राहतात, काम मिळाले तर काम करतात, मिळाले नाही तर संध्याकाळी परत घरी येतात. असे लोक, हातावर पोटभरणारे लोक आहेत. त्या लोकांसाठी जर आपण हा टॅक्स लावला, तर त्यांना हे शहर सोडून जाण्या शिवाय पर्याय राहणार नाही. तर हा मोठा अन्याय सर्वसामान्य, गरीब लोकांवर करू नका? पुन्हा मी तुम्हाला सांगतो की, आम्हांला अच्छे दिन नको? जे दिवस पुर्वीचे आहेत ते तसेच राहू दया. आम्हांला नविन टॅक्स नको, आम्हांला अच्छे दिन नकोच? जे स्वच्छता अभियान आहे, ते चालू राहू दया आणि स्वच्छा अभियान म्हणता म्हणता मी एक छोटेसे उदाहरण देतो की, दिनांक २८ फेब्रुवरीला स्वच्छता अभियान चालू होते, सगळीकडे व्यवस्थितीत साफसफाई होती, परंतु १ ते २ तारखे पासून लोकांनी सांगावे की, वार्डमध्ये तशी स्वच्छता होते का? त्यांनी सांगावे. नगरसेवकांनी सांगावे, मी सांगतो, माझ्या परिसरात या मी तुम्हांला दाखवतो, दिनांक २८ फेब्रुवारीला या ठिकाणी स्वच्छता होती. आज आठ, नऊ मार्च रोजी त्या ठिकाणी काय परिस्थिती आहे? कचरा तसाच पडलेला आहे, नाले, गटारे तसेच भरलेला आहे. माझ्या बरोबर या तुम्हांला दाखवतो, सुर्वे साहेब, तुम्हीही या तुम्हांला मी दाखवतो, सुर्वे साहेब, लक्षा दया, मी सांगतो ते, फक्त दिनांक २८ फेब्रुवारीलाच साफसफाई झाली, तर पुन्हा येरे माझ्या मांगल्या तसेच काम चालू आहे आणि मग जर त्याच प्रमाणे काम सुरू असेल तर अशा प्रकारचा टॅक्स वाढवून, अशा प्रकारचा स्वच्छता कर वाढवून काहीही उपयोग होणार नाही. तर माझी पुन्हा एकदा नम्र विनंती आहे की, हा संपुर्ण स्वच्छता अभियानाचा कर आपण रद्द करावा आणि लोकांना दिलासा दयावा, धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

या वेळी सदस्या, श्रीमती कांचन लुंड यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आयुक्त साहेब, आपण ज्या प्रकारे शहराचे उत्पन्न वाढवायचे करीत आहेत, या विषयामध्ये मी कमीत कमी तीन वेळा आपल्या बरोबर या विषयावर चर्चा केली आहे की, सन २००६ मध्ये अध्यादेश आला होता उल्हासनगरला रेग्युलाईजेशन करण्यासाठी, त्या विषयामध्ये उल्हासनगरच्या लोकांनी महापालिकेमध्ये फाईल जमा केल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी स्वत: ॲफीडेट, आर्कीटेकचा प्लॉन आणि टॅक्स पावती दिली आहे. त्यामध्ये त्यांची टॅक्स पावतीमध्ये जी जागा आहे, ती कमी दाखवली आहे आणि प्लॅनमध्ये जे आपल्याकडे ॲफीडेव्हीट बरोबर दिले आहे, त्यामध्ये जागा जास्त आहे. जर त्या विषयामध्ये आपण लक्ष दिले असते, तर आज त्यामध्ये सुध्दा जास्त उत्पन्न शहरामध्ये वाढले असते आणि त्याचे बेनीफिट विकास कार्यामध्ये झाले असते. हा विषय तीन वेळा मी आपल्या समोर आणला पण आज पर्यंत त्याच्यावर कारवाई झाली नाही. त्याची प्रत मी आपल्याला देतो, या विषयावर आपण लक्ष दिले जर भरपूर उत्पन्न जो आपल्याला शहर विकासासाठी उपयोगी पडेल. त्यासाठी आपण जरा योगदान दिले तर चांगले होईल.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव हे सभागृहातून बाहेर गेले.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौर, आयुक्त साहेब, थोडक्यात त्यांचे म्हणणे जे आहे ना? ज्या लोकांनी रेग्युलेजेशनसाठी फाईल टाकलेल्या आहेत, त्यांच्यामध्ये असणार एरिया आपल्याकडे पुरावाच आहे ना? आपण त्यांच्याकडून ते रेन्यु वसुल करून घेऊ शकतो, पण तिकडे कोणाचे लक्षच नाही, ते डिपार्टमेंट बंद आहे. त्या डिपार्टमेंटचे पगार चालू आहेत, त्या डिपार्टमेंटमध्ये मला वाटते एक इंजिनियर आणि काही लिपीक आणि जे काही पाच—सहा लोक तुम्ही ठेवलेले आहेत. एल.बी.टी. पण बंद करा, तिथले लोक दुसरीकडे कामाला लावा, कर्मचारी कमी आहेत तर?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी,....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, मा. आयुक्तजी, जसे की, आज ऐकले आहे की, कर वाढवायचा आहे, मला माहीती झाले की, केणे साहेबांनी सांगितले की, ६५ करोडचा आहे, तो आपल्याकडे मा.स्थायी समितीकडून आला आहे, स्थायी समितीने इथे पाठवला आहे. त्याच्या नंतर पण पुर्नविचार झाला आहे, असे मी ऐकले आहे. त्याचे पण उत्तर आपणच दया, बजेटसाठी काही कमी केले आहे की नाही, नंबर १, नंबर २ हा टॅक्स लावल्या नंतर संपुर्ण शहरामध्ये हाहाकार माजला जाईल. घराघरामध्ये हाहाकार माजला जाईल. पैसे पाहीजेत, मला पण माहीत आहे की, घर चालवण्यासाठी पैसे पाहीजेत. प्रत्येक घर चालवण्यासाठी पैसे पाहीजेत. घर चालवण्यासाठी पैशासाठी दोन प्रकार असतात, असे नाही की, प्रत्येक घरावर दरोडा टाकला जाईल, हे असे होईल. आपल्या जवळ तर अजून काही पध्दत होती, तर खुप चांगले झाले असते. आपण दुसरे सजेशन आणले असते तर खुप चांगले झाले असते. हे तर घराघरामध्ये जाऊन पैसे घ्यायला लागतील. म्हणजे कॅम्प नंबर १ ते ५ नंबर पर्यंत एक पण घर वंचित राहणार नाही. ते माझे घर असेल किंवा महापौरांचे घर असेल, उप महापौरांचे असेल, विरोधी पक्ष नेता यांचे असेल किंवा कोणाचे पण असेल सगळयांवर कर लागेल आणि झोपडपट्टीवर पण कर लागेल, असे कोणीच वंचित राहणार नाही आणि मागच्या दोन वर्षामध्ये या वर्षी मी पण निवडून आलो आहे आणि मागच्या वर्षी माझी धर्मपत्नी होती, तेव्हा एक रूपया पण महानगरपालिकेकडून सुविधांसाठी वाढीव मिळाले नाहीत. जर आपला खर्चच नाही, तर आपल्याला पैसे घ्याण्याची काय गरज आहे. त्याच्या नंतरही आम्ही आपल्याला सहकार्य केले. सहकार्य केले आपण सांगितले की, आपण पैसे आणून दया, मी तुम्हांला फंड देतो. आपण सांगितले की, टॅक्स वसुलीसाठी कॅम्प लावा, आम्ही कॅम्प लावले, थकबाकीसाठी आणि अभय योजनेसाठी सर्व नगरसेवकांनी सर्व काही केले आणि स्पर्धा चालू झाली. प्रत्येक व्यक्तिने बोलेले की, मी कोणी १५ करोड जमा केले, कोणी १० करोड, कोणी ४ करोड, ३ करोड, ज्यांची जेवढी क्षमता होती, त्यांनी आपले काम केले. परंतु त्या पैशाचे काय केले? कुठे गेले ते तुम्हांला माहीती, महानगरपालिकेला माहीती असेल. परंतु ते पैसे आपल डेव्हलेपमेंट फंडामध्ये आले नाही. मला नाही वाटत की, त्यामधून आपण १० लाख, ५ लाख जर दिले असते, तर मी शहरवासियांना छाती ठोकून सांगितले असते की, मला पैसे मिळणार आहेत, पैसे दया आणि मला वाटते की, जर महाराष्ट्र शासनाचे अधिनियम असे आहे की, जर मी कोणताही फंड महानगरपालिकेकडून पास करून घेऊ शकतो, तर मी पहीले वार्डमध्ये जातो. कायदा असा आहे की, वार्डमध्ये जायचे आहे, तिथे जाऊन मिटींग घ्यायची आहे, एरियामध्ये काम आहे, त्यांना विचारायचे आहे, ते जर सहमती देतील तर काम नगरसेवकांना दयायचे आहे, हा कायदा आहे. सर्व नगरसेवकांना आणि जनतेला माहीती असेल. ज्या नविन लोकांना माहीती नसेल त्यांना मी सांगत आहे. कायदा असा आहे, आपण पत्र देतो, असे होत नाही. आपण मिटींग घेतात, जर आपण असे केले आहे, तर आम्ही पण निवेदन बघू, आमच्या वार्डातील लोकांकडे जाऊ आणि मिटींग घेऊ आणि ते जर म्हणत असतील की, आम्हांला टॅक्स भरायचा आहे, तर आम्ही टॅक्स भरू, तो पर्यंत मी विरोध करेल. मला टॅक्स

वाढवायचा नाही, जर रस्त्यांसाठी फंड आणायचा असेल, आपण बोलेले आहे की, महसुल वाढवायचा आहे, त्या गोष्टीशी मी सहमत आहे. आपण ३२ करोडचे टॅक्स म्हणत आहेत, मला असे माहीती पडले की, पहीले ६५ करोड होते, आता ३२ करोडचे आहे. ३२ करोड आपल्यासाठी शेंगदाण्याचा एक दाना आहे. साहेब, उल्हासनगरमध्ये श्री. दादा पाटील, यांनी काही आणले आहे? टॉवर्समधून महसुल मिळेल, बॅकेकडून महसूल मिळेल आणि ए.टी.एम. कडून सुध्दा महसुल मिळेल आणि करोडो रूपये आपल्याला नगररचनाकार विभागाकडून मिळतील. जर टाऊन प्लॅन या शहराला लागू झाले तर? जर आपण वास्तुविशारद लाईसन्स रिन्यु करा. मी आत्मविश्वासाने सांगतो की, जर ३२ करोडच्या पुढे अजून एक शुन्य लावला जाईल. त्याच्या नंतर पैसेच पैसे होतील. त्यासाठी मी सांगतो की, गरींबावर कोणत्याही प्रकारचा टॅक्स लावला जाऊ नये, धन्यवाद.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** महापौर महोदया, आयुक्त साहेब, सभागृहाच्या भावना तुमच्या लक्षात आल्या असतील, हा विषय स्थायी समितीमध्ये आला होता आणि स्थायी समितीमध्येच मीच स्पष्ट केले होते की, शहरवासियांना पुर्ण कळले पाहीजे. हा शहराचा विषय आहे, १६ सदस्यांनी निर्णय घेणे आणि संपुर्ण सभागृहाने निर्णय घेणे याच्यामध्ये फरक आहे आणि म्हणून त्या समितीने निर्णय न घेता धोरणात्मक निर्णय असल्यामुळे कर वाढीचा हा प्रस्ताव महासभेपुढे आलेला आहे. त्यामुळे स्थायी समितीने निर्णय घेतला होता आणि मंजुरी दिली असे नाही, तर स्थायी समितीने महासभेपुढे आणला आणि त्याच्यावर चर्चा आहे. एक तर प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव, हा अवाजवी होता, मला वाटते काल श्री. राजेश वदारिया यांनी त्याच्यामध्ये काही सुधारणा केल्या होत्या मला वाटते की, काही तरी सांगितले होते. १, ३, ५ जसे काही कुठल्या तरी गेममध्ये चालते, २, ३, ५.....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** ५, ३, २

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** ५, ३, २ असे काही तरी, असा काही तरी प्रस्ताव होता, पण संपुर्ण सभागृहाच्या भावना तशाच ५, ३, २ किंवा १, ३, २ चा ३, ४, ५ चा तो प्रस्ताव नको आहे, असे वाटते? याच्या मागच्या भावना त्यांनी स्पष्ट केल्या, एक तर प्रशासनाकडून या ठिकाणी जी चर्चा होते. हा जो प्रस्ताव आणला आहे, तो साधारणत: ४५०० आहे, दर वर्षाला? टी.जी. आणि ए.सी. सिट आणि ब्रिक्स जे काम आहे त्याला वर्षाला ३३०० रूपये आहे आणि लाकडी मातीचे बांधकाम असलेल्या मालमत्तांना २१०० रूपये म्हणजे सरसकट त्याला एरिया वैगेरे कुठला दिला नाही? आता ब—याचशा ठिकाणी झोपडपट्टयांमध्ये लाकडी बांधकाम असेल किंवा मातीचे बांधकाम असेल, त्याचा टॅक्स किती येतो ते मला सांगा? म्हणजे त्या घराचा मालमत्ता कर हा ३०० रूपये असेल आणि त्यातला कचरा उचलायचा युझर फी २१०० रूपये ते जस्टीफाईड आहे का? आपल्याला समजायला आले का? ज्यांचा प्रॉपर्टी टॅक्स जर ५०० रूपये आहे, एक वर्षाचा ५०० रूपये राहील? आणि त्याचे गार्बेज कलेक्शन किंवा युझर फी त्याचे ४५०० रूपये, २१०० आहे, ३३०० आहे, ४५०० आहे, तर प्रशासनाने सुध्दा आणतांना थोडेसे एक आयुक्त साहेब, काही सर्व्हिसेस आहेत, त्या महापालिकेने दिल्याच पाहीजेत. प्रत्येक ठिकाणी लॉस आणि प्रॉफिट असे बघून चालणार नाही. या खात्यामधून आम्हांला लॉस किती आहे आणि त्या खात्यामधून प्रॉफिट किती आहे? मग इतर लोक आम्हांला विचातील, आम्ही जर टॅक्स देत आहोत, इतर विभागामधून त्याच्या बाबतीत आम्हांला तुम्ही काय देतात? आमच्या श्री. रमेश चव्हाण यांनी इथे विषय उपस्थित केलेला आहे. तो माझ्या वार्डमध्ये यांच्या वार्डमध्ये प्रत्येक वेळी होत आहे आणि उपस्थित होतो कारण फुटत नाही आणि जो पर्यंत फुटत नाही तो पर्यंत हा प्रश्न उपस्थित राहील. नो डाऊट आयुक्तांना एक प्रश्न पडला आहे की, फक्त आम्हीच सोडवायचा का? त्यासाठी आम्हांला काय सहकार्य लागेल ते आम्हांला केलेच पाहीजे? पण प्रश्न कुठे तरी सुटला पाहीजे? सुटला नाही तर चर्चा होणारच आहे. मग लोकांना आम्ही पाणी देऊ शकत नाही. स्वच्छता अभियान अंतर्गत साफसफाई चांगली झाली त्या बददल स्थायी समितीमध्ये सुध्दा प्रशासनाचे अभिनंदन केले आहे. जे अभिनंदनासाठी योग्य आहे, त्यांचे अभिनंदन केलेच पाहीजे. संपुर्ण शहरामध्ये साफसफाई चांगल्या प्रकारची आहे. अशी वारंवार रहावी, अशी नेहमी रहावी. पण उल्हासनगरच्या लोकांना काय पाहीजे? पाणी, स्वच्छता, लाईट आणि रस्ते या चारच्या पलिकडे काय नाही? आम्ही लोकांकडून कसे वसुल करतो? हे श्री. अरूण आशान यांनी सांगितले आहे, आम्ही लोकांकडून वसुल करतो, वसुल करण्यात कुठेही कमी नाही आम्ही? कारण तुम्ही सन १९९७ साली या महानगरपालिकेचे नगरपालिका असतांना बजेट होते, फक्त ३३ कोटी, सन १९९६ साली, सन १९९७ साली ते साधारणत: ५२ कोटी पर्यंत गेले नंतर ८० कोटी, आज ते साडेचारशे, पाचशे कोटीच्या आसपास झाले. आपण आता जे बजेट झाले आहे, ते साडे सहाशे कोंटीचे आहे. त्यातले पसत्तीस कोटी बाजूला केले तरी आमच्याकडे सहाशे कोटी आहेत. मग लोकांनी गेल्या २० वर्षा पासून जर बजेट आमचे ३३ कोटीवरून सहाशे कोटीवर गेले म्हणजे वसुलीमध्ये कुठे कमी नाही? म्हणजे आपले जे नियोजन आहे, ते खर्चामध्ये नाही. पण खर्च म्हणावे तर सगळे नगरसेवक बोलत आहेत, गेल्या दोन वर्षामध्ये प्रभाग समिती निधी मिळाले नाही, नगरसेवक निधी नाही. तीन वर्षा पासून? मग तीन वर्षापासून हा जो स्टॉक होता, तो शिल्लक असला पाहीजे. मग आता एवढी अर्जेन्सी काय आहे? की, लोकांवर कर लावायचा मी सांगितले तुम्हांला की, २१०० रूपये

आम्ही युझर फी कचरा उचलण्यासाठी तर लोक विचारणारच, ज्या मालमत्ताचा टॅक्स ३०० रूपये ते ४०० रूपये असेल, उप महापौरजी बरोबर आहे ना? जर १०X १० चे रूम आहे, तो पण ब्रिक्सचा आहे, त्याचे टॅक्स किती असेल, सन १९९१ च्या पहीले किती आहे? ३०० रूपये किंवा ४०० रूपये आणि कचरा उचलण्याचा टॅक्स २१०० रूपये आहे, तर तो प्रस्तावच चुकीचा आहे. याचे समर्थन कसे करू शकतो? कोणीच नाही. एका साईडला बजेट मी तुम्हांला सांगितले वर्षानुवर्ष तुम्ही लोकांकडून पैसे वसुल करतो, तर त्या मोबदल्यात आपण लोकांना काय देतो? ना क्रिडा संकुल आहे, ना गार्डन आहेत, ना रस्ते चांगले आहेत? रस्ते मंजूर करतो, त्याच्या नंतर कसे बनतात, ते अम्हांला माहीती नाही? जर फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये गेल्या नंतर, तिथे लोक पैसे भरतात, कारण तिथल्या सोयी सुविधा तशा असतात. आम्ही चार्जेस लोकांना सांगितले आम्ही करून देऊ पण लोकांचा विश्वास असला पाहीजे, त्यासाठी अगोदर झाले पाहीजे. मला वाटते की, डॉ. प्रकाश नाथानी यांनी अगोदर दाखवले होते की, महाराष्ट्र शासनावर किती कर्ज आहे? किती कर्ज आहे?

या वेळी सदस्य, श्री. भारत राजवानी हे सभागृहातून बाहेर गेले.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** ४ लाख, १३ हजार करोड.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** ४ लाख, १३ हजार करोड कर्ज आहे, मी सभागृह नेता यांना विचारू इच्छितो की, स्वच्छता अभियान म्हणजे काय? लोकांवर टॅक्स लावून स्वच्छता अभियान चालवणे असे महाराष्ट्र शासन, केंद्रशासनाचा असा आदेश आहे का काही? जेव्हा आमच्या श्री. सतरामदास यांनी विचारले की, "अच्छे दिन, अच्छे दिन" हे आहेत का? जो ४०० रूपये टॅक्स आहे, त्यांच्याकडून २१०० रूपये वसुल करा, ४५०० रूपये वसुल करा आणि गरीब लोक भरणार आहेत का? प्रश्नच नाही, जो टॅक्स आपण इथे लावणार आहेत, तो इम्पलीमेंट होणार आहे का? काही लोक देतील, जसे श्री. भारत गंगोत्री यांनी सांगितले की, सन २०१६ मध्ये त्यांनी पत्र दिले आहे, यामध्ये आपल्याला ४० करोडच्या वरतीच वसुली येईल, त्यांनी आयुक्तांना पण सांगितले, मिटींगमध्ये सुध्दा सांगितले. जाण्याची पण आवश्यकता नाही, प्रत्येकाने ॲफीडेट पण केले आहे, आमच्या जवळ जे ॲसेसमेंट आहेत, कोणाचे २०० आहेत, कोणाचे २५० आहे. परंतु लोकांनी स्वत: लिहून दिले आहे की, माझे १००० आहे, तर त्याचे ॲसेसमेंट व्हायला पाहीजे, ॲसेसमेंट करण्याची गरजच नाही, जे ॲफीडेट आहेत आणि आपल्याकडे तज्ञ समिती पण बसली आहे, चार प्रभागामध्ये चार तज्ञ समित्या आहेत आणि त्यांचे काम आहे, रेग्युलाईजेशनची प्रक्रिया बंद आहे. तर कमीत कमी हे तर करा. लोकांनी ॲफीडेट केले आहे की, माझा एरिया २०० च्या जागी ५०० आहे, ॲसेसमेंट २०० आहे, तिथे किती आहे, तर ७०० आहे. तर त्याचे टॅक्स किती वाढेल? तर जे करायला पाहीजे, ते होत नाही. आता डॉ. प्रकाश नाथानी यांनी सांगितले की, घर चालवायचे आहे, तर पैसे पाहीजेत, जसे महापालिका चालवायची तर पैसे पाहीजेत. एल.बी.टी. चे उत्पन्न एवढे आहे की, आपल्याकडें , परंतु एल.बी.टी. बाबत आम्ही प्रशासनाला वारंवार सांगितले होते की, तर तत्कालिन प्रशासनाने लक्ष दिले नाही आणि म्हणाले आम्ही नंतर करू. त्यासाठी स्पेशल एक सेल बनवले, तो सेल काय करते, कोणालाच माहीती नाही? महापालिकेचा पगार चालू आहे. म्हणजे जिथून उत्पन्न झाले पाहीजेत, ते उत्पन्न होत नाही आणि गरीब जनतेला भुर्दंड नको आहे, अशी संपुर्ण सभागृहाची भावना आहे. मी विरोधी पक्षाच्या वतीने विनंती करतो की, अशा प्रकारचा प्रस्ताव हा शहराच्या हिताचा नाही, लोकांना सुविधा दिल्या नंतर आपण लोकांना सांगू शकतो, आणि कुठलाही कर लोकांवर लादू नये, लोक स्वत:हून देतील असे वातावरण निर्माण झाले पाहीजे. गेल्या तीन वर्षा पासून कुठलाही निधी नाही, तर आपण आयुक्तांना मतद करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा शासनाने एवढे कर्ज झाले आहे की, आम्हाला थोडे फार कर्ज दया, किंवा आम्हांला मदत करा अशा प्रकारचे साकडे शासनाला घालावे की, मी विनंती करतो की, अशा प्रकारचा प्रस्ताव करून या उल्हासनगर वासियांवर कुठलाही कर लादू नये, धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आज सभागृहामध्ये हा विषय आलेला आहे, हा विषय उपभोगक्ता फी च्या विषयी स्थायी समितीने आपण पाठवले आहे. तो संपुर्ण चुकीचा होता, हा पॉलिसी डिसीजन विषय होता. त्यामुळे स्थायी समितीने महासभेपुढे पाठवला आहे. स्थायी समितीमध्ये या विषयावर कोणतीही चर्चा झालेली नाही, यावर चर्चा आता महासभेमध्ये होत आहे. काही लोकांना चुकीचे समजले की, स्थायी समितीमध्ये हा विषय झाला आहे. स्थायी समितीमध्ये हा विषय आला होता आणि सर्व सदस्यांनी सर्व संमतीने पॉलिसी डिसीजनचा विषय म्हणून महासभेपुढे पाठवला आहे. मा. आयुक्तजी, मला खुप दु:खाने सांगावेसे वाटते की, आपल्या बरोबर जी टीम आहे, तिचे सहकार्य तुम्हांला नाही किंवा बरोबर बसून कुठलेस मार्गदर्शन नाही. ज्या प्रकारे आपण ही उपभोगक्ता फी ठेवली आहे, जसे की सभागृहाच्या सर्व सदस्यांनी सांगितले आहे की, ती पुर्णपणे चुकीची आहे. आपण जे रेट ठेवले आहेत, त्याच्यावर विचार सुध्दा केला नाही की, आपण हे रेट कशा प्रकारे ठेवत आहेत? आर.सी.सी. घरांवर ३७५ रूपये, साडेचार हजार रूपये, मातीच्या घरांवर आपण २१०० रूपये लावले आहेत. जसे श्री. बोडारे साहेबांनी सांगितले आहे. इथे तर

८० हजार कमीत कमी बॅरेक आणि जे कच्चे घर आहेत, त्याची टॅक्सच ५०० ते ६०० येत असते. म्हणजे ४०० टक्के पर्यत जास्त आहेत. या सभागृहाचे कोणीही सदस्य, या गोष्टीला मानणार नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, ठिक आहे, रेट वाढवायला पाहीजे होते, २० फब्रुवारीच्या पहीले, सर्व गटनेत्यांनी आपल्या बरोबर बसून निर्णय घेतला होता की, या शहराच्या विकासाठी निधीची आवश्यकता आहे. परंतु या प्रकारचे कोणतेही कार्य झाले नाही? सभागृहाचे सर्व सदस्य, सत्ता पक्षाचे असतील किंवा विरोधी पक्षाचे असतील या गोष्टीचे दु:ख प्रत्येकाला आहे. मागच्या तीन वर्षापासून ज्या वार्डमधून नगरसेकव निवडून येतात, त्या वार्डमध्ये नालीचे काम झाले नाही. कारण की, नगरसेवक निधी आणि प्रभाग समिती निधीचा मागच्या तीन वर्षा पासून मिळाले नाही. या गोष्टीचे प्रत्येकाला दु:ख आहे. जर आज अशा प्रकारची उपभोगक्ता फी वाढवली जात आहे, जसे की, श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले होते की, अशा प्रकारची उपभोक्ता फी लावणे चुकीचे आहे. यामध्ये जर काही वाढवायचे होते तर सर्व गटनेता एकत्र बसून चर्चा केली असती. परंतु लोकांना काय सांगितले जाईल? या शहराची जनतेकडे आम्हांला परत परत जायचे आहे, जसे की, डॉ. नाथानी यांनी सांगितले की, वार्डची बैठक होईल, बैठकीमध्ये लोक कामाच्या बाबतीत चर्चा करतात की, आमच्या इथली नाली तुटलेली आहे, ती बनवून दया, माझे कल्वर्ट बनवून दया, रोड बनवून दया. तीन वर्षामध्ये आम्ही किती तरी वेळा बैठकीमध्ये या बाबतीत चर्चा केली आहे आणि किती तरी वेळा आम्ही आश्वासन पण दिले आहे. सन २०१७ च्या निवडणूकीमध्ये किती तरी आश्वासन लोकांना दिले आहेत? की, हे काम होऊन जाईल. परंतु या प्रकारचा प्रस्ताव आज ९ तारेखे पर्यंत कोणतीही वर्क ऑर्डर किंवा कोणतेही काम, कोणत्याही सदस्यांना मिळाले नाही? मा. महापौरजी, खुपच दु:खाने सांगावे लागत आहे की, दोन वर्ष असेच चालले गेले आणि नविन सत्ता आल्या नंतर एक वर्षाचा शेवटचे जे पर्व होते, होळीचा पर्व, आमच्या धर्माच्या अनुसार, आमच्या मान्यतेनुसार वर्षाचा अंतिम पुर्व असतो. आणि नविन वर्षाची सुरूवात होते, गुढीपाडवा – चेटीचंढ वर्षाच्या शेवट पर्यंत आपण काम देवू शकलो नाही. नविन वर्षाच्या सुरूवातीला आम्ही तयारीला लागलो की, गुढीपाडवा साजरा करणार – चेटीचंढ साजरा करणार. शहराचे लोक पण पाणी पट्टी, घरपट्टी थोडे फार वाढवण्यास तयार होते. ते तेव्हा तयार झाले असते, जर आपण लोकांचे काम केले असते. वार्डमध्ये आम्ही लोकांजवळ जेव्हा जाऊ त्यांना आम्ही काय उत्तर देणार? तुम्ही आम्हांला तीन वर्षापासून आश्वासन दिले होते आणि काहीच करू शकले नाहीत. त्यासाठी मा. महापौरजी, सभागृहाच्या सर्व सदस्यांचे मत, या सभागृहामध्ये, जेव्हा स्थायी समितीमध्ये हा विषय आला तेव्हा पण आमचे म्हणणे होते की, सभागृहाचे सर्व सदस्य या गोष्टीवर एक मत होईल तेव्हाच हे कार्य होईल. पॉलिसी डिसीजनचा विषय आहे, इथे कोणी विरोधी पक्ष नाही किंवा कोणी सत्ता पक्ष नाही, इथे आम्ही शहराच्या हितासाठी, लोकांच्या कामासाठी इथे आलेलो आहे. आम्हांला लोकांनी निवडून पाठवले आहे. जो पर्यंत आम्ही त्यांचे काम करीत नाहीत आणि वेगवेगळे टॅक्स लावून आपण त्यांच्याकडून वसुल करीत आहेत किंवा टॅक्स लावत आहेत, तर हा लोकां बरोबर एक अन्याय होईल. यासाठी मा. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, आजची ही जी सभा आहे, अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात यावी. आमच्या वर्क ऑर्डर थांबल्या आहेत, आमची कामे थांबली आहेत, आमचे फंड थांबले आहेत, ते काम झाले पाहीजे. नंतर उपभोगक्ता फी वर विचार केला जाईल. पुढच्या येणा–या दिवसामध्ये कर वाढवण्यासाठी विचार केला जाईल. कारण की, कर आणि दर वाढवणे २० फेब्रुवारीच्या पहीले आहे. २० फेब्रुवारीच्या पहीले आम्ही कर आणि दर वाढवण्याचा विचार करू. परंतु पहीले शहरवासियांसाठी काही तरी देण्यात यावे, आम्ही आता पर्यंत काय दिले आहे? आज या सभागृहातील कोणही सदस्य बोलेल की, त्यांच्या वार्डचा जो निधी आहे, महापौर निधी आहे, उप महापौर निधी आहे, स्थायी समिती निधी आहे, सभागृह नेता निधी आहे आणि जे पण निधी आहेत, त्यांचे कोणत्याही निधीचा वर्क ऑर्डर मिळाले आहेत का? नाही मिळाले. एकच उत्तर असेल आणि असे नाही की, सत्ताधारी पक्षाला मिळाले आहे आणि विरोधी पक्षाला मिळाले नाही. आम्ही सर्व जाती, धर्माचे लोक या शहरामध्ये एकत्रित राहत आहेत, सर्व पक्षाचे नगरसेवक एकत्रित राहून काम करीत आहेत आणि प्रयत्न करतात की, सर्व पक्ष मिळून शहराच्या विकासाठी कामे करतील. त्यासाठी मा. महापौरजी, हा जो उपभोगक्ता फी चा विषय आला आहे, तो संपुर्णपणे त्याच्यामध्ये ज्या त्रुटी आहेत, काही चुका आहेत, त्या सुधारण्याची गरज आहे. येणा–या दिवसामध्ये वेगवेगळया ठिकाणांहून जसे की, डॉ. नाथानी यांनी सांगितले आहे, नगररचनाकार विभाग आहे, तेथून भरपूर निधी येऊ शकतो, जसे की, श्री. बोडारे साहेबांनी सांगितले की, ॲसेसमेंट बाकी आहेत, भरपूर ॲसेसमेंट होऊ शकतात, अशा प्रकारे आपण सर्व एकत्र बसून काही तरी सोलुशन काढू आणि विकास कार्य होणे पण गरजेचे आहे. मी आपल्याला निवेदन करतो की, संपुर्ण सभागृहाला निवेदन करतो की, ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात यावी.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:–** जमनुजी धन्यवाद, सर्व लोकप्रतिनिधीना धन्यवाद, आपण उशिरा बोलेले पण चांगले बोललेत.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—</u>** सभा स्थगित करण्यापेक्षा ठरावच रद्द करून टाका? सभा स्थगित करून परत तो विषय येणारच आहे, चर्चा कशाला परत? ठरावच रद्द करून टाका? परत परत चर्चा करणार, परत ठराव करणार, त्यापेक्षा ठरावच सरळ रद्द करून टाका?

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सन्माननिय सदस्य, कृपया करून शांत बसा. आता आयुक्त साहेब, बोलतील आणि आपण ऐकाल.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव, व सदस्य, श्री. भारत राजवानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, सदस्य महोदय, मला खुप वाईट वाटत आहे की, ज्या गोष्टीवर आपण मागच्या आठ दिवसापासून सहमतीने बोलत होतो, सर्व पक्षांच्या गटनेते, सर्व पदाधिकारी वैयक्तिक स्वरूपात आणि सामुहिक स्वरूपात मी चर्चा केली होती आणि त्याच्या नंतर जेव्हा ६५ करोडचा घनकचरा व्यवस्थापन, उपभोक्ता फी चा प्रस्ताव होता. त्यामध्ये काही कपात करून, पहीले मी सुध्दा समजलो यामध्ये काही कपात करण्याची गरज राहीली नाही पाहीजे. कारण की, ही आपली गरज आहे. तरी सुध्दा मी विचार केला की, सर्व सदस्य यासाठी तयार होत आहेत, सर्व पक्षाचे लोक या विषयाला सहकार्य करणार आहेत. तर यामध्ये ५० टक्के कपात करण्याची सर्व सदस्य सहमती देत असतील तर काही हरकत नाही. परंतु आज २० तारखेच्या नंतर परत मिटींगची सुरूवात पण वेगळया प्रकारे झाली, त्याच्या नंतर आपण बोलत आहेत की, परत सभा स्थगित करण्यात यावी आणि एका बाजूला आपण बोलत आहेत की, शहरारमध्ये कामे होत नाहीत. कामे होत नाहीत किंवा होत आहेत, ही गोष्ट वेगळी आहे, त्याचे स्पष्टीकरण मी करू शकतो. आता आपण जे काम करणार आहे, ते पाईप लाईनमध्ये आहे. त्यांना मान्यता देण्यासाठी सर्व फाईल माझ्या समोर आहेत, काहीना मी मान्यता दिली आहे, जे काम अत्यावश्यक आहेत, ते मी न डगमगता मागच्या दोन महीन्या पासून मान्यता देत आहे. सर्व सदस्यांना हे माहीती आहे की, प्रत्येक वार्डमध्ये कामे होत आहेत. गल्ली मोहल्यामध्ये नाली आणि पेव्हर ब्लॉक, छोटे छोटे रोड बनवण्यासाठी ते पण सांगितले होते की, त्यांचे फंड मी ५० टक्के दिले आहेत. पदाधिका—यांना पण २५ टक्के फंड दिले होते आणि या गोष्टीवर पण मी सहमती दर्शविली होती की, जर हा विषय मान्य होत आहे तर या विषयाचे जे पण उत्पन्न येईल त्याचा आणि आमचे पदाधिकारी आणि नगरसेवकाचे फंड रिलीज करण्यासाठी जर १०० टक्के करायचे आहेत, तर त्यामध्ये काहीच ताळमेळ नाही, जे फंड आपण रिलीज करणार आहेत, त्याच्या पेक्षा किती तरी टक्के ६५ करोड किंवा त्या पेक्षा जे पण आपण पास करायचे आहेत, त्या पेक्षा जे काम करणार आहे, त्याचा खर्च किती तरी जास्त आहे. तरी सुध्दा मी हे मान्य केले की, पुढे जाऊन नागरीकांचे जे कामे आहेत, ती झाली पाहीजेत. त्यांचा विश्वास असला पाहीजे, लोकांमध्ये चुकीचे समज झाले नाही पाहीजेत की, मागच्या दोन वर्ष तीन वर्ष काहीच कामे झाली नाहीत. केवळ याच आधारावर मी विचार केला की, आपली आर्थिक परिस्थिती ६५ करोडनी सुधारू शकत नाही, ६५ करोड फक्त कचरा व्यवस्थापनासाठीच उपयोगी पडतील आणि कोणत्याही कामासाठी हा पैसा शिल्लक राहणार नाही. परंतु सगळयांची भावना, आपले सगळयांचे आदर करून मी ही गोष्ट मान्य केली होती आणि विचार केला होता की, मी सगळयांना मान्यता देईल. हे पण बोलणे झाले होते की, आपण सगळे माझ्या समोर उपस्थित होते आणि जर या विषयाला मान्यता मिळेल तेव्हा आपण पाच मिनीट पण थांबू नका आणि व्हॉटस अपवर मॅसेज पाठवा की, आम्ही सर्व हे काम करणार आहेत. मला नाही माहीत की, हे सर्व एकदम यु टन इथे कसे झाले आहे? आणि गोष्ट माझ्या पर्सनल किंवा प्रशासनाचा काही हेतु नाही, हे शहराच्या हितासाठी आहे. मला वाईट वाटते की, शहराच्या हिताचा एक अहंम मुद्दा फक्त केवळ आपण शहरवासीयांवर बोजा टाकणार आहेत, त्या भुमिकेमुळे विरोध करीत आहात, ही गोष्ट अत्यंत दु:खाची आणि खेदजनक आहे. आपण बजेट बदल बोलत आहेत की, ६०० करोड रूपयांचे बजेट आहे, ७०० करोड रूपयांचे बजेट आहे, ८०० करोडचा बजेट आहे. या वर्षी परत आपण ८०० करोडच्या बजेट बाबत बोलत आहेत. खरे तर बजेट किती आहे? हे आपण बघणार तर, मागच्या चार वर्षाचे आकडे आपण काढून बघा, मी आपल्याला सांगतो की, जे बजेटचे आकडे आपण बनवतो, ते सर्व पेपरवरच असतात. जो खर्च होतो, त्यातून प्रशासनावर किती खर्च होतो ती गोष्ट तर वेगळीच आहे? परंतु मागच्या तीन वर्षामध्ये जो खर्च झाला आहे, सन २०१४—२०१५ मध्ये आम्ही खर्च केले आहे, २९२ करोड रूपये, सन २०१५—२०१६ मध्ये खर्च केले आहे ३२१ करोड रूपये, शेवटच्या वर्षी सन २०१६—२०१७ मध्ये खर्च केले आहे, ३८० करोड रूपये, आपला बजेट होता ७४६ करोड, या शहरामध्ये आणि यामध्ये ४५ ते ४० टक्के जसे काल बोलणे झाले होते, तो प्रशासनिक खर्च आहे. म्हणजे शहरामध्ये जो खर्च होत आहे, तो २०० करोडच्या आसपासच होत आहे. हे ३८० करोड, जो पण ४०० करोड आहेत, समजा या वर्षी ४०० करोड आहेत असे मानू, त्यामध्ये पण २२५ करोड केंद्रशासन व महाराष्ट्रशासन यांच्याकडून येतात. आपले स्वत:चे जे बजेट आहे, तो १२० व १२५ करोड रूपयांच्या वरती जात नाही. त्याचे कारण काय आहे? कुठून उत्पन्न येऊ शकते? डेव्हलेपमेंट चार्जेस वाढायला

पाहीजेत. १०० करोड त्यामधून येतील, एम.आर.टी.पी. मधून येतील, डेव्हलपमेंट प्लॉनमधून येतील, तो संशोधनाचा विषय आहे, आपण असे जनरल बोलून एका प्रमुख विषयाला साथ देवू शकत नाही. आपण विचार करायला पाहीजे आणि खुप गंभीरपणे विचार करायला पाहीजे आणि आत्मपरिक्षण करायला पाहीजे की, खरोखर आपले सोर्च काय आहेत? आणि आपण हे सोर्च प्राप्त करू शकतो किंवा नाही? पैशाचे नाव होत नाही किंवा पैशाचे रंग पण होत नाही. कच–यासाठी आलेले ६५ करोड यासाठी वापरू नका? जर प्रॉपर्टी टॅक्समध्ये वाढवले असते तर ते आम्ही मान्य केले असते. हे तर एक प्रकारचे पाखंडीपणा दुसरे कुठले नाव नाही, आपल्याना चुकीचा शब्द वाटेल, पाखंडीपणा पेक्षा दुसरे कुठले नाव नाही? पैसे कोणाच्या तरी खिशातून येईल ते मी मान्य करतो, किती प्रपोशनल व्हायला पाहीजे? परंतु आपण ६५ करोचे या शहराचे उत्पन्न वाढवणार आहेत, तो कचरा व्यवस्थापन नावाने असेल किंवा दुस–या कोणत्याही नावाने असेल. आज आपले डिपीसुट, आपल्या महानगरपालिकेची जी तुट आहे, ती मागच्या किती तरी वर्षा पासून चालत आलेली आहे? ती २०० ते २५०० करोडच्या वरती आहे. ६५ करोड आपण बोलत आहेत, शब्द युज केला खरे तर हे पिनट आहे ६५ करोड. जो अडीच करोडच्या तुलनेत वाढवण्यासाठी आम्ही ६५ करोड ठेवले आहे. जर मागच्या १५ ते २० वर्षाचा रेकॉर्ड काढून बघाल तर कधी पण आपण मुलभु सक्षमतेने बजेट वाढवण्याचा कोणताच प्रस्ताव ठेवला नाही किंवा मान्य केला नाही. प्रस्ताव न ठेवण्याची चुक तर मी करणार नाही. प्रस्ताव ठेवण्यासाठी मी प्रयत्न केले आहे, त्याला मान्य न करण्याची चुक आपण करू नका? अशी माझी सर्वांना विनंती आहे. राहीली गोष्ट प्रपोशनची बोडारे साहेबांनी स्वत: सांगितले की, झोपडपट्‌टीवाले ५०० रूपये, ६०० रूपये वर्षाला टॅक्स भरतात. कोणता फॉर्मुला आहे? कोणत्या शहरामध्ये हा फॉर्मुला आहे की, हे घर झोपडपट्‌टीवाले, त्यांचे उत्पन्न मला वाटत नाही की, २० हजार रूपयांच्या आतमध्ये असेल, प्रत्येक महीन्याला? तो प्रत्येक वर्षाचा प्रॉपर्टी टॅक्स भरेल आणि आता आम्ही त्यामध्ये ३००० हजार रूपये किंवा ३०० रूपये त्याच्यावर किंवा २१०० रूपये झोपडपट्‌टी धारकांसाठी. तर आपण समजतो की, खुप मोठा अन्याय झाला आहे. २१०० प्लस ५०० किती झाले? २६०० रूपये, म्हणजे महीन्याचे २१० ते २२० रूपये म्हणजे रोजचे १० रूपये पण नाहीत. या शहराला सुविधा दयायच्या आहेत, शहराला चांगले बनवायचे आहे, या शहराची तुट कमी करायची आहे, या शहराच्या नगरसेवक निधीला प्रत्येक वेळी मंजुरी पाहीजे, तर रोजचे १० रूपयात काम कसे चालेल? आणि प्रत्येक माणसाला २ रूपये, फॅमिली १० रूपये म्हणजे प्रत्येक माणूस २ रूपये भरेल. म्हणजे मी जेवढे पण सांगितले ते आपण सगळे समजतात, परंतु त्याला स्विकार करण्यास तयार नाहीत. मी त्या दिवशी एका मिटींगमध्ये पण सांगितले की एखादी गोष्ट आपण न समजताच स्विकार करतो. त्यामुळे एवढे नुकसान होत नाही, त्या पेक्षा जास्त नुकसान जी गोष्ट समजून सुध्दा स्विकार करणार नाही, त्या पासून होईल. तर माझी परत विनंती आहे की, ही गोष्ट समजून घ्यावी आणि या गोष्टीचे स्विकार पण करावे. ही आपली मुलभूत गरज आहे, या शहराच्या बजेटला चांगल्या प्रकारे पारख करण्याची. तर त्यामध्ये जो पण आपल्याला पर्यायी व्यवस्था करण्याची गरज आहे, ते आपल्याला करावे लागेल. कोणत्या हिशोबाने आम्हांला २५०० करोड पाहीजेत. आपल्याला डेव्हलेपमेंट प्लॉन डी.सी.आर. रूल प्रमाणे येणार नाही, आपल्याला डेव्हलेपमेंट प्लॉनचे १० करोड, १२ करोड वरती कोणताही पैसा मिळणार नाही आणि कोणते माध्यम आहेत, पार्किंग चार्जेस वैगेरे मिळून १०, २० करोड, २५ करोड सर्व मिळून होतील. प्रश्न राहीला प्रॉपर्टी टॅक्सचा आम्ही किती प्रयत्न केले आहेत? आम्ही बिल वेळेवर दिलेत, लोकांना चेतावनी दिली, लोकांना जागृत करण्याचे प्रयत्न केलेत. महीला बचत गटाना आम्ही प्रत्येक दिवसाचे ५०० रूपये देवून त्यांच्याकडून काम करून घेतले. त्यांनी सुध्दा प्रत्येक घरी जाऊन लोकांना विनंती केली की, आपण टॅक्स भरा. आपल्या महीला सेविकांनी सांगितले की, जास्त टॅक्स श्रीमंताकडे थकित आहे. मी श्रीमंताकडे जास्त अमाउंट आहे, परंतु गरीबांची संख्या जास्त आहे, अमाउंट सेम होऊन जाते. जर १०० करोड आपले प्रत्येक वर्षाची डिमांड आहे, आपण ५० करोड पण आपली वसुली करू शकत नाही. अशी कोणतीही महापालिका नाही की, जिथे २० टक्के लोकांकडे कंप्लसरी जाऊन बाय मेथडी वसुली करायला लागते, हे सर्व उलटे आहे. १० किंवा २० टक्के लोक फक्त स्वत:हून महानगरपालिकेमध्ये, प्रभाग समिती कार्यालयामध्ये किंवा कियोस सेंटरमध्ये जाऊन टॅक्स भरतात. बाकी ८० टक्के लोकांच्या मागे आम्हांला धावावे लागते. आमची सर्व ताकत त्यामध्ये खर्च करावी लागते, आमचा प्रशासकीय खर्च त्या वसुलीमध्ये जास्त होतो. बोडारे साहेबांनी सांगितले की, आपला बजेट सन १९९६ – १९९७ मध्ये ३३ करोड होता, आज जवळ जवळ २५ वर्षे झाली आहेत. प्रत्येक ५ वर्षामध्ये आपण जर डबल केले, तर आज आपला स्वत:चा बजेट १०५६ करोड रूपये व्हायला पाहीजे होता. आज आपला स्वत:चे बजेट सव्वाशे ते दिडशेच्या वरती नाही. म्हणजे २५ वर्षामध्ये फक्त ५ टक्के वाढ बजेटमध्ये झाले आहे. जर आपण आरवी रेट काढले तर किंवा टॅक्सचा जो प्रपोशनल टक्के आहे, माहीतीसाठी देतो, जसे सन १९९१–१९९५ मध्ये आपल्या आरवीचा टोटल टक्के होते, ३३.८२, आज ती आपली टक्केवारी आहे ५८, म्हणजे संपुर्ण २५ वर्षामध्ये आपण फक्त २५ टक्केची वाढ केली आहे. दुसरा म्हणजे आपले जे आरवीचे रेट आहेत पर स्केअर फुट, त्यामध्ये पण आपण बघाल तर १९८४–१९८७ पासून १४ व १५ ओरल जे इंप्लेशन ज्या रेटनी वाढतात, त्याच्या प्रपोशनलमध्ये आम्ही एकदम वाढ केली आहे. म्हणजे प्रॉपर्टी टॅक्समध्ये वाढवण्याचे दोन पध्दती आहेत, या दोन्हीमध्ये आपण वाढ करण्यासाठी संपुर्णपणे असफल राहीलो आहे. तर अजून कोणती पध्दत आहे की,

आपले बजेट वाढले पाहीजे किंवा वाढलेच नाही पाहीजे. जर वाढणार नाही तर काम पण होणार नाही. आपण दोन्ही बाजुनी बोलत असतो, काम पण झाले पाहीजेत, नगरसेवक निधी पण पाहीजे. गव्हर्नरच्या ज्या मोठ मोठया योजना आहेत, २५ टक्के पासून तर ५० टक्के पर्यंत जसे की, अमृत योजना, खेमाणी नाल्याचा प्रोजेक्ट आपण आपल्या फंडामधून करीत आहे. शहाड रोड करीत आहे, त्यामध्ये आपला फंड वापरला आहे. आपले ग्रीन स्पेसचे प्रोजेक्ट आहेत, आपला वडोलचा ब्रिज आपल्याच फंडातून करीत आहेत आणि प्रत्येक गोष्टीमध्ये वाढ होत आहे. सन २००० साली आपले जे पण काम होत होते, त्यामध्ये आज पाच ते सहा टक्के वाढ झालेली आहे. कोणती पण वस्तु घ्या, सिमेंट असेल, रेती असेल किंवा स्टील असेल. तर हा सर्व खर्च कुठून मेलमिलाप होईल. मी थोडे संक्षिप्तपणे, डिटेलमध्ये बोलत आहे, तुम्हांला थोडेसे वाईट वाटेल. सर्व गोष्टी मी आपल्याला ज्या समजण्यात येत नाही, त्यांना समजवण्याची जबाबदारी माझी आहे. त्याच्या नंतर तुमचा निर्णय आहे. परंतु तुमचा निर्णय झाल्यावर माझा पण निर्णय असेल. मी २० तारखेच्या मिटींगच्या नंतर त्वरीत एक पत्र लिहीले होते, त्याची प्रत आपल्या सर्व मान्यवर, आपले आमदार महोदय, आपले खासदार महोदय यांना देण्यात आली होती की, हा विषय खुपच महत्वपुर्ण आहे, त्याला मान्यता मिळण्यासाठी आपल्या पक्षाच्यावतीने, आपल्या सदस्यांच्या वतीने मान्यता मिळण्यासाठी सहयोग करा. त्याच्या नंतर दुसरे कोणी तरी लिहीले की, याचे हिंदीमध्ये भाषांतर करा. हिंदीमध्ये मि सर्व डिटेल सांगितले. आता मी जे सांगितले त्यामधून ब—याच गोष्टी सांगण्यात आल्या. आपला ६००रूपये करोडचा बजेट आहे, त्यामधून फक्त २३२ करोड रूपये आपल्याला सरकारकडून मिळणार आहेत. बाकी ३६८ करोड रूपये आपल्यालाच जमा करायचे आहेत. तेव्हाच आपला ६०० करोड रूपयांचा बजेट बनेल. जर आपले फक्त सव्वाशे करोड होत असतील तर श्री. प्रदिपजी जर २३२ प्लस १२५ करोड, म्हणजे साडे तीनशे करोड आपले बजेट बनले पाहीजेत. जर आपला बजेट प्रशासनाने ६०० करोड ठेवला आहे. आता स्थायी समितीने ७७४ करोडचा बजेट सादर केला आहे. तर व्ही. आय.पी. इमॅजीन ७७४ करोडमध्ये आपल्याला कुठून उत्पन्न मिळेल आणि आपण काय करू शकतो? आता मी जास्त वेळ घेणार नाही. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की, जो आम्ही ६५ करोड रूपयांचा आकडा ठेवला आहे. त्यामध्ये आपल्याला वाटत असेल की, १७५ रूपये गरीबांवर जास्त होत आहेत, २७५ रूपये तुमच्या बॅरेकवर सुध्दा जास्त वाटतात, ३७५ रूपये आपण वाढवू शकतो किंवा कमर्शियल प्रॉपर्टीवर आपण वाढवायला पाहीजेत. परंतु कमर्शियल प्रॉपर्टीची संख्या दोनशेच्या आत आहे. त्यामुळे त्यांना एवढे आपण वाढवू शकत नाही. तर सर्व मिळून टोटल आपले ३५ करोड झाले पाहीजेत. आता मी ५० टक्के यामध्ये समजोता केला आहे. म्हणजे आमच्या प्रशासनाने आणि आपण सगळेच समझोता करीत आहेत. फक्त मी प्रशासनानेच का म्हणू? आपण सगळे इथे शहर चालवण्यासाठी बसलेलो आहेत, आपली सर्वांचीच ही गोष्ट आहे. जर आपण ५०टक्के समजोता शहरवासीयांसाठी केला आहे. तर ५० टक्के बाहेरून आपल्याला मागवावे लागेल. आपली एवढी जबाबदारी आपण समजायला पाहीजे आणि हा ३५ करोडचा आकडा कशा प्रकारे यायला पाहीजे आपण पण काही फार्मुला बनवला आहे. मला वाटते की, आपण फक्त फार्मुलावरच चर्चा करू. नाही तर या विषयाला पारीत करण्यासाठी अमर्याद स्वरूपात ही महासभा स्थगित करण्यात यावी. तर माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, आजच या विषयावर आपण निर्णय घेण्यात यावा. मला आशा आहे की, या सर्व गोष्टी समजल्या नंतर त्यांचा आपण स्विकार पण जरूर कराल, धन्यवाद.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मा. महापौरजी, ही कसली महासभा आहे?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** एक मिनीट, माझे शेवटचे दोन शब्द राहीले आहेत, जर हा विषय मान्य होत नसेल तर मी आपलं शांतीपुर्वक, शालिनतापुर्वक व खुप विनयपुर्वक तुमच्याशी विनंती करतो की, जर हा विषय मान्य होत नसेल तर आजच्या नंतर जे स्वभाविक गरजेचे काम आहेत ते सोडून मी कोणतेही कामे करणार नाही. जर माझ्याकडून बनत नसेल तर आपण आपल्याशी फ्री आहेत, हे सभागृह फ्री आहे. जी पण कायदयानुसार कारवाई आहे, जे पण कायदयानुसार पर्याय आहेत ते आपण करू शकतात. परंतु मी ठाम आहे, निश्िचत आहे, कोणतेही काम करणार नाही. जे स्वभाविक गरजेचे काम आहेत ते सोडून मी आजच्या नंतर हा विषय होत नाही तर मी कोणतेही कामे करणार नाही. हे पेपरमध्ये कोणी लिहीलेले आहे, की धमकी आहे, ती धमकी नाही. कारण की, मला दिसून येत आहे की, हा पुढे जाऊन आपण धक्का खाणार आहेत, पण ही स्टेरिंग आहे आणि स्टेरिंग माझ्या हातात आहे. स्टेरिंग फिरवण्याचे काम माझे आहे, आपल्याला जे काही समजायचे आहे ते समजा. हा विषय होत नसेल तर आजच्या नंतर जे स्वभाविक गरजेचे काम आहेत ते सोडून मी कोणतेही कामे करणार नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** महापौरजी, हे काय आहे? तर ही महासभा का? का बोलवतात? का एवढे पेपर छापतात आणि चर्चा करायला लावतात. हे काय? विचार विनिमय आणि समजून विचार करून बोलत असतात.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. महापौरजी, सभागृहामध्ये सर्व सदस्यांनी आपले मत मांडले आहेत. सभागृहाची अंतिम चर्चा असते, मी विचारलेले आहे की, अजून कोणला बोलायचे आहे का? मग परत चर्चा होत आहे. सर्व सदस्यांना माझे म्हणणे आहे की, ही सभा सर्व संमतीने अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** हा विषय रद्द करण्यात यावा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** सभागृह नेताजी आम्हांला मान्य आहे. अनिश्चित कालावधीसाठी वगळण्यात यावा.

**<u>महापारै तथा पिठासिन अधिकारी:—</u>** ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

**<u>महापालिका सचिव:—</u>** पहीली महासभा मा. महापौरांनी अनिश्चित कालावधी करीता स्थगित करण्यास सांगितले आहे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** ही महासभा उद्या ३.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— डॉ. प्रकाश नाथानी

**<u>स्थगित प्रस्ताव</u>**

विशेष महासभा मंगळवार दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यात आली. सदर सभा दिनांक ९/३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली व पुन्हा स्थगित करण्यास प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र. ७३ फ</u>** **<u>दिनांक : ९/०३/२०१८</u>**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ९/०३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ४.४८ वाजता मा.महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्रीम. मिना कुमार आयलानी यांनी ही सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— २७/३/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २७/३/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

**३—क**

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा मंगळवार दिनांक २०/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक ९/३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा मंगळवार दिनांक २७/३/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३९ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४० | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४१ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४२ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्रीमती आशा नाना बिराडे | ४३ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४४ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४७ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १५ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४८ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १६ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४९ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १७ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५० | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १८ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५१ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५२ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५३ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २२ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५५ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीमती शुभांगिनी निकम | ५६ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५७ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसूळ | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५९ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २७ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६० | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २८ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६१ | श्रीमती मिनाक्षी रवि पाटील |
| २९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६२ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३० | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६३ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६४ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३२ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६६ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६७ | अरूण लक्ष्मण आशान |
| ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६८ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ३. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ४. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ५. श्री. भगवान शंकर भालेराव, ६. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ७. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, ८. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ९. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १०. श्री. भारत रामचंद्र राजवानी, ११. श्री. प्रमोद नामदेव टाले, १२. श्री. विकास परशुराम पाटील, १३. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी. १४. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी
६. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
८. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
९. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. एस. के. सेलवन, कार्यकारी अभियंता
११. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१२. श्री. बालाजी लोंढे, सहाय्यक आयुक्त
१३. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
१७. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१८. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
१९. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२४. श्री.दत्ता्त्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२५. श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
२६. श्रीमती. निलीमा कदम, लेखा पाल, शिक्षण मंडळ

२७. श्रीमती सलोनी निवकर, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१.श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.०० वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** ही स्थगित महासभा आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** महापौर महोदया, मी सर्वात पहीले, आज उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये नविन आयुक्ताची इथे नियुक्ती झाली आहे. श्री. गणेश पाटील, भारतीय प्रशासकिय सेवा, आय.एस.आय. अधिकारी आहेत. त्यांचे उल्हासनगरमध्ये संपुर्ण सभागृहाच्या वतीने आणि भारतीय जनता पार्टी, सर्व पक्ष आणि साई पार्टी, शिवसेना, आर.पी.आय., कॉग्रेस सर्वांच्या वतीने आम्ही आपले स्वागत करतो. जर आपण भुतकाळामध्ये जाऊ, तर आपल्या या सदनच्या नगरसेवकांचे अनुभव खुप दुःखद राहीले आहे. आपला चांगला चेहरा बघून आम्हांला आनंद झाला आहे. तर चांगल्या दिवसाचे इथे प्रारंभ होणार आहे आणि मी संपुर्ण सभागृहाच्या वतीने आपले स्वागत करतो की, रचनात्मक कार्यामध्ये, उल्हासनगरच्या रचनात्मक कार्यामध्ये सत्ता पक्ष आणि विरोधी पक्ष एका बाजूने मजबुतीने उभे राहतील. फक्त आपल्यांना एक निवेदन आहे की, जर सर्वांना बरोबर घेऊन चालाल तर, तेव्हा सर्वांचे सहकार्य आणि सर्वांचा विकास होईल. याच आधारावर आम्ही परत एकदा आपले स्वागत करीत आहोत आणि आम्हांला आनंद आहे की, आपली उल्हासनगरमध्ये नियुक्ती झाली आहे. जो क्षेत्रफळामध्ये छोटा आहे, पण कार्यामध्ये आणि काम करण्यासाठी खुप मोठा आहे आणि आपण या महानगरपालिकेमध्ये सफल आयुक्त म्हणून ओळखले जाल, जेव्हा कधी भविष्यामध्ये चर्चा होईल तेव्हा आपल्या सफलते बाबतच बोलले जाईल. अशी मी आपल्याकडून अपेक्षा बाळगतो, धन्यवाद.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, वेल कम टू उल्हासनगर, आयुक्त साहेब, खुपच आनंदाची गोष्ट आहे, आज दिड वर्षा नंतर आम्हांला हसरा चेहरा दिसत आहे. मला खुप आनंद झाला आहे की, चौथा नंबर, १, २, ३, ४ डायल होता, कधीच हसरा चेहरा दिसणार नाही आणि जसे तुम्ही आले आहेत, आम्हांला करंट आला आहे, वायब्रेशन आले आहे. आनंदाची वायब्रेशन आम्हांला वाटत आहे. तर मला वाटते की, ज्या प्रकारे आपण हसत राहतात. तर शहराला सुध्दा हसत ठेवणार, जो पर्यंत आपण राहाल, एक वर्षे राहाल, दोन वर्षे राहाल. आपण संपुर्ण शहराला हसवत राहाल आणि आपल्या शहर विकासाचे कार्य कराल. जी कामे थांबली आहेत, अर्धे आहेत, त्यांना पुर्ण करणार आणि आशा बाळगतो की, प्रत्येक माणसाला वेलकम ड्रिंक्स मिळते. वेल कम ड्रिंक्सच्या स्वागतामध्ये आज मला वाटते की, आजच्याच दिवशी आज आपण वेलकम ड्रिंक्सच्या रूपाने आज आपण आमची नगरसेवक निधी आणि राहीलेला प्रभाग समिती निधी आपण आम्हांला देणार, अशी मी आशा बाळगतो आणि आशा करतो की, आपला संपुर्ण कार्यकाळ चांगला जाईल आणि कोणतेही मतभेत न ठेवता, इथे चर्चा होते की, मतभेद न करता, पर्सनल काहीचे घ्यायचे नाही. जर मी काही बोलतो तर यु डोन्ट टेक सिरीयसली एज अ पर्सनल, जसे आय एम वर्किंग फॉर माय सिटी आणि यु आर आल्सो डुव्हिंग फॉर सिटी सो आय अगेन वेल कम यु थॅक्स ऑन बीहॉफ ऑफ अवर हाऊस, धन्यवाद.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजीः—** ॲन्ड बीहॉफ अवर लेडीज टीम. यु आर वेलकम सर, सर एक गोष्ट आहे की, श्री. निंबाळकर सरांची जी आामच्यासाठी पॉझिटीव्ह भुमिका होती की, आमच्या उल्हासनगरच्या इतिहासामध्ये साफसफाई पहील्याच वेळी आम्हांला चांगल्या प्रकारे दिसून आली. सर जर आपण अशीच साफसफाई मेन्टेन ठेवाल अशी आम्ही अपेक्षा करतो, धन्यवाद सर.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** खरोखर संपुर्ण सभागृहाने तुमचे चांगले स्वागत केलेले आहे आणि तुमच्याकडून अनेक अपेक्षा ठेवल्या आहेत. यापुर्वी काय झाले? त्याचे वर्तमानकाळामध्ये वापर करून भविष्य चांगले करायचे, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी भुतकाळ सांगितला अनुभव ज्याचा त्याचा असेल, खरोखर एक कनस्ट्रेस्कटीट काम तुम्ही आणि आम्ही मिळून, तुम्हांला प्रशासनाला कुठे अडचण येईल तिथे आम्हांला सांगा काही वापर करायचा असेल, तो आम्ही वापर करून या शहराचे हित कशात होईल? एक कायदयाच्या चौकटीमध्ये राहून, कायदा लोकांसाठी कसा राबविता येईल? त्याचा जास्तीत जास्त, कायदा लोकांसाठी आहे, लोकांना आडकाठी करण्यासाठी नाही. तर त्याचा वापर आपण करूया. कायदयाच्या चौकटीत राहून लोकांचे उल्हासनगर, जसे अता लोकांना पाहीजे काय? पाणी साफसफाई आणि रस्ते चांगले आणि लाईट त्यासाठी लोक टॅक्स देत असतात. या चार गोष्टी मिळाल्या तर याच्यावर आपण प्राधान्य आणि बाकी जी विकासाची कामे आहेत, ती वेगळया

प्रकारची ती नक्कीच करू पण प्राथमिक ज्या गर्जा आहेत, बेसिक निड्स त्या पुर्ण होत नाहीत. गेल्या ब–याच वर्षा पासून आमची मानसिकता भरपूर आहे. परंतु प्रशासन एक तर थांबवून ठेवतो किंवा त्या प्रकारे चालत नाही. तर आपल्याला आपले अनुभव जिल्हा परिषदेतले असतील किंवा प्रशासनातले असतील ते जास्तीत जास्त वापरून छोटेसे शहर आहे, फक्त १३ चौ.किलो मिटरचे आहे. पहायाला गेले तर आपल्या सारखे अधिकारी, सक्षम अधिकारी काही दिवसामध्ये, काही महीन्यामध्येच काया पालट करू शकतात. पण दुर्देवाने ते झाले नाही. तुमच्या चांगल्या गोष्टीसाठी, या शहराच्या विकासासाठी आम्ही संपुर्ण सभागृह विरोधी पक्ष तर आहेच, सत्ताधारी पक्ष तर त्यासाठी आहेच. आपण कराल अशी अपेक्षा आहे, पुन्हा सभागृहाच्या वतीने हार्दीक, हार्दीक अभिनंदन, शुभेच्छा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** मा. महापौरजी, आपल्या सभागृहाची ही प्रथा आहे की, नविन आयुक्त किंवा अधिकारी जेव्हा पण येतात, तेव्हा ते पहीले आपली ओळख करून देतात. तेव्हा नंतर, माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण नंतर बोला?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:–** सन्माननिय महापौर, उप महापौर, आणि सर्व सन्माननिय सदस्य, मराठीमध्ये बोलायला लागेल की, हिंदीमध्ये बोलायला लागेल. मी श्री. गणेश पाटील, आय.एस. २०१० ची बॅच मी या ठिकाणी नव्याने आयुक्त म्हणून रूजू झालेलो आहे. या पुर्वी मी जिल्हापरिषद वासिम येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम बघितले आहे, ठाणे जिल्हामध्ये देखील मी पुर्वी काम केलेले आहे. सर्वांना नमस्कार, धन्यवाद.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:–** मा. महापौर साहेबा, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकामध्ये, राष्ट्रवादी पार्टीच्यातर्फे आपले हार्दिक स्वागत आहे. आपल्याला इथे शहराची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. आमचे जे निंबाळकर साहेब होते, खुप चांगले साहेब होते. जेव्हा नविन आले होते, तेव्हा ते सकाळी ६.०० वाजता घरातून बाहेर पडत होते आणि शहरात फिरत होते, त्यांनी खुप अनुभव घेतले आणि खुप चांगल्या सेवा पण दिल्या. परंतु काही लोकांना व्हॉटसअ‍ॅपवर ऐकत पण होते आणि उत्तर पण देत होते. काही वेळे नंतर खुप चांगले कारभार चालले. त्यांच्याकडून एकच कमी राहीले, त्यांनी जो अंदाज पत्रक बनवले होते. ते बाजूला केले गेले. लोकांना न्याय दिला नाही, लोकांना सुविधा देण्यासाठी एक रूपया पण त्यांनी खर्च केले नाही. तर ही उल्हासनगरसाठी अन्यायकारक गोष्ट आहे. जनतेसाठी ही अन्यायकारक गोष्ट झाली. आम्ही आपल्याकडून आशा करतो की, जी अंदाजपत्रक बनले आहे, त्या अंदाजपत्रकाची पुर्तता करणे प्रशासन आणि नगरसेवक यांचे काम आहे. जे पण नियम आहेत, त्या नियमानुसार आपण भरपूर सहकार्य करावे आणि आपण सुध्दा जनतेला न्याय दया, अशी आम्ही आपल्याकडून आशा बाळगतो की, अंदाजपत्रकानुसार ज्या सेवा देण्याच्या बाकी राहील्या आहेत, त्या लोकांना देण्यात याव्यात आणि न्याय देण्यात यावा, धन्यवाद.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:–** मा. आयुक्त साहेबांचे माझ्या तर्फे आणि कॉग्रेसतर्फे, सभागृहातर्फे, उल्हासनगरवासीयांतर्फे आपले हार्दीक स्वागत करते आणि पुढील भविष्यासाठी आपल्याला खुप खुप शुभेच्छा देते, तुमच्याकडून आशा आहेत की, आपण उल्हासनगरला एका प्रगतीपथावर नेऊन ठेवाल, धन्यवाद.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:–** मा. आयुक्त साहेब, साई पक्षाच्यातर्फे उल्हासनगर शहरामध्ये खुप खुप अभिनंदन करतो आणि जसे की बोलेले जात होते की, श्री. निंबाळकर साहेब, सकाळी ७.०० वाजता साफसफाईसाठी घरातून निघत होते. तर आज सकाळी मला व्हॉटसअ‍ॅपवर काही फोटो आले की, श्री. गणेश पाटील साहेब, पण साफसफाईसाठी सकाळी ७.०० वाजता कॅम्प नंबर ५ पर्यंत आले होते. तर उल्हासनगरसाठी ही खुप आनंदाची गोष्ट आहे की, साफसफाईसाठी पहील्याच दिवशी, म्हणजे आज तुमची पहीलीच महासभा आहे. तर ज्या प्रकारे आपण सुरूवात केली आहे, त्याच प्रमाणे सतत असेच राहीले पाहीजे, अशी माझ्याकडून आपल्याला शुभकामना आहे, धन्यवाद.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आजचा हा विषय पहीले पण ही सभा स्थगित करून परत आला आहे. ही जी फी आपण ठेवली होती, आयुक्त साहेबांनी प्रस्ताव दिला होता. पहीले पण सभागृहामध्ये या विषयावर खुप चर्चा झालेली आहे. सर्व सदस्यांचे पण हेच म्हणणे होते की, आपण संपुर्ण वर्षामध्ये सन २०१७—२०१८ मध्ये जे गल्ली गल्लीमध्ये रोडच्या नाल्या दुरूस्त करण्यासाठी, कच—या पासून मुक्त करण्यासाठी, काही ठिकाणी शौचालय बनवण्यासाठी जे नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधीठेवले होते, महापौर, उप महपौर, सभागृह नेता निधी, विरोधी पक्ष नेता निधी व स्थायी समिती सभापती निधी ठेवले होते, स्थायी समितीच्या सदस्यांचे निधी ठेवले होते. विशेष समित्यांचे सभापती यांचे निधी ठेवले होते, प्रभाग समितीच्या सभापतींचे निधी ठेवले होते. परंतु आज पर्यंत आम्हाला, आज हे वर्ष ३१ मार्चला संपायला आले आहे आणि आपण नविन वर्षे सन २०१८ मध्ये पर्दापण करीत आहोत. परंतु आमच्या कोणत्याही नगरसेवकांना वार्डच्या विकासासाठी कोणताही निधी उपलब्ध झाला नाही. अशा प्रकारे निवडणुकीच्या वेळी लोकांना केलेल्या घोषणा आम्ही पुर्ण करण्यासाठी असमर्थ झालो आहोत आणि आपण अशा प्रकारे लोकांवर एक नविन कर युझर फीच्याद्वारे लादणार आहोत, तर हे ठिक नाही. त्यासाठी मी संपुर्ण सभागृहाच्यातर्फे हा प्रस्ताव रिजेक्ट करण्यासाठी मान्यता देतो की, संपुर्ण सभागृह एक मताने हा प्रस्ताव रिजेक्ट करू आणि भविष्यामध्ये शहराच्या विकासासाठी नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी, अन्य निधी जेव्हा पण देवू आणि या शहराचा विकास झालेला दिसेल, तर अशा प्रकारची युझर फी, दुसरे कर, पाण्याचे बिल जिथे जिथे गरज असेल, आपल्या आजुबाजुला ज्या महानगरपालिका आहेत. त्यांच्या हिशोबाने आपण बघून नक्कीच मान्य करू. परंतु आज हा प्रस्ताव सर्व संमतीने रिजेक्ट करण्यात यावा.

या वेळी सदस्य, श्री. रवि जग्यासी, सदस्य, श्री. दिपक सिरवानी व सदस्य, श्री. गजानन शेळके यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**महापालिका सचिव:—** हा प्रस्ताव सर्वानुमते अमान्य?

**काही सदस्य :—**होय अमान्य.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा प्रस्ताव अमान्य करण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १:—** स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ‘‘उपभोक्ता फी’’ **[User fee]** आकारणी करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६३ (३) मधील तरतुदीनुसार मलजल, दुर्गंधीयुक्त पदार्थ व कचरा गोळा करणे, काढून नेणे, त्याची व्यवस्था व विल्हेवाट लावणे आणि (राज्य) शासनाने तसे फर्माविल्यास असे मलजल, दुर्गंधीयुक्त पदार्थ, कचरा यापासून मिश्रखत तयार करणे ही सेवा पुरविणेचे तरतूद आहे.

उल्हासनगर शहरात अंदाजे ४०० टन कचरा प्रतिदिन निर्माण होत आहे. सदर कार्ये व कर्तव्ये पार पाडणेसाठी अंदाजे १३०० कर्मचारी अधिकारी आणि त्यासोबत खाजगी ठेकेदार संस्था कार्यरत आहेत.

उपरोक्त कार्ये व्यवस्थितरित्या पार पाडणेसाठी केंद्र शासनाने का. आ. क्र. १३५७ (इ) दि. ८ एप्रिल, २०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ जाहिर केले आहे. सदर नियमानुसार शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेने पुढीलप्रमाणे कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत.

१) शहरातील घरे, झोपडया, मॉल्स, वाणिज्य मिळकतीतून दैनंदिन कचरा गोळा करणे.

२) कचरा गोळा करणाऱ्या लोकांचा गट तयार करून त्यांना प्रशिक्षण देवून त्यांच्या या कार्यात सहभाग घेणे.

३) कचरा निर्माण करणाऱ्या लोकांना कचरा रस्त्यावर, नदीत, नाल्यात, खुल्या जागेत न फेकण्यासाठी सूचित करणे.

४) कचरा निर्माण करणाऱ्या लोकांना कचऱ्याचे विलगीकरण करणेबाबत सूचना देणे.

५) विलगीकरण केलेल्या कचऱ्याची योग्यरितीने विल्हेवाट करणे.

६) अपायकारक कचऱ्याचा विहित पध्द्तीने साठा करणे व विल्हेवाट लावणे.

७) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणेसाठी भांडवली गुंतवणूक करणे.

८) कचऱ्यावर विविध प्रकारच्या पर्यायांपैकी योग्यरितीने विल्हेवाट लावणे.

९) जनजागृती करणे.

वरीलप्रमाणे अशा अनेक कर्तव्ये व जबाबदाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेवर लादण्यात आलेल्या आहेत. ही सर्व कर्तव्ये पार पाडणेसाठी सद्या करण्यात येणाऱ्या खर्चा व्यतिरिक्त मोठया प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे.

सदर नियमानुसार घन कचरा निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या निश्‍चित करण्यात आलेल्या आहेत.

१) कचरा निर्माण करणाऱ्या व्यक्तींनी कचऱ्याचे विलगीकरण करणे व स्थानिक स्वराज्य संस्थेने प्राधिकृत केलेल्या कचरा गोळा करणाऱ्यास देणे.

२) कचरा निर्माण करणाऱ्यांनी कचरा रस्त्यावर, नदीत, नाल्यात, खुल्या जागेवर फेकू नये.

३) प्रत्येक दुकानदाराने वाया जाणारे अन्न फळे, भाज्या, डिस्पोजेबल कप, प्लेट इ. डसबीन मध्ये टाकणे.

४) प्रत्येक हॉटेल मालक यांनी महापालिकेच्या सहकार्याने कचऱ्याचे विलगीकरण करून महापालिकेने प्राधिकृत केलेल्या कचरा गोळा करणाऱ्यास देणे तसेच बायोडिग्रेबल कचऱ्यावर प्रक्रिया करणे.

५) घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेने निश्‍चित केलेल्या **''उपभोक्ता फी''** **[User fee]** चा नियमित भरणा करणे.

तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मधिल मार्गदर्शक सुचना नुसार घनकचरा व्यवस्थापन पध्दती आर्थिकदृष्टया सक्षमपणे चालु ठेवण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनावरील खर्च स्थानिक स्वराज्य संस्थानी मालमत्ता कर आणि उपभोक्ता शुल्कामधून वसूल करावयाचे आहे.

या संदर्भात विस्तृत जबाबदाऱ्यांचा तपशिल घन कचरा व्यवस्थापन २०१६ मध्ये विहित करण्यात आलेला असून त्याची अंमलबजावणी अनिवार्य राहील.

सद्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापनापोटी होणारा खर्च व संबंधित करापासून प्राप्त होणाऱ्या महसूली उत्पन्नाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| तपशिल | रक्कम (आकडे कोटीत) | एकुण (आकडे कोटीत) |
|---|---|---|
| पगार व भत्ते (पगार, बोनस, प्रवास भत्ता इ..) (कर्मचाऱ्यांची संख्या – १२५४) | ३२ | |
| प्रशासकीय खर्च | २ | |
| कचरा वाहतूक खर्च | १६.०७ | |
| डंपिंग ग्राउंड व्यवस्थापन | २.५४ | |
| मशिनद्वारे साफसफाई | १.५२ | |
| डेब्रीज वाहतूक | १.८० | |
| डसबीन पुरविणे | ६ | |
| जंतूनाशके खरेदी | २ | |
| एकूण खर्च | ६३.९३ | |
| आकस्मिक खर्च (१०:) | ६.४० | |
| | ७०.३३ | ७०.३३ |
| मल प्रवाह कर (वार्षिक मागणी) | ५.१५ | |
| विशेष मल प्रवाह कर (वार्षिक मागणी) | ०.०८ | |

| | | |
|---|---|---|
| एकूण उत्पन्न | ५.२३ | ५.२३ |
| तूट | | ६५.१० |

उक्त तपशिलानुसार सद्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापनावर एकूण वार्षिक खर्च रुपये ७०.३३ कोटी इतका असून घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार यापुढे भविष्यात शहरातील नागरीकांसाठी घनकचरा वाहतुक करण्यासाठी डोअर टू डोअर सर्विस माहापालिकेस उपलब्ध करुन देणे अनिवार्य असल्याने त्यासाठी आवश्यक वाहने व मनुष्यबळ इत्यादीसाठी खर्चात अजून वाढ होणार आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत सद्यस्थितीत मल प्रवाह कर व विशेष मल प्रवाह कर याद्वारे वार्षिक रुपये ५.२३ कोटी मात्र कर स्वरुपात महापालीकेस प्राप्त होत आहेत. सदरची कर स्वरुपात वसूल होणारी रक्कम ही एकूण घनकचरा व्यवस्थपनावरी खर्चाच्या १० टक्के पेक्षाही कमी आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी येणारा खर्च इतर योजना, कार्यक्रम, पदाधिकारी व नगरसेवक निधी यातून करावा लागतो, त्यामुळे शहरातील विकास कामांवर मर्यादा येते.

याशिवाय घनकचरा साठा, विलगीकरण व त्यावर प्रक्रियेसाठी जमीन संपादन करून तेथे घनकचरा प्रक्रिया करणे या बाबींवर मोठया प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावयाची आहे. याकामी आवश्यकता वाटल्यास एम.एम.आर.डी.ए सारख्या वित्तीय संस्थेकडून कर्जाची उभारणी करावी लागेल.

महापालिकेचे स्वत:चे उत्पन्नाचे दोन स्त्रोत म्हणजे मालमत्ता कर व पाणी पुरवठा हे आहेत. यापैंकी पाणी पुरवठयाचे दर खरेदीपेक्षा फारच कमी असल्याने सदर सेवा अर्थसहाय्य देवून पूरविण्यात येत आहे. परिणामी एम.आय.डी.सी ला कोटी रूपयांची थकबाकी देय आहे. मालमत्ता कर व अनूदानापोटी प्राप्त होणारी रक्कम महापालिकेने पार पाडाव्या लागणाऱ्या कार्ये व कर्तेव्यांसाठी पुरेशी होत नाही. व त्यामुळे उभारण्यात आलेल्या कर्जाची परतफेड वेळेवर होत नाही. अशा परिस्थितीत घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये महापालिकेवर लादण्यात आलेल्या अन्य जबाबदाऱ्यांसाठी अतिरिक्त निधी उभारणे आवश्यक आहे. अन्यथा सदर नियमांची अंमलबजावणी होणे कठीण आहे.

तरी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये महापालिकेस पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठी शहरातील मिळकतधारकांवर पुढीलप्रमाणे **''उपभोक्ता फी''** **[User fee]** आकारण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्तावित करण्यात आलेला **''उपभोक्ता फी''** **[User fee]** चा तक्ता

| अ. क्र | मालमत्तांचा तपशिल | मालमत्तांची संख्या | प्रतिमाह युजर फी | प्रतिवर्ष युजर फी | अंदाजित उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी/टीअर गर्डर बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्ता | ७६६५६ | ३७५ | ४५०० | ३४,४९,५२,००० |
| २ | एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्ता | ७९६२० | २७५ | ३३०० | २६,२७,४६,००० |
| ३ | लाकडी/मातीचे बांधकाम असलेल्या मालमत्ता | १७१९५ | १७५ | २१०० | ३,६१,०९,५०० |
| ४ | तबेले, मंगल कार्यालय, हॉटेल व रेस्टॉरंट, मॉल्स इ. मालमत्ता | २९१ | | | |
| | अ) ज्या मालमत्तांचे क्षेत्रफळ १००० चौ.फुट पर्यंत आहे :– १०० | | १००० | १२००० | १२,००,००० |
| | ब) ज्या मालमत्तांचे क्षेत्रफळ १००० चौ.फुट पेक्षा अधिक आहे:– १९१ | | ५००० | ६०००० | १,१४,६०,००० |
| ५ | औद्योगिक मिळकती | १३ | ५००० | ६०००० | ७,८०,००० |
| एकुण | | १७३७७५ | | | ६५,७२,४७,५०० |

घरात किंवा आस्थापनेमध्ये गोळा होणारा कचरा हा त्याच ठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत असलेल्या मिळकतींना वरीलप्रमाणे **''उपभोक्ता फी''** **[User fee]** मधुन पूर्ण सुट देण्यात येईल.

उपरोक्त **''उपभोक्ता फी''** **[User fee]** मालमत्ता कर बिलात समाविष्ट करून त्याप्रमाणे वसुलीची पध्दत लागू केल्यास स्वतंत्रपणे बिले बजावणे, त्याचे वाटप करणे इ. सर्व बाबींवरील खर्च वाचविता येईल.

सबब, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील तरतुदीनुसार **''उपभोक्ता फी''** **[User fee]** आकारणीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीने महासभा पटलावर मंजुरी करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ९३**      **दिनांक:– ९/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती तसेच काही सदस्य उपस्थित नसल्याने घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेचा निर्णय शहराची परिस्थिती विचारात घेता स्थायी समिती स्वत:च्या अखत्यारीत निर्णय न घेता महासभेपुढे निर्णयास्तव ठेवण्याचे निर्देश प्रशासनास देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ८३** **<u>दिनांक:—२७/३/२०१८</u>**

**सुचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी**

**अनुमोदकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी ३.१४ वाजता पिठासिन अधिकारी, श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– २७/३/२०१८

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २७/३/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक २७/३/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी –– महापौर

३. श्री. जीवन चंद्रभान इदनानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २७ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २८ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २९ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३० | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ७ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ८ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३२ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ९ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३३ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ३४ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३५ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३६ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ३७ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ३९ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १६ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १७ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता उर्फ पप्पू गुप्ता | ४१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ४२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ४३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २० | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ४४ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २१ | श्रीमती इन्दिरादेवी जमनादास उदासी | ४५ | श्री. विजय चाहू पाटील |
| २२ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ४६ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २३ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | ४७ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २४ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | ४८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २५ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव | ४९ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २६ | श्रीमती आशा जीवन इदनानी | ५० | श्री. अरुण लक्ष्मण आशान |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे, २. श्रीमती पुजा सचिन भोईर, ३. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ४. श्रीमती मिना कौर अजितसिंग लबाना, ५. श्रीमती पंचम ओमेश कालानी, ६. श्रीमती आशा नाना बिराडे, ७. श्री. स्वप्नील मिलींद बागुल, ८. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ९. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता, १०. श्री. अशोक बच्चुमल छाप्रु, ११. श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी, १२. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १३. श्रीमती शुभांगीनी निकम, १४. श्री. भगवान शंकर भालेराव, १५. श्रीमती चक्रवर्ती उर्फ अडसुळ छाया सुजित, १६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १७. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १८. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १९. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, २०. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, २१. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), २२. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २३. श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी, २४. श्री. रमेश महादेव चव्हाण, २५. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, २६. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), २७. श्रीमती कविता सुधिर बागुल, २८. पुष्पा नाना बागुल, २९. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ३०. श्रीमती मिनाक्षी रवि पाटील, ३१. श्री. आकाश परशुराम पाटील, ३२. श्री. विकास परशुराम पाटील

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी
६. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
८. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
९. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. एस. के. सेलवन, कार्यकारी अभियंता
११. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१२. श्री. बालाजी लोंढे, सहाय्यक आयुक्त
१३. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
१७. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१८. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
१९. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ठता निरीक्षक
२३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२४. श्री.दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२५. श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
२६. श्रीमती. निलीमा कदम, लेखा पाल, शिक्षण मंडळ
२७. श्रीमती सलोनी निवकर, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळू भांगरे

सांयकाळी ६.५१ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १:–** स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन सन २०१८–१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम मंजुरी देणे

---

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>**सन्माननिय स्थायी समिती सभापती आपण व्यासपीठावर यावे व आपला अर्थसंकल्प प्रस्तृत करावा.

यावेळी स्थायी समिती सभापती श्रीमती कांचन अमर लुंड हया व्यासपीठावर येवुन बसल्या.

**<u>महापालिका सचिव :–</u>**मा. मुख्य लेखा अधिकारी यांना विनंती करते की त्यांनी बजेट सादर करावा.

यावेळी श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी यांनी मा. स्थायी समिती सभापती यांना अर्थसंकल्प सादर केला.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :—**हा अर्थसंकल्प चोपडीमध्ये असेल की रोखडीत असेल.

यावेळी मा. स्थायी समिती सभापती यांनी अर्थसंकल्प वाचुन दाखविला.

**श्रीमती कांचन अमर लुंड, सदस्या स्थायी समिती सभापती:—**मा. महापौर, उप महापौर, आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी , कर्मचारी और पत्रकार बंधू आपणासर्वांचे या विशेष अर्थसंकल्पीय सभेत मी हार्दिक स्वागत करते.

सन २०१७ ते २०२२ या पांच वर्षाच्या कार्यकाळात स्थायी समिती सभापतीच्या नात्याने मला दुस—यांदा अर्थसंकल्प, जी एक महत्वपुर्ण जबाबदारी आहे, यास सादर करण्याची संधी मिळाली आहे. यासाठी मी आपणा सर्वांचे आभार मानते.

केंद्र आणि राज्य शासना प्रमाणे महापालिका सुध्दा एक शासन आहे. ज्यात आपल्या शहरात राहणा—या लोकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी स्थापन केले आहे. या शासनाच्या कार्यक्षेत्रात ज्या गोष्टींचा समावेश आहे, ते म्हणजे साफसफाई, रस्ते विकास, शहर रोशनाई आणि पाणी पुरवठा इत्यादी या व्यतिरिक्त अन्य जबाबदा—या जसे महिला व बालकल्याण, गरीबी दुर करणे व पर्यावरण बनवुन ठेवणे, या सर्वे जबाबदा—या महापालिकेस सुपुर्त केल्या आहेत. या जबाबदा—या पुर्ण करणेसाठी महापालिकेकडे फारच कमी साधने आहेत, जसे एलबीटी, मालमत्ता कर आणि पाणी पुरवठा, या उपलब्ध साधानातुन ख—या अर्थाने वापर करुन जनहितासाठी सुविधा देणे हा अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश आहे. अर्थसंकल्प तयार करण्याची जबाबदारी मुख्यम्हणजे स्थायी समितीची आहे. ज्यास महासभेद्वारे अंतिम मान्यता दिली जाते. शहरातील जतनतेने या संस्थेत ज्या सदस्यांस निवडून पाठविले आहे ते सर्व येथे उपस्थित आहेत. आणि या सभागृहात १६ सदस्यांची स्थायी समितीने नियुक्ती केली आहे. स्थायी समितीद्वारे ७ मार्च २०१८ रोजी बनविण्यात आलेल्या या अर्थसंकल्पास मी आपल्या समोर ठेवत आहे.

प्रशासनातर्फे वर्ष २०१८—१९ साठी ६००.९२ कोटी रुपयाचे उत्पन्न आणि ६००.६७ कोटीचा खर्चाचा अंदाज स्थायी समिती समोर ठेवण्यात आला होता. याचबरोबर प्रशासनाने ७० कोटीचा घनकचरा व्यवस्थापन उपभोक्ता(युजर फी) चा प्रस्ताव सुध्दा दिला आहे.

उत्पन्नाचे विविध साधनातुन किती पैसे जमा केले जातील त्याबाबतचे विवरण प्रशासनाने दिले आहे ते याप्रकारे आहे.

**१ उत्पन्न बाजू:——**

| अ.क्र. | लेखा शीर्ष | उत्पन्न |
|---|---|---|
| १ | एल.बी.टी | १८ कोटी |
| २ | प्रॉपर्टी टॅक्स | २२५ कोटी |
| ३ | पाणी बील | ०३ कोटी |
| ४ | एम.आर.टी.पी. अंतर्गत वसुली | २५ कोटी |
| ५ | परवाने शुल्क व इतर शुल्क | ७२ कोटी |
| ६ | वित्त आयोग व इतर अनुदान | २३२ कोटी |
| ७ | अमृत व सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना | १७.७५ कोटी |
| ८ | इतर | ८.१८ कोटी |
| | एकूण रुपये | ६००.९३ कोटी |

**प्रापर्टी टॅक्स:——**

शहरात जवळ जवळ १,७५,००० घर व दुकान आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२७ च्या अनुषंगाने मालमत्ता कर वसुल केला जात आहे. महापालिकेचे जवळ जवळ ३०० कोटी रुपये कर उर्वरीत आहे. महानगरपालिकेतर्फे नोव्हेंबर आणि डिसेंबर २०१७ मध्ये दंडमाफी दंडमाफीसाठी अभय योजना सुरु करण्यात आली होती, परंतु या योंजनेच्या अपेक्षेनुसार प्रतिसाद मिळाला नाही. परंतु वसुलीसाठी आम्हांला सलगपणे प्रयत्न करावा लागणार आहे. या गोष्टीकडे लक्ष देवुन सन २०१८–१९ च्या अर्थसंकल्पात २४० कोटी रुपये प्रापर्टी टॅक्स वसुली चे लक्ष ठेवण्यात आले आहे. आम्हांला आशा आहे की, मालमत्ता कराचे कर्मचारी या लक्षास मिळविण्याचा प्रयत्न करतील आणि त्यात शहरवासी आम्हांला सहकार्य करतील.

**एल.बी.टी:—**

सन २०१२ ते जुलै २०१५ च्या दरम्यान व्यापारींमार्फत आयात करण्यात आलेले वस्तुंवर उर्वरीत रक्कम वसुल करण्यासाठी एल.बी.टी. विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहे. सन २०१८–१९ साठी ५० कोटी एल.बी.टी वसुलीचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

**डेव्हलपमेंट चार्ज व अन्य फी:—**

आपण सर्वांना माहित आहे की, काही कालावधीपुर्वी राज्य शासनामार्फत डेव्हलपमेंट प्लान मंजूर करण्यात आला आहे. डेव्हलपमेंट प्लान नुसार इमारत बनविण्यासाठी डेव्हलपमेंटस रुल्स काही दिवसांत मंजुर होणार आहेत. या नियमात विकासाच्या संदर्भात काही बदल करण्यात आले आहे. एफ.एस.आय. मध्ये वाढ करण्यात आली आहे. एफ.एस.आय. पैसे देवुन महापालिकेतुन खरीदी केली जावु शकते. या कारणास्तव टाउन प्लॅनिंग विभागातील विकास व अन्य शुल्क च्या माध्यमातुन १३३ कोटी रुपये वसुलीचे लक्ष सन २०१८–१९ च्या बजेटमध्ये करण्यात आले आहे.

**अनुदान:—**

महानगरपालिकेला ब—याचप्रमारे अनुदान राज्य शासनातर्फे प्राप्त होत आहे, जसे की, रस्ता अनुदान, स्टॅम्प डयुटी अनुदान, एल.बी.टी. अनुदान , वित्त आयोग अनुदान इत्यादी या सर्व अनुदानाच्या माध्यमातुन २३२ कोटी सन २०१८–१९ मध्ये मिळण्याची शक्यता आहे.

**घनकचरा व्यवस्थापन उपभोक्ता फी (युजर फी):—**

आपण सर्वांना माहित आहे की, संपुर्ण देशात स्वच्छ भारत अभियान चालविले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातुन सफाईशी निगडीत प्रत्येक विषयावचर आवश्यक ते उपाय करणे आवश्यक आहे. या उपायांसाठी पैश्यांची आवश्यकता प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेस आहे. या गोष्टीकडे लक्ष ठेवुन केंद्र शासनाने युजर फी वसूल करण्यासाठी निर्देश सर्वांना दिले आहेत. या आदेशानुसार प्रशासनने ७० कोटी रुपये युजर फी वसूल करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवला होता. स्थायी समिती सदस्यांनी ती कमी करुन ३५ कोटी केले आहे. या प्रस्तावास विचारविनिमय आणि अंतिम निर्णयासाठी महासभेसमोर ठेवण्यात आले आहे. ज्यास काही वेळेपुर्वी सभेमध्ये मंजुरी दिलेली नाही.

**पाणी बील वसूली:—**

शहरातील नॉन डोमेस्टीक ग्राहकांना स्वतंत्र पाणी बील देवुन वसूली केली जात आहे. या बिलांचा अभ्यास केला तर फार मोठया संख्येने व्यापारी बंधुवर दंड लावण्यात आला आहे, असे नजरेत आले आहे की या विषयावर प्रशासनाने चर्चा केल्यानंतर एप्रिल आणि मे, २०१८ या दोन महिन्यात अभय योजना जाहीर करण्यात आली की व्यापा—यांनी जर एप्रिल महिन्यात बिल अदा केले तर दंड केलेली रक्कम पुर्णत: सुट देण्यात येईल. १ मे ते १५ मे पर्यंत ही शुट ५० टक्के होईल आणि १६ मे ते ३१ मे २५ टक्के पर्यंत होणार, आमची व्यापारी बंधुना ही विनंती आहे की, उर्वरीत रक्कम भरुन दंड रक्कम ने सुटकारा मिळणार आणि शहर विकासात आपले योगदान दया. या माध्यमातुन जवळ जवळ ७ कोटी रुपये सन २०१८–१९ मध्ये प्राप्त होणार.

वर दर्शविण्यात आलेले फेरबदलानंतर सन २०१८–१९ साठी ७७४ कोटी रुपये उत्पन्न चा अंदाज स्थायी समिती सदस्यांनी निश्चित केला आहे.

**खर्च बाजू:—**

सन २०१८–१९ मध्ये होणा—या उत्पन्नातुन विकास कार्य और अन्य जबाबदारीवर होणारा खर्च याप्रकारे आहे

**खर्चबाजू:—**

| अ.क्र. | लेखा शीर्ष | उत्पन्न |
|---|---|---|
| १ | पगार और भत्ते खर्च | १३२.९० कोटी |
| २ | एम.आय.डी.सी. | ३३.४० कोटी |
| ३ | कर्ज भुगतान | ४०.०६ कोटी |
| ४ | शहर रोशनाई | १३.१३ कोटी |
| ५ | कचरा वाहतूक और जंतुनाशक | ४८.११ कोटी |
| ६ | बाग बगीचे | २१.७० कोटी |
| ७ | अग्निशमन व्यवस्था | ३.९१ कोटी |
| ८ | दवाखाना और जन आरोग्य | ५.२६ कोटी |
| ९ | रस्ते और अन्य सुविधाए | १९२.०४ कोटी |
| १० | प्रभाग समिती क्षेत्रविकास | १७.१६ कोटी |
| ११ | पाणी पुरवठा | २२.०५ कोटी |
| १२ | मल निसारण | ४३.९५ कोटी |
| १३ | भुयारी गटार | ४.३३ कोटी |
| १४ | प्राथमिक शिक्षण | ६०.९२ कोटी |
| १५ | परिवहन सेवा | २.१५ कोटी |
| १६ | असाधारण लेखे | २५.७४ कोटी |
| १७ | इतर | २२.३९ कोटी |
| | एकूण | ६८८.४० कोटी |
| | अमृत योजना | ८६.०२ कोटी |
| | अमृत योजना के साथ एकूण | ७७४.४२ कोटी |

**<u>प्रशासकीय खर्च</u> :—**

महानगरपालिका जी जबाबदारी निभावते त्यामध्ये आपले सफाई कामगार, मजूर, माळी, लिपिक, वायरमन, इंजिनिअर व अधिकारी या सर्वाचा समावेश आहे या अधिका—यांवर आणि कर्मचा—यांवर पगार भत्ते व प्रशासकीय खर्चासाठी १३२.९० कोटी रुपये सन २०१८—१९ च्या अर्थसंकल्पात ठेवण्यात आले आहे.

**<u>शहर स्वच्छता</u> :—**

शहरातील विविध भागामध्ये दररोज अंदाजे ३५० टन कचरा उचलण्यासाठी जंतुनाशक आणि अन्य साहित्य खरेदी, या व्यवस्थेसाठी अंदाजपत्रकामध्ये ४८ कोटी रुपयांची तरतुद केली आहे. शहरातील सर्व शौचालयांच्या देखभाल आणि दुरुस्ती साठी चार प्रभागांसाठी निविदा आताच मंजुर करण्यात आली आहे. शहरातील ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी डस्टबिन लावण्यात आले आहे. शहरातील लोक आपल्या दुकान व घरातील सुका व ओला कचरा वेगवेगळा जमा करतील, या कारणासाठी सर्वांना दोन डब्बे देण्याकामी निविदा सुध्दा मंजुर करण्यात आली आहे. या सर्व प्रयत्नातुन शहर स्वच्छ ठेवण्यास मदत होईल.

**बाग बगीचे :––**

शहरातील लोक आपल्या आरोग्यासाठी जागृत होत आहेत. त्याबाबत साधू वासवानी गार्डन, राजीव गांधी गार्डन, जिजामाता गार्डन, प्रभात गार्डन , लाललोई गार्डन येथे येणा–या लोकांची संख्याने आपणांस कळत आहे. या उदयानांची सोंदर्यता आणि स्वच्छता राखुन ठेवण्यासाठी सन २०१८–१९ च्या अर्थसंकल्पात २१.७० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. या उदयानात खुली व्यायाम शाळा, (Open gym) आणि मुलांसाठी खेळाच्या सामानासाठी अर्थसंकल्पात ५ कोटी रुपये ठेवण्यात आले आहेम.

**रस्ते विकास :––**

एम.एम.आर.डी.ए. मार्फत चार मुख्य रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरण करण्याचे काम सुरु झाले आहे त्याव्यतिरिक्त काही नविन कामे मंजुर करण्यात आले आहे ते याप्रकारे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | न्यू इंग्लिश स्कूल ते निर्मल कुंज उल्हासनगर –५, ४० फुट रस्ते सिमेंट कॉक्रीटीकरण . | २.५४ कोटी |
| २ | कालानी सोसायटी ते रामरक्षा हॉस्पीटल उल्हासनगर–४, १०० फुट रस्ते सिमेंट कॉक्रीटीकरण . | ४.८५ कोटी |
| ३ | खेमानी चौक, सीमा अर्पाटमेंट ते इंडस्ट्रियल परिसर मार्गे आंबेडकर चौक, जग्गु हॉटेल उल्हासनगर–२, ५० फुटाचा सिमेंट कॉक्रीटीकरण. | ४.५६ कोटी |
| ४ | कॅम्प नं ३ ओटी ते गुलराज टॉवर मार्गे पिंटो पार्क उल्हासनगर–३, ६० फुट रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण. | ८.७७ कोटी |
| ५ | सचदेव कॉम्प्लेक्स् ते हिरा मेरेज हॉल उल्हासनगर–२, ६० फुट रस्ते सिमेंट कॉक्रीटीकरण . | २.८७ कोटी |
| ६ | सत्यम अर्पाटमेंट ते बॅक ऑफ बरोडा उल्हासनगर–२, ४० फुट रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण. | २.१७ कोटी |
| ७ | कॅब्रीज शॉप सामने जते साई कुटीर उल्हासनगर–२ रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण. | ४५.०० लाख |
| ८ | बॅरेक क्र २०७१ ते २०४६, बॅक ऑफ इंडीया येथुन, उल्हासनगर–५ रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण. | २.०७ कोटी |
| शौचालय विकास | | |
| १ | गोलमैदान, उल्हासनगर–१ पुरुष वा महिला यांच्यासाठी सुंदर व सुविधायुक्त १२ सीट, ४ बाथरुम वा १० युरिनल शौचालय. | ६० लाख |
| २ | नेताजी चौक उल्हासनगर–४ पुरुष वा महिलांसाठी सुंदर व सुविधायुक्त शौचालय . | ६० लाख |
| भुयारी गटार योजना | | |
| १ | ७६ कोटी रुपयांचे शहरातील महत्ताचे भुयारी गटार योजनाचे काम सुरु करण्यात आले आहे | |
| घरोघरी कचराकुंडी | | |
| १ | स्थायी समिती ठराव.८८ दि. २/२/२०१८ नुसार शहरातील प्रत्येक दुकान वा घरामध्ये सुखा आणि ओला कचरा अलग | |

| | | |
|---|---|---|
| | अलग करण्यासाठी २ कचराकुंडी देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे | |

नुकतेच शहरातील २० पॅनल मध्ये नगरसेवक निधीच्या कामाची निविदा अंतिम करण्यात आली आहे ही मंजुरी प्रति पॅनल ६४ लाखाच्या हिशोबाने देण्यात आली आहे.

**रस्ताची डागडुजी:—**
पावसाळयापुर्वी रस्त्याची डागडुजीसाठी १२ कोटी रुपये अर्थसंकल्पात ठेवण्यात आले आहे.

**महापौर आणि आयुक्त निवास:—**
महापौर आणि आयुक्त यांच्या निवासस्थानासाठी ३ कोटी रुपये ठेवण्यात आले आहे

**महापौर, उप महापौर और अन्य पदाधिकारी निधी:——**
प्रशासनातर्फे पदाधिकारी वा नगरसेवकांसाठी सन्मानजन निधीची तरतुद केली आहे त्याचे विवरण याप्रकारे आहे.

| अ.क्र. | लेखा शीर्ष | उत्पन्न |
|---|---|---|
| १ | महापौर निधी | ५ कोटी |
| २ | उप महापौर निधी | ५ कोटी |
| ३ | स्थायी समिती सभापती निधी | ५ कोटी |
| ४ | सभागृह नेता निधी | ५ कोटी |
| ५ | विपक्ष नेता निधी | ५ कोटी |
| ६ | प्रभाग समिती सभापती निधी | १ कोटी |
| ७ | विशेष समिती सभापती निधी | १ कोटी |
| ८ | स्थायी समिती सदस्य निधी | १ कोटी |
| ९ | नगरसेवक निधी | १०लाख |
| १० | स्वीकृत नगरसेवक निधी | ४५ लाख |
| ११ | प्रभाग समिती सदस्य निधी | २२ लाख |
| १२ | गट नेता निधी (प्रत्येकी २० लाख) | २० लाख |

**स्टेशन परिसर विकास:——**
उल्हासनगर शहराची भौगोलिक स्थिती नुसार आपले शहर हे मध्ये रेल्वेचे तीन स्टेशनने जोडले आहे. हजारो शहरवासी आपला धंदा आणि नोकरीसाठी या तीन स्टेशनचा वापर करतात. त्यांच्या सुविधेसाठी स्टेशन परिसराचा विकास करणे आवश्यक आहे. यासाठी रेल्वे स्टेशन परिसर विकासासाठी सन २०१८—१९ मध्ये अर्थसंकल्पात १० कोटी रुपयाची तरतुद केली आहे.

**चालीया साहेब उल्हासनगर—५, झुलेलाल मंदिर, उल्हासनगर—१ क्षेत्र विकास:——**
उल्हासनगर शहरातील मंदिर और महापुरुषांसाठी, देश विदेशाचे काही भागात राहणारे भारतीय आणि शहरवाशी यांची आस्था जोडली गेली आहे. या मंदिरात होणारे वार्षिक कार्यक्रमात हजारोच्या संख्येने देशी व विदेशी लोक येतात. अशा स्थानाची सुंदरता बनवुन ठेवणे आवश्यक आहे. या कारणासाठी या स्थानाचा विकास करण्यासाठी सन २०१८—१९ च्या अर्थसंकल्पामध्ये १५ कोटी रुपये ठेवण्यात आले आहे. या व्यतिरिक्त

शिवरात्री आणि चालीया सारखे वार्षिक कार्यक्रमांचे आयोजन महापालिकेतर्फे करण्यासाठी ५० लाख रुपये चालू अर्थसंकल्पात ठेवण्यात आले आहे.

**औदयोगिक परिसर विकास:—**

उल्हासनगर शहरातील काही भागांमध्ये इंडस्ट्रीअल झोन घोषित केले आहे. या उदयोगात काही लोक जोडले गेले आहेत. या उदयांगामुळे उल्हासनगर शहर देशाच्या प्रत्येक कानाकोप—या मानला जातो. या औदयोगिक परिसरामध्ये सर्व आवश्यक मुलभूत सुविधांवर खर्च करण्यासाठी सन २०१८—१९ च्या अर्थसंकल्पात १० कोटी रुपये ठेवण्यात आले आहे.

**चौकांचा विकास (Junction):—**

शहर हे वेगवेगळया भागातील चौकांनी जोडला गेला आहे. या चौकांवर मोठया संख्येने लोकांना यावे व जावे लागते. येथे वाहतुकीने जोडलेल्या सुविधांवर खर्च करनेसाठी सन २०१८—१९ च्या अर्थसंकल्पात ३ कोटी रुपये ठेवण्यात आले आहे.

**शमशानभूमी अत्यआधुनिकीकरण :—**

हिंदू संस्कृतीच्या हिशोबो मृतदेहाला अग्नी देवुन अंतिम संस्कार केला जातो, परंतु देशातील काही शहरामध्ये आधुनिकीकरण आणि पर्यावरण नजरेत ठेवुन अंतिम संस्कारासाठी विदयुत वाहिनी चा उपयोग केला जात आहे. याचप्रकारे शहरातील स्मशनभूमी मध्ये आधुनिक विज वाहिनी लावण्यासाठी १ कोटी रुपयांची तरतुद सन २०१८—१९ च्या अर्थसंकल्पात केली गेली आहे.

**लॅपटॉप:—**

संगणकीकरणाला लक्षात ठेवुन सर्व नगरसेवकांसाठी एक लॅपटॉप देण्यासाठी अर्थसंकल्पात ५० लाख रुपयांची तरतुद करण्यायत आली आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे नुतनीकरण:—**

शहरातील शिवाजी चौकात असलेले छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे नुतनीकरण करण्यासाठी सन २०१८—१९ च्या अर्थसंकल्पात १ कोटी रुपयांची तरतुद ठेवण्यात आली आहे.

**प्राथमिक शिक्षण:—**

महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण घेणारे विदयार्थ्यांसाठी युनिफार्म, रेनकोट, बुट आणि अन्य वस्तूंसाठी अर्थसंकल्पात ६१ कोटी रुपये ठेवण्यात आले आहे.

**महिला व बालकल्याण:—**

महिला व बाल कल्याण या संविधानिक जबाबदारीस निभावुन महिला व बालकल्याण विकास संबंधीत सर्व योजनेसाठी ९ कोटी रुपये सन २०१८—१९ साठी तरतुदी केली आहे.

मा. महापौर, उप महापौर, आयुक्त वा अन्य पदाधिकारी व अधिकारी यांच्या सहकार्याने मी, वर्ष २०१८—१९ चा अर्थसंकल्प आपल्या समोर ठेवु शकली. यासाठी मी सर्वांचे आभार प्रकट करते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०० अन्वये आपण सर्व एकजुट होवुन अर्थसंकल्पास अंतिम मंजुरी देणार, अशी विनंती करुन आपले दोन शब्द पुर्ण करते.

जयहिंद ! जय महाराष्ट्र ! जय झुलेलाल !

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन २०१८—१९ साठी मा. आयुक्तांद्वारे स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्प प्रस्तृत करण्यात आला होता. त्या अर्थसंकल्पाचा अभ्यास केल्यानंतर या शहरातील बरेच विकासाचे कामे संकलीत करुन फारच चांगला व सुंदर असा अर्थसंकल्प आज सभागृहामध्ये प्रस्तृत केला आहे. आता संध्याकाळचे ७ वाजुन १२ मिनिटे झाली आहेत. आपण सभा बरोबर ७.०० वाजता संपवितो. तसेच महिला सदस्या असल्याने ही सभा आता स्थगित करावी. या अर्थसंकल्पावर चर्चा होणे आवश्यक आहे. तसेच हा २०१८—१९ चा अर्थसंकल्प या शहरास सुंदर करण्यासाठी चांगला बनविला जावा यासाठी मी आपणांस निवेदन करतो की ही महासभा स्थगित करुन दिनांक ३१/३/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता ही अर्थसंकल्पाची सभा चर्चेने सुरु करावी.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**ही सभा ३१ मार्च २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २७/०३/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ८७ अ** **दिनांक : २७/०३/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २७/०३/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.१५ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ३१/३/२०१८

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३१/३/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

## ४ —अ

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक २७/३/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित करण्यांत आल्याने सदरची सभा दिनांक ३१/३/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

४. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३० | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| २ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३१ | श्रीमती इन्दिरादेवी जमनादास उदासी |
| ३ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३२ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३३ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ५ | श्रीमती मिना कौर अजितसिंग लबाना | ३४ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ६ | श्रीमती पंचम ओमेश कालानी | ३५ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३६ | श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४० | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४२ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १४ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४३ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४४ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४५ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १७ | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी | ४६ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४७ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २० | श्रीमती शुभांगीनी निकम | ४९ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५० | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २२ | श्रीमती चक्रवर्ती उर्फ अडसुळ छाया सुजित | ५१ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५२ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५४ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५५ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २७ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता उर्फ पप्पू गुप्ता | ५६ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ५७ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| २९ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५८ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ३. श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ४. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ५. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ६. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ७. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ८. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ९. श्री. रवी किशनचंद जग्यासी, १०. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, ११. श्रीमती ज्योती शामराव माने, १२. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, १३. श्री.

भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), १४. श्री. प्रमोद नामदेव टाले, १५. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १६. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, १७. श्रीमती मिनाक्षी रवि पाटील, १८. श्री. विजय चाहू पाटील, १९. श्री. आकाश परशुराम पाटील, २०. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, २१. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, २२. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त
२. डॉ, विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. वानखेडे, लेखापाल
९. श्री. बी.एस. पाटील, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१०. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता
११. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त
१२. श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त
१३. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१४. श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त, साप्रवि
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१७. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
१८. श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१९. श्रीमती निलिमा कदम, अकाउंटंट
२०. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. राजा बुलानी, प्र. विद्यी विभाग प्रमुख
२२. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळू भांगरे

सांयकाळी ४.३९ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १:—** स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन सन २०१८—१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम मंजुरी देणे

---

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**सन्माननिय स्थायी समिती सभापती, आपण वर व्यासपीठावर येवुन बसावे व आपले कार्य पुर्ण करावे.

यावेळी मा. सभापती, स्थायी समिती श्रीमती कांचन अमर लुंड हया व्यासपीठावर आसनस्थ झाल्या.

**सदस्या श्रीमती सविता तोरणे:—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आज गेल्या चार दिवसापासुन प्रभागामध्ये पाणी नाही, प्रभाग क्र. १८ मध्ये पाण्याचा दुष्काळ पडला आहे. सारखे फोन येत असतात. न पाण्याचा वेळ निश्चित आहे, ना पाणी वेळेवर आहे. पाणीच येत नाही प्रभागामध्ये.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**त्याची प्रोसेस चालु आहे. बजेटची सभा झाल्यानंतर आपण या विषयावर बोलु. प्रोसेस चालु आहे व मी सर्वांच्या टचमध्ये आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**प्रत्येक वर्षाप्रमाणे यावर्षी देखील स्थायी समिती सभापती महोदयांनी बजेट वाचला आहे. मी त्यामध्ये एवढे सांगु इच्छितो, ३० सप्टेंबर २०१८ मध्ये ५० टक्के नगरसेवक निधी व ५० टक्के प्रभाग समिती निधी व ५० टक्के महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व स्थायी समिती सदस्य निधी रिलीज झाला पाहिजे. दुसरे म्हणजे फायनान्स वर्षाच्या अर्ध्याभागात ३१ मार्चच्या पुर्वी बाकी सर्व निधी रिलीज झाले पाहिजे. नाहीतर काय होते नगरसेवक आपापले बजेट पास करतात व आपआपली सूचना देतात, त्यांच्या प्रभागांमध्ये काम होत नाही तर ते येथे ट्रस्टी बनुन बसुन काय फायदा? काय अर्थ आहे या अर्थसंकल्पाचा. बजेट पास करा व अधिका—यांकडे चकरा मारा, आमचे प्राकलन बनवा, आमचे प्राकलन पास करा. काम होत नाही तर मग बजेट पास करण्याचा काय फायदा होतो. त्यासाठी ठरावात असे लिहा ५० टक्के निधी ३० सप्टेंबर पुर्वी व ५० टक्के निधी ३१ मार्च पुर्वी मंजुर झाली पाहिजे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, या महासभेत मा. सभापती महोदया यांनी बजेट प्रस्तृत केलेला आहे. मागील वेळेस असाच बजेट प्रस्तृत केला होता. त्यावेळी चर्चा करण्यात आली होती व असेच वाचण्यात आले होते. आमचे मित्र श्री. राजेश वदारिया यांनी म्हटले होते तशी अंमलबजावणी झाली नाही व जी तरतुद बजेटमध्ये होती तसे काम झाले नाही. ही फार खेदाची गोष्ट आहे. आपण जसा अर्थसंकल्प वाचला आहे तसेच काम यावर्षी तरी झाले पाहिजे. सभापतीच्या नात्याने आपण अर्थसंकल्प वाचत होतात, परंतु संपुर्ण शहरासाठी नाही तर फक्त प्रभागासाठी आपण वाचत होतात, हा रस्ता येथुन येथपर्यंत इतके इतके कोटी रुपये, परंतु शहराचा विकास करण्याच्या हेतुने बजेट वाचला असता असे मला वाटते. आता आपण बजेट पास करण्यास जात आहात तर सर्वांची भावना व सर्वांच्या प्रभागातील काम, शहरातील विकासाचे काम आपण घेतले पाहिजे अशी माझी भावना आहे. आपण पाहत असाल की हिराघाट ते बोटक्लबच्या समोर तेथे ब—याच वर्षापासुन रस्त्याचे अर्धे काम झाले व अर्धे झाले नाही. येथिल अधिकारी कशाप्रकारे प्राकलन बनवितात अर्धे काम करतात व अर्धे करत नाही. आउटसाईडचा रस्ता असता तर आम्ही समजले असतो परंतु रस्त्याच्यामधोमध काम सुटले आहे हे बरोबर नाही शहरातील मुख्य रस्ता आहे, ते काम झाले पाहिजे त्यासाठी बजेटमध्ये सुध्दा तरतुद असली पाहिजे. बोट क्लब हिराघाट येथिल रस्ता एका बाजुन सिमेंट कॉंक्रिट झाला आहे व दुस—या बाजुने झाला नाही तर त्यासाठी सुध्दा बजेटमध्ये तरतुद झाली पाहिजे. तसेच काही वर्षांपुर्वी उल्हासनगर महानगरपालिकेने श्री. आर.डी. शिंदे आयुक्त होते त्यावेळी एमएमआरडीएचे शौचालय बनविले होते, ते बनविल्यानंतर श्री. उन्हाळे साहेब होते त्यानंतर दोन मजले करुन एमएमआरडीएचे शौचालय बनविले होते व मुतारी बनविले होते. त्याची परिस्थिती अत्यंत खराब आहे व ते पडायला आले आहे. झोपडपट्टी एरियामध्ये बांधलेले आहेत ती जर पडली तर फार मोठा अपघात होवु शकतो. अशी बरीचशी शौचालय आहेत माझ्या प्रभागातील चार शौचालय मी सांगु शकतो. लोकांच्या प्रभागात अशी परिस्थिती होवु शकते तर एमएआरडीएचे जे शौचालय बनविण्यात आले होते त्याची दुरावस्था आहे अपघात वगैरे होवु शकतो तर त्यासाठी सुध्दा अर्थसंकल्पात तरतुद केली पाहिजे. त्यास डिमॉलेशन करुन ग्राउंड प्लस टु नाही तर वन किंवा फक्त ग्राउंड बनविले तरी चालेल, तर अर्थसंकल्पात तरतुद झाली पाहिजे व इनवेस्टमेंट झाली पाहिजे. त्याचबरोबर उल्हासनगर शहरातील जे रस्ते आहेत ते अर्धवट होवुन बंद आहेत जसे मी आता बोटक्लबबाबत सांगितले तसे काही असतील तर ते सुध्दा या अर्थसंकल्पात तरतुद व्हावी. जेव्हा उल्हासनगरमध्ये स्टेशन नव्हते तेव्हा हा विठ्ठलवाडी पहिले स्टेशन होते, तेथे येण्याजाण्यासाठी एक रस्ता होता, बालानी हाउस ते ब्रिज होते तेथे लोक पायदळ येत होते, हनुमान मंदीरच्या बाजुला मेन रस्ता नव्हता तेव्हापासुन हा रस्ता बनविला आहे, त्याची परिस्थिती खराब आहे त्याची सुध्दा बजेटमध्ये तरतुद झाली पाहिजे. शहरातील या सर्व विकासाच्या गोष्टी आहेत तर बजेमटमध्ये त्याची तरतुद झाली पाहिजे. बजेट मंजुर झाल्यानंतर जसे आमचे श्री. राजेश वदारिया यांनी म्हटले की बजेटची अमंलबजावणी सुध्दा झाली पाहिजे. फक्त सभेत बोलणार त्याची अंमलबजावणी होणार नाही, एक आयुक्त जाणार एक येणार व त्यांना सांगणार असे होता कामा नये. बजेटची अंमलबजावणी झाली पाहिजे ही गोष्ट लक्षात ठेवा. बजेट जर चांगला व विकासासाठी असेल तर आमचे समर्थन असेल, जर शहराच्या विकासाचा नसेल तर आम्ही यास समर्थन नाही करणार.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य व स्थायी समिती सभापती, आपण चांगला अर्थसंकल्प प्रस्तृत केला आहे. जर त्यामध्ये काही राहिले असणार जसे आमचे बंधु श्री. राजेंद्र चौधरी म्हणाले की शहरातील मोठ मोठी रस्ते अर्धवट राहिले आहेत जसे मी मागील तीन वर्षापासुन रस्त्याची तरतुद करत आहे. पेडर ऑफ द उल्हासनगर, पेडर ऑफ द उल्हासनगर गोलमैदान. गोलमैदान परिसरातील जेवढे रस्ते आहेत त्यासाठी पाच पाच पत्र दिले आहे, बजेटमध्ये तरतुद केली आहे परंतु ते रस्ते कधीच झाले नाही. त्याचे वर्णन करुन आपणांस पत्र देईन नंतर मी दुस—या विषयावर बोलेन, मुख्य म्हणजे मयुर अपार्टमेंट रामजपो आश्रम, हिरा मॅरेज हॉल व्हाया बॅक ऑफ बडोदा, साधु वासवानी पुतळा ते नामोमल गार्डन हे २५० सीसी रस्ते बनले पाहिजे. मा. सभापती महोदया मी आपणांस पत्र देतो व त्याची प्रत

महापौर व आयुक्तांना देतो. बाकी राहिला प्रश्न प्रभाग समिती व नगरसेवक निधी, तर हा निधी फारच कमी आहे आपण अर्थसंकल्पात तरतुद केली आहे. तर हे फारच कमी आहे. प्रभाग समिती निधी ३५ लाख व नगरसेवक निधी १० लाख ठेवण्यात यावा. हे एकुण ४५ लाख होते त्यास दोन भागात दयावे जसे श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले आहे. तसेच ज्या पक्षाचे जसे जसे बनणार नाहीतर काय होते कोणी सभापती असतो, मी असणार, कोणी विपक्षामध्ये येणार, त्याबाबतीत मी काही बोलत नाही या शासनास चार वर्ष निघुन जाणार. जे सभापती बनणार त्यांच्यासाठी जो प्रभाग येतो तर २५ हजार आजच्या तारखेस फारच कमी आहेत, तर वाहनभत्ताबाबत आज वाहनचालक आहे तो १५ ते २० हजार भत्ता घेतो, डिझेलचा भाव ८० लिटर वाढला आहे. कमीत कमी ५० हजार ठेवले पाहिजे. तर मी निवेदन करतो की हा निधी वाढविला पाहिजे व हे पत्र मी आपणांस देतो धन्यवाद।

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी, उप—महापौर, आयुक्त साहेब, सभापती महोदय, एक महत्वाचा विषय आहे, महिला सक्षमीकरणासाठी जो बचत गट आहे एनएयुएलएमच्या माध्यमातुन त्यात काम होते, साहेब त्यामध्ये बचत गट निधी ठेवायला पाहिजे होता तो ठेवलेला नाही. हा राज्य शासनाचा कायदा आहे, दुसरे कायदा म्हणजे मुलींच्या जन्मात एका मुलीला पाच हजार दयायचे, दहा दयायचे ही शासनाची तरतुद आहे ती आपण ठेवलेली नाही. सरकारच्या नियमा प्रमाणे ती ठेवली पाहीजे आणि आपण कायदयाच्या बाहेर जातो चुकीचे वागतो असे मला वाटते म्हणून मी आपणाला या दोन गोष्टी प्रकर्षाने सांगतो तिसरे सर उल्हासनगरमध्ये कुत्र्यांची संख्या इतकी भयानक आणि ती या पदधतीने झालीय की एखादया लहान मुलांचा जीव घेतील. तर त्यांना आपण मारू शकत नाही पण जी निर्बीजीकरणाची प्रक्रीया आहे, त्याकरीता पण निधी फार कमी ठेवला आहे जे इंजेक्शन लागत त्याचीपण प्रोव्हीजन कमी ठेवली आहे. या काही गोष्टी महत्वाच्या आहेत महीला सबलीकरणाकरीता अत्यंत आवश्यक आहे आणि कायदयाचे बंधन आहे अपंगाकरीता जी मदत दिव्यांग ज्यांना म्हणतात त्यांना ठेवायला बजेटच्या ३ टक्के तर ३ टक्के मला वाटते ठेवलेली नाही. मागच्या वर्षात ती वापरण्यात सुध्दा आलेली नाही तर हा कायदेशीर गुन्हा आहे हा आपल्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल होवू शकतो मी मागच्या वेळीस पत्र पण दिले होते या गोष्टीकडे कृपया गांर्भियाने या बजेटकडे लक्ष दयावे. तसेच नगरसेवक निधी बाबत जसे सांगितले नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी हा अत्यंत कमी ठेवण्यात आला आहे. पहीली गोष्ट आम्ही कितीही ठेवला तरी तुम्ही किती देता त्यावर आवलंबून आहे मागच्या वर्षी निंबाळकर साहेबांनी म्हणजे खूप काही चांगले काम केले म्हणजे ते रिव्हेन्युमधून आले होते म्हणजे पैसे जमा करायचे एवढेच माहीती आहे, खर्च करायचे माहीती नाही ज्यांच्या जीवावर आपण ज्या नागरीकांच्या जीवावर आपण हे चालवतो आम्हाला ट्रस्टी म्हणून आणि तुम्हाला प्रशासन म्हणून मी वांरवार हे वाक्य बोलतो आणि पुन्हा एकदा बोलतो की प्रशासन आपल्या खर्चात काटकुसर कुठेच करीत नाही की आम्ही पगार अर्धा घेतो जरा कमी वसूली झालीय सर्व गरजा फक्त प्रशासनाच्या पुर्ण केल्या जातात. पण ज्या नागरीकांच्या कराच्या रूपाने आपल्याला हा जो पैसा येतो त्या बाबत अक्षरश: दुर्लक्ष होते. मागच्या दोन वर्षापासुन निधी नाही हे तिसरे वर्ष आहे. आता १६ लाख रूपये आपण दिलेत त्याबद्दल धन्यवाद म्हणजे आपण आल्यानंतर तेवढा तरी आपण चांगला निर्णय घेतला थोडेसे आम्हांला आता असे वाटते की पॉझीटिव्ह झाले कुठे तरी कर्ज कर्ज कुणावर नाही आपल्या देशावर आहे. राज्य सरकारवर ४५० कोटी कर्ज आहे. तरी ते योजना कुठल्या थांबवतात का नागरीकांच्या जे गरजेचे आहे, जसे मागच्या वेळेस पाणी कपात केली ५० लाख रूपये वाचविले पाणी सर्वांना मिळालेच पाहीजे ही गरज आहे ती आपल्याला पुर्ण केलीच पाहीजे त्यात बचत करून चालणार नाही. उद्या १७० एमलडी पाणी आपल्याला मिळणार आहे. ५० एम. एल. डीची तांत्रिक मंजूरी मिळालेली आहे. तीन तारखेच्या मिटींगमध्ये १०० टक्के होणार आहे त्यानंतर ते पाणी घेवून त्याचे व्यवस्थीत वाटप करून जेथे पाणी कमी आहे ते सर्व हया अनुषंगाने झालेले आहे. पुर्वी १,२,३ मध्ये एवढी ओरड नव्हती, आता तिकडेपण ओरड चालू झाली आहे ४,५ ला तर आम्ही वर्षानुवर्ष ओरडतच आहोत पण कोणाला त्याचे सुतक नाही. बजेटमध्ये हे प्रोव्हीजन पण ठेवा प्रोव्हीजन केल्यानंतर त्याचा वापर झाला पाहीजे. आपण सक्षमपणे कराल अशी अपेक्षा बाळगतो आणि हे बजेट त्याच्यामध्ये मी ज्या गोष्टी सांगितल्या त्या चेक करा. महीला सबलीकरण्याच्या ज्या गोष्टी आहेत बेटी बचाव, बेटी पढाव हा सर्व खर्चपण त्यांना आपल्याला दयायाचा आहे. एक मुलगी आहे आणि दोन मुली आहेत तर हया गोष्टी जरा कृपया मा. महापौर यांनी ध्यान दयावे. धन्यवाद.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**मा महापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब कल्याणच्या महापालिकेने येणाऱ्या या सन २०१८—१९ च्या बजेटमध्ये पत्रकारासाठी मेडीक्लेमची योजना ठेवलेली आहे. त्यांनी १.५० कोटीचे बजेटमध्ये प्रोव्हीजन केलेले आहे. माझी महापौर आपल्याला विनंती आहे की, आपल्याही बजेटमध्ये पत्रकारांच्या मेडीक्लेमसाठी जसे कल्याण महापालिकेने केले तशी ही महापालिका बजेटमध्ये प्रोव्हीजन करू शकते का? ते बघून पत्रकारांसाठीही बजेटमध्ये एक कोटी तरतुद करावी कल्याण महापालिकेने केले तर आपल्या महापालिकेला करायला हरकत नाही धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. शंकर लुंडः—</u>**महापौर महोदया, स्थायी समिती सभापती आणि आयुक्त साहेब, पुर्ण शहरामध्ये आमचे ६१गार्डन आहेत. सर्व गार्डमध्ये फॅन्सी लाईटींग लावणेसाठी जशी गार्डनची शोभा वाढेल, पुर्ण शहरामध्ये फॅन्सी लाईट लावणेसाठी विदयुत विभागाला १ कोटीची निधीची तरतुद करावी हा प्रस्ताव मी माझ्याकडून पाठवितो.

यावेळी सदस्या श्रीमती आयोध्याप्रसाद सिंग सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**<u>सदस्य श्री. महेश सुखरामानीः—</u>**मा महापौर, आयुक्त साहेब, श्री. राजेंद्र चौधरी यांनी शहरामध्ये जे रस्ते अपुर्ण आहेत सिंमेट कॉक्रीटचे अवश्य पुर्ण केले पाहीजे तशी बजेटमध्ये तरतुद केली पाहीजे. कारण जर शहरात जे रस्ते अपुर्ण आहेत तर जे रोड आहेत तेथे दुर्गंधी होतेच पुर्ण रोड आणि युनिफॉर्ममध्ये कोणीच दिसत नाही आपल्या शहराची कोणी व्याख्या करील तर बाहेरील लोक येथे येतीलच तर हा कोणत्या वार्डचा मुद्दा नाही हा शहराचा मुद्दा आहे तर अशा बऱ्याच जागेवर काही जागा सुटल्या गेल्या आहेत. काही ठिकाणी ४०० फुट, काही ठिकाणी २०० फुट, काही ठिकाणी ६०० फुट, एक ठिकाण मी नमुद करतो की, हॉटेल मयूर पासून नवजीन बॅक सेवासदन कॉलेज पर्यंत तेथे सुटलेली आहे आणि प्रत्येक पावसात तेथे पाणी जमा होते आम्ही १० वर्षा पासून बघतो तो तुकडा बनला गेला पाहीजे हॉस्पीटलचा रोड बनला आहे टाऊन हॉल पासून हा तुकडा बनला तर सर्वांना दिसेल की शहरातील रस्त्याचे काम चालू आहे आणि या वर्षी जे काम झाले नाही वार्डमध्ये तर पुढच्या वर्षीच्या बजेटमध्ये झाले पाहिजे. आमच्या श्री. राजेश यांनी सुध्दा सांगितले आहे आपला जो निधी आहे नगरसेवक निधी तो दुप्पट करायला हवा श्री. प्रकाश नाथाजीने जे शिवलिला चा जो रोड आहे ते सांगितले आहे तो पण १० वर्षापासून त्याच स्थितीत आहे. त्यांनी पण सांगितले आहे आणि मी सांगत आहे की, तो रोड बनला गेला पाहीजे. माझ्या वार्डातही बरेच विकास कामाचे काही ठिकाणी समाज मंदीरांची गरज आहे. आमचा एरिया बराच स्लम आहे जी नगरपालिकेची जागा आहे तेथे समाज मंदीरासाठी मी प्रस्ताव देवू इच्छितो, पॅनल नं. ६ साठी बॅ.नं. ५८७ ओटी सेक्शन येथे समाज मंदीराचे काम चालू करावे नाहीतर ती जागा भुमाफीया हडप करतील तेथे जागा खाली पडली आहे कचरापण पडला आहे. दुर्गंधी वाढत आहे तेथे जर समाज मंदीर बनले तर नागरीकांच्या उपयोगात येईल. माझे निवेदन आहे सभागृहाला एक अजून समाज मंदीरासाठी जागा आहे, अमरधाम मंदीर येथे अमरधाम चौकाच्या पुढे बरीच जागा आहे. कमीत कमी २५० हजार स्केअर फुट जागा पडली आहे, तेथे पण शासनाचे शौचालय होते ते तोडल्याने तेथील जागा खाली पडली आहे. तेथे समाज मंदीर बनविले गेले नाही. तेथे कमीत कमी १५०० नागरीक राहतात तेथे जवळपास एकही समाज मंदीर नाही. कोणाचे लग्न असो किंवा सामाजिक कार्यक्रम असो तेथे नगरपालिकेच्या जागेवर एक समाज मंदीर बनले पाहीजे. आणि ते आर सी सी बनविले पाहीजे. ग्राऊंड प्लस फर्स्ट राहण्यासाठी रूम, त्याची ५० लाखाची तरतुद आहे मी मा महापौर, आयुक्त साहेबांना सांगू इच्छितो या बजेटमध्ये हे विषय समाविष्ट करावे एक समाज मंदीर अजून आहे. बॅ.नं. ६०४ ओटी सेक्शन तेथे १० लाख रूपये, एक अजून बॅ.नं.२७८ ते २७९ पर्यंत भाजी मार्केट एरिया तेथे सुध्दा जागा खाली आहे तेथे सुध्दा शौचालय तोडून आणि तीही जागा १० वर्षापासून खाली आहे, भुमाफिया पासून वाचवून वांरवार आम्ही तेथे सरकारी बोर्ड लावत आहोत, तरी ते बोर्ड काढले जातात तर तेथे सुध्दा १५ लाखाचे निधी, माझी सभागृहाला विनंती आहे की त्याला सुध्दा याच्यात समाविष्ट करावे आणि जे गार्डन साठी येथे तरतुद केलेली आहे संपुर्ण शहरासाठी यामध्ये नाना नानी गार्डन आमच्या स्थायी समिती सभापतीने जी नावे घेतली आहेत त्यामध्ये ही नावे नाही आहेत, नाना नानी पार्क पॅनल नं. ६ मध्ये आहे. यात्री निवास गार्डन पॅनल नं.६ मध्ये आहे, वासूदेव गार्डन पॅनल नं. ६ मध्ये आहे तिन्ही गार्डनचा विकास होणे बाबत प्रस्ताव पारीत करावे आणि श्री. शंकर लुंड यांनी सुध्दा लाईटिंग बद्दल जे प्रस्ताव मांडले आहेत, तर हे जे गार्डन वरीष्ठ नागरीक तेथे येतात, परंतु या गार्डनला मेंन्टेन केले जात नाही, तर तिन्ही गार्डनसाठी ४० लाख रूपयांची तरतुद करून बजेटमध्ये समाविष्ट करण्यात यावे, ही माझी विनंती धन्यवाद.

**<u>सदस्या श्रीमती मिना सोनेजीः—</u>**मा महापौर मॅडम, उप महापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, बजेट १७–१८ जो झाला आहे, पुर्ण वर्षात टॅक्सचे कलेक्शनही वाढविले आहे, अनेक सदस्यांनी यात मदत केली आहे टॅक्स वाढविण्यामध्ये. परंतु असे बधितले तर जेवढे कलेक्शन येते त्यामध्ये कर्मचाऱ्याचे पेमेंट किंवा स्कुल बोर्डमध्ये खर्च होत आहे त्यामुळे इतर विकास कामे होत नाहीत. एक विनंती करते की सर्व नगरसेवकांचे पत्र घेण्यात यावेत जे नगरसेवक आपल्या एरियाचे रोड बनवू पहात आहेत. त्यानंतर एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते की, श्री. सुर्वे साहेबांनी सांगितले रॅबीजचे इंजेक्शन ते सेंन्ट्रल हॉस्पीटलमध्ये मिळत नाही त्यामुळे त्याच्यावर आपण एक निर्णय करा. कारण जो कोणी जातो तेथे त्यांना इंजेक्शन संपल्याचे सांगितले जाते. आणि आपल्या शहरासाठी दिले गेले पाहीजे. काही पेशंन्ट मुरबाडवरून येतात त्यांनाही ते इंजेक्शन वापरले जातात, त्यामुळे आपल्याकडे ते कमी पडतात, जर आपण खाजगीमध्ये घेवू तर हे महाग पडते. दुसरी गोष्ट अशी आहे की. कुत्र्यांचे निर्बीजीकरण लवकर झाले पाहीजे त्याच्यावर कोणाचेच लक्ष नाही त्यामुळे शहरात

कुत्र्यांची संख्या वाढत जात आहे. महोदया, सर्व नगरसेवकांचे जे पत्र आहेत त्यांचे मेन रोडची नोंद करून घेण्यात यावीत धन्यवाद.

**सदस्य श्री. हरेश जग्यासी :—**महापौर मॅडम, स्थायी समिती सभापती, उप महापौर, मी बऱ्याच वेळा माझ्या वार्डमधील एक रोड टाकला आहे त्याची प्रत्येक वेळी नोंद केली जाते पण त्याचे काम केले जात नाही. तर माझे असे मत आहे की, या बजेटमध्ये त्याचे काम पुर्ण झाले पाहीजे अशी माझी विनंती आहे धन्यवाद.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**मा महापौर, मा उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब तीन वर्षापासून आम्ही बजेटच बनवत आहोत श्री. चौधरी साहेबांनी सांगितले, श्रीमती मिना मॅडमने सांगितले, श्री. राजेश वदारिया यांनीही सांगितले. तीन चार वर्षापासून आम्ही निधी पासून वंचित आहोत त्यामध्ये महापौर असो उप महापौर असो किंवा स्थायी समिती सभापती असोत, माझा असा प्रस्ताव आहे की, तीन वर्षामध्ये कमी निधी दिले जात होते. त्यामध्ये यावर्षी वाढ झाली पाहीजे महापौरांचे १० कोटी, उप महापौर १० कोटी, स्थायी समिती सभापती १० कोटी, विरोधी पक्ष नेता १० कोटी, सभागृहनेता १० कोटी, स्थायी समिती सदस्य २ कोटी, प्रभाग समिती निधी ३८ लाख, नगरसेवक निधी १० लाख, ज्या समित्या आहेत प्रभाग समिती सभापती यांना सुध्दा २ कोटी निधी ठेवावी. आयुक्त साहेबांचा निधी आहे तो २० कोटी करण्यात यावा धन्यवाद.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**मा महापौर मॅडम, मा उप महापौर, मा आयुक्त साहेब मा स्थायी समिती सभापती, मा सचिव या वर्षीचा अर्थसंकल्प सादर झाला आहे आणि त्यामध्ये काही त्रुटी मला आढल्याचे दिसून आले आहे त्यात काही मुद्दे टाकायचे आहेत ते मी सादर करीत आहे. आताच सन्मानिय सदस्य श्री. सुर्वे साहेबांनी सांगितले की, बचत गटाबाबत यामध्ये काही तरतुद केल्याचे दिसत नाही तर मला पण या बद्दल सांगायचे आहे की, आपण अनेक बचत गट तयार करतो त्यांना अनेक प्रकारचे ट्रेनिंग देतो पण सर त्यांना मार्केटिंगसाठी कुठे जागा उपलब्ध नसते आणि ब—याचवेळा हे बचत गट मार्केटिंग न झाल्यामुळे बंद पडतात. मा महापौर मॅडम, तर माझी अशी मागणी आहे की चारी प्रभागात बचत गटातील महीलासांठी एक बचतगट भवन उभारण्यात यावे त्यात त्यांना गाळे उपलब्ध करून देण्यात यावेत. ४ प्रभागांसाठी यासाठी चार कोटींचा निधी ठेवण्यात यावा अशी माझी मागणी आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपण जे बजेटमध्ये सादर करतो आता १५—१६ बजेटमध्ये महीलांना देण्यासाठी मशिन मंजूर करण्यात आल्या होत्या. पण २०१८ साल उगवले तरी त्या मशिन अजुन वाटप करण्यात आल्या नाहीत. तर मग या बजेटला अर्थ काय उरतो त्या महीलांना इतकी गरज असते आणि त्या महीला वारंवार मागणी करतात आणि १५—१६ च्या बजेट मधील मशिन अजून देण्यात आल्या नाहीत. शिलाई मशिन तर या गोष्टीकडे लक्ष दिले पाहीजे की बजेटमध्ये जे होते ते मिळाले पाहीजे नाहीतर बजेटला काहीच अर्थ उरत नाही दुसरी गोष्ट अजून एक मी सांगू इच्छिते की, आपल्या महानगरपालिकेतर्फे आरोग्य सेवेबाबत आपण काहीच सुविधा लोकांना पुरविल्या जात नाही आपली जी सहा सात आरोग्य केंद्र आहेत सर तर त्यामध्ये डॉक्टर उपलब्ध नसतात नुसते नावा पुरते चालू आहेत आरोग्य अधिकारी असतील तर त्यांना बोलवा डॉ. रिजवानी आहेत, डॉ. रिजवानी तर माझी अशी मागणी आहे की सर्व आरोग्य केद्रावर पुर्णवेळ डॉक्टर उपलब्ध असावेत आणि पुर्ण सुविधा उपलब्ध असाव्यात. दुसरे आपण काहीच सुविधा उपलब्ध करत नाही निदान जे आरोग्य केंद्र आहेत तेथे पुर्णवेळ डॉक्टर उपलब्ध करून त्यासाठी राखीव निधी ठेवण्यात यावा. तसेच मा आयुक्त साहेब आपले राखीव भुखंड ताब्यात घेण्याबाबत मी वारवांर मागणी करत आली आहे की जे काही राखीव भुखंड आहेत. त्यांना कुंपण घालून संरक्षीत करावे मी गेल्या पाच वर्षापासून बघत आहे मागणी करत आहे तेव्हाची परिस्थिती आणि आताची परिस्थिती खूप वेगळी आहे त्यापैकी बरेच राखीव भुखंड हडप करण्यात आले आहेत म्हणून जे आहेत त्यांना कुंपन घालून संरक्षीत करावे त्यासाठी निधी ठेवण्यात यावा तसेच या बजेटमध्ये आपण खेळांडुसाठी काहीच निधी ठेवलेला नाही.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात प्रवेश केला.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सन्मानिय सदस्य, श्रीमती साळवे मॅडम काय बोलतात ते सगळयांना समजले, आपण गप्पा मारण्यात एवढे बीजी आहात, सदस्य बालतो त्याकडे कोणाचे लक्षच नाही, तर कृपया करून शांतता राखा.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—** खेळाडूसांठी एक विशेष राखीव निधी ठेवण्यात यावा कारण आपल्या पालिकेमध्ये महापालिकेतर्फे खेळासाठी, महीलासांठी मैदाने सुध्दा नाहीत तर जी मैदाने आहेत आमच्या विभागातील राजीव गांधी उद्यान आहे त्यामध्ये बॅटमिंटन कोर्ट बनविण्यासाठी आम्ही वारवांर मागणी केली आहे पण त्याच्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात नाही ही सर्व शहराची परिस्थिती आहे. मुलांना खेळायला दुसरीकडे जावे लागते म्हणून खेळाडुंसाठी एक खास निधी उपलब्ध करून द्यावा आणि खेळाडूंचे मैदाने विकसीत करण्यात यावेत. जेणेकरून खेळाडूंना चालना मिळेल तसेच साहेब, उद्याने विकसीत करण्यासाठी निधी

ठेवतो पण कोणत्याच उद्यानाला चांगल्या प्रकारे निधी उपलब्ध करून देण्यात येत नाही. मागच्या वर्षी आमच्या प्रभागातील तिन्ही उ्द्यानांसाठी निधी टाकुन देण्यात आला होता पण त्याच्यावर काहीच डेवलपमेन्ट झाली नाही. त्यामुळे बजेटमध्ये टाकून फायदा काय तिन्ही उद्याने डेवलपमेन्टसाठी टाकली होती. पण कुठल्याच परिस्थितीत ती झालेली नाहीत तर यावेळेस याकडे लक्ष देण्यात यावे अजुन एक गोष्ट म्हणजे आपल्या नगररचना आणि पाणी पुरवठा विभागात स्टाफची अत्यंत कमतरता आहे कोणतेही काम वेळेवर होत नाही साधे लिकेज दुरूस्त करायचे असले तरी १५— १५ दिवस जातात, प्रत्येक वेळेस आपल्याला दहा वेळा पाठपुरावा करावा लागतो आणि त्याच्यामुळे पाणी वेस्टेज होते ती अडचण सगळयांनाच माहीती आहे म्हणून मी वारवांर ही मागणी पण केली आहे की त्याच्यासाठी एक स्पेशल गाडी ठेवा, त्याच्यावर स्टाफ ठेवा की चोवीस तासाच्या आत लिकेजेस बंद झाली पाहीजेत ताबडतोब यासाठी एक वेगळा निधी राखीव ठेवा जेणेकरून पाणी सर्वांना व्यवस्थीत मिळेल. स्टाफ सुध्दा वाढविण्यात यावा. प्रत्येक ठिकाणी स्टाफ अत्यंत अपुरा आहे आणि छोटया गोष्टीतुन आपल्याला उत्पन्नाचे स्त्रोत कसे वाढविता येईल याकडे लक्ष देण्यात यावे जसे अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत त्यावर आपण दंड लावू शकतो. साहेब, रोडवरील पार्किंगवरही आपण टॅक्स लावू शकतो आणि स्वच्छता विषयी कायदे कडक करून त्यावरही दंड लावू शकतो. अशा छोटया छोटया गोष्टीतुन एलबीटीमधून आपल्याला उत्पन्न मिळू शकते आणि आमच्या प्रभाग १८ मधील कामाची यादी आम्ही देत आहोत ती मंजूर करण्यात यावी, धन्यवाद.

यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव व श्री. सोनु छाप्रु यांनी सभागृहात प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>**मा महापौर मॅडम, मा उप महापौर, मा आयुक्त साहेब, मा स्थायी समिती सभापती, बजेट २०१७—१८ जो सादर केला बजेटमध्ये सभापतीने निवेदन दिली, आयुक्त साहेबांनी निवेदन दिली, बऱ्याच कामाची चर्चा झाली सुरुवातीला जे पहील्यांदा मा. स्थायी समिती सभापती महोदयांनी या सभागृहात सांगितले की, मी पहील्यांदा निवडून आली आहे आणि या बजेटमध्ये मी पहीली वेळ बजेट सादर करीत आहे तर मी डॉ. बाबासाहेब आंबेटकर भवनासाठी दोन कोटी देत आहे, सुरुवात येथून का करतो की डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी राज्यघटना लिहीली त्यांची जयंती आता १४ एप्रिल रोजी साजरी करण्यात येत आहे. त्या बजेटमध्ये जर दोन कोटी रूपयांची तरतुद केली आहे तर या बजेटमध्ये तशी तरतुद का नाही तर हे काम झाले आहे का महापौर मॅडम हे बजेट आहे यामध्ये सर्व नगरसेवक चर्चा करीत आहे की आमच्या वार्डाचे काम झाले पाहीजे परंतु जी कामे टाकली आहेत ज्या लोकांच्या गोष्टी सांगितल्या आहेत, जे संपुर्ण देशाचे सत्तास्थान आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या भवनासाठी एक रूपयाचाही निधी नाही आहे. आयुक्त साहेब, सुरवात बजेटची बजेटमध्ये तुम्ही काही तरी प्रोव्हिजन करता लोकांना सांगता की आम्ही हे करू आम्ही ते करू. हे दोन्ही बजेट माझ्याकडे आहेत मग तुम्ही सांगता त्या गोष्टी होणार का? की नुसतेच आम्ही सांगत राहायचे आमचे पत्र तुम्हांला दयायचे, आमचे पत्र तुम्हाला देणार आणि आम्ही काय करायचे, मा सभापती, महापौर मॅडम, आयुक्त साहेब, ज्या गोष्टी झालेल्या नाहीत ज्या गोष्टी करणे बाकी आहेत त्या गोष्टी बाबत मागच्या बजेटमध्ये जी तरतुद होती ती पुर्ण होईल, त्यासाठी निधी उपलब्ध होईल, बजेटमध्ये लास्ट ईअर १७—१८ मध्ये आपण बजेटचे प्रोव्हिजन केले होते बजेटमध्ये डांबरीकरण रस्ते आणि सिमेंट कॉक्रीटचे रस्ते आयुक्त महोदय, या दोन्ही गोष्टींकरीता आपण बजेटमध्ये तरतुद ठेवली होती पण महापौर मॅडम, मोठया खेदाने बोलावे लागते की, या महासभेमध्ये हे बजेट सर्व सदस्यांचे मते पारीत केला जातो आणि त्याबद्दल जेव्हा वर्गीकरण होते तो बजेट डायर्व्हट होतो त्याबद्दल एक शब्दही महासभेत येत नाही का हे अधिकार आहे, कॉक्रिट रस्त्याचे डांबरीकरणामध्ये वर्गीकरण करणे आणि डांबरीकरण रस्त्याचे कॉक्रीट रस्त्यामध्ये वर्गीकरण करणे हा आधिकार कोणाला आहे. तर महासभेमध्ये का व हा कसला बजेट आहे, आमचे रस्ते जे कॉक्रीट होणार होते त्याचा निधी डायर्व्हट करून घेतला आणि जो डायर्व्हटेशनाचा निधी या बजेटमध्ये शुन्य ठेवला आहे का आपण सांगू शकतात की या वर्षी कोणताच कॉक्रिटचा रोड होणार नाही का? आपण सांगू शकाल का डांबरीकरणासाठी आपण शुन्य पैसे ठेवले आहेत का ? या वर्षी रस्त्यामध्ये एकही खड्डा पडणार नाही का? जे डांबरीकरण रस्त्याचे खडयासाठी आपण जी तरतुद केलेली आहे त्यापैकी जर दुसऱ्या रस्त्यामध्ये खड्डे पडले तर ते भरले जाणार नाही का? हे काय आहे. महापौरजी, हे काय आहे हा बजेट त्याचे सादरीकरण आहे यामध्ये दोन्ही बाजू माझ्या हातात आहेत तरतुद ठेवलेली आहे. यामध्ये तरतुद नाही आहे मला कोणी सांगू शकता की एखादा रोड डांबरीकरणाचा आहे, समजा उद्या एखादया दुसऱ्या रोडवर खड्डे पडले तर कोठून भरणार जर यामध्ये सिमेंट कॉक्रीटचे रोड आहेत जे रद्द केले आहेत त्याचा पुर्ण निधी रद्द केला आहे तर ते रोड होणार नाही का? महापौरजी सर्व लोक म्हणतात की आमच्या वार्डाचे काम झाले पाहीजे, मी तर नामनिर्देशित आहे पण माझा निधीही एखादया वार्डमध्ये लागेल आयुक्त साहेब त्यामुळे या बजेटचा कामामध्ये अंर्तभुत होवून जर ते कामे होत असेल तर तो बजेट करायला अर्थ आहे. आम्ही या बजेटसाठी वर्षभर वाट पाहत असतो. सभापती महोदय, आम्ही एक एक पत्र देत असतो आम्ही आपल्याकडे येतो महापौरांकडे जातो

आयुक्तांकडे जातो आमचे काम झाले पाहीजे या बजेटमध्ये प्रोव्हिजन नाही तर कामे कसे करणार त्या रोड बाबत कोण करणार जर सर्व लोकांनी आपल्या वार्डाचे, महापौरांच्या वार्डाचे, सर्व सदस्यांच्या वार्डाचे रोड यामध्ये टाकले आहेत त्यामध्ये लिहीले आहे शेवटची लाईन सांगतो आम्ही आशा करतो की आमचे नगरसेवक निधी प्रभागाच्या विकासाठी संपवितो तर मा आयुक्त साहेबांच्या निधीतून थोडा निधी दिला जाईल, आयुक्त साहेबांनी थोडासी पण काहीच मदत केली नाही, निधीही दिला नाही परंतु या बजेटमध्ये मी अशा दोन चार उणीवा ज्या आहेत त्या महापौर मॅडम, मी सांगू इच्छितो पहील्या महासभेमध्ये मी जमीन लिकव्हेजेशनसाठी आपल्याकडे निधी नव्हता तर आपण जमीन लिकव्हेजेशन केली नाही, ती जमीन वर्गीकरण केले गेले हाय कोर्टव्दारे या वेळेस यावर्षी किंवा दोन चार सहा महीन्यांनी ज्यावेळेस राज्यशासन करणार तेव्हा आपले डिपी प्लॅन येणार आहे तर डिपी प्लॅन आल्यानंतर असे अनेक मुद्दे आहेत भुसंपादन जमीन आपल्याला घ्यावी लागणार त्यामध्ये बरेच कमी प्रोव्हिजन ठेवले आहे तर त्यावेळेस जर आपल्याकडे प्रोव्हिजनसाठी निधी राहीला नाही तर कोणी आपल्याला बोलू शकतो की आपण आम्हाला खरेदी नोटीस दिली होती का आपण आमची जमीन घेतली नाही तेव्हा आम्ही कोर्टमध्ये गेलो जर समोर येणारी वस्तु आपल्याला माहीत आहे काय होणार आहे त्याच्यासाठी सुध्दा प्रोव्हिजन नाही मा महापौरजी पाण्याचा विषय मोठा गहन प्रश्न आहे पाण्याच्या प्रश्नाबाबत पाणी टॅकर भाडेचे बजटमध्ये शुन्य तरतुद ठेवली आहे महापौरजी जर आणिबाणी झाली कधी पाणी आले नाही तर आपण शहरात कसे पाणी दयाल जर टॅकरच्या प्रोव्हिजनसाठी टॅकरला पैसे ठेवले नाहीत तर टॅकर कुठून देणार जर बजेटमध्ये तरतुद असेल तर आपण कोठूनही उपलब्ध करू शकतो बजेटमध्ये जर या प्रकारे तर अशी सर्व समस्या या बजेटमध्ये आहे. महापौरजी, पहीली वेळ मी सभागृहामध्ये आहे मागच्या वेळेला मी नव्हतो तर या वर्षीच्या बजेटची टॅली मी करीत आहे जर काही चुका असतील तर त्या सुधारू शकतो जर माझ्या बोलण्यात काही चुका असतील तर सर्व अधिकारी मला सांगू शकतात. आताच माझ्या मित्राने सांगितले की, लाईटचे व्यवस्था गार्डनमध्ये झाली पाहीजे. मित्र श्री शंकर लुंडने सांगितले, ती झाली पाहीजे त्याचबरोबर आता जे आपले चांगले रोड बनत आहेत त्या रोडच्या चौकामध्ये हायमस्ट लॅम्प असायला हवे. मॅडम, शहराच्या सुविधामध्ये मोठे योगदान आहे जर रात्रीच्या आंधारामध्ये एक हायमस्ट लाईट असेल तर पुर्ण चौक उजाडले जाते. माझ्यामते हायमस्टसाठी सुध्दा तरतुद ठेवली नाही, श्री. आबा नाही आले सभेत. तर मा महापौरजी अशा बऱ्याच कमी आहे आणि मागच्या वेळेस जे आम्ही रस्ते ठेवले होते तरतुदीसाठी ते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन साठी आपण बजेटमध्ये तरतुद करा हे मी सांगू इच्छितो, धन्यवाद.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>**मा महापौरजी, मा उप महापौर, मा आयुक्त साहेब, मा स्थायी समिती सभापती, सचिव मॅडम, सर्व सन्मानिय सदस्य आज जो बजेट २०१८—१९ चा पास होणार आहे त्यामध्ये जेवढे पण सदस्य मागणी करतात त्यांचे स्वागत आहे, परंतु २०१७ आणि २०१८ मध्ये जो बजेट पास झाला होता त्याचा अनुभव असा होता, आयुक्त साहेबाचा जो उद्देश होता, शहरासाठी त्यांचा काम करण्याचा हेतु अजिबात नव्हता मी तर म्हणतो त्यांच्याकडे बरेच चार्ज होते आमचे २०१७—१८ मध्ये अनुभव खूप खराब होता रियल बजेट ४०० कोटी आहे त्यामध्ये ते बोलत होते की मी अर्धा नगरसेवक निधी, अर्धा प्रभाग समिती निधी देणार त्याला सुध्दा एक वर्ष झाले त्यांनी नाही दिले आणि निघून जाण्यापर्यंत बोलत होते पण दिला नाही. तरी आज आम्ही नविन आयुक्त साहेबाचे अभिनंदन करतो आणि धन्यवाद मानतो की त्यांनी आल्यावर लगेच सांगितले की, जो नगरसेवक निधी आणि प्रभाग समिती निधी बाकी आहे तो देण्यात यावा. यासाठी आम्ही आयुक्त साहेबांचे आभार मानतो जे श्री. सिरवानी साहेबांनी सांगितले त्याला मी अनुमोदन करतो, नगरसेवक निधी वाढवा पदाधिका—यांचा निधी वाढविण्यात यावा, आयुक्त साहेबांचे १० कोटी फंड आहे ते २० कोटी करण्यात यावे आणि सातवा वेतन आयोग लागू करण्यात यावा तर जे करेक्शन आहेत ते या महासभेत आपण करू शकतो आणि जेवढया सदस्यांनी मागील वेळेस जेवढे पत्र दिले होते बजेटमध्ये टाकण्यासाठी ते काम आयुक्त साहेबांनी केले नाही. तरी यावेळेस सर्व सदस्यांचे पत्र घेवून या बजेटमध्ये ते समाविष्ट करावे आणि जे श्री. सिरवानी साहेबांनी नगरसेवक निधी ४५ लाख वाढवून जे सभागृहनेता सांगतील ते अंतिम आहे. त्यानंतर महापौर मॅडम होय म्हणतील. या बजेटमध्ये मराठीमध्ये याला अंदाजपत्रक म्हणतात, तर याचा अर्थ आम्ही जेवढा निधी ठेवतो हा एक अंदाज लावला जातो पुर्ण होत नाही अंदाजपत्रक तर अंदाज लावला जातो, तर जे जे आयुक्त साहेब बजेट सादर करतात त्यामध्ये स्थायी समिती आणि महासभा दुरूस्ती करून अतिंम महासभेमध्ये बजेट जो पास होतो तोच अंतिम होतो. तर मी अभार मानतो स्थायी समिती सभापतींचे की त्यांनी चांगला बजेट सादर करून तो पास झाला आणि महासभेमध्ये जेवढे पण करेक्शन आहेत ते करेक्शन केल्यानंतर महासभेमध्ये हा बजेट पास करा. कारण जेवढेपण निधी बाकी आहेत ते या बजेटमध्ये समाविष्ट करता येवू शकतात आणि एक गोष्ट जर एखादया कामासाठी निधी ठेवला नाही तर कोणत्याही वेळेस आपण पुर्नबजेट आणू शकतो, बजेट दुरूस्ती करूनही ते करू शकतो, आमचे श्री. चंद्रशेखर साहेब, आयुक्त म्हणुन उल्हासनगर मध्ये आले होते १९९९ मध्ये तर त्यावेळेस महापालिकेची अर्थिक स्थिती खूप खराब होती. तर त्यांनी प्रत्येक डिर्पाटमेंटकडून १० कोटी घेवून एम एम आर डी कडून पैसे घेवून ३३ कोटी रूपयांचे रोड बनविले जो आजपर्यंतचा इतिहास आहे, उल्हासनगर मध्ये आजपर्यत एकावेळेस ३३ कोटीचे रोड बनविले नाहीत. जो सेंन्ट्रल हॉस्पीटलचा रोड बनला

आहे व्हिटीसी पासून आशेळा गावा पर्यंत बनला आहे, विठ्ठल वाडीचा रोड बनला आहे अजून अनेक रस्ते बनविले जात आहेत, अजुन एम एम आर डी कडून लोन येत आहे, त्यामुळे अजून शहराचा विकास होणार तर पाच वर्षा पर्यंत असा विकास होईल आणि त्यामध्ये आमचे सर्व पक्षांचे सहमत आहे. सर्व लोक मिळून मिसळून कामे करतात आणि जे काही शहराच्या हिताचे काम असेल ते मिळून मिसळून करणार धन्यवाद.

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळेः—** मा महापौर मॅडम, मा उप महापौर, मा आयुक्त साहेब जो आता आपण अर्थ संकल्प राबविणार आहोत २०१८—१९ मध्ये त्याच्यात काही तरतुदी आहेत माझ्या पॅनल नं. १३ मध्ये भरपूर एम एम आर डीचे शौचालय आहेत ते पडीत अवस्थेमध्ये आहेत आणि काही ठिकाणी जसे भरतनगर परिसर झाला त्या ठिकाणी शौचालय नाहीत परंतु आपण तेथे हागंणदारी मुक्त अशी योजना राबविलेली आहे जे शौचालय पडीत आहेत त्यांच्यासाठी २५ लाखाचा निधी उपलब्ध करून देणे तसेच पाणी पुरवठयाचे जे कार्यालय आहे ४ नंबरचा गार्डनच्या सुशोभिकरणासाठी आणि त्याच्यामध्ये एक शौचालय असले पाहीजे आणि मागच्या अर्थसंकल्पनामध्ये २०१७—१८ मध्ये चालीया मंदीरामध्ये जी तरतुद ठेवली होती की जो त्याचा आजुबाजूचा परिसर आहे तो सुशोभिकरण करण्यासाठी तसेच अंबिका मित्र मंडळ पॅनल नं. १३ मध्ये उल्हासनगर ४ येथे आजुबाजूचा जो परिसर आहे त्याच्या सुशोभिकरणासाठी २५ लाखाचा निधी मंजूर करण्यात यावा, ही विनंती.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—** सन्मानिय महापौर, उप महापौर आणि आयुक्त साहेब, २०१८—१९ च्या बजेटच्या संदर्भात आपली चर्चा आहे बजेटचे आकडे भरपूर आहेत पेपरच्या माध्यमातून बरेच काही येते २६५ कोटीची वसूली १०० कोटींवर आली त्याअनुषंगाने बजेट स्थायी समितीने बनविला आणि सभागृहात ठेवला विशेष म्हणजे मागच्या तीन वर्ष आयुक्त साहेब, सन २०१६—१७—१८—१९ या तीन वर्षात नगसेवक निधी मिळाला नाही मागच्याही वर्षी मिळाला नाही आणि आता सुध्दा शेवटचा क्षण आला आहे, बरेच नगरसेवक आहेत त्यांना निधीच मिळाला नाही. नविन नगरसेवकांचा तर विषयच नव्हता तर आम्हाला मागच्या दोन वर्षापासून आर्थिक कारण सांगून निधी मिळाला नाही तर या बजेटमध्ये तुम्ही आलात, तुमचे विचार होकार्थी आहेत, पहीले आम्ही सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो म्हणजे आम्हांला आशा वाटते नगरसेवकांना की, शहरासाठी तुम्ही काहीतरी विकासाचे कामे करून जाल अशी आम्हांला अपेक्षा आहे. म्हणून माझी एक अपेक्षा आहे की माझा जो वार्ड आहे तो अतिदुर्गम आहे बघायला गेले तर उल्हासनगरला पाणी पुरवठा करणारी पुर्ण यंत्रणा माझ्या वार्डमधून जाते हनुमान नगरचा हिल स्पॉट रमाबाई आंबडकरनगरचा हिल स्पॉट माझ्या वार्डमधून जातो पुर्वी तेथे डंपिंग ग्राऊड होते अशा पद्धतीची रचना असलेला टेकडीचा भाग आणि येथे बाकीचे यंत्रणा ठिक आहे येथे, पिण्याच्या पाण्याची अत्यांत आवश्यकता आहे या भागात आपल्या उल्हासनगरमधील पाणी काही प्रमाणात अंबरनाथच्या भागात आपण देतो परंतु आपल्याच नागरीकांना पिण्याचे पाणी मिळत नाही पण माझी एक विनंती आहे की ज्या योजनेसाठी ५० लाखाची तरतुद या बजेटमध्ये केली तर हनुमाननगरच्या पिण्याच्या पाण्यासाठी कारण शहराला पाणी आपण तेथून देतो पण त्यांना पाणी मिळत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे साहेब, आम्ही मागच्या बॉडीमध्ये शिवसेना बीजीपी आणि आरपीआय अशी युती होती त्या युतीमध्ये आम्ही आणि साईपक्ष यांनी बाबासाहेबांच्या १८५ जयतीनिमित्ताने आभ्यासिकाचे काही कार्यक्रमाची तरतुद केली होती. बजेटमध्ये तर लागोपाठ, ते स्थायी समितीच्या बजेटमध्ये तीन वर्ष येत होते ते आभ्यासिकाच्या नावाने याकाळात आमच्या सुभाष टेकडी परिसरात डॉ. बाबासाहेबाची आभ्यासिका व्हावी यासाठी जागाही उपलब्ध आहेत आणि यासाठी तशी तरतुद २५ लाखाची आपण केली होती. माझ्या वार्डामध्ये भिमाई आभ्यासिका व्हावी यासाठी तेथे जागा होती तेथे काही लोकांनी अतिक्रमण केले आहे जेथे अतिक्रमण झाले आहे तेथे ती जागा आपण सुचित केली होती. तर परिस्थिती अशी आहे की दलित भागामध्ये आणि स्लम भागामध्ये मुलांना अभ्यास करण्यासाठी जागाच उपलब्ध नसते आणि अशा पद्धतीने छोटया छोटया आभ्यासिका झाल्या तर भविष्यकाळात मुलांना एम पी एस सी असेल, युपीयसी असेल आणि मधल्याकाळातील ज्या परिक्षा असतील, स्पर्धा परिक्षा असतील त्यांचा अभ्यास चांगल्या पद्धतीने करता येवू शकतो किंवा तिथल्या मुलींना कॉप्युटर सारखे कोर्सेस आपण वेगवेगळया पद्धतीने करू शकतो. आभ्यासिकासाठी तरतुद करावी अशी माझी विनंती आहे. दुसरी एक गोष्ट डंपींग ग्राऊंडचा खालचा भाग आहे तो दुर्गामातानगरचा आहे पुर्वी आपण एक कोटीची ऑर्डर काढली होती, कामही सुरू केले होते नंतर काय झाले, कळले नाही खड्डे भरून कामही सुरू झाले होते नंतर तो निधी कुठे गेला हे कळले नाही आणि संरक्षण भिंत बांधायचे जे काम होते ते तसेच राहीले पावसाळयात पाण्यामुळे, पाण्यामुळे ते ओले होवून तेथील मज्जीद आणि झोपडंया कोसळून जिवीत हानी होते आणि असे जे प्रकार असतात त्यामुळे मागे एक मुलगी वारलेली आहे. त्यामुळे एक कोटीची जी तरतुद होती ती तशीच ठेवावी. दुसरी गोष्ट साहेब, शहरामध्ये अजून दुर्गानगर ते हनुमाननगर येथे जावून या तेथे रस्ताच नाही लोकांना जाणेसाठी रस्ता नाही इकडुन टु व्हिलर जावू शकते. दुर्गानगर ते हनूमाननगर पर्यंत एक ते सव्वाकोटीची तरतुद केली तर ते बरे होईल, दुसरी गोष्ट उल्हासनगरच्या आमदार यांच्या कालानी महल पासून अमरधाम चौक आणि बाबासाहेब आंबेडकर चौक आजची परिस्थिती बघीतली तर मागच्या कित्येक वर्षापासून

मी तेथे गेली कित्येक वर्ष सांगतो तेथे रस्ते करा मागच्याही बजेटमध्ये मी सांगितले होते तेथे आजची परिस्थिती अशी आहे की तेथे एवढे खड्डे पडलेले आहेत तेथे धड चालता येत नाही जर हा रस्ता कॉंक्रीटीकरण झाला तर तेथील दलदल जो लिकेजचा प्रश्न आहे खेमानी नाल्याला आपण एवढे कोटी रूपये देतो त्या रस्त्यासाठी आपण कुठे खर्च केला नाही मला वाटते त्या रस्त्याचे काम या बजेटमध्ये घ्यावे आणि अशा प्रकारे सार्वजनिक उपक्रमांनी शहरा बरोबर झोपडपट्टीत पुढे घेण्यासाठी आपल्याला काय काय योजना करता येतील या बजेमध्ये त्या पुर्ण करण्यासाठी महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब यांनी पुढाकार घ्यावा अशी मी अशा व्यक्त करतो आणि थांबतो.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**एक मिनिट छोटासा प्रश्न आहे, मा महापौरजी उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, आपण शहराच्या विकासाबाबत सर्वांनी सांगितले परंतु ज्या सभागृहातून शहराच्या विकास ठरविला जातो त्या सभागृहाची हालत खूप खराब आहे गंभीर आहे यासाठी या सभागृहाच्या कामासाठी या बजेटमध्ये प्रोव्हिजन झाले पाहीजे. आपण नुतनीकरण करण्यासाठी ठेवले आहे परंतु माझी अशी मागणी आहे की, पहिल्या बजेटमध्ये या महानगरपालिकेच्या दुसऱ्या माळयावर एक नवा हॉल बनविण्याचे सभागृह बनविण्याचे प्रोव्हिजन होते परंतु तो दुसऱ्या बजेटमध्ये आला नाही. दुसरे बजेटमध्ये या सभागृहाला रिपेअर करणेसाठी फंड ठेवले आहे परंतु दुसऱ्या माळयावर जी जागा आहे, तेथे नविन सभागृह बनविण्याचे प्रोव्हिजन केले होते. त्याप्रमाणे तेथे एक सभागृह झाले तर एक चांगली गोष्ट होईल त्यासाठी बजेटमध्ये प्रोव्हिजन करा अशी माझी मागणी आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—** सन्मानिय महापौर मॅडम, माझे दोन विषय राहीले आहेत चुकून एक विषय असा आहे दलित वस्तीच्या शासनाच्या जीआर प्रमाणे आपल्या महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या १० टक्के हा खर्च दलित वस्तीवर झाला पाहीजे पण या बजेटमध्ये ४ ते ४.५० टक्के पर्यत तरतुद असल्याचे दिसते अजून पाच टक्कांनी जर दलित वस्तीला कारण ते कायदेशीर आहे शासनाच्या नियमाप्रमाणे अंदाज पत्रकात १० टक्के तरतुद केली पाहीजे तर ती तरतुद झाली तर बर होईल. दुसरी गोष्ट अशी आहे आयुक्त साहेब, आता आपली डॉ.बाबासाहेब आंबेडकर आभ्यासिका नावानी आपल्या जव्हार हॉटेलच्या जवळ वास्तू तयार आहे त्याचा उद्‌देश आमचा असा होता की, युपीएसी, एमपीएसी मोफत क्लासेस सुरू करणे असा होता आपल्या शिक्षण मंडळा मार्फत ती बांधण्यात आलेली आहे पण ती महानगरपालिकेने हॅण्डओव्हर करून जर युपीएसी आणि एमपीएसी चालविणाऱ्या एखादया सामाजिक संस्थेला दिली त्यामुळे शहरातील मुलांना चांगल्या प्रकारे युपीएसी आणि एमपीएसी अभ्यासाचे मार्गदर्शन मिळेल आणि ते स्पर्धा परिक्षेत कसे यश सपांदन करतील, अशी व्यवस्था तेथे जर सुरू झाली तर उल्हासनगर महानगरपालिका हे एक आदर्श ठरेल असे मला वाटते धन्यवाद.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** सन्मानिय महापौर, उप महापौर आणि आयुक्त साहेब, सचिव मॅडम आणि सभापती मॅडम, माझ्या वार्डातील कामे आहेत ती प्रभाग निधी आणि नगरसेवक निधीमधून होवू शकत नाही. मोठे मोठे कामे आहेत रोहीदास येथील अंबा अपार्टमेंट मंगलमुर्ती अपार्टमेंट पर्यंत मोठा नाला नविन बनविणे त्याचा २० लाख खर्च आहे. ए ब्लॉक येथील रामायण अपार्टमेंट ते महात्मा फुले चौक पर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्ते बनविणेसाठी दोन कोटी खर्च आहे. दत्तवाडी येथील गोपाल दवाखान्याजवळील महापालिका नविन शौचालय बनविणेसाठी दहा लाख खर्च, शिवाजी रोड शहाड फाटक येथील टेंभेच्या घराजवळ महापालिका शौचालय नविन बनविणे १५ लाख खर्च, शिवाजीनगर येथील बिर्लागेट जवळ प्रकाश पवार यांच्या घराजवळ अर्धवट समाज मंदीर ते काम पुर्ण करणेसाठी २० लाख खर्च, हरमन मोहटा गेट मागील शिवाजी नगर येथे मोठा नाला बांधणे खर्च आहे ३० लाख, बॅरेक नं. ३८३ समोर चंद्रलोक अपार्टमेंट ते महापालिका जागेसमोरील हजेरी शेड बनविणे १५ लाख खर्च, शहाड फाटक येथिल मंगलभवन ते अग्रवाल हॉटेलपर्यंत तसेच डेअरी ते आनंद विदयालयापर्यंत फुटपाथ व नाली बनविणे ४० लाख खर्च, बॅरेक नं. ३७६ ते ३९१ पर्यंत नाली बनविणे ३० लाख रुपये खर्च, बीपी नाईक कॉलनी येथिल झोपडपट्टी येथे फुटपाथ व नाली बनविणे ४० लाख रुपये खर्च महापौर महोदया, माझी विनंती आहे की अर्थसंकल्पात एवढी तरतुद करण्यात यावी व काम झाले पाहिजे.  मागील वेळेस यातुन एक सुध्दा कामे झाली नाहीत.

यावेळी सदस्या श्रीमती दिप्ती दुधानी, श्रीमती कांचन लुंड हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :</u>—**महापौर महोदया, उप—महापौर महोदय, आयुक्त साहेब, सभापती स्थायी समिति, स्थायी समितीने वर्ष २०१८—१९ साठी जो अर्थसंकल्प तयार केला आहे त्या अंदापत्रकाचे मी समर्थन करतो जर सर्व नगरसेवक समर्थन करतील तर मी सुध्दा अवश्य करेल. परंतु कृपया हे सांगावे की मी मागील सभेत एक लक्षवेधी टाकली होती की पुढील वर्षाची आवक जावक होती ती किती झाली, त्यात खर्च किती झाले. त्याची माहिती दिली असती तर फारच चांगले झाले असते. परंतु त्याची माहिती मिळाली नाही त्या स्थायी समितीच्या अर्थसंकल्पातुन किती पैसे भरले, ती किती बरोबर होती किंवा हे जे अंदाजपत्रक आहे त्यात किती पैसे येण्याची शक्यता आहे की आपण त्यातुन शहर विकासाचे काम करु शकतो. आजच्या वर्तमानपत्रात आम्ही वाचले की उल्हासनगर महानगरपालिका घरपट्टी विभागामध्ये १०० कोटीपर्यंत वसुली झाली आहे. हे सत्य आहे का हे जरा आयुक्त महोदय, आमचे शहर अभियंता व लेखा अधिकारी आहेत त्यांनी जरा सांगावे. जर १०० कोटी आले असतील तर मी सर्वांना धन्यवाद देतो, प्रशासनास, महापौर व उपमहापौर यांना. परंतु ते गेले कोठे १०० कोटी? कोणत्या खजिनात १०० कोटी पडुन आहेत त्याची जरा माहिती दयावी. ते आहेत का की ते सुध्दा संपुन शुन्य झाले? कारण संपुर्ण वर्षभरात एक पैश्याचे काम झाले नाही असे आता नगरसेवकांनी सांगितले. तर मग ते १०० कोटी बॅंकेत पडुन राहायला पाहिजे ना. जर समजा पुढील वर्षात पैसे नाही आले तर यातुन जे आहे ती कामे नक्की होतील. असे जर आहे तर आपण शहरवाशियांना विश्वास दाखवु की आमच्याकडे १०० कोटी रुपये मागील वर्षाचे पडुन आहेत. बाकी बॅंकेत आहेत पडले आहेत आपण चिंता करुन नका, आपणांस कोणताच त्रास होणार नाही व पाणी सुध्दा वेळेत मिळणार. कारण आमच्याकडे पैसे आहेत व आपण भरु शकु. आपणांस रस्ते बनवुन देवु शकतो कारण की आमच्याकडे पैसे आहेत. आयुक्त महोदय, महापौर महोदय आपणांस सांगु इच्छितो की जसे आमच्या श्रीमती साळवे ताई यांनी सांगितले की गोरगरीब लोकांना आम्ही २०१२ पासुन ते २०१७ पर्यंत मशिन नाही देवु शकलो. मी सुध्दा नगरसेवक होतो मी प्रश्न टाकला की गेल्या पाच वर्षात आपण किती मशिन खरेदी केल्या, कोणास दिल्या. जर नाही दिल्या तर आहेत कोठे? आपण ते केव्हा वाटणार, डायरी सुध्दा बनविल्या नाहीत. आपण लोकांना काय स्वप्न दाखविणार, आपण डायरी व मशिन देवु शकलो नाही लोकांना. जर मी चुकीचा असेल तर मला सांगा व जर मी बरोबर असेल तर त्या गोष्टीचा विचार करा. पुढील वर्षी या अंदाजपत्रकाचा योग्य वापर झाला पाहिजे. प्रशासनाने चांगले काम करावे तरच लोक आमच्यापासुन आनंदीत होतील. आपणांस आठवत असणार की घरपट्टी वसुल करण्यासाठी आम्ही काय नाही केले. ढोलक वाजविले लोकांच्या घराबाहेर की घरपट्टी भरा नाहीतर आपली जप्ती करण्यात येईल. मागील वेळेस नोटबंदली झाली तेव्हा आपणांस भरपुर पैसा मिळाला. आपण दोन वेळा अभय योजना चालविली त्यामुळे भरपुर पैसा मिळाला. तर कृपया येणारा पैसा आहे की नाही, बाकी आहे की नाही. आम्ही आशाने काम करु शकु किंवा नाही तसेच या अंदाजपत्रीकेत जे दाखविण्यात आले आहे त्यात सत्यतेने वसुली होवो, काम होवा, शहराचा विकास होवो. तसेच जी कामे आमच्या नगरसेवकाने सांगितले व राहिले आहेत, व मी सुध्दा आणले आहे, ती झाली पाहिजेत. काही अशा गोष्टी आहेत, एक नाला आहे, आयुक्त महोदय, हा शहरातील सुरक्षेचा प्रश्न आहे. पाऊस प्रत्येक वर्षी पडतो, जोराने पाऊस पडावा म्हणुन आम्ही प्रत्येक वर्षी पुजा करतो. घरात व दुकानात पाणी घुसू नये साठी जेवढे काही मोठे नाले असतील ते बनविले पाहिजे. आमच्या प्रभागात व कित्येक नगरसेवकांच्या प्रभागातुन एक मोठा नाला जात असतो, बॅरेक नं. १७१९ पासुन गणेशनगर, गणेशनगर ते स्मशानभुमीपर्यंत जो नाला जातो ब—याच जागी अपुर्ण आहे व ब—याच जागी तुटला आहे. तर अशा नाल्यास सुध्दा बनविणे आवश्यक आहे, असे नाले जर बनविले. तर घरात पाणी जाणार नाही. २५ वर्षापुर्वी जे रस्ते बनविले त्याच्या बाजुला ज्या नाल्या बनविल्या आहेत, त्या तुटल्या आहेत. तेथे जो फुटपाथ होता तो तुटला आहे. तो तुटल्यामुळे व नाल्या तुटल्यामुळे घरात व दुकानात पाणी घुसते. काही वर्षापुर्वी जे रस्ते बनले होते जे आता खराब झाले आहेत तर ही कामे सुध्दा करण्यासाठी लक्ष दयावे. धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—**महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती महोदया, २०१८—१९ चा अर्थसंकल्प आपण मंजुर करत आहोत. आयुक्त महोदय, आपण आता सर्वांचे म्हणणे ऐकलेच असेल. २०१७ चा अर्थसंकल्प हा अर्थहीन संकल्प झाला. कसलाही अर्थ नसलेला संकल्प या वर्षी होवु नये म्हणुन सर्वांना भिती वाटते. यास कोणी अंदाजपत्रक बोलतात कोणी अर्थसंकल्प बोलतात. सगळे अंदाज फोल ठरविणारा मागचा अर्थसंकल्प म्हणजे गेल्या दोन वर्षाचा. उत्पन्न पाहिले तसे काही कमी नाही मी यापुर्वी सांगितले ८ महिन्याच्या अंदाजावर ४६४ कोटीचे उत्पन्न त्यांनी दाखविले आहे. म्हणजे ४६४ कोटीमध्ये नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी न देण्यासारखे झाले, दुर्देवाने ते झाले नाही गेल्या दोन वर्षामध्ये. नगरसेवकांनी शिबीर घ्यायचे व लोकांना समजावुन सांगायचे की टॅक्स भरा. लोकांनी टॅक्स भरायचा पण परतफेड काय, संपुर्ण सभागृहात आपण ऐकलेले आहे. तुम्ही आणि आम्ही एकत्र येवुन या उल्हासनगरच्या लोकांना, नागरीकांना पायाभुत सुविधा तरी देणे आपले काम आहे. तर ४६४ कोटी उत्पन्न असतांना सुध्दा आम्ही मागच्या वर्षी, पायाभुत सुविधा व मुलभुत सुविधा सुध्दा देवु शकलो नाही आजतागायत. ही दुर्देवाची गोष्ट आहे म्हणुन यावर्षी सुध्दा अर्थसंकल्प हा अर्थहीन होता कामा नये. जी आम्ही तरतुद करतो ती जास्तीत

जास्त कसोसीन प्रयत्न केला पाहिजे उत्पन्न वाढविण्यासाठी. म्हणजे खर्चावर एक बाजु आहे, खर्च कमी करणे एवढे फक्त न करता उत्पन्न वाढले पाहिजे. असलेल्या तरतुदीतुन जास्तीत जास्त ते कसे निर्माण करेल, ही झाली क्रिएटीव्हीटी. माझ्याकडे असलेला पैसा फक्त कमवायचा, खर्च करायचा नाही ही झाली कंजुषी. तर तो पैसा कोठे खर्च होणार आहे ते पहावे तो नागरीकांसाठीच खर्च होणार आहे. पाणी, साफसफाई, रस्ते आणि लाईट, उदयाने विकसित करण्यासाठी या शहरामध्ये जागा नाही. स्टेडीयम डेव्हलोप करण्यासाठी या शहरामध्ये जागा नाही. असे असतांना फक्त रस्ते, लाईट, स्वच्छता आणि पाणी हे देण्यासाठी आम्हांला एवढा आटापिटा करावा लागतो. सर्वांनी सांगितले की माझे हे टाका, ते टाका परंतु टाकल्यावर काय होणार आहे हे सर्वांना माहित आहे. फक्त फॉर्मालेटिज पुर्ण करतो. मागच्या वर्षी असेच झाले की जो अनुभव आहे, फक्त बजेट म्हणुन प्रक्रिया पुर्ण करायची. पण वर्षभर त्याचे काही नाही, प्रत्येकाने त्यास आशेने पाहिले आहे. महापालिका म्हणजे महापौर, उप–महापौर, आयुक्त आणि सर्व सभागृह हे सर्व एकत्रित येवुन हे सर्व महापालिका बसते. आणि येथे घेतलेल्या निर्णयाची प्रशासनाने अंमलबजावणी करायची आणि प्रशाासनाकडुन आपण काम करुन घ्यायचे. तर आजची जी अर्थसंकल्पाची सभा आहे ती अर्थहीन होवु नये याकडे तुम्ही आणि आम्ही मिळुन सर्वांनी आता लक्ष दयायचे. ज्याठिकाणी उत्पन्न वाढवायचे आहे आयुक्तांनी सांगितले तर त्याठिकाणी आम्ही कसोसिने प्रयत्न करु. पण अट्टहास म्हणुन नाही. आणि जर समस्या आली तर तुम्ही आणि आम्ही मिळुन सोडविणार आहोत. जरी याठिकाणी आम्ही अर्थसंकल्प मंजुर केला त्यात तरतुद नसेल तर सप्लीमेंटरी किंवा आम्ही अमेंडमेंट करतोच. आज खरे सांगु तुम्हांला की स्थायी समितीमध्ये, या महासभेत गंभीर कोणच नव्हते. ज्यावेळी श्री. लाल पंजाबी येथे होते त्यावेळी त्यांनी सांगितले होते की अर्थसंकल्प हा शहरातील दिशा नसलेला अर्थसंकल्प होतो. जर अर्थसंकल्पावर चर्चा झाली तर तेवढेच चांगला अर्थसंकल्प होतो तर दिशा चांगली मिळते व दशा चांगली होते. एकदा दिशा बदलली की दशा बिघडते. मागच्या वर्षी प्रशासनाची दिशा बदलली त्यामुळे शहराची दशा बिघडली. म्हणुन हा अर्थसंकल्प श्री. जमनुजी, विरोधी पक्षाचे काम आहे आम्ही विरोध करायचा. पण आमचा मनाचा मोठेपणा आहे, तुम्ही काम चांगले करा तरी. शहरातील लोकांना काय पाहिजे रस्ते पाहिजे, लाईट पाहिजे, पाणी पाहिजे, स्वच्छता पाहिजे ते तुम्ही देवु शकत नाही म्हणुन आम्ही तुम्हाला साथ देत आहोत. नाहीतर प्रत्येक वेळी विरोधी पक्षाने विरोधी भुमिका घेतलेली आहे. याठिकाणी शिवसेना असा पक्ष आहे की तो चांगल्या बाजुने समर्थन करतो तुमचे शहराच्या विकासासाठी. परंतु मागच्यावेळेसारखा अर्थहिन झाला नाही पाहिजे, ही जबाबदारी महापौर महोदया, उप–महापौर महोदय आपली आहे. परत एकदा महापौर महोदया, ही आपली सुध्दा जबाबदारी आहे, अर्थसंकल्प तर अर्थसंकल्प म्हणजे अर्थ त्यात आपण बरेच अर्थ करतो व संकल्प त्यात आपण संकल्प करतो. तर हा अर्थहिन होता कामा नये ही आपली सुध्दा जबाबदारी आहे. नाहीतर चर्चा करुन काय फायदा आहे. यामध्ये श्री. पाटील साहेब, आमचे जेएनएनयुआरएमची जी योजना आहे आता पाणी पुरवठयाविषयी चर्चा झाली की आमच्याकडे काम सुरळीत होत नाही. गेल्या चार पाच वर्षापासुन, २००९ पासुन आम्ही जेएनएनयुआरएमची योजना मंजुर केली. २०११ ला वर्कऑर्डर दिली, २०१२ डिसेंबरमध्ये प्रत्येकाच्याय घरात, झोपडपट्टयांपासुन उंच इमारतीमध्ये प्रत्येकाला २४ X ७, मुबलक पाणी मिळेल मिटरसह असे त्यामध्ये होते. प्रशासनाने जसे सांगितले आम्ही मंजुरी दिली, मी तुम्हांला परत सांगतो हिशोब तुम्हांला कळला पाहिजे. आम्ही मंजुरी दिली प्रशासनाने सांगितले एवढे एवढे प्रकल्प आहेत, एक वर्षानंतर ते काम संपले असे सांगितले, पुन्हा रिवाईज्ड प्रोजेक्ट केला साडेतीनशे कोटीचा, साडेचारशे कोटी झाले. तरी सुध्दा काम अपुर्ण आहे. त्यामुळे पाणी लोकांपर्यंत पोहचत नाही असे प्रशासनाचे म्हणणे आहे. एकदा तो प्रकल्प मार्गी लागण्यासाठी यामध्ये तरतुद केलेली दिसत नाही. श्री. पाटील साहेब, श्री. सेलवन साहेब असेल तर सांगा ती यामध्ये केलेली दिसत नाही. प्रकल्प पुर्ण करण्यासाठी ६० किंवा ७० कोटी असेल, पाण्यासाठी नागरीक तडफडत आहेत. जेएनएनयुआरएमची योजना आणि एमआयडीसी आता सतावित आहे आम्हांला. जे पाणी स्टेम प्राधिकरण येथुन घेवुन मिराभाईंदर येथे ६५ कि.मी. म्हणजे ४ एमएलडीने पाणी देत आहेत तर ते आम्हांला येथे ६० रुपये लावत आहेत. पाणी पुरवठयावर आमचा किती खर्च होतो ही संशोधनाची गोष्ट आहे. आम्ही एक ठराव मंजुर केलेला आहे की आमचा स्वत:चा स्त्रोत असावा. जागा उपलब्ध करण्यासाठी शासनाकडे पाठपुरवा केलेला आहे. आपणाकडे ५ कोटी भरलेली आहेत. त्याबाबतची याठिकाणी तरतुद नाही. जेएनयुआरएमची योजना तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा पाईप लाईन त्याठिकाणी पडतील, मिटरची सिस्टम होईल. आणि आमची स्वतंत्र योजना आता आम्ही एमआयडीसीवर अवलंबुन आहे. एमआयडीसीची मशिनरी त्यांना पाहिजे तशी नाही आहे. ६०–६१ चा त्यांचा प्लांट आहे. कधी कार्यरत असतो कधी कार्यरत नसतो, ब–याच वेळा फॉल्ट होतो. आणि मग त्याचा परिणाम शहरातील नागरीकांना होतो. आमची स्वतंत्र योजना असेल तर एमआयडीसीवर अवलंबुन होता कामा नये. आज पाल्यावरुन जे ५३ एमएलडी पाणी मिळत होते आत ३६ एमएलडी येते. म्हणजे ४ आणि ५ नंबर मध्ये दिवसाआड पाणी येते, म्हणजे आठवडयातुन ३ दिवस, त्यात सुध्दा शुक्रवार बंद असल्यामुळे रविवारी पाणी मिळते. मंगळवार नंतर गुरुवार येतो गुरुवारी लाईट गेली दुर्देवाने, आणि लाईटचे इन्ट्रप्शन जास्त असते. त्यामुळे मंगळवार ते रविवार या कालावधीमध्ये लोकांना पाणी मिळत नाही. मग आपण हे देत आहोत का, ती जबाबदारी कोणाची, आमची आहे. आपण ७७४ कोटीचा अर्थसंकल्प करतो, शहरातील एका गरीब माणसाला

पाणीही आपण देवु शकत नाही. ही दु:खाची बाब आहे. मला वाटते की आपण पाठपुरावा करुन या उल्हासनगर नदीवर स्वतंत्र पाणी पुरवठा योजना बीओटी तत्वावर आपण मंजुर केलेली आहे. ती शासनाच्या बासनात गुंडाळुन पडली आहे त्याचा पाठपुरावा करुन दोघांनी मिळुन तुम्ही आणि आम्ही मिळुन करु या. या सर्व गोष्टी यामध्ये अंतर्भुत करुन सभागृह नेता नगरसेवकांच्या काही सूचना असतील तर त्या वाचतील. आयुक्त साहेब, कळकळीची विनंती आहे की जे कामे असतील ते आपण करु परंतु कुठलेही काम रखडुन न ठेवता, ठिक आहे फायनान्सचा प्राब्लेम आहे, परंतु सभागृह चर्चेसाठी आहे तुम्ही सांगाल ते आम्ही करु. पण लोकांना विकास दिसला तर मालमत्ता कर वाढीव असला तरी भरतील. विकास दिसला नाही तर मालमत्ता कर भरण्यास अनाकानी करतील. त्यामुळे लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी, या शहराचा विकास करण्यासाठी ते करु या. त्यामुळे जास्तीत जास्त अंमलबजावणी कशी करता येईल चांगल्या गोष्टीची ती कराल, ही अपेक्षा करतो. हा अर्थसंकल्प अर्थसंकल्पच झाला पाहिजे, अर्थहिन संकल्प होता कामा नये त्यासाठी सत्ताधारी पक्षांना शुभेच्छा.

| ३२ | | सौ. आशाताई नानाभाऊ बि—हाडे | नंद जेठानी यांच्या घरासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये जीमचे साहित्य बसविणे. | उद्यानामध्ये जीमचे साहित्य बसविणे | उद्यान बनविणे | १५ लाख |
| | | | महात्मा फुले चौक ते दुलीचंद कालानी कॉलेज पर्यंत सी.सी. रस्ता, फुटपाथ वरील रेलिंग, डिवासडर, रस्त्यामधील ड्रेनेज लाईनचे काम करणे. | सी.सी. रस्ता बनविणे | रस्ते बनविणे | ८५ लाख |
| ३३ | | श्रीमत. मिना कुमार आयलानी | धिरज टॉवर ते मोनिका मॅरेज हॉल पर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्ता बनविणे | सी.सी. रस्ता बनविणे | रस्ते बनविणे | |

सदर ठरावाअंतर्गतचा निर्णय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता, अंमलात आणण्यात येईल.

अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.१३ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
२०/१०/२०१८

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१०/२०१८ रोजीच्या विशेष सभेचे इतिवृत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष सभा दिनांक २०/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम ओमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/ होत्या.

१. श्रीम. पंचम ओमेश कालानी —— महापौर

५. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | १८ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | १९ | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| ५ | श्रीमती मिना कुमार आयलानी | २० | श्रीमती इन्दिरादेवी जमनादास उदासी |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २१ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ७ | श्रीमती आशा नाना बिराडे | २२ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | २३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | २४ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १० | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | २५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| ११ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | २६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १२ | श्रीमती शुभांगीनी निकम | २७ | श्रीमती मिनाक्षी रवि पाटील |
| १३ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | २८ | श्री. विजय चाहू पाटील |
| १४ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | २९ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| १५ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ३० | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| १६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ३१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| १७ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३२ | श्रीमती चक्रवर्ती उर्फ अडसुळ छाया सुजित |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. हरेश परमानंद जग्यासी, २. श्रीमती मिना कौर अजितसिंग लबाना, ३. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ४. श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर, ५. श्रीमती कविता सुधिर बागुल, ६. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ७. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता, ८. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ९. डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी, १०. श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी, ११. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १२. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, १३. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १४. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १५. श्री. भगवान शंकर भालेराव, १६. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे,, १७. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १८. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १९. श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता उर्फ पप्पू गुप्ता, २०. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, २१. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, २२. श्रीमती कविता लाल पंजाबी, २३. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), २४. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २५. श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी, २६. श्री. सुमित सागर सोनकांबळे, २७. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, २८. श्रीमती ज्योती शामराव माने, २९. श्री. रमेश महादेव चव्हाण, ३०. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, ३१. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, ३२. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, ३३. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, ३४. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, ३५. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, ३६. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, ३७. श्रीमती कांचन अमर लुंड, ३८. श्री. शंकर गोविंदराम

लुंड, ३९. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, ४०. श्रीमती सुमन राजेश सचदेव, ४१. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), ४२. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, ४३. श्री. प्रमोद नामदेव टाले, ४४. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ४५. श्री. आकाश परशुराम पाटील, ४६. श्री. विकास परशुराम पाटील, ४७. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, ४८. श्री. अरुण लक्ष्मण आशान, ४९. श्रीमती आशा जीवन इदनानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. बाळू भांगरे

दुपारी १२.३१ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :–**विषय क्र. १ वाचुन दाखविला.

---

## ⇨ **विषय क्र. १:–** परिवहन समिती नेमणे

---

निर्धारीत कार्यक्रमानुसार दिनांक १५/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत परिवहन समिती सदस्य पदाच्या निविडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे १३ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झालीत. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नामनिर्दिष्ट उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिनेश अर्जुनदास लहरानी | श्री. राजेश नानीकराम वधारिया | सौ. छाया सुजीत अडसुल (चक्रवर्ती) |
| २ | श्री. संतोष सुरेशचंद पांडे | सौ. पंचम ओमी कालानी | सौ. शुभांगीनी राजेश निकम |
| ३ | श्री. खेमचंदानी मनोहर जयरामदास | श्री. किशोर नारायणदास वनवारी | श्रीमती मीना चंद्रगुप्त सोनेजी |
| ४ | श्री. तोमर बच्चन महेश प्रसाद | श्री. पुरस्वानी जमनादास खूबचंद | श्री. महेश पहिलाजराय सुखरामानी |
| ५ | श्री. सिंग राजकुमार मुरली | श्रीमती मीना कुमार आयलानी | डॉ. प्रकाश घनशामदास नाथानी |
| ६ | श्री. कांतीलाल पांडुरंग कांबळे | श्री. जीवन चंद्रभान ईदनानी | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. शंकर मूरलीधर दावानी | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे | श्रीमती सुमन राजेश सचदेव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| ८ | श्री. नवनाथ बाबासाहेब लोंढे | श्री. धनंजय बाबूराव बोडारे | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्री. रविंद्रसिंग वीरसिंग भुल्लर | श्री. सुनिल मुकूंद सुर्वे | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्री. अनिल दौलतराम वलेचा | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ११ | श्री. इंदर खुबचंद गोपलानी | श्री. सुमित सागर सोनकांबळे | श्री. स्वप्नील मिलिंद बागुल |
| १२ | श्री. दत्तु विष्ण पोळके | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | श्री. कलवंतसिंग सोहता |
| १३ | श्रीमती वर्षा दिनेश आहुजा | सौ. ज्योती दिलीप गायकवाड | श्री. चंद्रशेखर केशव यादव |

तद्नंतर दिनांक १६/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता सहा. मुख्य लेखा परिक्षक व वरिष्ठ लेखा परिक्षक यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्रांची छाननी केली. सदर नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करणेत आले. छाननी अंती वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नावे |
|---|---|
| १ | श्रीमती आहुजा वर्षा दिनेश |
| २ | श्री. भुल्लर रविंद्रसिंग वीरसिंग |
| ३ | श्री. दावानी शंकर मूरलीधर |
| ४ | श्री. गोपलानी इंदर खुबचंद |
| ५ | श्री. कांबळे कांतीलाल पांडुरंग |
| ६ | श्री. खेमचंदानी मनोहर जयरामदास |
| ७ | श्री. लहरानी दिनेश अर्जुनदास |
| ८ | श्री. लोंढे नवनाथ बाबासाहेब |
| ९ | श्री. पांडे संतोष सुरेशचंद |
| १० | श्री. पोळके दत्तु विष्णु |
| ११ | श्री. सिंग राजकुमार मुरली |
| १२ | श्री. तोमर बच्चन महेश प्रसाद |
| १३ | श्री. वलेचा अनिल दौलतराम |

अशा प्रकारे छाननीचे काम दुपारी ३.०० वाजेला सुरु करुन सायंकाळी ५.०० वाजता संपविण्यात आले.

त्यानंतर दिनांक १७/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० ते सांयकाळी ५.०० या दरम्यान नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या वेळेमध्ये एक उमेदवार श्री. भुल्लर रविंद्रसिंग वीरसिंग यांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीच्या बारा सदस्यांच्या पदासाठी निवडणूक कार्यक्रमानुसार दिनांक १७/१०/२०१८ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर निवडणूक लढविणा—या उमेदवारांची वर्णानुक्रमे अंतिम यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | परिवहन समिती सदस्य पदासाठी उमेदवारांची अंतिम यादी |
|---|---|
| १ | श्रीमती आहुजा वर्षा दिनेश |
| २ | श्री. दावानी शंकर मूरलीधर |
| ३ | श्री. गोपलानी इंदर खुबचंद |
| ४ | श्री. कांबळे कांतीलाल पांडुरंग |
| ५ | श्री. खेमचंदानी मनोहर जयरामदास |
| ६ | श्री. लहरानी दिनेश अर्जुनदास |
| ७ | श्री. लोंढे नवनाथ बाबासाहेब |
| ८ | श्री. पांडे संतोष सुरेशचंद |
| ९ | श्री. पोळके दत्तु विष्णु |
| १० | श्री. सिंग राजकुमार मुरली |
| ११ | श्री. तोमर बच्चन महेश प्रसाद |
| १२ | श्री. वलेचा अनिल दौलतराम |

आता परिवहन समिती सदस्य पदासाठी १२ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. परिवहन समितीवर १२ सदस्यांची नेमणूक करावयाची असल्याने आता निवडणूक प्रक्रिया न होता परिवहन समितीवर १२ सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**मी खालीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे.

मी पीठासीन अधिकारी मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी खालील १२ सदस्य हे परिवहन समितीवर बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

| अ.क्र. | परिवहन समितीवर बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्रीमती आहुजा वर्षा दिनेश |
| २ | श्री. दावानी शंकर मूरलीधर |

| | |
|---|---|
| ३ | श्री. गोपलानी इंदर खुबचंद |
| ४ | श्री. कांबळे कांतीलाल पांडुरंग |
| ५ | श्री. खेमचंदानी मनोहर जयरामदास |
| ६ | श्री. लहरानी दिनेश अर्जुनदास |
| ७ | श्री. लोंढे नवनाथ बाबासाहेब |
| ८ | श्री. पांडे संतोष सुरेशचंद |
| ९ | श्री. पोळके दत्तु विष्णु |
| १० | श्री. सिंग राजकुमार मुरली |
| ११ | श्री. तोमर बच्चन महेश प्रसाद |
| १२ | श्री. वलेचा अनिल दौलतराम |

सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय :—**परिवहन समिती नेमणे

**<u>प्रस्तावना</u>**

दिनांक २०/१०/२०१८ रोजी परिवहन समितीवर १२ सदस्य नेमणेबाबत विशेष सभा आयोजित करण्यांत आली. त्याकरीता दिनांक १५/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत परिवहन समिती सदस्य पदाच्या निविडीसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला. सदर दिवशी व वेळी महानगरपालिका सचिव यांचेकडे १३ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झालीत. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **नामनिर्दिष्ट उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| १ | श्री. दिनेश अर्जुनदास लहरानी |
| २ | श्री. संतोष सुरेशचंद पांडे |
| ३ | श्री. खेमचंदानी मनोहर जयरामदास |
| ४ | श्री. तोमर बच्चन महेश प्रसाद |
| ५ | श्री. सिंग राजकुमार मुरली |
| ६ | श्री. कांतीलाल पांडुरंग कांबळे |
| ७ | श्री. शंकर मूरलीधर दावानी |
| ८ | श्री. नवनाथ बाबासाहेब लोंढे |
| ९ | श्री. रविंद्रसिंग वीरसिंग भुल्लर |
| १० | श्री. अनिल दौलतराम वलेचा |
| ११ | श्री. इंदर खुबचंद गोपलानी |

| | |
|---|---|
| १२ | श्री. दत्तु विष्ण पोळके |
| १३ | श्रीमती वर्षा दिनेश आहुजा |

तद्नंतर दिनांक १६/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता सहा. मुख्य लेखा परिक्षक व वरिष्ठ लेखा परिक्षक यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्रांची छाननी केली. सदर नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करणेत आले. छाननी नंतर १३ उमेदवार वैध ठरविण्यांत आले.

तसेच दिनांक १७/१०/२०१८ रोजी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेमध्ये एक उमेदवार श्री. भुल्लर रविंद्रसिंग वीरसिंग यांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीच्या बारा सदस्यांच्या पदासाठी निवडणूक कार्यक्रमानुसार दिनांक १७/१०/२०१८ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर परिवहन समिती सदस्य पदासाठी १२ उमेदवार शिल्लक राहिलेत. परिवहन समितीवर १२ सदस्यांची नेमणूक करावयाची असल्याने आता निवडणूक प्रक्रिया न होता परिवहन समितीवर १२ सदस्य बिनविरोध निवडून येण्यासाठी प्रस्तावित.

**विशेष सभा ठराव क्र. ३९** **दिनांक :—२०/१०/२०१८**

ही सभा वरील प्रस्तावनेनुसार परिवहन समितीवर खालीलप्रमाणे १२ सदस्य बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

| अ.क्र. | परिवहन समितीवर बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्रीमती आहुजा वर्षा दिनेश |
| २ | श्री. दावानी शंकर मूरलीधर |
| ३ | श्री. गोपलानी इंदर खुबचंद |
| ४ | श्री. कांबळे कांतीलाल पांडुरंग |
| ५ | श्री. खेमचंदानी मनोहर जयरामदास |
| ६ | श्री. लहरानी दिनेश अर्जुनदास |
| ७ | श्री. लोंढे नवनाथ बाबासाहेब |
| ८ | श्री. पांडे संतोष सुरेशचंद |
| ९ | श्री. पोळके दत्तु विष्णु |
| १० | श्री. सिंग राजकुमार मुरली |
| ११ | श्री. तोमर बच्चन महेश प्रसाद |
| १२ | श्री. वलेचा अनिल दौलतराम |

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
विशेष सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>महापालिका सचिव:—</u>**सर्व नविन निवडून आलेल्या परिवहन समिती सदस्यांनी सभागृहात यावे त्यांचे मा. पीठासीन अधिकारी पुष्पगुच्छ देवुन स्वागत करतील.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**परिवहन समितीवर निवडून आलेल्या १२ सदस्यांचे मी अभिनंदन करते.

**<u>सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u>** परिवहन समितीवर निवडून आलेल्या १२ सदस्यांचे मी अभिनंदन करतो.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**मिडीयावाले ज्यांना यायचे आहे ते सभागृहात येवु शकतात.

यावेळी मा. महापौर तथा पीठासीन अधिकारी यांनी परिवहन समितीवर निवडून आलेल्या १२ सदस्यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले.

**<u>महापालिका सचिव :—</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १२.४१ वाजता वाजता महापौर श्रीमती पंचम ओमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
प्र.महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— ०२/११/२०१८**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०२/११/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ०२/११/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम उमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचम उमेश कालानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४० | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४१ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४२ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १५ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २० | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २१ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५६ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २३ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५७ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २४ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५८ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५९ | श्री. किशोर नानायणदास वनवारी |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६० | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६१ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २८ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६२ | श्री. विजय चाहु पाटील |
| २९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६३ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३० | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६४ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३२ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्री. रवि किशनचंद जग्यासी | ६७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३४ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६८ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६९ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३६ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना २. श्रीमती आशा नाना बिराडे, ३. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ४ श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ५. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ६. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ७. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्री. रमेश महादेव चव्हाण, ९. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १०. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ११. श्री. विजय चाहु पाटील, १२ . श्री. आकाश परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. अच्युत हांगे, आयुक्त

२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

३. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

४. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार

५. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता

६. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी

८. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक

९. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक

१०. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

११. श्री. विजय मंगलानी, प्र. सहाय्यक आयुक्त

१२. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त

१३. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१५. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता

१६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

१७. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

१८. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

१९. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

२०. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२१. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक

२२. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक

२३. श्री. दत्तात्रय जाधव, अधिक्षक अभिलेखा विभाग

२४. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३.श्री. बाळु भांगरे, लिपीक
४. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

सायंकाळी ४.३३ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव:–** ही दिनांक ०२/११/२०१८ रोजीची विशेष महासभा आहे. प्रशासनाकडून एक आयत्या वेळेचा विषय आला आहे. स्वच्छ सर्व्हे सन २०१९ स्वच्छ महाराष्ट्रा अभियान अंतर्गत कचरामुक्त शहराला तारांकित मानाकंन देण्याबाबत हा विषय अर्जेंटली शासनाकडे पाठवायचा असल्यामुळे हा स्विकारावे की कसे हे महासभा ठरवेल? विषय घ्यायचा की नाही हे महासभा ठिक आहे, या विषयाचा समावेश करण्यात येत आहे आणि तुम्हांला गोषवारा वाटला आहे, तुम्ही तो वाचू शकता.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

**⇨विषय क्र. १ :–** व्हि.टी.सी. क्रिडा संकूल, बोटक्लब व इंदिरा गांधी भाजी मार्केट हे भुखंड ''बांधा, वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर विकसित करणे व त्याकरीता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांची नेमणूक करणे.

---

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी :–** मा.महापौर मॅडम, महासभा सुरू होणेपुर्वी पॉईंट ऑफ ऑर्डर वर थोडी चर्चा करायची आहे. या विषयाच्या पहीले.

**सदस्य, श्री. शेखर यादव:–** मा. महापौर मॅडम, मा.उपमहापौर, मा.आयुक्त साहेब याविषयावर मला बोलायच आहे. व्ही.टी.सी. मैदान, इंदिरा गांधी भाजी माकेट, बोटक्लब विकसीत करण्यासाठी बांधा, वापरा व हस्तांतर करा तत्वावर विकसीत करण्याबाबत. या विषयावर सर्व सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील व्ही.टी.सी. मैदान, इंदिरा गांधी भाजी मार्केट, बोटक्लब विकसीत करण्यासाठी बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर विकसीत करण्याचा विषय दिनांक ०२/११/२०१८ रोजीच्या विशेष महासभेमध्ये ठेवण्यात आला असून शहराचा मूळ विकास आराखडा हा सन १९७४ साली तयार करण्यात आला व भुखंडाचा ताबा, पावती सन १९८६–८७ दरम्यान महानगरपालिकेला दिली. परंतु सदर भुखंडाचा मालकी हक्क दिनांक १२/१०/२०१८ रोजी महापालिकेस मिळाला व त्याला ३१ वर्षाचा दिर्घ कालावधी लागला. त्यानंतर फक्त २० दिवसांत प्रशासनाने सदर भुखंड बांधा, वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर विकसीत

करण्यासाठीचा प्रस्ताव आणला असून बहुमताच्या जोरावर सदर विषय पास देखील करण्यात येईल. महापालिका अंतर्गत शहरातील ु नागरिकांच्या हिताचे, फायदयाचे शहराच्या विकासाचे अनेक विषय व प्रस्ताव वर्षानुवर्ष प्रलंबीत असून सदर विषयांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. ३०० कोटींची अमृत योजना कार्यान्वयीत होऊनही पिण्याच्या पाण्याची समस्या सुटलेली नाही. माता, भगिनी, अबला वृध्द नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी अहोरात्र झगडत असून पाण्यासाठी इतरत्र भटकत आहेत. हा विषय कोणत्याही तत्परतेने घेतलेला नसून यामुळे स्थानीक नगरसेवकांना नागरिकांच्या रोषाला बळी पडावे लागत आहे. माझी सभागृहास विनंती आहे की, एवढया जटील समस्या असतांना सदर विषयांचे प्रस्ताव एवढया तत्परतेने महासभेपुढे आणले जात नाही. मात्र भुखंडाची मालकी महापालिकेकडे आल्या नंतर फक्त २० दिवसांत व्हि.टी.सी, मैदान, इंदिरा गांधी भाजी मार्केट, बोट क्लब विकसित करण्यासाठी बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर विकसित करण्यासाठी प्रस्ताव महासभेमध्ये कसा काय आणण्यात आला? या बाबत चर्चा करण्यात येवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**या** वेळी सदस्या, श्रीमती आशा जीवन इदनानी व सदस्य, श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** मा. महापौर मॅडम, मा.उपमहापौर, मा.आयुक्त साहेब हा विषय खुप विचार करण्यासारखा आहे. खरं बघायला गेलं तर व्ही.टी.सी. ग्राउन्ड, क्रीडास्कुल, बोटक्लब हा जो विषय आहे, याच्यामध्ये जर आपण बघायला गेले तर बांधा व वापरा हस्तांतरीत करा, हा विषय जरा विचार करण्या सारखा आह. कारण कसे आहे, विकसित करा, त्याच्या बदल आम्हांला काहीच प्रॉब्लेम नाही किंवा वाद नाही. पण विकसित झाल्या नंतर त्याचा पुरेपर फायदा नागरिकांना झाला पाहिजे. या माध्यमातून आपण जर केला तर बर होईल. एकीकडे आपण बघतो ६०५ चा भुखंड आहे, तो महापुरुषांचा आरक्षीत भुखंड आहे, तिथे २० गाळे बांधले जातात. साहेब तो विषय महासभेमध्ये आणता येत नाही, त्याला पहिलं निष्कासीत करा. तो विषय महत्वाचा नाही का? आणि जर हे करत येत तर बी.ओ.टी.ला तुम्ही एवढ समर्थन का देत आहात? तुम्ही त्याला दहा लाख रुपये खर्च करणार का? आपले महापालिकेचे अधिकारी सक्षम नाहीत का? विरोध फक्त एवढाच आहे की, बी.ओ.टी.ला न देता, तो विषय नागरिकांसाठी असला पाहिजे, नागरिकांना त्याचा फायदा झाला पाहिजे. आता तुम्ही बघायला जाणार इकडे जे स्विमींगपुल बांधलेले आहे त्या स्विमींगपुलचा पहिले लोक फायदा घ्यायचे. आता त्या लोकांना फायदा होत नाही. आधी तेथे एक लाख रुपये मेंबरशीप भरावी लागते. त्याच्या नंतर लोक त्याचा फायदा घेणार. गरीब लोक आणणार कुठून, पहिल जे स्विमींगपुल होत त्यावेळी लोक तेथे टिकीटावर जायचे. आता लोक जातात कुठे? तर हे बी.ओ.टी.ला न देता हे नागरिकांना ओपनस्पेससाठी राखीव कराव असे माझे या ठिकाणी मत आहे.

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** जनरल अरूण कुमार वैद्य हॉल देखील बी.ओ.टी. तत्वावर देण्यात आलेला आहे आणि त्याचा फक्त ३० टक्के भाग हा फक्त लोकांना फायदा आहे. बाकी व्यापा—यांना त्याचा फायदा आहे. सामान्य जनतेला त्याचा काय फायदा आहे हे सांगा?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा.आयुक्त साहेब विषय असा आहे, मनसेवाले ७०५ माझी आयुक्त साहेब तुम्हांला एक विनंती आहे की, हे तीन प्लॉट जे आपण बी.ओ.टी. तत्वावर आणलेत ते आताच मा. प्रांतअधिकारी यांनी आपल्याला हस्तांतरित केलेले आहेत. परंतु ते बी.ओ.टी. तत्वावर निर्माण करण्यासाठी आपल्याला शासनाची परवानगी घ्यावी लागते. ती आपण घेतली का? माझा साधा प्रश्न आहे तेवढ जर आपण उत्तर दिलं तर बरं होईल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. आयुक्त साहेब आमच्या सर्वाच्या प्रश्नांची एकसाथ उत्तरे दिली तरी चालतील.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौर, महासभा सूरू आहे आणि बाहेर कुठल्या पार्टीचे कार्यकर्ते लॉबीमध्ये आंदोलन करत आहेत, हे कुठ पर्यंत बरोबर आहे, ते आत आले कसे? आणि एवढे कार्यकर्ते एकसाथ कसे आले व ते आंदोलन कसे करत आहेत? जबाबदारी काही आहे की नाही?

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** मा. आयुक्त साहेब पोलीसांना बोलवा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** पोलीस ऑल रेडी आहेतच.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** पोलीस आहेत मग ते काय करत आहेत?

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** आपल्या सुरक्षा रक्षकांना सांगा त्यांना दांडे मारायला सांगा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** पोलीस सांगतात की, महापालिकेच्या आत आम्ही कारवाई करू शकत नाही. मग पोलीस आतमध्ये येतात तरी कशाला?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** जर कोणी आंदोलन करीत असेल तर ते करू शकतात, त्यांचा अधिकार आहे. परंतु महापालिकेच्या.....

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** पोलीसांना मी अर्ध्या तासापूर्वी सांगीतले की असे होणार आहे. परंतु ते म्हणतात की आम्ही आतमध्ये कारवाई करू शकत नाही, ते तुमचे क्षेत्र आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तुमचे अधिकार सिमित राहतील.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** पोलिसांचे बंदोबस्त कशाला मग?

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** मा. महापौर मॅडम महापालिकेचे स्वत:चे सुरक्षा रक्षक आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, मी अर्धा तास पहीले पोलिसांना सांगितले होते की, असे होणार आहे. त्यांना बाहेर काढा, ते म्हणाले की, ते तुमचे काम आहे, आमचे काम नाही. मा. आयुक्त साहेब, जे कोणी आंदोलन करीत असतील त्यांच्या प्रत्येकावर कारवाई झाली पाहिजे, प्रत्येकावर गुन्हा दाखल झाला पाहिजे, ही जबाबदारी आपली आहे. आयुक्त म्हणून महापालिकेच्या आवारामध्ये होणा—या सर्व घटनांची जबाबदारी आपली आहे. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल झालेच पाहिजे, ही आमची मागणी आहे. महापालिकेच्या आवारामध्ये आंदोलन करायला आहे का? त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मा.आयुक्त साहेब माझा एक साधा विषयआहे, बि.ओ.टी. तत्वावरचा त्याचे जर उत्तर आपण दिले तर बरे होईल. आपण शासनाची परवानगी घेतली आहे का? महाराष्ट्र शासनाने जरी महापालिकेला मालकी दिली असली तरी महापालिका याची सर्वस्वी मालक नाही. बी.ओ.टी. वर सदर भुखंड द्यायचे असतील तर शासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. शासनाची परवानगी न घेता महापालिका प्रशासनाने बी.ओ.टी. चा प्रस्ताव आणला असा काय? याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे.

या वेळी सदस्य, श्री. धनंजय बोडारे व सदस्य, श्री. अरूण आशान हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** हा विषय आणला कोणी?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, बी.ओ.टी. बाबत हे तीन विषय जे आज आणले आहेत त्याविषयीच माझा देखील हा प्रश्न आहे त्याचे उत्तर मा.आयुक्त साहेब देतील. जोपर्यंत ती उल्हासनगर महानगरपालिकेची मालमत्ता नव्हती तोपर्यत ती शासनाचे नावे होती. त्यावेळी शासनाची परवानगी लागत लागते. आपण टाऊन हॉल बी.ओ.टी. तत्वावर दिला, आपण स्विमींग पूल बी.ओ.टी. तत्वावर दिले याबाबत मी विचारतो की, याची परवानगी घेतली आहे का?

या वेळी सदस्य, श्री धनंजय बोडारे व सदस्य, श्री. अरूण आशान यांनी पुन्हा सभागृहमध्ये प्रवेश केला.. .

**सदस्य श्री. सुरेंद्र सावंत:—** मा. महापौरजी, मला या विषयावर बोलायचे आहे. व्ही.टी.सी.क्रीडा संकुल, बोटक्लब आणि इंदिरा गांधी भाजी मार्केट या विषयावर महत्वाची सूचना करायची आहे. व्ही.टी.सी.क्रीडा संकुलाचे नामांतर शिवसेना प्रमुख, श्री.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल असे नामांतर झालेले आहे. टाऊन हॉलचे नामांतर अरूण कुमार वैद्य अें झालेले आहे. इंदिरा गांधी भाजी मार्केटचे नामांतर इंदिरा गांधी भाजी मार्केट झालेले आहे. पण दुर्दैवाची बाब अशी की आज या ठिकाणी फक्त इंदिरा गांधी भाजी मार्केटचा उल्लेख आहे आणि टाऊन हॉलचा उल्लेख सुध्दा नाही. त्याचबरोबर व्ही.टी.सी.क्रीडा संकुलाचा शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल असा नामोल्लेख पाहिजे. दुदैवाने या सभागृहात सभासद टाऊन हॉल व व्ही.टी.सी.क्रीडा

संकुल असा चुकीचा नामोल्लेख करत आहेत ती चुक सभासदांनी सुधारावी आणि व्ही.टी.सी. क्रिडा संकुल ऐवजी शिवसेना प्रमुख, बाळासाहेब ठाकरे असा उल्लेख करावा. जर तुमच्या नियमाप्रमाणे आहे. अशी माझी सर्व सभासदांना नम्र विनंती आहे. शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलाच्या नामांतराचा ठराव मंजूर झालेला आहे आणि असे असतांना आपण नोटीस का काढत आहेत? याची आपण आधी माफी मागावी. याठिकाणी सही प्राजक्ता कुलकर्णी यांची आहे, आपल्याकडून ही चुक झालेली आहे. या ठिकाणी व्ही.टी.सी. क्रिडा संकुलच्या ऐवजी मा. सशिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल असा उल्लेख उल्लेख पाहीजे. आपण व्ही.टी.सी.क्रीडा संकुल अशी नोटीस का काढली हे आपण सांगा? बाळासाहेबांचा उल्लेख का नाही? या ठिकाणी आपण या सभेची माफी मागावी. मग पुढील कामकाज चालू करावे. इंदिरा गांधींचे नाव तुम्ही टाकू शकता मग मा.बाळेसाहेबांचे नाव तुम्ही का टाकू शकत नाही?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारीयाः—</u>** मा. महापौरजी, महापालिकेला जर आपली मालमत्ता विकसीत करण्याची परवानगी असेल.......

**<u>सदस्य श्री. सुरेंद्र सावंतः—</u>** वदारियाजी,एक मिनीट प्राजक्ता कुलकर्णी यांनी माफी मागावी. अशी माझी विनंती आहे, आपण या ठिकाणी मा. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव का वगळले? जर इंदिरा गांधीचे नाव तुम्ही छापतात तर बाळासाहेबांचे नाव का छापत नाहीत, ते मला सांगा.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारीयाः—</u>** या महानगरपालिकेला परवानगी आपली मालमत्ता विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परवानगीची गरज आहे. तर ते शासनाच्या कोणत्या नियमान्वये? कोणत्या जी.आर.मध्ये, कोणत्या नोटीफिकेशनमध्ये लिहीले आहे. हे आधी आम्हाला सांगावे. कुठे लिहिले आहे? की, महापालिकेला जरूरी आहे शासनाला विचारायची?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** सन्माननीय आयुक्त साहेब आमचे मित्र श्री. राजेश वधारीया यांनी सांगीतले, आपण कायदेशीर युजर आहोत, आपण कायदेशीर त्या जमीनीचे मालक नाहीत. जर युजरला कुठला निर्णय घ्यायचा असेल तर मूळ मालकाची परवानगी घ्यावी लागते. तर युजरनी परवानगी घ्यावी एवढेच माझे तुम्हांला सांगणे आहे. आणि तसा जी.आर. आहे. पाहिजे तर मी तो आणून देऊ शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—</u>** पहिली गोष्ट अशी की, हे सर्वांना माहित आहे की, सदर तीन्ही मालमत्तांची मूळ मालक हे महाराष्ट्र शासन नसून केंद्र शासन आहे. याची आम्हाला सनद मिळाली आहे आणि उल्हासनगर शहर इथे वसलेले आहे आणि आपल्याला ज्या तीन प्रॉपर्टी मिळाल्या आहेत, त्याचे मुळ मालक महाराष्ट्र शासन नाही, त्याचे मुळ मालक गव्हर्नमेंट ऑफ इंडिया आहे. त्यांची ती पॉप्युलेशन प्रॉपर्टी आहे आणि त्यामुळे आम्हांला ही सनद मिळाली आहे. जी सनद आम्हांला देण्यात आली आहे, ती कॉकेजेशन कुल प्रॉपर्टीमधून एक प्रॉपर्टी आहे, त्यामुळे आम्हांला सनद मिळाली आहे. त्याचे मालक गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र नाही, १९८७ मध्ये त्या प्रॉपर्टीच्या देखभालसाठी...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** आपण येथे वकीली करत आहात काय? तुम्ही कोण आहात महापालीकेचे, ही केंद्र शासनाची मालमत्ता नाही, ही महाराष्ट्र शासनाची मालमत्ता आहे. मा. आयुक्त साहेबांनी सांगावे की, ही महाराष्ट्र शासनाची मालमत्ता आहे की, केंद्र शासनाची मालमत्ता आहे. हे वकील ठेवले आहेत का प्रशासनाने, बिन पगारी फुल अधिकारी, बिन पगारी फुल अधिकारी वकील ठेवले आहेत का?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** प्रशासन एवढया खालच्या थराला गेले आहे का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** यांची काय गरज आहे? यांना बोलण्याची काय गरज आहे? बिन पगारी फुल अधिकारी.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—</u>** याचा अर्थ असा होतो की, आपल्याला याबाबत माहिती घ्यायची नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** मा.आयुक्त साहेब याचे उत्तर आपण द्यावे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u>** ठिक आहे, तुम्ही बसून घ्या.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आयुक्त साहेबांनी आम्हांला माहीती दयायला पाहीजे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** एक मिनीट आपण शांत बसावे. तुमचा माईक चालू होणार नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** प्रशासनाने त्यांना...

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** तुम्ही आम्हांला माहीती देणार तर आम्ही ती मान्य करणार नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** हे बघा, सर तुमचा माईक चालू होणार नाही पाच मिनीट तुम्ही बोला एक एक करून बोला.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** महापौरजी बाळासाहेब ठाकरे उद्यनाचे नाव लिहीले नाही, त्याचे उत्तर पहीले तुम्ही मागायला पाहीजे, प्रशासनाने मागायला पाहीजे. ही गोष्ट लाजीरवानी आहे, बाळासाहेबांचे काम का लिहीले नाही? आम्ही ठराव पास केला आहे, तर यामध्ये नाव का घेतले नाही?

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** ठिक आहे, सराना उत्तर देवूदया तुम्ही लोक बसून घ्या.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** माफी मागून उत्तर दयायला पाहीजे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** ठिक आहे, तुम्ही बसून घ्या.

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—</u>** मॅडम आम्ही तुम्हांला सहकार्य करू, पहीले माफी मांगा कारण आमच्या बाळासाहेबांचे नाव लिहीले नाही.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** पहीले मा. बाळासाहेबांचे नाव लिहीले गेले नाही, आयुक्त साहेब, आम्ही सभा चालू देणार नाही.हा समस्त शिवसैनिकांचा व समस्त महाराष्ट्राचा अपमान आहे.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—</u>** संपुर्ण सभागृहाचे अपमान आहे.

या वेळी काही सदस्यांनी सभागृहात मा.बाळासाहेबांचे नावाची घोषणाबाजी करण्यात आली.

**<u>सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे:—</u>** पहीले तुम्ही व्ही.टी.सी. चे नाव बघा आणि माफी मागा तुम्ही बाळासाहेब ठाकरे यांचे नाव लिहीले नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** आयुक्त साहेब, तुम्हाला कदाचित माहित नसेल की, व्ही.टी.सी.क्रीडा संकुल म्हणजे वोकेशनल ट्रेनिंग सेंटर, वोकेशनल ट्रेनिंग सेंटर हे ब्रिटीशांच्या काळामध्ये या विस्थापितांसाठी असलेले एक पुनर्वसन उत्पादन केंद्र होते. तेव्हांपासून म्हणजे ब्रिटीश कालापासून तेथे व्ही.टी.सी. असे नामांतरण झाले. तिथे बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल रितसरपणे महासभेने ठराव पारित केला त्याठिकाणी या नावाचा गेट लावलेला आहे. संपुर्ण क्रिडा संकुल झाले.

**<u>सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे:—</u>** आणि आपल्या पुर्व महापौरांनी, सगळया मंत्र्यानी उद्घाटन कलेले आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** एवढे सगळे असतांना सुध्दा पुन्हा व्हि.टी.सी. हा आपल्या महापालिकेकडून होते, खरोखर खेदजनक बाब आहे, आपल्या अधिका—यांना हे माहीती नाही का? पण बाकीच्या अधिका—यांना माहीत आहे. जाणूनबजून प्रत्येकवेळी आम्ही सदस्यानी व्ही.टी.सी. च्या ऐवजी बाळासाहेब ठाकरेच उल्लेख केलेला आहे. असे असतांना पुन्हा जाणीवपुर्वक व्हि.टी.सी. असा चुकीचा उल्लेख परत का येतो? पुढचा विषय मी नंतर घेईल. तर आपण आता या बाबतीत टाऊन हॉल, टाऊन हॉलचा विषय हा याचे नांव अरूण कुमार वैद्य सभागृह आहे, परंतु तिथे अजुनही टाऊन हॉलच म्हटले जात आहे. अरूण कुमार वैद्य, मा.बाळासाहेब ठाकरे यांना वगळून तुम्ही व्हि.टी.सी., टाऊन हॉल, अशी ब्रिटीश कालीन परंपरा चालवित आहात ही चुकीची पध्दत आहे. आणि म्हणून सभागृहाचे हे म्हणणे आहे की, प्रशासनाने जो अजेंडा काढलेला आहे तो चुकीचा आहे. तो बाळासाहेबांचा अपमान आहे, म्हणजे पुन्हा व्हि.टी.सी. डॉ.अरूण कुमार वैद्य व मा. बाळासाहेब ठाकरे यांना विसरून जायचे हे पाप आहे, गुन्हा आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>** मा. महापौरजी....

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:–</u>** श्री. जमनूजी आधी माफी मागावी.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–</u>** मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर, नगरसचिव व या सभागृहातील सर्व सन्माननीय नगरसेवक, नगरसेविका आणि उपस्थित माझे सर्व अधिकारी, कर्मचारी बंधू, भगीनींनो व उपस्थित सर्व माध्यमांचे प्रतिनिधी आणि सर्व माझे पत्रकार मित्र, आज जो प्रस्ताव आपण या महासभेसमोर आणलेला आहे, त्या प्रस्तावामध्ये व्ही.टी.सी.ग्राऊन्ड क्रीडा संकुल, बोटक्लब व इंदिरा गांधी भाजी मार्केट, मी आपल्या महापालिकेमध्ये काही दिवसांपूर्वीच चार्ज घेतलेला आहे. आदरनिय मा.बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल आपल्या ह्रदयामध्ये जेवढे प्रेम आहे तेवढेच माझ्या ह्रदयामध्ये देखील प्रेम आहे. जाणूनबुजून मी काही मा.बाळासाहेबांच नांव डावललेले नाही. परंतु मला कल्पना नाही की, या ग्राऊंडचे नाव, आपण आता म्हणलात की टाऊन हॉलचे नाव अरूण कुमार वैद्य आह. तर सभागृहामध्ये जो प्रस्ताव आणला आहे,याचे मध्ये आम्ही दुरूस्ती, मी उदाहरण दिले आहे. मी नविन असल्यामुळे मला कल्पना नव्हती. आपल्याला असे वाटत असेल की आम्ही मुदामहून केले. तर प्रशासनाच्या वतीने मी दिलगीरी व्यक्त करतो आणि या नावांची दुरूस्ती आम्ही व्हि.टी.सी ग्राउंडची आदरणीय ह्रदयसम्राट शिवसेना प्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल असे करण्यात असे जे नाव आहे, त्याच नावाने, त्यांचे नाव त्या ठिकाणी देण्यात येईल आणि महासभेने ते मान्यच केलेले आहे आणि जे टाऊन हॉलचे नाव आहे, तिथे डॉ.अरूण कुमार वैद्य आता जुने नाव असल्यामुळे लोक कुठे जायचे टाऊन हॉलला जायचे. ब–याच लोकांना माहीत नसते की, तिथे अरूण कुमार वैद्य साहेबांचे नाव दिलेले आहे. परंतु ते परिचित व्हायला नविन पिढी त्या वेळेस पुढे पण जुने माणसे आपण जुन्या बसस्टॉपला जायचे, नविन बस स्टॉपला जायचे असे.....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** इंग्रज गेले पण सोडून गेले.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–</u>** इंग्रज सोडून गेलेत पण आपण त्याला नाव दिले आहे, त्याला आम्ही नाकारतच नाही. आपण म्हणालात त्या बददल, प्रशासनाच्या लक्षात आणून दिले आणि या पुढे आमच्या हेड ऑफ डिपार्टमेंटकडून अशा प्रकारची चुक होणार नाही, म्हणून संबंधित हेड ऑफ डिपार्टमेंटच्या त्यांनी असा उल्लेख करायला नाही पाहीजे होता, तो केला गेला यापुढे त्यांना ताकीद देतो की, असे होणार नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** टाऊन हॉलचा जो उल्लेख झाला, त्याच्यामध्ये अरूण कुमार वैद्य अस नाव आहे त्यांचे. टाऊन हॉलचे सध्या टाऊन हॉलला आपण बी.ओ.टी. तत्वावर दिलेले आहे. बरेच वर्षे झाली परंतु तिथला जो संबंधीत ठेकेदार आहे, त्याला लाज वाटते जनरल अरूण कुमार वैद्य, टाऊन हॉल असे नाव लिहायला. त्यावर नाव लिहीलेले नाही, ती शंका मोठी आहे आणि ते नाव लिहीले पाहीजे, अशी आमची मागणी आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–</u>** महापालिकेने जे नांव दिलेले आहे ते महापालिकेमार्फत लिहिण्यासाठी कारवाई करण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** मा. महापौर मॅडम, मला याबद्दल असे म्हणायच आहे की....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** साहेब, जागेच्या संदर्भात, बी.ओ.टी. च्या संदर्भात.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** आपण यासाठी दिलगीरी व्यक्त केलेली आहे, त्याच्यासाठी आम्हांला तुमची दिलगीरी मान्य आहे. पण मला हे सांगा आपल्याला फक्त २२ दिवस झालेले आहेत. यामध्ये तुम्हांला २२ दिवसात तुम्हांला पाहीत नसेल की, याचे नाव आदरणीय बाळासाहेब ठाकरे हे क्रिडा संकुल आहे. पण कुठल्या विभागाने हे बनवलेले आहे, हे मला जाणीव करून दयावी आणि कोणी चुक केलेली आहे, ज्यांनी चुक केलेली आहे, त्याला कमीत कमी कारणे दाखवा नोटीस तरी दिली पाहिजे. ही खूप मोठी चूक आहे. हिन्दू ह्रदय सम्राट हे संपूर्ण देशाचे हिन्दू ह्रदय सम्राट आहेत आणि तुम्हांला येऊन २२ दिवस झालेले आहेत, तो वाद

नाही. परंतु जे वर्षानुवर्ष काम करीत आहेत, त्यांच्याकडून चुक झालेली आहे. त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहेत, याचे उत्तर दयायला पाहीजेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** संबंधीत नगररचना विभागाकडून हा प्रस्ताव आलेला आहे. त्यांचे विभाग प्रमुखांनी ही गोष्ट लक्षात ठेवून व्ही.टी.सी.क्रीडा संकुल ऐवजी हिन्दू हृदय सम्राट मा.शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल असे नांव तिथे कंसात तरी तिथे लिहीणे आवश्यक होते. तिथे जुने नाव व्हि.टी.सी. होते आणि बाळासाहेबांचे नाव लिहीले आहे, असे निदर्शनास आणयला पाहीजे होते. ते त्यांनी निदर्शनास आणून न दिल्यामुळे याबद्दल सन्माननिय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे संबंधीत विभाग प्रमुखांस कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल आणि यापुढे असे होणार नाही याची १०० टक्के दखल घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा.महापौर, मा.आयुक्त साहेब, बोटक्लब व मा.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलाची मागणी आपण प्रांतअधिकारी कार्यालयाकडे कधी मागणी केली होती? हा जो प्लॉट महापालिकेला मिळाले आहेत त्यांची मागणी आपण प्रांतअधिकारी कार्यालयाकडे अथवा शासनाकडे कधी केली आहे? जे आता तिन्ही प्लॉट मिळाले आहेत.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** जे आपल्याला १८८६—८७ मध्ये आपल्याला देण्यात आले होते, त्यावेळेस पत्र व्यवहार चालू होता. परंतु आता मिळाले आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** ही मागणी जुनी आहे १८८६—८७ ची ठिक आहे.याच्या नंतर जसे हॅन्डवर्क झाले तसे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** माझ्या प्रश्नाला उत्तर दया, आपण जो प्रस्ताव आणला आहे, बी.ओ.टी. तत्वावर तो मालमत्ता विभागाने येऊन सांगावे, मालमत्ता विभागाने आम्हांला सांगावे की ही जागा आपली आहे की, सरकारची आहे. प्रॉपर्टीकार्ड जरी आपला झाला असेल.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** जेव्हा जागेचे मालक आपण आहेत, सनद आपल्या नावाने झालेली आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तुम्ही महाराष्ट्र सरकारने बी.ओ.टी. वर दयायचे असेल तर महाराष्ट्र गव्हर्नरची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** एक लक्षात घ्या, ज्या वेळेला पुर्वी आपल्याला फक्त ताबा दिलेला होता, त्याचे मालकी हक्क सन १८८६—८७ दिलेले नव्हते त्यामुळे ते आपल्याला शासनाला विचारायचे आहे… .

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** जर आपण बी.ओ.टी. वर करीत आहेत, आपण ८ दिवसापुर्वी जमीनीचा नाही नाही, आपण बी.ओ.टी. साठी आणला आहे ना.जमीन आपल्याला मिळाली आहे, फक्त ८ दिवस झाले. महाराष्ट्र गव्हर्नमेंटची परवानगी न घेता आपण बी.ओ.टी. वर देतो

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मा. महापौर मॅडम, हिंदीमध्ये एक म्हण आहे, 'कहूँ तो माँ मरती ना कहूँ तो बाप कुत्तां खाता' विकास होत नाही, विकास होत नाही आणि विकास आणला तर म्हणतात का आणला? सर्वात मोठी गोष्ट ही आहे की…

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मा. आयुक्त साहेब आमचे म्हणणे आहे की, तुम्ही विकास करा पण तो कायदेशीर करा. तुमच्या विकासाला आमचा कधीच विरोध नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** आयुक्तांना बोलू दया, बोला आयुक्त साहेब.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सर जेंव्हा आयुक्त साहेब बोलतात तेंव्हा त्यांचे म्हणणे आधी पूर्ण होवू द्या. आपण बसावे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** आयुक्त साहेब बोलत असतांना सर्व मध्ये का बोलत आहेत? आयुक्तांना बोलू दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, सभागृहामध्ये डेकोरेट मेंटेन होत नाही, कोणी पण आपल्याला विचारून बोलावे? आयुक्त साहेब बोलत आहेत आणि सर्वच मध्येच बोलत आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** माझी आपणांस विनंती आहे, सर्व नगरसेवक व नगरसेविकांना विनंती आहे, की सभागृहाचे पावित्र्य राखणे सर्वांचे कर्तव्य आहे. प्रशासनाचेही आहे आणि आपलही आहे. मा. महापौरांनी एखाद्या नगरसेवक अथवा नगरसेविका यांना बोलण्याची परवानगी दिल्या नंतर त्यांचे जोपर्यंत बोलणे होत नाही तोपर्यंत दुस—या सदस्यांनी मध्येच उठून बोलू नये, अशी माझी पण प्रशासनातर्फे विनंती आहे आणि आपल्या प्रश्नाचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर आपल्याला काय बोलायचे ते बोलावे. म्हणजे मला अस म्हणायचे होते की, या सभागृहामध्ये आपण वर्षानुवर्ष विकासापासून वंचीत आहोत. त्या जागेवरती ताबा आपला आहे पण मालकी आतापर्यंत आपली नव्हती आणि शासनाने आता आपल्या ताब्यामध्ये दिली आहे आणि आपल्या महापालिकेच्या नावाने सनद दिलेली आहे. आणि म्हणून आपण हा प्रस्ताव महासभेच्या समोर आणला आहे. आजच्या तारखेला प्रशासनाला असे वाटते की, महापालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची आहे. त्यामुळे महापालिकेच्या निधीमधून एवढा मोठा प्रोजेक्ट आपण आजच्या तारखेला विकसीत करू शकणार नाही. आणि त्याला पुढे मेंटेन देखील करायचे आहे. त्याच्यात आणखीन रस्त्यामध्ये ब—याचशा लोकांच्या जागा गेलेल्या आहेत. काही लोक रस्त्यावर आलेली आहेत. या शहरामध्ये महापालिकेच्या मालकीची दुसरीकडे जागा नाही. मग इंदिरा गांधी मार्केट जे आहे त्यामध्ये आपण दुकान केंद्राच बांधकाम केल तर काही दुकान आपण महापालिकेला देवू, काही दुकान बी.ओ.टी. वर दिली तर त्यासंबधी जे विकसीत करणार आहेत त्यांना जातील. आणि महापालिकेला जी दुकाने येतील ती दुकाने या शहरातील नागरिकांची जी रस्त्यामध्ये दुकाने गेली त्यांना आपण काहीतरी प्रस्तापित करू शकू. या दृष्टीकोणातून हा प्रस्ताव आम्ही आपल्या समोर आणलेला आहे. दुसरा प्रश्न राहिला की, महासभेमध्ये हा प्रस्ताव आणणेसाठी शासनाची मान्यता लागते का? महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे, महापालिकेच्या ताब्यामध्ये आहे. माझ्या माहितीनुसार नगरपालिकांना बी.ओ.टी. तत्वावर जर समजा विकसीत करायचे असेल तर शासनाची परवानगी लागते. मात्र नगरपालिकेला पण महानगरपालिकेला बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करण्यासाठी परवानगी लागते असे मला वाटत नाही. पण आमचे सन्माननीय सदस्य भगवानरावजी भालेराव यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, जर आवश्यकता असेल तर शासनाची परवानगी आणल्या शिवाय पुढील कोणतीही कारवाई केली जाणार नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** साहेब मला दुसरा एक प्रश्न विचारायचा आहे. व्हि.टी.सी. बी.ओ.टी. तत्वावर ते सन्माननिय बाळासाहेब ठाकरे ग्राऊन्ड आहे आपण बी.ओ.टी. तत्वावर देण्यात प्रस्तावित केला आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** प्रस्तावित प्रशासनाने केलेला आहे, काय करायचे याचा निर्णय सभागृहाने घ्यायचा आहे?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** प्रस्तावित केलेला आहे पण साहेब मला एक सांगायचे आहे, मागच्या वर्षी आपण त्याच्यावरती दोन कोटी रुपये खर्च केलेत आता दहा रुपये येवून पडलेत, आवश्यकता आहे का? सन्माननिय बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलनाला बी.ओ.टी. तत्वावर देण्याची आवश्यकता आहे का, मला तेवढे सांगा. आणि दरवर्षी दोन कोटी रुपये त्याच्यावर येणार आहेत. कारण आपल एक ग्राउन्ड चार नंबरचे दसरा मैदान याचे एक कोटी व मा. बाळासाहेब ठाकरे क्रडी संकुलनाचे एक कोटी असे दरवर्षी दोन कोटी रुपये आपल्याला मिळणार आहेत. तर काय आवश्यकता आहे ते बी.ओ.टी. तत्वावर केल पाहिजे? याचे मला सविस्तर प्रशासनाकडून खुलासा मिळावा.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मा.श्री.भगवानजी भालेराव साहेब आपल्या प्रश्नाचे उत्तर मी देत आहे. तर बी. ओ.टी.तत्वावर विकसित करण्याची काय आवश्यकता आहे? असे आपण म्हटले आहे. बरोबर. हा प्रशासनाने आपल्यासमोर प्रस्ताव आणलेला आहे, म्हणजे या मलापालिकेचे काहीतरी भले व्हावे, या क्रीडा संकुलामध्ये मा.बाळासाहेब ठाकरे नावासारखे चांगले क्रीडा व्हावे असे आमच्या मनामध्ये उद्देश आहे आणि त्या ठिकाणी जे क्रीडा संकुल आहे तिथे दुकान केंद्रही होवू शकते, क्रीडा संकुल पण होवू शकते, तुमचे बॅटमिंटन कोर्ट पण

होवू शकते. टेनिसकोर्ट होवू शकते, जीम होवू शकते, त्याठिकाणी येणा—या खेळाडूंना राहण्याची सोय होवू शकते. तिथे एखादी चांगली कॅन्टींन होवू शकते, चांगला स्विमींगपूल होवू शकतो. या सगळया गोष्टी तेथे आपल्याला करायच्या आहेत. म्हणजे करावे तर मा.बाळासाहेबांच्या नावासारखे करावे अशा पध्दतीने म्हणून यासाठी आम्ही हा प्रस्ताव आणलेला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** मान्य आहे साहेब आम्हाला, फक्त दहा कोटी रुपयांचे काय करणार ते सांगा?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** दहा कोटी आपल्याकडे येवून पडलेले आहेत आणि ते दहा कोटी आपल्या तिजोरीमध्ये आहेत. दहा कोटीमध्ये जी भव्यता आहे ती होणार नाही. आपण दहा कोटी खर्च करू पण त्याच्यामध्ये थोडफार काम होईल. म्हणून पुनर्विचार आपण करावा. आपल्या ठरवायच आहे, तुम्ही जर म्हणालात की दहा कोटीतच करा तर मी उद्याच्याला तयार आहे. तुम्ही जर सभागृहात निर्णय घेतला की, दहा कोटीमध्ये जसे होईल तसे करा तर मी उद्या तयार आहे. प्रस्ताव मी आणला आहे, निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** मा.आयुक्तांनी आता सांगीतले की, जे रस्त्यामध्ये दुकाने गेलेली आहेत त्या गरीबांना आपण त्यांना इंदिरा गांधी मार्केटमध्ये दुकाने देऊ. ती कधीपासून देणार आहेत? उल्हासनगरमध्ये ब—याच वेळी रस्त्यामध्ये लोकांची घरे गेलेली आहेत. दुकाने गेलेली आहेत. मग आता तुम्ही हे पहिल्यापासून देणार आहात की, आता जे नविन गेली आहेत त्यांना देणार आहात, कुठल्या आधारावर देणार आहात तुम्ही?

या वेळी सदस्य, श्री. रवि जग्यासी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौर, मा.आयुक्त साहेब आणि सर्व सभागृह, मा. महापौरजी दिपावलीच्या आपणांस खूप—खूप शुभेच्छा. मा.आयुक्त साहेब तुम्हाला दिपावलीच्या शुभेच्छा. या उल्हासनगर शहरात प्रत्येक गरीब व्यक्ती, प्रत्येक व्यापारी, प्रत्येक नागरिक खरेदीसाठी निघतात. परंतु आपले शहराचे दुर्भाग्य आहे की, आपली महापालिका विकण्यास निघाली आहे. खूप चांगले आहे की काही विकास होत आहे. मा.आयुक्त साहेब सन्माननिय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने क्रीडा संकुल विकसीत करण्या करीता आपण जो मानस केलेला आहे तो आदरणिय आहे. परंतु प्रत्येक गोष्ट बी.ओ.टी. तत्वावर दिल्यास त्याचा वापर गरीब नागरिक कसं काय करतील? आपण चांगले काम करीत आहात, आपण विषय चांगला आणला आहे. परंतु ते बी.ओ.टी. वरच का? आयुक्त साहेब आपण नविन आले आहेत, आपण दोन मिनीटापुर्वी सांगीतले की, बी. ओ.टी.चे प्रकल्प आपण केलेले आहेत, आम्ही ते ऐकून आहोत. यास शासनाची परवानगी लागते की नाही लागत. परंतु साहेब या १३ किलोमीटरच्या शहरामध्ये ही जनता नव्याने आशा बघते की, आम्हाला कुठेतरी सुंदर उद्यान, कुठेतरी बगीचा, कुठेतरी खेळाचे मैदान, स्विमींग पूल मिळावे, पण त्याला जर निर्बंध लावून त्यांच्याकडून पैसे घेवून बी.ओ.टी. च्या ठेकेदारालाच जर बलवान करणार असाल तर ही जनता याचा काय उपभोग घेईल? आपला उद्देश एकदम शुध्द आणि चांगला आहे. महापौरजी आपला अत्यंत चांगला प्रकल्प आहे. आम्ही याचे स्वागत करतो पण बी.ओ.टी. वरच का? महापालिका का करू शकत नाही. जर आपण करू शकतो तर बी.ओ.टी.वरच का? महापौरजी सभागृहासमोर एक विषय मी सागू इच्छितो, आयुक्त साहेब ही थोडी माहिती मला भेटलेली आहे. आयुक्त साहेब आपण कृपया जरा लक्ष द्या. आपल्या महापालिकेमध्ये एक गोष्ट बी.ओ.टी. वर देण्यात आलेली होती. परंतु कोणत्याही नियमाचे पालन त्याच्यात केले गेले नाही. या सभागृहात जर मी काय सांगतो तर मला माहित आहे की, सभागृहात जे बोलणे होते त्यास कायदा, कानुन, कलम लागते. आपल्या महापालिकेमागे तरणतलाव बी.ओ.टी. तत्वावर दिलेला आहे. आयुक्त साहेब आपण नविन असल्याने आपल्याला माहित नाही. तरणतलाव जेंव्हा बी.ओ.टी. वर दिला त्या तरणतलावाचे बांधकाम इमारत बांधून झाली, येथील जुनी इमारत निष्कासीत करण्यात आली. नाकवा नावाच्या व्यक्तीस यास सल्लागार म्हणून नेमण्यात आले. मा.महापौरजी हा विषय आपल्याला माहित आहे की नाही मला माहित नाही, जर अशाच पध्दतीने विकासकार्य होत राहिले तर महापौरजी आपण या शहरास काय देणार? बी.ओ.टी. वाल्यांनी लक्ष देवू नका.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मी ऐकले आहे, वाचले आहे की, एक सदस्य, सात मिनीट बोलू शकतात, कारण की दुस—याला पण बोलण्याची संधी दया, मुद्दयावर बोला आणि थोडक्यात सांगा.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** थोडक्यात सांगतो मॅडम की, बी.ओ.टी. तत्वावर देण्यात येऊ नये. एकदम थोडक्यात

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ठीक आहे, दुस—या सदस्यांचे पणम्हणणे ऐकुन घेऊ.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापौर मॅडम ला या गोष्टीचा आनंद आहे की, आपण सर्व सदस्यांना बोलण्याची संधी दिली व देण्यात आली पाहिजे. माझे मित्र श्री.आरूणजीने खूप चांगले सांगीतले.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मॅडम आपण थोडक्यात सांगितले आहे, थोडक्यात सांगावे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** एक मिनीट प्रत्येक सदस्य ५ ते ७ मिनीट आपले म्हणणे मांडू शकतात. ७ मिनीट झाल्यानंतर मी त्यांना खाली बसायला सांगेल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मॅडम पण ते मुद्यावर बोलत नाहीत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** कोणीची निंदा झाली नाही पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** माझ्या मित्राचे म्हणणे आहे की, बी.ओ.टी. वर देण्यात येवू नये, परंतु मी आपणांस सांगू इच्छितो की, जेंव्हा तरणतलाव जेव्हा बी.ओ.टी. वर दिला होता, तेंव्हा महापौरांच्या खुर्चीवर शिवसेना पक्षाच्या सौ. अपेक्षा पाटील बसल्या होत्या. माझे सांगणे आहे की, यांनी दिले तर चांगली गोष्ट आहे व आम्ही दिले तर वाईट गोष्ट आहे. असे चालणार नाही मॅडम. माझे म्हणणे आहे की, आपण भुतकाळ पाहा त्यावेळी विकासाच्याबाबतीत आम्ही यांच्याबरोबर होतो आजही आहे. परंतु आज हा भेदभाव का? मा.आयुक्त साहेबांनी सांगीतले की, बी.ओ.टी. वर देण्याची आवश्यकता आहे. तिजोरीत पैसे नाहीत. शहराचा विकास करायचा आहे. आज देशाकडे पैसा नसेल तर विश्वातील दुस—या देशाकडून पैसे घ्यावे लागतात. काम व्हायला पाहिजे, कामात गती व्हायला पाहिजे. या कामास गती दिल्याबद्दल मी मा.आयुक्तांचे आभार मानतो. आपण विकास करावा सत्तापक्ष व विरोधी पक्ष आपल्या सोबत असेल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय....

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** एक मिनिट, सुर्वेजी तुम्ही बोला.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा.महापौर, मा. उपमहापौर, मा.आयुक्त साहेब सर्व उवापोह आपण सर्वांनी ऐकला येथे सुरवातीलाच लिहिलेले आहे की, १६० होते. त्या भुखंडांचे हस्तांतर महापालिकेकडे केले होते. मला वाटते या सभेच्या माध्यमातून मा.आयुक्त साहेब व मा.नगररचनाकार साहेब यांनी जे १६० भुखंडाची आज काय अवस्था आहे त्याची? त्यांतील किती बाकी आहेत? आता ४ आपणांस मिळाले अजूनही शासनाकडून आणायचे असतील तर ते आपण आणू. आम्ही त्याबद्दल सहकार्य करू. कारण विकासाचा विषय आहे, मा. मोदीजींचा विकासाचा विषय आहे, परंतु मा.मोदीजींचा जो विषय आहे ना तो गरिबांकरीता आहे, हे लक्षात घ्यावे. आपण जे मगाशी सांगीतले की, कुत्ता काटके खाया, ही वाक्य आता लागू होतात की नागरिकांना मारा आणि काही धनदांडग्यांसाठी व्यापार करा, धंदा करा. हे या माध्यमातून सरळ—सरळ दिसते. आज क्रीडा संकुलाचे १० कोटी रुपये आपल्याकडे आलेले आहेत. बाकीची मागणी सरकारकडे करायची आहे, काही आपण टाकायचे आहे. आतातरी लहान मुले त्या मैदानात खेळतात, क्रीडा मैदानाचे संकुल झाल्यानंतर त्याच्यात बदल काय होणार आहे माहीती आहे? सर्वसामान्य गरीबाची मुले तेथे पायही ठेवू शकणार नाहीत. ही सत्यता आहे. तुम्ही वास्तविकतापण लक्षात घ्या. आमचे पंतप्रधान मोदी म्हणतात की मी फक्त गरिबांकरीता लढतोय, परंतु येथे काही गरिबांकरीता दिसत नाही आणि ही परिस्थिती १६० सन्माननिय नगररचनाकार यांनी १६० भुखंडांची परिस्थिती पण सांगावी. आज हा चांगला विषय आला आहे. वारंवार ते ७०५ वर बांधकाम काय चालू आहे, आणि ते बांधकाम कोणाचे आहे हे सर्वांना माहित आहे. मला नाव नाही घ्यायच पण तुम्ही सर्व सुज्ञ आहात. तुम्हांला खुप माहीती आहे, तुम्ही जी उत्तरे आम्हाला दिलीत त्याच्यातून एक निष्पन्न झाल की

तुम्ही प्रत्येकाला ओळखलेल आहे. आयुक्त म्हणून तुम्ही प्रत्येकाला ओळखलेल आहे की, कोणाची आवड, रस कशात आहे. ७ मिनीट नाही तीनच मिनीट झालीत अजून ४ मिनीट आहेत. खूप काही बोलू शकतो त्याच्यामध्ये. येथे माझी तिसरी व माझ्या पत्नीची पाचवी टर्म आहे. त्यामुळे ही गोष्ट मी वारंवार बघतो, ही नाटक आणि अचानक मग एकत्र येणे आणि एकत्र बहुमतान पास करणे हे सगळ येथे होते. येथे काय नाही घडू शकत? हे सगळे होऊ शकते. आज मला या अनुषंगाने तुम्हाला एवढच सांगायचे आहे की, मा. महापौरजी आपण प्रथमच महापौर बनला आहात आणि ज्या परिवारातून बनल्या आहेत त्या परिवाराने या शहरास खूप काही दिले आहे. आमची आपल्याकडून अपेक्षा अशी आहे की, आपल्या परिवाराकडून गरिबांसाठी मिळाले पाहिजे. हा दृष्टिकोन ठेवून जर आपण कार्य कराल तर हे जे मधले लोक आहेत जे वकिली करत आहेत त्यांचे काही चालणार नाही. दलाली शब्द चुकीचा आहे म्हणून वकीली करणे. ओन्ली बिझनेस ओन्ली पैसा. आपल्या शहराला काय दयायचे आहे? आता आपण महापौर आहेत, त्या परिवाराच्या सूनबाई आहेत. आपणांस याच्यावर अंकूश ठेवला पाहिजे मला नाही वाटते आपण ठेवाल, कारण स्थायी समितीची ताकद वेगळी आहे आपली ताकद वेगळी आहे. हे आम्हाला माहित आहे. मी जे सांगतआहे ते आपणांस व काही लोकांना ऐकण्यास वाईट वाटेल, परंतु हे सत्य हे आहे की जेवढया लवकरात लवकर होईल, आता पहा की, टाऊन हॉलचा गरिब लोक उपभोग घेवूच शकत नाही. टाऊन हॉल नाही, अरूण कुमार वैद्य माफ करा सवय झाली आहे. दुसरा साई बलराम यांचे नावे आहे. आज तेथे पहा काय आहे? तेथे पहा सामान्य नागरिक तेथे २०/२५ रुपयांत स्विमींग करू शकत नाही. त्या हॉटेलमध्ये प्रवेश करू शकत नाही. हे केंव्हा झाले हे मलाही माहित नाही. आम्ही फक्त स्विमींगपूल दिला होता. ही चौकशी होणे गरजेच आहे. हे एवढे सोपे नाही आहे. जर वाटत असेल काही लोकांना, आज तेथे रूम झालेत त्या रूममध्ये काय चाललय काय नाही? या सगळया गोष्टी आहेत साहेब. तुम्हाला जसे हे लोक चित्र दाखवतात तस चित्र नाही. उद्या जेंव्हा निवृत्त झाल्यानंतर येथे चौकशीला यायला लागेल ना तेंव्हा तुम्हाला कळेल की वाईट लोकांच्या संगतीला होतो म्हणून. हे लक्षात घ्या आणि स्पष्टपणे या सर्वासमोर सांगतोय आज जी परिस्थिती आहे, एकच मिनीट उरला आहे, संपवतो, १६० भुखंड आहेत त्यातील ४ आता दिसत आहेत, २/४ अजून आहेत. त्याची जरा माहिती निवांत दिली तर फार बरं होईल.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** ७०५ चे बोला, ७०५ चे काय झाले?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा.महापौर, मा. उप महापौर, मा.आयुक्त साहेब मगाशी व्ही.टी.सी.ग्राउन्डच्या संदर्भात आपण जे सभागृहाला सांगीतले की, प्रशासनावर ज्यांच्याकडूल जी चुक झाली असेल, व्हि.टी.सी. ग्राउंडच्या संदर्भात त्याच्या बदल तुम्ही कारणे दाखवा नोटीस देणार आहेत,परंतु माझे म्हणणे असे आहे की, त्यांच्यावर तर कारवाई झालीच पाहिजे. परंतु ज्यांनी गोषवारा पाठवला आहे त्यांच काय? ज्या स्वाक्षरीसह गोषवारा आलेला आहे, त्यांच काय? गोषवारा हा सन्माननिय नगरसेवकांनी पाठविला आहे, त्यांचे काय करणार? हा एक विषय. मा. महापौरजी, आयुक्त साहेब मगाशी म्हणाले की ते २०/२२ दिवसांपासून आले आहेत. परंतु माझी माहिती अशी आहे की त्यांना उल्हासनगर बद्दल पूर्वीपासून सर्व काही माहित आहे आणि आज या शहराचा इतिहास आहे की, उल्हासनगरचे सिंगापूर बनविण्याच स्वप्न त्यावेळी मा.पप्पू कलानी यांनी पाहिलेल होते. महाराष्ट्रात सर्वात प्रथम सिमेंट कॉंक्रेटचा रस्ता या उल्हासनगर शहराला मिळालेला आहे. हे सर्व होत असतांना त्यानंतर  मा.आमदार, सौ.ज्योती कलानी यांनी या महापालिकेमध्ये अडीच वर्ष महापौर पद भोगले. त्यांच्या कालावधीत पण उल्हासनगर शहराचा विकास करण्याचा प्रयत्न सर्वांनी केलेला आहे आणि आज...

**मा. महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सर विषयावर बोला.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मी विषयावरच येत आहे, विषयाची पार्श्वभुमी सांगणे गरजेचे आहे, आज आपण स्वतः महापौरांच्या खुर्चीवर बसले आहात आणि या वेळी हा जो बी.ओ.टी. चा प्रस्ताव आणला आहे, मला वाटते की आपण ट्वेन्टी—ट्वेन्टी मॅच खेळत आहोत. जेवढया लवकर होईल शहराचा विकास झाला पाहिजे. परंतु त्याचा अर्थ असा नाही की, लोकांची दिशाभूल करावी, गोर—गरीब जनतेला याचा उपभोग घेता आला पाहिजे. जर असे होत नसेल तर त्याला काही अर्थ नाही. मी आपणांस हे सांगू इच्छितो की, एवढी वर्षे राज्य केल्या नंतर १६० भूखंड होते त्यातील आज मोजकेच वाचले आहेत. हे दोन—तीन भूखंड आपण विकासीत

करीत आहोत, परंतु ७०५ चा प्लॉट जो मनोरंजनासाठी आहे, तो हडप करण्यात येत आहे. तरी देखील आपण कोणती कार्यवाही करत नाहीत. याचा आम्ही काय अर्थ समजावा? हे सरकार काय करीत आहे? हे सरकार जाणूनबुजून भूखंडाचा श्रीखंड खाण्याचा प्रकार या शहरामध्ये चालू आहे. हे मा.आयुक्तांनी थांबविले पाहिजे, आयुक्तांनी गंभीरपणे याची दखल घेतली पाहिजे आणि हे करत असतांना बी.ओ.टी. तत्वावर करण्याच्या आगोदर त्याचा प्रकल्प जो आहे, जो सल्लागार तुम्ही नेमणार आहेत, तो प्रकल्प पहिल्यांदा आमच्या समोर येऊ द्या. तो समोर आल्यानंतर मग त्याच्यावर विचार करता येईल. धन्यवाद !

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय महापौर मॅडम मला फक्त दोन मिनीटे बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रदीप रामचंदानी:—** झाले ना मॅडम, एक सदस्य किती वेळा बोलणार? हे भगवान!

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** प्रदिपजी तुम्ही सुध्दा किती वेळा बोलतात? आरे फाईल चोर, फाईल चोर,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** हे भगवान नाही, हे प्रदीप! अरे फाईल चोर, फाईल चोर, फाईल चोर.

**सदस्य, श्री. प्रदीप रामचंदानी:—** भूखंड चोर, भूखंड चोर, भूखंड चोर. आता सांगतो मी कुठला भूखंड चोरला तू. तुझे भूखंड चोरीच काम चालू आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** अरे कुठे आहे भूखंड मला दे?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सर दोन मिनीट मॅडमला बोलू दया.

**सदस्या,श्रीमती अंजली साळवे:—** मा.महापौर, मा.उप महापौर, मा.आयुक्त साहेब, सर्वप्रथम मी महापौर मॅडम आणि तत्कालीन मा.आयुक्त श्री.गणेश पाटील साहेब व प्रांतअधिकारी गिरासे साहेब यांचे अभिनंदन करते. कारण इतका महत्वाचा विषय, जेंव्हापासून ही महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे, तेंव्हापासून १६० भूखंड हस्तांतरित करण्याची प्रक्रिया प्रलंबीत होती. पण आम्ही देखील विविध संघटनेच्या माध्यमातून याच्यासाठी पाठपूरावा केलेला आहे आणि असे महत्वपूर्ण शहरहिताच्या निर्णयावर ४ राखीव भूखंड महापालिकेच्या नावे हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत आणि बाकी भूखंडाची प्रक्रिया सुरू आहे. म्हणून मी महापौर मॅडम व दोन्ही अधिका—यांचे आभार व्यक्त करते आणि आता महापौर मॅडम व आयुक्त साहेब उर्वरीत भूखंडाची प्रक्रिया लवकरच पूर्ण करतील अशी अपेक्षा व्यक्त करते. हा जो सदर विषय महासभे समोर आलेला आहे, भूखंड बी.ओ.टी. तत्वावर देण्याचा, इतक्या तातडीने करण्याची गरज आहे का असे मला वाटते? मा. महापौर मॅडम, मा.आयुक्त साहेब मी सांगू इच्छिते की, क्रिडा प्रेमी जनते सोबत आम्ही कॉंग्रेस पक्षातर्फे मा. बाळासाहेब क्रीडा संकुलनासाठी आम्ही सातत्याने आंदोलने केलेली आहेत. महाराष्ट्रातील उल्हासनगर महापालिका ही एकमेव महापालिका आहे, जिथे स्वत:च क्रीडा संकुल नाही आणि आता एवढया वर्षानंतर सदर हक्क महापालिकेला मिळाला आहे. तेंव्हा आयुक्त साहेब आपल्याला माहीती असेल की? क्रिडा संकुलसाठी शासनाचा जो निधी आहे, तो प्रथम उपलब्ध करून दयावा व त्याचा सतत पाठपूरावा करावा. त्यासाठी मला वाटते विधानसभा सदस्यांनीसुध्दा याचा पाठपूरावा करावा. एखादी गोष्ट बी.ओ.टी.तत्वावर जेंव्हा दिली जाते, तेंव्हा आपल्याकडे निधी उपलब्ध नसतो. शासनाकडून तो निधी उपलब्ध होऊ शकतो म्हणून आपण प्रयत्न करायला हवा असे मला वाटते. मा.आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेचा इतिहास बघता बी.ओ.टी. तत्वावर जे प्रोजेक्ट आपण दिलेले आहेत त्याचा सर्वसामान्य जनतेला काहीच फायदा होत नाही. फक्त ठेकेदारांनाच त्याचा फायदा होतो. तेंव्हा सर्वप्रथम महापालिकेने हे विकसीत करण्याचा प्रयत्न करावा, असे माझे ठाम मत आहे. मा.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलनासाठी शासनाचा निधी घेवून तो विकसीत करण्याचा प्रयत्न करण्यात यावा व नंतर न जमल्यास हा विषय महासभेसमोर आणण्यात यावा असे माझे स्पष्ट मत आहे. तसेच मागील आठवडयात देखील मिडीयावर याचा विरोध दर्शविला जात आहे, विविध संघटनेच्या माध्यमातून कायद्याने वागा व मनसे सारख्या पक्षाकडून यावर विरोध दर्शविला जात आहे, आणि मी सुध्दा बी.ओ.टी. तत्वावर देण्यास विरोध करेल. धन्यवाद!

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** मा. महापौर मॅडम

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** डॉक्टर साहेब आपण बोलावे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** नाही, नाही मॅडम मला बोलायच आहे. मी एकच मिनीट घेईल. मी चार वेळा बसलो आहे. जीवन भाई चार वेळा बसलोय मी. मला एक मिनीट बोलायच आहे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सर, यांच्या नंतर बोला, कारण ते सुध्दा चार वेळा बसले आहेत.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** भालेराव साहेब आम्हाला सुध्दा बोलायचे आहे.मला बोलण्याची संधी दिली याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो. महापौर मॅडम, १९८६ पासून जे आपण सी.डी. करीता लढाई लढत होतो, ती सी.डी. शेवटी आपल्याला मिळाली. याबद्दल मी आपले व आयुक्त साहेबांचे आभार मानतो. नाहीतर कोणीतरी भूमाफिया येवून ती सी.डी. हडप करून बसला असता. काही सदस्य बोलले की अरूण कुमार वैद्य याचे काय होते? स्विमींगपूल काय होते? आयुक्त साहेब सभागृह शांत होईल तेंव्हाच मी बोलेल.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** फक्त सत्ताधारी सदस्यांनाच तुम्ही बोलू देणार का? असे चालणार नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u>** असे चालणार नाही मॅडम, असे चालणार नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** सभागृहात ही दादागीरी चालणार नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** एक मिनीट आपण शांत रहा.

**<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u>**मी चार वेळा बसलो आहे, हे तुमचे चुकीचे आहे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** मी येथे बसली आहे. मी पाहतेय कोण हात वर करतोय कोण नाही. सर,

**<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u>** तुमचे सदस्य, मध्येच बोलत आहेत, मध्येच उठून.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** आपण ऐकत नसाल तर मी कसे बोलणार.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा.महापौरजी, सगळे बसतील आणि एक—एक करून बोलतील.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** भालेराव तुम्ही बसा मला बोलू दया,दोन मिनीटत तर बोलू दया, मी तुमचा पार्टनर आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** बोला, बोला.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मा. महापौरजी, विषय माझा होता, ज्याप्रकारे अरूण कुमार वैद्य हॉल एक खंडहर बनला होता तो आज सभागृहामुळे टाऊन हॉल नावा वरून अरूण कुमार वैद्य हॉलच्या नावाने खूप चांगल्याप्रकारे बनला आहे. त्यानंतर स्विमींगपूल बनविण्यात आला, साई बलरामजींच्या नावाने. आज तो शहराचे नाक बनला आहे. त्याचीही प्रशांसा झाली पाहिजे. ज्याप्रकारे तीन विषय आलेत, मा.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकूल, इंदिरा गांधी मार्केट, बोटक्लब, हे तीन्ही विषय मी तर म्हणतो विजया दशमीच्या दिवशी यांची पूजा करण्यात यावी. आणि याला त्वरीत चालू करण्यात यावे आणि याला आत्ताच अनुमती देण्यात यावी. हे सर्व संमतीने व्हायला पाहिजे. कारण यात मा.बाळासाहेब ठाकरे यांचे नांव आहे. आमचे शिवसेनेचे बंधू आहेत, इंदिरा गांधी मार्केटमध्ये ज्या गरीब लोकांचे दुकान तुटले आहेत ते सुध्दा विकसीत होतील. जे सन १९८५ पासून येथील नगराध्यक्ष होते, मा. पप्पू कलानीजी त्यांचे देखील स्वप्न होते बोटक्लब बनावा, तो देखील बनेल. म्हणजे पूर्ण शहरात विकासाची निशानी दिसेल आणि विकासासाठी अनुमती सर्व संमतीने मिळावी. आणि श्री. रमेश चव्हाण यांचा प्रश्न जो टाऊन हॉलचे दर कमी करावे त्यावर देखील विचार—विर्मश करायला पाहिजे. सन १९७८ मध्ये माझे वडील नगरसेवक होते त्यावेळी स्विमींगपूलसाठी सर्व नगरसेवकांना पास मिळत होता तो देखील मिळत असेल मिळावा त्यामुळे सर्व नगरसेवक आपल्या परिवारासोबत तेथे जातील व शहराचे नांव होईल. हा विषय सर्वसंमतीने मंजूर करावा. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सन्माननिय महापौर मॅडम, विषय असा आहे, आयुक्त साहेब मगाशी जो शेर म्हणाले ते मला उशीरा समजले. पण आयुक्त साहेब मी तुम्हाला सांगतो. ठाणे जिल्हयामध्ये ही महानगरपालिका आहे, आमच्या ठाणे जिल्हयाची एक पध्दत आहे ती मी सांगतो, मी स्थानिक असल्यामुळे

येथील वस्तुस्थिती सांगतो. ठाणा मुंबईला लगत असल्यामुळे आमची परिस्थिती अशी आहे की, आमच्या जमीनी असतात ना आमच्याकडे ५ एकर, ४ एकर, १० एकर आम्ही विकतो, सोन घेतो, गाडी घेतो, हायफाय बी.एम.डब्ल्युमध्ये फिरतो. परत जमीन संपली की परत दुसरी जमीन आम्ही विकतो. अशा पध्दतीची आपल्या महानगरपालिकेची पध्दत झाली आहे आणि एका बापाला जर दोन मुल असतील एक मुलगा जमीन संभाळत असेल आणि दुसरा विकत असेल तर तो नाकर्ता पुरूष म्हणून गणला जातो. मग आपल्या महानगरपालिकेची ही परिस्थिती निर्माण करायची का, आयुक्त साहेब. कारण आपण जमीन विकायची भाषा करतोय, आपण जमिनी संभाळायला पाहिजे, त्या जनतेच्या विकाससाठी वापरायला पाहिजे, आपण जमिनी विकुण त्या पैशात महानगरपालिका चालत असेल, आपले घर चालत असेल तर त्यासारखा नाकर्तेपणा महानगरपालिके सारख दुसरा कुठला नाही?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौर मॅडम,

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सर आज एक निर्णय घेऊ की, एक जण दुस—या बाजूने बोलतील आणि एक जण दुस—या बाजूने बोलतील.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** या विषयावर मी अजून चर्चा केली नाही, आयुक्त साहेब, आजचा जो विषय आला आहे, सर्व सदस्यांनी चर्चा केली आहे. सत्ताधारी पक्षाचे काही आमचे मित्र त्यांनी ही चर्चा केली आहे. येथे शिवसेनेच्या महापौरांचा विषय निघाला सौ. अपेक्षा पाटील यांचा विषय निघाला त्यांचे नांव घेण्यात आले त्यावेळी शिवसेनची सत्ता होती, शिवसेनचे महापौर होते. भारतीय जनता पार्टी देखील सत्तेत होती, त्यांचे स्थायी समितीचे सभापती होते, आर.पी.आय. चे उपमहापौर होते. हे सर्व सत्तेत होते, फक्त राष्ट्रवादी पार्टी सत्तेत नव्हती. सत्तेत असलेल्या सर्वांनी निर्णय घेतला होता. काम चांगले करण्याचा तो आमचा पहिला निर्णय होता. ते काम आम्ही केले. पण त्याचा येथील जनतेला काही फायदा होत नाही. ते आता आम्हाला देखील दिसते. येथील जनता जे कर भरते त्यांना याचा फायदा मिळत नाही. येथील श्रीमंत लोकांना याचा फायदा मिळत आहे. त्याची चर्चा सर्वांनी केली आम्ही सुध्दा केली. हा जो प्लॉट आहे, बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करण्याचा, आम्हाला तर विकास करायचा आहे. आम्ही विकासाच्या बाजुनेच आहोत. हे तीन भुखंड जे आम्हाला शासनाने दिले आहेत त्याची आपण येथे चर्चा करत आहोत. पण एक जो ७०५ चा भुखंड आहे त्यावर श्री. प्रमोद टालेजींनी चर्चा केली. हा ७०५ चा भुखंड कोणीतरी हडप करीत आहे. ही देशाची राष्ट्रपार्टी असून ते तेथे त्यांचे कार्यालय बनवित आहे. ते सत्तेत असल्याने काहीही करू शकतात. सत्तेमध्ये,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मुद्दा तोच आहे,

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सर, मुद्यावर बोला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मुद्दा हाच आहे.

या वेळी सदस्य, श्री. रमेश चव्हाण हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** शिवसेनेच्या जेवढया शाखा आहेत, सगळया अनधिकृत आहेत.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मुद्दा तोच आहे, मॅडम.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** तुम्ही पुरावा सादर करा की भारतीय जनता पार्टीचे कार्यालय अनधिकृत आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते ऐकु आले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** सर्व शाखा अनाधिकृत आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** हे पुरावा मागतात, संबंधीत सहा. आयुक्तांना बोलवा, ७०५ वर स्टे कोणी घेतला, कोणत्या पक्षाने घेतला आहे? तुमच्या मंगलानी साहेबांना विचारा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** आम्ही कधीच बोलत नाही की, ही शिवसेनेची शाखा आहे,

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** यावर खुलासा करण्यासाठी सहा. आयुक्तांना बोलवा.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौरजी, तिथे अनाधिकृत आहे, तर कारवाई करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** स्टे कोणी घेतला आहे? स्टे

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** हिन्दूवादी पक्षाने असे बोलले नाही पाहिजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** स्टे कोणी घेतलाय? सहा. आयुक्तांना बोलवा, स्टे कोणी घेतला आहे? भारतीय जनता पार्टीने स्टे घेतला आहे. ७०५ वर भारतीय जनता पार्टीने स्टे घेतला आहे.

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** आयुक्त साहेब, ७०५ प्लॉटबाबत तुम्ही निर्णय द्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मॅडम, आपण एकत्र आलो आहे, चांगल्या गोष्टीवर चर्चा करा, ही चांगली गोष्ट नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** या मिटींगसाठी तुमचे शहर प्रमुख श्री. चौधरी साहेबांची देखील स्वाक्षरी आहे. ज्यामध्ये मा.बाळासाहेबांचे नांव लिहिलेले नाही. तुम्ही काय गोष्टी करता.

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** आयुक्त साहेब, ७०५ प्लॉटबाबत तुम्ही निर्णय द्या. आयुक्त साहेब ७०५ बाबत आपण गप्प का? हे काय चाललय?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** ७०५ चा विषय घेतला होता, त्याचे उत्तर मिळाले नाही.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे विषय कशासाठी आणलेला आहे, कन्सलटंट नेमणे चर्चा काय होते की, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा. आमचे डॉ. नाथानी तेथे गेले आणि उद्घाटन पण करा. म्हणजे यांनी मंजूर पण केले व कोणाला तरी देवून पण टाकले. येथे चर्चा चाललेली आहे, तुम्ही सांगीतले की, आम्हाला विकास करायचा आहे. म्हणजे घर विकुन विकास. विकास झाला पाहिजे. पण जेंव्हा शंकेची सुई येते, एवढी घिसाड घाई का? एवढया घाई—घाईत का? ते प्रकरण महत्वाचे आहे. सुरवातीला श्री. भरत गंगोत्री व श्री. प्रमोद टाले यांनी मुद्दा उपस्थित केला, सन १९८६ पासून मागणी करतात. भुखंड मिळाला तर चार दिवसांमध्ये लगेच, यावर विचार मंथन व्हायला पाहिजे होत. माहिती घ्यायला पाहिजे होती की, व्ही.टी.सी.क्रीडा संकुल आहे की, मा.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल आहे. अरूण कुमार वैद्य आहे की, टाऊन हॉल आहे. हे कुठल्या प्रॉपर्टीमधून आलेत, इतर भुखंड किती आहेत? त्या भुखंडांच काय करायच? जसे आता येथे उदाहरण निघाल ७०५ चा भुखंड, कोणी बनवले ते महत्वाचे नाही तर चालू बांधकाम तोडणे प्रशासनाचे काम आहे आणि येथे एवढी चर्चा झाल्यानंतर मला वाटते आयुक्त लगेच सांगतील सहा. आयुक्तांना स्टे असू द्या, स्टे मिळाला कसा काय? स्टे मिळाला असेल तर त्या सहा.आयुक्तांना निलंबीत करा. त्यांनी एवढे होईपर्यंत काय केल. कोणाच्या नावाने स्टे, कसा स्टे, एका बाजुला विकास करण्यासाठी राखीव भुखंड कमी आहेत. १६० पैकी जेमतेम १० ते १२ भुखंड शिल्लक असतील. तेही आहेत की नाही माहित नाही. आयुक्त साहेब तुम्हाला माहित नसेल हा भुखंड मिळविण्यासाठी चार महापौर, तीन आयुक्त चौथे तुम्ही आहात, हिरे साहेब आहेत तेव्हांपासून हा भुखंड मिळण्यासाठी, बोटक्लबच्या बाबतीत मला माहित नाही, पण मा.बाळासाहेब क्रीडा संकुलाचा भुखंड मिळण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून मी सातत्याने पाठपुरावा करत आहे. मंत्रालयात, खासदार श्रीकांत शिंदे साहेबांकडे, पालकमंत्र्यांकडे, नगरविकासमंत्र्याकडे वारंवार पाठपुरावा केलेला आहे. तत्कालीन आयुक्त व महापौरांनी सुध्दा त्याला पाठिंबा दिला. एक पायगुण असतो, तुमचा पायगुण, तुम्ही आलात आणि भुखंड ताब्यात मिळाले आणि मिळाले व लगेच हा विषय आला बी.ओ.टी. तत्वावरचा. ज्या क्रीडा संकुलाचे निविदा निघण्यापर्यंत प्रक्रिया आली होती. १० कोटी आले होते. कदाचित हिरे साहेब असते तर तेंव्हाच निविदा निघाली असती. महापालिका विकसीत करेल म्हणून. २२ कोटीचा होता ठिक आहे, एखादा प्रकल्प जो शहराला पाहिजे, ज्या ठिकाणी मुले खेळतील बाकी सगळा विकास बाजुला ठेवू, रस्ते होतील एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून, याला आपण प्राधान्य देवू आणि निधी उपलब्ध करून देवू, १० कोटी शासनाने दिले आहेत

साधारणत: २५ कोटी, २६ कोटी लागतील. २२ कोटीचा काहीतरी प्रस्ताव केला होता. वारंवार बैठका झाल्या, आपणाशी चर्चा झाली जिल्हाधिकारी चार बदलले. कल्याणकर साहेब गेले त्यांच्या अगोदर दुसरे होते वारंवार जंत्रे साहेब असल्यापासून पाठपुरावा करतोय. जंत्रे साहेब गेले, वेलरासू साहेब आले त्यांच्याकडे सुध्दा पाठपुरावा केला त्यानंतर इतर जिल्हाधिकारी आले, मा.आयुक्तांनी पाठपुरावा केला पण मिळालें. एक लोकांनी पाहिलेल स्वप्न असते की, माझ्या शहराला काही मिळाव. मी एक स्वप्न पाहिल आहे, मी सर्वांना सांगतो की, माझं ड्रीम प्रोजेक्ट आहे. मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाप्रमाणेच प्रोजेक्ट झाला पाहिजे, मगाशी तुम्ही सांगीतले. माझे ही म्हणजे तेच आहे. पण याचा वापर सर्वसामान्यांसाठी असला पाहिजे फक्त मोठया उद्योगपतींसाठी नको आहे. मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने धंदा नको आहे, ते लोकांसाठी पाहिजे, लोकार्पण कार्यासाठी पाहिजे. त्याचे भुमीपुजन झाले, श्री. भालेराव साहेबांनी सांगीतले तसे, हिरे साहेब असतांना निविदा काढण्यापर्यंत आलें होते. पण श्री. निंबाळकर साहेब म्हणाले की, आपल्या ताब्यात प्रॉपर्टी नाही. प्रॉपर्टी ताब्यात आपल्याच होती, कागदोपत्री नव्हती. हिरे साहेबांनी सांगितले की, आपण काढून टाकू त्यावेळी हिरे साहेबांची बदली झाली नाहीतर अतापर्यंत निविदा निघाली असती. या पुर्वी पण ती जागा आपल्या ताब्यात होती, ती प्रॉपर्टी विकसित झाली होती. ती मला वाटते सन १९८७ साली झाली होती. बोटक्लब, अरूण कुमार वैद्य, ७८ आणि क्रिडा संकुल तत्कालीन व्ही.टी.सी. क्रिडा संकुल जे आताचे बाळासाहेब क्रिडा संकुल आहे. त्यावेळी सुध्दा तेव्हा ताकत नसताना सुध्दा विकसित केली होती, इच्छा शक्ती पाहिजे, नंतर निंबाळकर साहेबांनी त्याला ब्रेक दिला आणि ते थांबविण्यात आले. नाही तर आता पर्यंत ते बरेचसे झाले असते आणि ते चालू ही झाले असते आणि उभे राहिले असते, लोकार्पण झाले असते,आणि सत्कार सुध्दा झाला असता. हीरे साहेबांची इच्छा होती नाही आपणया प्रोजेक्टला प्राधान्य देऊ, रू.१० कोटी शासनाकडून आणलेले आहे आणि १० कोटी शासनाकडून आणलेले आहेत आणि १२ कोटीचा प्रश्न, एवढयामध्ये आपण उभे करू शकत नाही का? दोन वर्षामध्ये टप्या टप्याने उभे करू. पण ते सर्व सामान्यााठीच असेल अशी भूमिका होती. त्या ठिकाणी मी तुम्हाला सांगितले प्रोजेक्ट तयार झाालेला गेल्या ४ वर्षापासून सर्व प्रभागाची मंजूरी झाली तिथे कन्सलटंट म्हणजे सल्लागार सुध्दा आहे.प्रतिष्ठान ही माहीती असताना सुध्दा आपण तिथे नविन सल्लागार नेमणूक करत आहोत हे कसे काय? मग पहिलया सल्लागाराचे काय केले. त्यांनी केलेले बरोबर नाही का? मग बरोबर नसेल तर आतापर्यंत मंजूरी कशी काय मिळाली? सगळया विभाकडून फिरलेली फाईल आहे. मग हा प्रस्ताव तयार करताना सर्व विभागांना विचारात घेतले नाही का? की पूर्वी काय झालेले आहे? सर्व डिझायर स्ट्रक्चर वगैरे सर्व ठरलेले आहे. सोनावणे साहेबांचा रिमार्क आहे, पीडब्ल्युडी, शहर अभियंता, आयुक्त साहेब सर्वांचा, मग असे असताना आता परत त्या ठिकाणी नविन सल्लागार का याचे उत्तर मला पाहिजे? बाकी बोट क्लब याच्यासाठी सुध्दा माझे प्राधान्याने मत आहे. श्री.प्रदिप रामचंदानीने सांगितले त्यावेळेस शिवसेना बरोबर होती, हो. जसे राज्यात चालेले तसे त्यावेस सुध्दा तुम्हाला खुश ठेवण्यासाठी तर आम्ही बरोबर आलो होतो. आता सुध्दा तुमची इच्छा आहे तुम्ही फरफटत यावे, तसे आता आजिबात होणार नाही. लोकांसाठी जे प्रोजेक्ट असतील त्यांना आम्ही प्राधान्य देऊ. त्यावेळेस होतो तुम्ही आग्रह धरला होता.आता चौधरी साहेबांनी सांगितले की आता आम्ही पस्तावलो आहे. तुम्हाला पश्चाताप सुध्दा होतो आहे आम्ही लोकांसाठी केले काय? अरूण कुमार वैद्य आम्ही त्यावेळी सुध्दा विरोध केला होता की बीओटी तत्वावर नको त्याचा लोकांना फायदा होणार नाही. जे त्यावेळी बोललो ते आता होत आहे. त्यावेळी हे सुध्दा विरोधात होते. अरूण कुमार वैद्य बीओटी तत्वावर नको आहे. तेव्हा बरोबर होते. बोट क्लब ला सुध्दा विरोध केलेला होता. परंतु याच्यातून काय की, ठिक आहे, आपले म्हणणे, विकसीत झाले पाहिजे पण हे सर्वनुमते सर्वाना घवून चर्चा करू मंथन करू हे झाले पाहिजे होते. जेव्हा कुठे शंकेची सुई येते मग ती प्रत्येकांच्या बाबतीत येते, माझ्या बाबतीत येते, हयांच्या बाबतीत येते, प्रत्येकाच्या बाबतीत येते. पण जेव्हा शहर विकाासाठी जेव्हा सर्वाना सामाविष्ठ करून जो विकास होतो, त्यामुळे हे वादळ होते. प्रथमता हे स्पष्ट आहे की ज्यासाठी पैसे आलेले आहेत, तुमच्या म्हणण्यानुसार व्हीटीसी, आमच्या म्हणण्यानुसार बाळासाहेब ठाकरे, प्रशासनाने माफी मागीतली त्यामुळे आता ठिक आहे. पण बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुलाचे संपूर्ण प्रपोजल तयार आहेत त्या कलाकाराने पूर्ण टी.एल.आर. केला, संपूर्ण सर्वे केला, बरोबर आपण काहीही केले नाही त्याची नेमणूक केली त्याला वर्क ऑर्डर दिली. बोट क्लब चा आगोदर प्रस्ताव झाला होता मग त्या सल्लागाराचे काय? एक आहे महापलिका विकास झाला पाहिजे. त्याच बरोबर सर्वसामान्यांचा सुध्दा समावेश असला पाहिजे. हा विचार केला तरच मी काल सुध्दा सांगितले आम्ही जेव्हा भारत महासत्ता होते तेव्हा प्रत्येक घटकाचा विचार केला पाहिजे. आम्ही दिव्यांगांचा विचार करतो, आम्ही

महिलांचा विचार करतो, आम्ही दलितांचा विचार करतो. मग या ठिकाणी जर क्रिडा संकुल विकसित झाले तर माझे झोपडपटटीतील गरीब मुले तिथे जावू शकली नाही तर उपयोग काय? असे क्रिकेट क्लब भरपूर आहेत, ते रात्रीचे चालतात टेरेसवरती. नेट लावलेत क्रिकेट सराव चालू आहे. तिथे गरीब मुले जावू शकत नाहीत. या स्वीमिंग पुल मध्ये गरीब मुले जावू शकत नाही. दुदैवाने आगोदर लोक जात होते एक पाच दहा रूपये फी होती. आता एकही माणूस जावू शकत नाही. तर मग आम्ही विकास करतोय कोणसाठी ठिक आहे विकास झाला पाहीजे. पण या १३ किलोमिटरच्या शहरामध्ये आम्ही गरींबांचा विचार करणार आहोत की नाही. मग गरीबासाठी काय? आता तिन्ही ठिकाणी एक इंदिरा गांधी मार्केट, हे कोणसाठी जे विस्थापीत झाले त्यांच्यासाठी, आमच्या विजू पटील साहेबांनी एक प्रश्न केलेला आहे की विस्थापीत म्हणजे तुम्ही नक्की कधी पासून धरणार. २८ रोड जेव्हा तुटलेत तेव्हा सुध्दा लोक विस्थापित झालेत. मग हे सर्व करताना चर्चा झाली पाहिजे होती. सर्वांनी चर्चा करून मग १५ दिवस २० दिवस, १ महिन्यानी की बाबा असे असे करायचे आहे. ताबा मिळाला आणि लगेच सुरू झाले. यावरून साधक बाधक चर्चा व्हायला पाहिजे. नक्की कुठले व्यापारी? बरे सगळे व्यापारी तिथे ॲडजेस्ट होतात का? आमच्याकडे डी.सी. नियम आलेत का? आता त्या डी.सी. रूलनुसार ते होतील का? ही सगळी चर्चा व्हायला पाहिजे होती. तर माझे एक मत आहे, आता आपण फक्त वाया चर्चा आम्ही करणार नाही. सल्लागार नेमायचे की नाही. बाळासाहेब क्रिडासंकुलाबाबत म्हणणे आहे अगोदर तो तिथे कोण सल्लागार आहे. तांत्रिक अडचण येवू नये. कारण अगोदर एकांनी केलेले आहे. संपूर्ण केला आणि दुसरे सल्लागाराचे नाव. तर अचानक कसा, येईल तेव्हा येईल.आणि दुस—या बोट क्लब किंवा हयाच्याबाबतीत सुध्दा महासभेने एक ट्रान्सफरंट भूमिका असली पाहिजे एक पारदर्शी. जे असेल ते फक्त लोकांसाठीच, लोकांच्या कल्याणसाठी.पून्हा एकाच्या कल्याणासाठीजसे टाऊन हॉल अरूणकुमार वैद्य, स्वमींग पुल एकाचा विकास जो जाऊ शकतो तो जाऊ शकतो. पण त्याच बरोबर ठिक आहे. लोकांचा सुध्दा सहभाग झाला पाहिजे. अशा प्रकारचा प्रोजेक्ट असला पाहिजे.त्या स्टेडियम मध्ये लहान मुलांना खेळायला मिळालेच पाहिजे. त्या मैदानावर मुले गेलीच पाहिजेत. ते एकमेव मैदान आहे. इथे दुसरे नगरसेवक, मी अभिमाने सांगतो ही गोष्ट. साहेब, गेल्या २५ वर्षापासून मी तिथे आहे. व त्या मैदानामध्ये एक विट सुध्दा कोणाची लागू दिली नाही. नाही तर तिथे दुसरा ७०५ भूखंड झाला असता. काही नाही प्रशासन पहिले होते तेच आहेत. मी सांगतो तो ड्रीम प्रेजेक्ट यासाठी. तो धनदाडग्यासाठी नाही, सर्व सामान्यासाठी असला पाहिजे. त्याच बरोबर तो विकसित झाला पाहीजे. महापालिका सक्षम असेल नाही तर मग पब्लीक प्रायव्हेट. परंतु आता तो विषयच नाही. फक्त सल्लागार नेमणे आहे. याच्यातून हा बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल हा विषय वगळून, साहेब, कारण सल्लागार नेमायचा आहे आणि अगोदरच सल्लागार आहे. त्यामुळे याठिकाणी सल्लागार नेमण्याची गरज नाही. बाकी राहीले दोन प्रोजेक्ट इंदिरा गांधी आणि बोट क्लब हे पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप मध्ये कसे होईल, यामध्ये लोकांचा सुध्दा सहभाग होईल. अशा प्रकारचा सल्लागार या गोषवा—यामध्येच नमूद केला पाहिजे. त्यासाठी सल्लागार बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या ऐवजी पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप मध्येप्रोजेक्ट करण्यासाठी सल्लागार नेमणूक करण्यसाठी कराल तर आमची त्याला साथ आहे विकास करण्यासाठी आम्ही साथ देतो. आम्ही विकासाबरोबर आहे पण त्याच बरोबर पब्लीकचा सुध्दा विकास झाला पाहिजे. बांधा वापरा आणि हस्तांरीत साठी नाही.

- या वेळी सदस्य, श्री. रमेश चव्हाण हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी मा. आयुक्तजी, मा. उप महापौरजी.....

**सदस्य, श्रीम कांचन अमर लुंड:—** मा. महापौरजी, आयुक्त सर जी, व्ही.टी.सी. ग्राऊंड आणि बोट क्लब सारखे आपण बी.ओ.टी. तत्तवार देवून आपण खेळणा—या मुलांच्या भविष्यासाठी मोठे नुकसान करत आहेत. ज्या व्ही.टी.सी. ग्राऊड वरती वेगवेळया प्रकारचे खेळ खेळण्यासाठी मुले येत असतात. आपल्याकडे असे आता ग्राऊंड राहिलेले नाहीत, गरीब मुले खेळण्यासाठी कुठे जाणार? मुलांवर हा फार मोठा अन्याय होत आहे. हे असे झाले नाही पाहिजे, बीओटी तत्वावर का देत आहात? काय गरज आहे की आपण बीओटी तत्वावर देण्यास तयार झाले आहेत आणि दुसरी गोष्ट जो पर्यंत टाऊन हॉल बी.ओ.टी. तत्वावर देण्यात आलेला आहे, याचा लोकांना कोणता असा फायदा मिळाला आहे? माझा या विषयाला विरोध आहे. मी सर्व नगरसेवक आणि

नगरसेविका यांना विनंती करीत आहे की या मुदद्याच्या विरोधासाठी माझे बरोबर असले पाहिजे. या गोष्टीला माझा स्पष्ट विरोध आहे.

**<u>सदस्य, श्री.शंकर लुंड:—</u>** आयुक्त साहेब, महापौर मॅडम, महापौर मॅडम,मी आपल्याला पहिले दिवाळीच्या शुभेच्छा देत आहे. तसेच आयुक्त साहेबांना सुध्दा दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा. तुमचे सर्वांचे भरपूर बोलणे झाले आहे, आता थोडे मलाही बोलू दया. मी महापौर मॅडम यांची परवानगी घेवून बोलत आहे.महापौर मॅडम, मी आपल्याला आठवण करून देवू इच्छितो की, आपले मा. पुर्व आमदार पप्पू कलानीजीने या बोट क्लब चे सुशोभिकरण, सुंदरीकरण केले होते तेव्हा तिथे बोटी चालत होत्या. फक्त पांच, पांच रूपयात गरीब लोक या ठिकाणी बोटींग करण्यासाठी जात होते. माझे माहितीप्रमाणे हजारोंच्या संख्येने बोटींग करण्यासाठी या ठिकाणी मेला लागत होता. मला असे वाटते की बोट क्लब चे काम आपल्या हातात घेवून महापालिकेच्या खर्चातून चांगल्या प्रकारे व सुंदर बनविण्यात यावे, जास्त खर्च येणार नाही आणि आपण भाग्यशाली आहे की महापौर मॅडमची सासू आमदार आहेत. आमदार महाराष्ट्र शासनाकडून सुध्दा फंड घेवून बोट क्लबची बनविण्यासाठी पहीले पण हॉटस ॲपवर बोट क्लबसाठी ९ करोड रूपयांसाठी प्रस्ताव पाठवला होता. महाराष्ट्र शासन आपल्या बोट क्लब साठी निधी जर देत असेल तर बीओटी तत्वावर देण्याची जरूरत का येईल? माझा बी.ओ.टी. तत्वावर देण्यासाठी मोठा विरोध आहे. आपले पुर्व आमदार पप्पू कलानीच्या पायावर पाय ठेवून आपल्या महापौर चालतील अशी मी अपेक्षा करतो.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>** मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सभागृह नेता जमनु पुरस्वानीजी, जे दुस—याला बोलू देत नाहीज. सगळयात पहिले सभागृहातील सर्व सदस्य, प्रेसअधिकारी वर्ग येणा—या दिवाळीच्या आगाऊ हार्दिक शुभेच्छा. आयुक्त साहेब, मी आज आपल्याला भेटून प्रभावित झालो आहे. आयुक्त साहेबांनी मागच्या सभेमध्ये पूर्ण वेळ बसून चर्चा केली होती, आज खुर्चीतून उठून बोलेले आहेत त्यामुळे मी आपल्याला धन्यवाद देत आहे. आज जर आपण बसून चर्चा केली तर मी या सभागृकडून हा कायदा पास करून घेतला असता की सर्व सदस्य बसून चर्चा केली असती. आज आपण तीन ते चार वेळा उभे राहून चर्चा केली जसे आज पर्यंत सर्व आयुक्त बोलत आले आहेत, यासाठी आपले मी आभार व्यक्त करत आहे. आयुक्त साहेंब, या विषयावरती मी दोन चार मुददयावरती बोलत आहे. एकतर या विषयावरती जसे की आबा बोलले. बी.ओ.टी. साठी कोणालाही ऑब्जेक्शन नाही आहे परंतु कायदयानेच झाले पाहिजे जसे आबा बोलले. मुलांना खेळण्यासाठी मैदान आहे, हे आयुष्यभर देऊ शकत नाही कारण की, जसे बोडारे साहेब बोलले की हे आयुष्यभर चालू असते. जसे आता शेरी भाऊ ने सांगितले की ही बोट क्लब पहिले महानगरपालिके मार्फत बनविला गेला होता. पाच रूपये लागत होते आणि हजारो लोक त्या ठिकाणी जात होते. मा. आमदार ज्याती कलानी यांनी काही दिवसापूर्वी घोषीत केले की मी महाराष्ट्र शासनाकडून ८ ते ९ करोड रूपये घेवून बोट क्लब बनवू शकते. तर हा विषय आहे, पांच दिवसासाठी तातडीची विशेष महासभा नियमित सभेमध्ये सुध्दा आलेले नाही आहे. तर आम्ही प्रत्येक वेळी जेव्हा सभा घेतली जाते त्यावेळी नियम , अपोझिसन कोअर कमिटी यांच्या सल्लयानुसार हा अजेंडा निघत असतो. तर हया वेळी इतकी घाई नव्हती,परमेश्वर कृपेने आपन अपून ८, १० महिने आहेत, तर थोडे दिवसानंतर पण घेवू शकता ना. वेळ आहे अजून तर या वेळेमध्ये सुध्दा सर आपण करू शकता. माझी आपल्याला एक विनंती आहे, हिंदी मध्ये एक जोक सांगितला त्याचे उत्तर देत आहे. आपण विकास पुरूष आहेत. इथे काहीच नाही होत तर लोक म्हणतात की विकास होत नाही. मी ऐकले की काल आपण आदेश काढलेला आहे नगरसेवक निधी पण वर्क ऑर्डर झाालेले काम बंद करण्यात यावीत. तर हा आपण विकास करू शकत नाही. आणि ही विकासाची निशाणी नाही आहे. याकडे आपले लक्ष असले पाहिजे कृपया करून ही ऑर्डर आपण काल नगरसेवक निधीचे वर्क ऑर्डर झालेले आहे ते कृपया करून बंद करण्यात येवू नयेत. आम्ही आपणांस विकास पुरूष संबोधत आहेत. विकास करायचा आहे परंतु विचारविनिमय करून की जसे शेरी भाऊ बोलले की सभेमध्ये आणावे, तसेही आज बीओटी तत्वार देणरे हे निश्चित नाही आहे. आज विचार करण्यशसाठी आले आहेत. प्रत्येक सदस्यांनी जर गोषवारा वाचला तर आज बीओटी तत्वावर दयायचा आहे किंवानाही याची चर्चा होवू विचार होण्यासाठी आलेले आहे. तर हे आपण दुस—या महासभेमध्ये सुध्दा करावे, आणि त्यामध्ये सांगितले की त्याच्या नावामध्ये दुरूस्ती इ. हे आपल्या कार्यकाळामध्येच करणार. साहेब अशी सर्व विकासाची काम आपल्या कार्यकाळामध्ये व्हायला पाहिजेत. आम्हाला आपल्याकडून खात्री आहे. धन्यवाद.

**सदस्या, श्रीम.शुभांगी बेहनवालः—** मा.महापौर साहेब मा.महापौर साहेब आणि मा.महापौर साहेब, आपण जो प्रस्ताव हया सभेमध्ये पाठवलेला आहे. जसे बांधित करा आणि हस्तातंरीत करा. हे थोडे अयोग्य वाटत नाही का? बांधा विकास करा आणिलोकांसाठी दया. हे खूप छान वाटते, आपण एकीकडे विकास करायचा आहे असे म्हणतो आणि एकीकडे लोकांचे गळे दाबून दुसरीकडे विकास करतो. त्यांचा विकास तर कुठे आहे? तो दिसतच नाही. त्यामुळे हा विषय जो महासभेमध्ये आणला आहे त्याला पूर्ण मी विरोध करते. आणि हे इथेच संपवायला पाहिजे आणि आपण विकास म्हटले तर आपण लोकांचा विकास करायला पाहिजे. हे नाही की खाजकी करण करून त्याला अर्थ नाही आहे आणि हस्तांतरीत करण्याचे म्हटले तर हे आपल्याला कळेल गरीब लोकांना कळणार नाही. हस्तांतरीत म्हणजे काय? ही संकल्पना त्यांना कळायला हवी ना. खाजगीकरणाला आपण पूढे करतो आणि लोकांसाठी आपण मागे वळता, विकास म्हणता तर विकास कुठे दिसतो?

**सदस्या, श्रीम. कविता बागुल::—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आजच्या संपादीत केलेल्या तीन भुखंडावर कोणती वास्तु प्रकल्प उघडणार आहोत हे नक्की झालेले नाही आहे? नक्की झालेले नसेल तर त्यावर कन्सल्ट नेमायची घाई करू नका. जनतेच्या गरजा ओळखून त्या भुखंडावर कोणता प्रस्ताव ठररवायचे हे लक्षात घ्या आणि खरे त्याच्यावरती कन्सल्ट जी आपण अंगावर ओढवून घेवू याची घाई करू नका यासाठी संबंधित अधिका—याशी स्पष्टीकरण करून या प्रस्तावाला भरीप बहूजन संघाच्या वतीने विरोध दर्शवीतो.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड::—** मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब, आपल्या सभागृहामधून माझे सहकारी सदस्या कांचन लुंड मॅडम यांनी जे सांगितले आहे की सामान्य जनतेसाठी जर आपण हा प्रकल्प आणला या तत्वावरती आणला तर त्यांच्यासाठी तो उपयोग होणार नाही आहे. आपण इथे तरण तलावाचे उदाहरण घेतले, तो बाहेरून बघायला आपल्याला खूप सुंदर वाटतो, पण पूर्वीच्या काळी जो पर्यंत हा जूना तलाव होता, तो पर्यंत सर्वसामान्यांची मुले तिथे जावू शकत होती. आज सर्वसामान्यांच्या मुलांना तो बाहेरून फक्त तलाव बघून आनंद मानल्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही आहे आणि आपण हे जे तीन प्रोजेक्ट त्याच्यामध्ये आणू इच्छितो त्याच्यावरती विचार करण्यासाठी आपण इथे आलेलो आहोत. इथेही जर तीच परिस्थिती उध्दभवली तर अशी वेळ येणार आहे की आज जी सर्वसामान्याची मुले जी तिथे जावून खेळतात त्याच्यासाठी जे मैदान उपलब्ध आहे, दुसरे कुठलेही क्रिडा संकुल इथे उपलब्ध नाही फक्त बाळासाहेब क्रिडा संकुल एवढेच क्रिडा संकुल उल्हासनगरमध्ये उपलब्ध आहे. जर उल्हासनगरच्या जनतेला आपल्याला काही जर दयायचे असेल तर सर्वसामान्याना त्याचा फायदा कसा घेता येईल ही माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे आणि बीओटी तत्वावरतीच जर हा प्रकल्प येणार असेल तर त्याला मी पूर्णपणे मी विरोध करते आहे. जेणेकरून ज्या लोकांनी आपल्याला इथे पाठवलेले आहे इथे ७० टक्के जनता ही गरीब आहे. ज्यांनी आपल्याला इथे पाठवलेले आहे लोकप्रतिनिधी म्हणून पहिले त्यांचा आपण विचार करूया. जर आपण फक्त ३० टक्के उरलेल्या लोकांचा विचार केला ते तिथे जवू शकतात तर हा सर्वस्व उल्हासनगरवर होणारा अन्याय आहे, आयुक्त साहेब याचा विचार करण्यात यावा.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी::—** मा. महापौर मॅडम, उपमहापौरजी आणि आयुक्त साहेब, सर भरपूर चर्चा झालेली आहे ब—यांच जणाचा याला विरोध आहे. तर काही सहयोग करत आहेत. सर आपल्याला लहानपणी एक गोष्ट शिकविली जो की ज्या चूका आम्ही मागच्या काही काळामध्ये केलेल्या आहेत त्या परत होता कामा नये. बी.ओ.टी. तत्वावर जर विकास होत असेल तर दयायला पाहिजे ठिक आहे परंतु त्याच्या पहिले त्याच्यावर काही नियम बनविले पाहिजे. आम्ही लोकांनी घाईघई मध्ये ज्याप्रकारे अरूण कुमार वैद्य हॉल देण्यात आला. आज आपल्या उल्हासनगरचे मुले त्याठिकाणी न नाटकाचे प्रयोग करू शकत नाही, तसेच एखादी शाळासुध्दा त्याला भाडेतत्वावर घेवू शकत नाही. उल्हासनगर महानगरपालिकेचे नांव आहे जो टाऊन आम्ही दिलेले आहे. परंतु त्याचे दर अजून सुध्दा इतके जास्त आहेत की त्या ठिकाणी मुले कोणतेही कार्यक्रम करू शकत नाही. आणि सर, आपले शहर खूप छोटे आहे. परतु या शहरामध्ये जर कोणी आले तर आमच्यासाठी खूप दु:खद एक गोष्ट आहे की आम्ही त्यांना बघण्यासारखी एखादी वास्तू दाखवू शकत नाही. जर माझे कडे कोणी पाहूणे आले तर मी टिटवाळा मंदीर, शिवमंदीर, बिर्लामंदीर हेच ठिकाणे दाखवू शकते. सर आपले मध्यवर्ती ठिकाण आहे बोटक्लब, या बोटक्लब ला एक थिम पार्क बनविली पाहिजे.आणि त्याचे चांगल्या प्रकारे नियोजन असले पाहिजे आणि ते जर बी.ओ.टी. तत्वावर करत असाल तर त्याच्यावरती पहिले नियम असले पाहिजे. सर

आपल्याकडे १४७ खुले भुखंडाची जर यादी बघितली ठिक आहे आपण सद्या नविन आहात, परंतु आपला जो कर्मचारी वर्ग आहे त्यांच्याकडून आपण तपासून घेवू शकता. अशा काही गोष्टी आहेत, ज्या चूका पहिल्या झालेल्या आहेत, त्या आता आपल्या कार्यकाळामध्ये परत होवू नयेत. तर पहिले नियम बनविण्यात यावेत. उदा. आपल्या घरातील मुलाची जर आपण विवाह करायचा म्हटला तर डायरेक्ट विवाह केला जात नाही. पहिले सर्व प्रोसीजर झाल्यानंतर विवाह केला जातो. विकास अशा प्रकारे व्हायला पाहिजे, सर. पहिले नियम बनविण्यात यावे की हे सर्वसामान्य जनतेसाठी असायला पाहिजे की अन्य कोणसाठी. त्या नंतर आपण कन्सल्ट करू शकता आणि दुसरी गोष्ट यामध्ये एक कमर्शिअल पब्लीकसाठी त्या ठिकाणी शिफट करायचे असेल तर इंदिरा गांधी मार्केट बनविण्यात येत आहे, आणि गार्डन बनविले जात आहे, आणि एक स्पोर्टस् कॉम्पलेक्स बनविला जात आहे. तर हया तिन्ही वेगवेगळया वास्तु आहेत. त्यामुळे त्यांची कन्सल्टींग वेगवेगळी असायला पाहिजे. कारण की जर कन्सल्टींग सारखीच असली तर टाईम डयुरेशन जास्त घेणार आणि आपली जी विकासाची कामे आहेत, असे होवू शकते की आपली बदली होईल, किंवा नविन मतदान प्रक्रिया येईल, तोपर्यंत ही कामे प्रलंबीत राहू शंकतात. जर आपल्याला रिझल्ट पाहिजे तर लवकरात लवकर कामे केली पाहिजेत.

 या वेळी सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**सदस्या, श्रीम. ज्योती भटीजा::—** मा. महापैरजी, मा. आयुक्तजी उप महापौरजी व्ही.टी.सी. ग्राऊंड आणि बोट क्लब जसे प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर देवून खेळाडूचे भविष्य घेक्यात येत आहे. व्ही.टी.सी. ग्राऊंडवरती वेगवेगळया प्रकारच`खेळ खेळले जातात. तर अशी काय पिरस्थिती आली आहे की आम्ही बी.ओ.टी. तत्वावर देत आहेत. आज टाऊन हॉल बी.ओ.टी. वर देवून जनतेला काय फायदा मिळाला आहे. काहीच नाही.अशी जी जमीन आहे ज्याला आम्ही महानगरपालिकेचा निधी, एम.एम.आर.डी.ए. काही मदत घेवून सुशोभीकरण करू शकतो आणि या शहराला चांगली वास्तु भेट म्हणून देवू शकतो. या विषयावर इथे बसलेल्या सर्व नगरसेवकनी गंभीर विचार करून पूर्ण शहराची जनता भविष्य बघत आहे. माझे या मुद्दयाला पुर्णपणे विरोध आहे, आभारी आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—:** सेटींग चालू.

**सदस्या, श्रीम. ज्योती चैनानी:::—** महापौर मॅडम माझा सुध्दा याला विरोध आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** सेटींग चालू, सेटींग चालू मी सांगिले होते ना.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले::—** शहरातील भुखंडाबाबत चर्चा चालू आहे, आज आयुक्त महोदय, आज ७०५ नंबरचा प्लॉट मनोरंजनासाठी राखीव आहे. परंतु आज त्याच्यावर अनधिकृत बांधकाम चालू आहे. त्याच्यावर स्टे आणलेला आहे असे कोणी तरी सांगितले? मला नेमका कोणी आणला स्टे, प्रभाग अधिका—यानी त्याच्यावर काय करवाई केली,

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे::—** सर, वार्ड ऑफीसरांना बोलवा संपूर्ण माहिति देईल की त्या भुखंडावरती जे २० अधिकृत बांधकामे झालीत त्याच्यावरती स्टे आलेला आहे. वार्ड ऑफीसरला बोलवा तो स्टे कोणी घेतला आहे? ती माहिती आम्हाला दया.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले::—** आणि आयुक्त महोदय तुम्ही काय कारवाई करणार आहात, त्याचे पण जरा खुलासा झाला तर बरं होईल.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे::—** सर, तो स्टे लवकरात लवकर व्हॅकेट करून तो निष्कषीत करण्याचा प्रयत्न करावा, आधी प्रभाग अधिका—याला बोलवा तिथे, त्या भुखंडावरती स्टे आलेला आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले::—** प्रभाग अधिका—यानी काय कारवाई केली? तो भुखंड आपण ताब्यात घेणार आहोत की नाही.

येथे प्रभाग अधिकारी, श्री. विजय मंगलानी मंचावर आले असता......

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** मंगलानी जी आपण कृपया करून जावे कारण आजच्या सभेत विषेश सभेमध्ये हा विषय नाही आहे. पुढच्या सभे मध्ये आपण यांना उत्तर दयावे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले::—** मॅडम, प्लॉट चा जो विषय आहे, त्या विषयामध्ये पण हा महापालिकेचा विषय आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सर आपण लक्षवेधी दया, उत्तर देण्यात येईल परंतु आजच्या सभेत वेळ वाया जात आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मा. आयुक्तजी, मा. उप महापौरजी, या विषयावरती चर्चा करून भरपूर वेळ झाला आहे.

**सदस्य, श्री सुनिल सुर्वेः—** जमनुजी एक सेकड,...

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** आपण जर शिस्त लावली असेल. तर मध्ये मध्ये बोलू नये.

**सदस्य,श्री सुनिल सुर्वेः—** शिस्त लावलेली आहे म्हणू बोलतो आहे,माझे १६० भुखंडाचे काय झाले हे सांगितले नाही. हा विषय बाकी आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—**हे पूढच्या सभेमध्ये सर, हे या अजेंडामध्ये नाही आहे.

**सदस्य, श्री सुनिल सुर्वेः—** हे या अजेंडामध्येच आहे आपण बघा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** नाही आहे. आज फक्त तीनच विषय आहेत

**सदस्य,श्री सुनिल सुर्वेः—** आजच्या अजेंडामध्येच हा विषय आहे, एकूण आपल्याकडे किती हे आहेत हे त्याना सांगायचे होते. १६० मधून किती बाकी आहेत?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** ठिक आहे. ७०५ ची गोष्ट नाही आहे.

**सदस्य,श्री सुनिल सुर्वेः—** ७०५ चे मी नाही सांगत आहे. त्यामध्ये काय लिहिलेले आहे आपण वाचावे. जे लिहिलेले आहे तेच मी मागत आहे. हा त्या विषयाशी संबंधित जोडलेला विषय आहे. १६० काय झाले आणि किती भुखंड बाकी आहेत?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः——**हा. ठिक आहे सर, आपले बोलणे संपवा नंतर श्री.मंगलानीजी उत्तर देतील.

**सदस्य, श्री शंकर लुंडः—** महापौर मॅडम, आयुक्त साहेब मी फक्त हे माहिती पाहिजे की ,मागे जो तरण तलाव आहे. या तरण तलावामध्ये १ तास पोहण्यासाठी चा दर किती आहे? हे मला कोण सांगणार आहे. जेव्हा आम्ही, यापूर्वी ही बीओटी वरती देण्यात आलेला आहे. जी वास्तु पहिले बी.ओ.टी. वरती देण्यात आलेली आहे, हया चूका कोण तरी पूर्वी केलेल्या आहेत. त्या परत दुबार होवू नयेत यासाठी मी चर्चा करू इच्छित आहे. कारण की तरण तलावामध्ये १ तासाचे रू.१५० देवून जाणे.तथापि कल्याणमध्ये जो तरण तलाव जो महानगरपालिकेचा आहे, तिथे फक्त १ तासाचे रू. २५ घेतले जातात आणि याठिकाणी आपल्याला जर १ वर्षासाठी जर जीम मध्ये जायचे असेल तर रू.१८०००/— भरावे लागतात. तर हे जे सर्व दर आहेत ते कोणी केले आहेत? आणि हॉल घेण्यासाठी एका विवाहासाठी किवा साखरपुडयासाठी रू. १ लाख रूपये घेण्यात येत आहेत. तर हे दर कोणी निश्चित केले आहेत? कारण की पुढे जावून तोच प्लॉट बी.ओ.टी. वरती देत आहेत तर परत त्याच चूका सत्ताधरी किवा अन्य कोणी केल्या असतील हे मला माहित नाही परंतु हे कोणी केले असेल त्या परत परत करण्यात येवू नयेत?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** बरोबर सर, हे क्लॉज मध्ये टाकले जाईल. त्यानंतर दिले जाईल आम्हाला सुध्दा असे वाटत नाही की सामान्य जनतेने बोलावे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** हा जो पहिला तरण तलावाचे जे दर आहेत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी मला समजत नाही की, हे काय होत आहे मी २२ वर्षापासून हया महानगरपालिकेत महासभेचा सदस्य आहे. आज महासभा कशा रितीने चालत आहे? जर या पध्दतीने चर्चा करायची असेल तर माझे कडे १५० मुददे आहेत चर्चा करण्यासाठी मीदहा दिवस बोलू शंकतो. आज जेव्हा विषय पत्रिका दोन तास झालेले आहेत, विषय प्रत्रिकेवर चर्चा होत आहे, वेगवेगळे विषय येत आहेत, मी आपणस निवेदन करीत आहे. या विषयांना इथेच ठेवा आणि आम्ही सतत तीन चार दिवस ५ तारखेपर्यंत महासभेला अन्य विषयावरती चालवत आहेत. मी चार वेळा विषय बोलण्यासाठी आपल्याकडून परवानगी घेवून तयार आहे. कोणीतरीमध्येच उठून बोलत आहे. आणि आमचे किशेर वनवरीजी आरोप करीत आहेत की सभागृह नेताजी बोलू देत नाही. एका विषयावरती दोन तास बोलल्यानंतर आपण जर बोलत असाल तर हे सभागृह नेता बोलू देत नाही. मी तर शेवटी बोलत आहे. प्रत्येक सदस्याने या विषयावरती बोलले आहेत. मी आता सर्व सदस्यानां निवेदन करत आहे शांतता पूर्वक...

**सदस्य, श्री शंकर लुंडः—**जमनुजी मी परवानगी घेवून मॅडमने स्वतः सांगितले की शेरीजी आपण बोला, आपण आता मध्येच बोलत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** जेव्हा मा. महापौरजी ने मला बोलण्यासाठी सांगितले तेव्हा मी बोलण्यास सुरूवात केली होती.

**सदस्य, श्री शंकर लुंडः—** मला पण महापौर मॅडमने सांगितले की, शेरीजी तुम्ही बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—**मा. महापौरजी आपण क्लिअर करा. आपण एकावेळी दोघांना परवानगी कशी देत आहात?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सरजी मी त्याना सांगितले आहे, आपण बोला, त्याचे बोलणे संपले तेव्हा मी आपल्याला बोलण्यास सांगितले.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मॅडम माझे बोलणे संपले नव्हते.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—**—हे सर्व बसून क्लॉज मध्ये टाकू नंतर बी.अ.टी. तत्वावर आम्हालाही नको आहे की जनतेला या मार्गातून जावे लागेल.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मॅडम, मला हेच सांगायचे आहे की गरीब लोकाना जर तरण तलावात पोहण्यााठी जावे लागले तर १५० रूपये कसे काय तो भरू शकतील?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** त्यासाठी  विशेष महासभा लावली जाईल,

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** याची तपासणी व्हायला पाहिजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** बिलकुल तपासणी होईल.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** याची तपासणी व्हायला पाहिजे. धन्यवाद मॅडम.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** बोला.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मी आमचे नविन निवड केलेले सदस्य शेरी लुंड जी यांना सांगत आहे की, जर स्वीमीग पुलचा कोणताही विषय प्रस्तुत करायचा असेल तर अशासकीय प्रस्ताव आणून त्या विषयावरती चर्चा करू शकतात. परंतु ज्याप्रकारे सभागृहामध्ये विषय आहेत त्या विषयांची तोडमोड करून बाद करून, दुस—या विषयावरती आपण बोलेले. मी त्यांच्यासाठी निवेदन करतो की त्यांनी अशासकीय प्रस्ताव आणा. काय चूकीचे होत आहे? त्यावर आपण चर्चा करून ठराव करूया. आज मी काही पण बोललो तर त्याच्यावर ठराव बनेल का? तर आपण हा विषय घेवून यावे किंवा सन्मानीय महापौरजी यांच्या दलनात जावे किंवा आदरणीय आयुक्त साहेंबांच्या दालनात जावे. उपमहापौर यांच्या कक्षात जावे. आमच्या सभागृह

कार्यालयात यावे. विरोधी पक्ष यांच्याकडे जावे. आपले जर समाधान नाही झाले तर आपण महासभेमध्ये विषय घेवून यावे. मी सर्वाकडून माफी मागतो. कारण की आज माफी दिवस आहे, आपण मनामध्ये ठेवू  नका. वेळ जास्त झालेला आहे. आज १२ वाजूपून महासभेमध्ये, स्थायी समिती सभा आणि महासभा चाललेली आहे. मी खुप कमी वेळेमध्ये...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मी आज सभागृहाला सुचीत करतो की जमनुजी आज वाढदिवस आहे.

**सदस्य, श्री. घनंजय बोडारे:—** वाढदिवसाच्या हार्दिक सुभेच्छा!

**सदस्य, श्री..जमनादास पुरस्वानी:—**सगळयाकडून मी क्षमा मागतो आणि ५ ते १० मिनीटे या विषयावरती एक विषय ठेवणार आहे आणि मला वाटते की सर्व सभागृहाचे सदस्य या गोष्टीला सहमत असतील. आज जो हा पहिला विषय चालला आहे. आजचा विषय आला आहे आदरणीय हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल, बोट क्लब आणि इंदिरा गांधी मार्केट, मा. आयुक्त जी, थोडी चूक आमच्याकडून झाली आहे. त्याला दुरूस्त करून हे तीन्ही विषय वेगवेगळया विषयामध्ये आले पाहिजेत. पहिला विषय आदरणीय हिंदू ह्दय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल यांच्या विषयी, दुसरा विषय बोट क्लब, आणि तिसरा विषय इंदिरा गांधी मार्केट विषयी. या तिन्ही विषयाचा जो इतिहास आहे या ठिकाणी माझे बरोबरचे जूने सदस्य आहेत त्यांना माहिती आहे की तिघांचा इतिहास वेगवेगळा आहे. तिन्ही वरती वेगवेगळे कार्य झाले पाहिजे. परतु आज एकत्र आलेले आहे. मा. आयुक्तजी आमच्यासाठी शहर विकासासाठी खूप चांगल्या प्रकारे कार्य करत आहेत आणि हे तिन्ही विषय शहर विकासाच्या जवळचे आहेत. परतु आपण समजण्यात कुठे तरी चूक करत आहेत. पहिल्या विषयाला मी सगळयासमोर ठेवत आहेत.आदरणीय हिंदू ह्दय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे क्रिडा संकुल आहे, ते आपल्याला बनवायचे आहे. त्यासाठी आपल्याकडे जमीन उपलब्ध आहे. आपल्याकडे शासनाकडून निधी सुध्दा आलेली आहे. निधी थोडा कमी आहे. आजचा जो विषय आहे तो फक्त आणि फक्त एक सल्लागार नेमायचा आहे. आमचे सदस्य कुठु ना कुठे तरी थोडीशी चूक करीत आहेत की आम्ही आजच्या आज देत आहे असे नाही. सल्लागार नेमला जाईल, सल्लागार पूर्ण डिझाईन बनविली जाईल त्यावरती किती खर्च येईल? लोकांना आपण कोणकोणत्या सुविध मोफत देत आहेत? जेवढे पण स्पोर्ट चे खेळ आहेत, क्रिक्रट असेल कबडडी, व्हॉली बॉल असेल, कॅरम असेल जितके क्रिडा संकुल मध्ये खेळ असतील तेथिल ज्या वस्तू आहेत त्या सर्वसामान्य जनतेसाठी मोफत दिल्या पाहिजेत. हे सल्लागार बनवेल. आम्ही तुम्ही बनवू शकत नाही. त्या सल्लागाराने ज्याप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रात क्रिडा संकुल विकसीत झाले आहेत ३० ते ४० करोड इतका खर्च आहे. सल्लागार डिझाईन बनवेल, बोहर मार्केट कसे बनेल? आतमधील हॉल कसे बनविले जातील? परंतु खेळाचे जेवढे पण प्रकारचे वस्तु आहेत, हे सर्व मोफत देण्यात येतील. ही डिझाईन आपला सल्लागार बनवेल आणि ती या महासभेत परत येईल. त्याचा जो गोषवारा असेलतो सर्व शहराची जनता वाचेल की आम्हाला काय देण्यात येत आहे? आणि त्यानंतर आम्ही त्यास मंजूरी देणार! की हां या सल्लागाराने जी डिझाईन बनवलेली आहे, काम बनवले आहे हे आमच्या शहराच्या लोकांसाठी आमच्या गरीब जनतेच्या हितासाठी आहे किंवा नाही. जर नसेल तर आम्ही त्याला मंजूर करणार नाही आणि जर असेल तर आपण त्यास मंजूरी देण्यात यावी आणि नंतर टेंडर प्रक्रीया होणार. जो जास्तीत जास्त खर्च करेल आणि जास्तीत जास्त सुविधा देईल. हे पी.पी.पी. मॉडेल जे आहे. पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप या प्रकारे हे बनविण्यात येईल. मी सर्व सभागृहातील सदस्यांना निवेदन करतो की सल्लागार नेमणे एक अलग गोष्ट आहे. सल्लागार डिझाईन बनवेल, काय काय आम्ही देत आहेत? हे तो घेवून येईल. या महासभेत प्रस्ताव येईल आपण काय काय देत आहे लोकांना? हे जर पसंत नाही आले तर आपण त्याला फेटाळू शकता. आम्ही सुध्दा आपल्या बरोबर आहेत. परंतु आज आम्ही सल्लागार ही नेमणार नाही. एक पाऊल एक शेतकरी होता त्याने सांगितले की हया  या वर्षी पाऊस पडणार नाही. मी बीज रोवणार नाही आणि मे—जून चे महिन्यात त्यांनी नागरणे बंद केले कोणी एका पंडींत ने भविष्यवाणी केली की जूलै मध्ये पाऊस पडणार नाही आणि त्यांनी बी शेतात पेरलेच नाही तर शेती कुठून पिकणार, हे पूढे बघितले जाईल. शहराच्या हितासाठी नसेल तर या भारतीय जनता पार्टीचे मी सभागृह नेता सगळयाच्या बरोबर आहे. बोडारेजी विरोधी पक्ष नेता आहेत आम्ही दोघेही आश्वासन देतो की पूर्ण सभागृहाचे सदस्य जर जनहितासाठी हे कार्य झाले नाही तर आम्ही त्याला मंजूरी देणार नाही. सल्लागार नेमायचा आहे. दुसरा विषय आहे इंदिरा गांधी भाजी मार्केट हे वेगवेगळे आणायला पाहिजे. मी आपणास निवेदन करत आहे

जेव्हा सल्लागार डिझाइन बनवेल, तीन्ही विषय आपण वेगवेगळे आणा इंदिरा गांधी भाजी मार्केट आणि जे आमचे सन्मानीय सदस्य बोलले तसे असेल आणि जर सल्लागार अगोदर नेमलेला आहे तर त्यांने काय काय केले ते बघा आणि नसेल, तो बेकायदेशीर असेल तर दुसरा नेमायला पाहीजे.

**सदस्य, श्री.. धनजय बोडारेः–** म्हणजेच विषय चूकीचा आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः–** विषय बरोबर आहे, मा. महापौर मॅडम विषय जो आपण दिलेला आहे ते आपल्या मताशी सहमत आहे की वेगळे वेगळे मा. बाळासाहेब ठाकरे साहेबांच्या नावाने एक विषय, त्याच्यानंतर बोट क्लबचा एक विषय आणि इंदिरा गांधी मार्केटचा एक विषय अशा पध्दतीने तीन वेगळे यायचे होते परंतु तो प्रस्तावना तयार करता आल्यामुळे माझी चर्चा पण झाली. म्हणजे आमच्या विभागाच्या म्हणजे टाऊन प्लान विभागाचे म्हणणे असे झाले की साहेब आपण सल्लागार नेमण्याची मान्यता मागत आहे. मग आता तें पी.पी.वर करायचे आहे. त्यानी फक्त पी.पी.पी आणि तुमचे बीओटी. याचे पैकी कॉन्सील ने ठरवावे म्हणजे उदया आम्ही म्हणतो ते मंजूर करा असा विषय नाही आहे आणि आता त्यांनी जो खुलासा केला की बाबा हयाच्यामध्ये सल्लागार आम्हाला नेमायचा आहे. आता ते क्रिडासंकुलसाठी लोक वेगळे आहेत आणि शॉपींग सेंटरसाठी वेगळे आहेत आणि ते थिम पार्क बनवायचे आहे त्यासाठी वेगळया प्रकारचे काम कराचे आहे. तर ते वेगळे तसे ठरावामध्ये नमूद करावे अशी मी आपल्या सभागृहाला विनंती करतो. की एक दोन तीन अशा पध्दतीने केले तर आपण त्यांचे वेगळया म्हणजे ते मास्टर लोक आहेत त्या वेगळया वेगळया क्षेत्रामध्ये आपण मिक्सींग करत नाही. परतु आम्ही आणताना एकच विषय याच्यामुळे घेतलाकन्सल्टंटसी नेमणे हा उदद्ेश आहे. आपण पी.पी.पी.वर करायचे आहे की बी.ओ.टी.वर करायचे हे सभागृहाला ठरवायचे आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः–** मी मगाशी बरोबर बोललो. हे सर्व होणार आहे नंतर सर्व समतीने होणार.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः–** नाही नाही, सर्वसमतीने होणार ते करावेच लागते. तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः–** आपल्या महासभेचे हे वैशिष्टय आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः–** मा. महापौर जी, कन्सल्टंट आपल्याला काय सांगतो? आपल्याला पी.पी.पी. करायचे असेल, बी.ओ.टी. करायचे असेल असे ही होवू शकते आपण स्वतः करा. त्याचे या महासभेत काय विचारले जाईल हे या महासभेचा अंतिम निर्णय असेल. दुसरा विषय आहे इंदिरा गांधी मार्केट.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः–** नाही, हे चूकीचे आहे तो का आम्हाला सल्ला देईल आम्ही काय....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** विषय कोणता आणला आपण?

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः–** सल्लागार नेमणे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा, विकसीत करण्यासाठी

**सदस्य, श्री..भगवान भालेरावः–** विषयच बीओटीचा आणला आहे. पी.पी.पी.वर चर्चा करण्यात काय अर्थ आहे?

**सदस्य, श्री..धनंजय बोडारेः–** आणि दोन विषय आहेत त्याच्यामध्ये बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या अंतर्गत विकसीत करण्यासाठी हे तीन प्लॉट आहेत, या पैकी एक सल्लागार आगोदरच नेमलेला आहे. परंतु नेमण्याची म्हणजेच गोषवारा चूकीचा आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानीः–** बोडारे साहेब दुरूस्त करत आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** चूकीचा आहे.

**सदस्य, श्री..जमनादास पुरस्वानीः–** मा. महापौरजी हा विषय झाला पाहिजे. हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल, बोट क्लब, आणि इंदिरा गांधी भाजी मार्केट हे भुखंड विकसीत करण्यासाठी सल्लागार नेमणूक करणे. हा विषय असा असायला पाहिजे. तर या विषयामध्ये आम्ही ठरावामध्ये दुरूस्ती करणार. दुसरा विषय

आहे इंदिरा गांधी भाजी मार्केट, आता एक विषय झाला. इंदिरा गांधी भाजी मार्केटचा ठराव दि. ११/१२/२०१५ रोजी बोडारे साहेब, इंदिरा गांधी भाजी मार्केटला बिल्ड आपरेट ट्रान्सफर पध्दतीने दिला जावा. ११/१२/२०१५ रोजी ठराव क्र.६० या महासभेने पारीत केलेला आहे. ज्याचे सुचक आहेत सन्मानीय सदस्य जे आज इथे उपस्थित नाही आहेत. त्यांची मिसेस इथे महापौर म्हणून बसलेल्या आहेत. ओमी कलानी जी, धनजय बोडारेजी, भगवान भालेरावजी, राजेंद्र सिंग भुल्लरजी आणि त्याचे अनुमोदक आहेत, जया साधवानीजी, जी या सभागृहाची सदस्य नाही आहेत. नरेंद्र कुमार ठाकूरजी हे आज सदस्य नाही आहेत. राम पारवानी जो सदस्य नाही आहेत. आणि स्वतः जमनादास पुरस्वानी त्याचे अनुमोदक आहे. त्या ठरावामध्ये बी.ओ.टी. तत्वावर इंदिरा गांधी भाजी मार्केटला दयायला पाहिजे. हा आम्ही ठराव केलेला आहे. ११/१२/२०१५ रोजी. परंतु त्याचे मालकी हक्क आमचकडे नाही होते, त्यामुळे तो ठराव आमचा तीन वर्षापासून प्रलंबित आहे. या सभागृहाचे सर्व सदस्यांना वाटते की कल्याण अंबरनाथ रोड,कल्याण बदलापूर रोड जो आहे, त्यामध्ये ज्या लोकांचे पूर्णपणे दुकाने किवा घरे गेलेली आहेत, त्यांना १० बाय २० ची जागा दयावयाची आहे आणि ही जागाा देण्यासाठी महापालिकेकडे जागा नव्हती, आज आपल्याला ही जागा मिळालेली आहे. त्या लोकांमध्ये एक अशा आहे की आपल्याला १०बाय२० ची जागा मिळेल. १० बाय२० ची म्हणजे २०० स्केअर फुट. २५० लोकांना देत आहात तर ५० हजार स्केअर फुटाची जागा आपल्या मार्केटच्या लोकांना दयाची आहे, त्यासाठी कमित कमी रू.१० करोड रूपयाचा खर्च आहे. आणि जर यालाच आम्ही बी.आ.टी तत्वावर बाधले आणि जॉईट व्हेंचर केले, ५० टक्के त्यांची आणि ५० टक्के आपली जागा किंवा जो आपला सल्लागार सांगेल तर हे मार्केट आम्ही दोन वर्षाच्या आत मोफत बनवू शकतो. आणि २५० विस्थापीत लोकांना त्यांचे घर आणि दुकान देऊ शकतो. यासाठी हा जो ठराव आहे हा खूप चांगला ठराव आहे. यामध्ये सभागृहातील सर्व वरीष्ठांनी स्वाक्षरी केलेल्या आहेत. त्यामुळे इंदिरा गांधी भाजी मार्केट साठी काही अडचणी नाही. तिसरा विषय आहे बोट क्लबचा, बोट क्लबचा, बोट क्लब एक खूप चांगली आणि सुंदर जागा आहे. त्यासाठी आम्ही ८ वर्षापूर्वी एक टेंडर काढले होते, की बोट क्लब विकसित व्हायला पाहिजे आणि त्याचे टेंडर काढून जनतेला कशा प्रकारे लाभ देवू शकतो, त्यामध्ये गार्डन असायला पाहिजे, खेळाचे मैदान पाहिजे, हे लोकांसाठी मोफत असायला पाहिजे. लग्नकार्यासाठी हॉल असायला पाहिजे. आणि बाकी बिल्डरने आपल्यासाठी विकसीत करण्यासाठी जे काही बनवायचे आहे ते बनवावे. लोकांना सुध्दा लाभ मिळाला पाहिजे. अशाप्रकारे बोट क्लबचा विकास झाला पाहिजे. हा फार जूना विषय आहे. यासाठी जेव्हा कन्सल्टंट यांनी व्यावस्थित रितीने बनवून देईल आणि सभागृहात येईल, की जनतेच्या हितासाठी हे आलेले आहे.

**सदस्य, श्री..राजेंद्र चौधरी:–** सभागृह नेताजी, एक मिनीट, ८ वर्षापूर्वी जे टेंडर वैगेर आपण काढले होते हे आपले म्हणणे खरे आहे. परंतु आजची परिस्थिती वेगळी आहे. शहारामध्ये एक गणशोत्सव साजरा करतो. हे गणशोत्सव विर्सजनासाठी फार मोठी समस्या निर्माण होते. विसर्जनासासठी खाडीवरती जावू शकत नाही ना घाटा वरती जावू शकत, ना नदीवरती जावू शकत, त्यासाठी जिथे गणपती विर्सजन होत असते तिथे भरपूर लोकांचे त्याठिकाणी गणपती विर्सजन होता असतात त्याचे काय होणार? याचा पण विचार करण्यात यावा. दुसरे असे आहे की त्याठिकाणी एक छठपूजा होत असते. आता त्या ठिकाणी पाण्याची टाकी आहे, ८ वर्षापूर्वी पाण्याची टाकी नव्हती. परतु आता पाण्याची टाकी झाली आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:–** हा जो विषय आहे चौधरी जी, जेव्हा आम्ही एका सल्लागार नेमला जाईल, आपल्या नंतर २५, ५० इंजिनिअर असतात. त्यामध्ये आपल्या सदस्याची जी चर्चा होते, असते ती आपले आयुक्तजी त्यांना सांगत असतात. आपल्याला शहरामध्ये काय काय पाहिजे? विकास केल्यामुळे कोणता लाभ होईल, आणि काय काय हानी होईल. गणपती विर्सजन कुठे करणार, छठ पूजा कुठे करणार? हया सर्व बाबीचा समावेश असेल. आणि जेव्हा सल्लागार रिपोर्ट बनवून देईल, परत महासभेमध्ये ठेवले जाईल आणि महासभेचे प्रत्येक सदस्य याचे वाचन करतील त्यानंतर आम्ही चर्चा करणार.यासाठी मी सर्व सदस्यांना आज क्षमा दिवस म्हणून हात जोडून निवेदन करत आहे की, सल्लागार नेमण्यासाठी काही अडचण नाही आहे. सल्लागार नेमायला पाहिजे. त्या मध्ये आपण बी.पी.पी, बी.ओ.टी, पी.पी.पी, जे पण काही टाकायचे आहे ते टाकावे. फिक्स नाही आहे. सल्लागारांनी रिर्पोट तर बनवून देवू दे. आम्ही तिन्ही प्रस्तावासाठी सल्लागार नेमत आहेत.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:–**पी.पी.पी. साठी आम्ही तयार आहेत बी.ओ.टी साठी आम्ही तयार नाही आहेत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—** इंदिरा गांधी मार्केटचे कसे पी.पी.पी. होणार.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—**कन्सल्टंट नेमायच्या आगोदर असे नाही झाले पाहिजे की, सेफ कंपनी देण्यात यावे की डी.पी. आपला फक्त गुगल वरून आला होता.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—**पी.पी.पी. / बी.ओ.टी. कन्सल्टंट नेमायचा, पी.पी.पी, बी.ओटी. कशात काय आहे? तिन्ही वेगवेगळे आहे.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** बाळासाहेब क्रिडा संकुलन आणि तरण तलाव, बोट क्लब हे दोन पी.पी.पी. वर करा.आणि इंदिरा गांधी मार्केट बी.ओ.टी. वर करा.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** हे जे भगवान भालेराव बोलत आहेत माझीही त्याला सहमती आहे. आम्ही तिन्ही विषयाना पी.पी.पी. आणि बी.ओ.टी...

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौरजी एक सेंकंद, आयुक्त साहेब, डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे एक बहिष्कृत भारत म्हणून एक साप्ताहीक होते. त्या साप्ताहीकाचे आधार घेवून बोलतो, की ज्या मुलभूत गरजा आहेत, स्थानिक स्वराज्य संस्थमध्ये राहणारे लोकांच्या ज्या मुलभुत गरजा आहेत त्या मुलभुत गरजा जर का त्याना स्थानिक स्वराज्य संस्थेने जर दयायच्या असतील तर त्यांनी ते विना मोबदला दयायचे आहेत. तसे डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी त्या पाक्षिकामध्ये लिहिलेले आहे. हे भारत देश डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे संविधांनावर त्यांच्या लिहिलेल्या पुस्तकावर चालते. आज जर का त्याच डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा विसरपडत असेल या सभागृहाला तर मला असे वाटते साहेब तुम्ही आता बोललात म्हणून हा मी तुम्हाला विषय सांगितला सर्व सामान्य नागरीकांना, हया स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये हया वास्तु आपण दयायचा हे मला म्हणायचे आहे. धन्यवाद.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मा. महापौर मॅडम, मला वाटेत या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे, आणि सभागृह नेते आता आपल्या समोर बोललेले आहेत. मला असे वाटते की मा. भालेराव साहेबांनी म्हटले, आमचा बी.ओ.टी. ला विरोध आहे आणि पी.पी.पी.ला समर्थन आहे. हा विषय आज नाहीच आहे. अजून एकदा समजून घ्या, की आपण कन्सल्टंटला कशासाठी नेमायचे आहे. उदा. तुम्ही ऐका एक मिनीट मला जरा बोलू दया. तुम्ही एक कन्सल्टंट आहेत, हे एक आहेत, हे एक आहेत, हे एक आहेत, आणि मी इंदिरा गंधी मार्केटचे प्लान मागवणार तर मला चांगल्या पध्दतीने सभागृहाला पटेल अशा पध्दतीने कोण आम्हाला जास्तीचे डिझाईन करून देतो ते बघणार. पी.पी.पी. च्या बाबतीत तेच करणार आपले स्वारी बोट क्लबच्या बाबतीत तेच करणार. उद्देश आमचा असा आहे की बोट क्लबचे जे एक्सपर्ट आहेत. त्यांच्याकडून मी त्याच्यात स्पर्धा लावणार की असे असे आम्हांला करायचे आहे तुम्ही आम्हाला काय देणार? म्हणजे त्याच्या बरोबर चर्चा आणि नंतर बाळासोब ठाकरे साहेबांचे मी म्हटले त्यांच्या नावासारखे व्हावे. आजच्या तारखेला १० कोटी आहेत. परंतु काय फंडची पोझिशन आहे. त्यामुळे आपणाला ते पी.पी.पी. वर करता येईल का बी.ओ.टी.वर करायचे आहे हा नंतरचा निर्णय आहे. तर ते पुढची स्टेप आहे. आजच्या तारखेला आपण कन्सल्टंट नेमून प्रपोजल तुमच्या समोर ठेवणार आहोत. अंधारात कोणतीही गोष्ट होणार नाही. धुतलेल्या तादळाप्रमाणे त्याची स्वच्छ सी.डी. सभागृहात दाखविली जाईल. आणि आपल्याला जे पसंत असेल त्याच्याबरोबरच लग्न लावले जाईल. अशा पध्दतीने मी आपल्याला सभागृहात सांगतो. उद्देश एकदम सोज्वळ आहे. फक्त आपले व्यवस्थित व्हायला पाहिजे.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आपण एकदम सार्थ बोललात. फक्त कन्सल्टंट नेमायचा आहे ना, मग एवढाच त्याच्यात उल्लेख असला पाहिजे तो बी.ओ.टी. नाही पी.पी.टी नाही किंवा सी. पी.टी. नाही. काय असेल तो कुठला पी.पी. आणि सी.टी. एवढे फक्त लक्षात ठेवा. त्या गोषवा—यात फक्त कन्सल्टंट नेमणे आणि बाळासाहेब क्रिडा संकुलामध्ये.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुलन सोडून त्याचे नेमलेला आहे.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—** बी.ओ.टी. पी.पी.टी. जे काय करायचे असेल ते नंतर आपण बघू. आणि कृपया साहेब जरा याच्या सोबत ही पण माहिती मिळाली तर बरे होईल. १६० भुखंड आणि मला वाटते या विषयाशी निगडीतच बोलतो १६० भुखंड. मा. महापौरजी आणि तो कन्सल्टंट याचे किती रूपये घेणार आहे? साहेब, कन्सल्टंट ची फी किती असेल? याचा पण जरा खुलासा झाला तर बरे आहे. मला वाटते हा विषयाच्या बाहेरचा विषय नाही आहे.

**महापालिका सचिव:—** माझ्याकडे एक ठराव आला आहे, मी एकदा वाचून दाखवते.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** मॅडम ठराव येण्याच्या अगोदर, ठरावाच्या अगोदर ज्या गोष्टी मी नीट घेतल्यात का त्या विचाल्या होत्या. १६० भुखंडाबाबत जे याच्यामध्ये उल्लेख आहे. त्या, ऐका, एकदा ठराव झाल्यानंतर बोलून फायदा नाही आहे. त्याचे पैसे किती? कन्सल्टंटचे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे::—** होय, मा. महापौर मॅडम, सुर्वे साहेबांनी एक प्रश्न विचारला की आपल्याकडे जे चार भुखंड मिळालेले आहेत, शासनाने आपल्याला त्याचा मालकी हक्क दिलेला आहे. आता राहीला १५७, बरोबर आहेत का? १५७ बाबत शासनाला मी आल्यानंतर पत्र, तो खुलासा करा ना मग मला सांगताय का? लवकर खुलासा करा तुम्ही.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोंनावणे:—** जी विकास योजना १९७४ साली मंजूर झाली होती, त्याच्यामध्ये १६० भुखंड आपण विकसित करायचे होते. त्याचा कागदोपत्री ताबा आपल्या सन८६—८७मध्ये पण त्याची मालकी हक्क, मुख्यमंत्री साहेंबानी याच्यामध्ये बैठक की प्रलंबित प्रश्न आहेत त्याच्यामध्ये हे तीन विषय आले होते. बोट क्लब, बाळासाहेब ठाकरे उदयान आणि इंदिरा गांधी मार्केट. त्यानी कलेक्टरांना जशा सुचना दिल्या कलेक्टरांनी ते तीन भुखंड आपल्या ताब्यात सन २०१८ मध्ये मिळाले. त्या वेळेला ते भुखंड त्यानी विनामुल्य दयायचे होते. आता सन २०१० मध्ये शासनानी त्याच्यावर दोन भाग केंले, पब्लीक कनव्हेंन्स आणि पब्लिक अमॅनीटी, तर पब्लीक कनव्हेंन्स मध्ये जें भुखंड आहेत ते आपल्याला विनामुल्य मिळणार आहेत. बाकीचे जे भुखंड आहेत ते रेडीरेकनरच्या रेट घेऊन आपल्याला ते मिळणार आहेत. तसे कालच आम्ही प्रस्ताव कलेक्टर साहेबांच्याकडे पाठवला होता. त्याच्यामध्ये मा. चव्हाण साहेब राज्यमंत्री, कलेक्टर साहेब याच्यामध्ये ठाण्याला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली, त्याच्यामध्ये त्यानी जे १९७४ भुखंड म्हणजे ती विकास योजना रदद् म्हणजे मुदत संपली, आता नवीन आली तर जे भुखंड त्यावेळचे आता ओव्हरलॅप होत आहेत, आणि मग त्या याच्या प्रमाणे आपल्याला विनामुल्य दयावे अशी आम्ही मागणी केली. बाकीचे पब्लिक ॲमिनीटी आणि पब्लीक कनव्हेंन्स ध्मये ३२२ भुखंड आता मंजूर विकास योजनेमध्ये आहेत, तर त्याच्या अनुषंगाने आम्ही त्यांना कळविले. हे भुख्ंड पूर्वी आम्हाला दिलेले आहेत, बाकीचे जे आहेत त्यशचे बायफरगेशन करून आम्हांला दया.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे:—** आमचा हेतू बदलला तिथला प्रस्ताव बदलतो, पब्लिक ॲमिनीटी आणि पब्लीक कनव्हेंन्स जर महापालिकेने विकसित केला तर तो पब्लीक कनव्हेंन्स आहे.

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोंनावणे:—** तसे नाही आहे. शासनाने जी.आर. मध्ये लिहून दिलेले आहे पब्लिक अमॅनीटी मध्ये काय असणार आहे? आणि पब्लीक कनव्हेंन्स मध्ये काय असणार आहे? या भुखंडाचा वापर काय असणार आहे आणि त्या भुखंडाच्या वापराप्रमाणे आम्ही त्यांना विनंती केली आहे १९७४ साली हे भुखंडा तुम्ही आम्हाला फुकट दयायला पाहिजे होते. आता ती विकास यांजना गेली त्याच्यामध्ये ते भुखंड होते ते याच्यामध्ये बसतात. या नॉर्म्समध्ये.

**सदस्य,श्री धंनजय बोडारे:—** बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल हे पब्लिक अमॅनीटी मध्ये येते का पब्लीक कनव्हेंन्समध्ये...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सर याचे उत्तर मी देते. फक्त एक सेंकद सर ही वास्तु आपल्याकडे नवीन प्रॉपर्टीनुसार लागू होते, त्याची सनद आपल्याला मिळाली आहे, त्याच्यावर हे लागू होत नाही.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे:—** हे शासनाकडून भुखंड आपल्याला आलेला आहे, त्याचा पैसा आपल्याला भरावयाचा आहे. भरायचा आहे किंवा नाही ही गोष्ट आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी::—** नाही भरायचे आहे, सर, मी आपल्याला हेच तर सांगत आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोंनावणे:—**एक क्रिडागंण आहे त्याच्यामध्ये त्यांनी लिहिलले आहे, तिथे आगोदरच त्यांनी आता देवून झाले आहे त्या भुखंडामध्ये आता पैसे भरावे लागणार नाही.

**सदस्य, श्री...सुनिल सुर्वे:—**साहेब, १६० पैकी किती आता बाकी किती आहेत? ते तर जरा आकडा तर सांगा. ठिक आहे बाकीचे जाऊदया, मालमत्ता तूमच्याजवळ आहेत, तुम्ही आहात, आम्हाला आकडा तर सांगा. आम्हांला तुमचा अभ्यास तर बघू दया किती आहे?

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोंनावणे:—** तुम्हाला तेच सांगितले, तो डी.पी. झालाय कॅन्सल, आता नविन प्रमाणे.. ..

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** मग तो १६० चा उल्लेख केला ना. नविन डी.पी. लागू आहे ना. मग १६० चा उल्लेख का केलात?

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोंनावणे:—** १६० पैकी कारण जेव्हा ती चर्चा झाली होती अणि त्या चर्चा अनुषंगाने झाले आहेत १६० पैकी हे ३ आपल्याला आता मिळाले आहेत. यापुढे जसे जिल्हाधिकारी साहेबांनी आदेश दिले त्याच्याप्रमाणे काल आपण त्यांना बाकी राहिलेले भुखंड पण त्यांनी दयावे असे आपण म्हटलेले आहे.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे**:— ठिक आहे, मग बाकीची यादी आम्हाला दया. पुढच्या मिटींगला.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोंनावणे::—** उदया देतो.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे**:— नाही , उदया नाही सगळया सदस्यांना दया ना. मग आम्हाला समजेल आमच्याकडे काय आह? आणि काय अजून विकायचे आहे? ते पण समजेल ना.

**महापालिका सचिव::—** ठराव वाचते. ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मा. हिंदू ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल वगळून बोट क्लब इंदिरा गांधी मार्केट हे भुखंड विकसितकरण्यासाठी त्या करिता प्रकल्प व्यावस्थापक व सल्लागार नेमण्यास मान्यता देत आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी::—** नाही नाही, दोन वेगवेगळे सल्लागार करायचे आहेत.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे**:— साहेब सल्लागार देताना त्याची फी जरा सांगितली असती तर आम्हाला पण अंदाज आला असता. की फी काय आहे? फी किती आहे? स्वेअर फुटावर किंवा कशावर घेतात.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मा. महापोर मॅडम, सन्मानीय सभागृह आता आज आपण ठाराव पारीत केलेला आहे. सुर्वे साहेब, ठराव आज पारीत होत आहे उआणि हा कर्न्फम न झालेला म्हणजे....

**सदस्य,श्री.सुनिल सुर्वे**:— साहेब आमच्या माहितीत भर म्हणून विचारले.बाकी काही नाही आम्ही कमी शिक्षित आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** असे नाही आहे, मी सांगतो ना उत्तर.पण ठराव आज पारीत करत आहोत. आणि इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अशी जर तुम्ही मुभा सभागृहाने दिली तर हे टेंडर आपण पुढच्या आठवडयात टेंडर मागवू आणि टेंडर मागविल्यानंतर आपण त्याचे रेट दर काय आहेत? ते येणार आहेत त्याच्यामध्ये. ते पण आपल्या स्थायी समितीच्या सल्ल्यानेच फायनल होणार आहेत रेट. आता आज कसे रेट सांगू सांगतो, कसे १ टक्का असू शकतो, सव्वा टक्का असू शकतो. दोन टक्के असू शकतात.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे**:— आता मी जे बोलत होतो तेच झाले. मी सुरूवातीलाच सांगत होतो मग आम्हाला कळणार पण नाही काय रेट ठरलेत ते स्थायी समितीत. माझे म्हणणे तेच आहे. मी सांगितले होते की, सगळे एक होणार आणि सगळयांची संमती येणार.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** आपले हेच वैशिष्ट आहे.

**महापालिका सचिव:—** पास..

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण::—** हयाच्यामध्ये आजिबात बदल करू नका. हा धंदा चाललाय. इथे जर बदल झाला ठरावामध्ये तर आमचा विरोध आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे::—** मा. आयुक्त साहेब, क्रिडा संकुल कसे विकसित करायचे. म्हणजे पैसा ना शासनाचा पैसा. आणि हे फक्त विकसित करण्यावर का?

**सदस्य,श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, आम्ही तिन्ही प्रकल्पासाठी कन्सल्टेटची नेमणूक करायची आहे. यामध्ये स्पर्धा ठेवा, त्यासाठी टेंडर मागविण्यात यावा आणि हे पारदर्शी असले पाहजे. ज्याला व्याज असेल असे नको, ज्या कन्सल्टंट मध्ये क्षमता असेल, ज्यामध्ये मोठे प्रोजेक्ट करण्याची क्षमता असेल असे कन्सल्टंट आमच्याकडे येतील आणि आमचे प्रोजेक्ट चांगल्या प्रकारे बनतील. चांगली डिझाईन आणतील त्यासाठी ठराव झाला पाहिजेत आणि इतरही टाका.

**सदस्य, श्री..भगवान भालेराव:—** साहेब बाळासाहेब क्रिडा संकुल सोडून जस त्यांनी प्रस्ताव वाचला.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—** बाळासाहेब क्रिडा संकुलाचा प्रस्ताव वाचलेला आहे, पून्हा त्यात बदल करणार आहात का तूम्ही?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**प्रस्ताव वाचलेला आहे पण पास झालेला नाही आहे. त्यामध्ये बदल सांगत आहे,तिन्ही प्रोजेक्टसाठी कन्सल्टंट नेमावा आणि टेंडर मागविण्यात यावा.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** आमचा तिन्हीना विरोध आहे. याच्यात शंका आहे.

**सदस्य, श्री..धंनजय बोडारे:—** आता त्यामध्ये काही तरी शंका आहे. सुर्वे साहेब बोलताहेत तसे काही तरी शंका आहे.

**सदस्य, श्री.. राजेश वदारिया:—** मॅडम जर असे काही असेल तर पूट ऑन वोट

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सचिव मॅडम मतदान टाका.

**महापालिका सचिव:—** मॅडम यांनी मतदान घ्यायला सांगितले आहे. जे प्रस्तावाच्या बाजूने आहे की कन्सल्टंट नेमण्यासाठी त्यांनी साहेब मला मॅडमनी आदेश दिल्यावर मी, मला मॅडमनी आदेश दिलेत ना.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—**एककन्सल्टंट नेमला असेल तर दुसरा नेमता येतो का? पहिला जर कन्सल्टंट नेमला असेल तर दुसरा नेमू शकतो का?त्याचे उत्तर पाहिजे. पहिला कन्सल्टंट दिलेला आहे का? पहिल्या कन्सल्टंट ला पैसे दिलेले आहेत ते पैसे पाण्यात गेले.

**सदस्य,श्री. राजेश वदारिया:—**मला तर फार वेगळेच वाटत आहे. महापौर यांच्या आदेशानंतर आपण कशासाठी हे असे करत आहेत.

**महापालिका सचिव:—** मी बोलेले आहे की, जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत, त्यांनी हात वर करा, तुम्हीच उशिर करीत आहेत.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** प्रस्ताव वेगवेगळे झाले पाहीजेत.

**सदस्य, श्री..राजेंद्र चौधरी—** सल्लागार नेमला, पहिला कन्सल्टंट जर असेल.

**महापालिका सचिव:—** विरोधसाठी नाही मागत आहे मी.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** मॅडम मी सांगितले आहे की, मॅडम प्रस्ताव एक एक करून घ्या की पूर्ण याच्यासाठी.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** याच्यामध्ये इतर पण भुखंड घेण्यात यावेत.

**<u>महापालिका सचिव:–</u>** मी परत वाचून दाखवत आहे, जे या प्रस्ताव नविन कन्सल्टंट नेमण्याच्या बाजूने आहेत की परत सल्लागार नेमण्यात यावेत त्यांनी हात वर करावेत हात नीट वर करा ज्याचे हात वर दिसत नाही.

**<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे</u>**:– बरे वाटले, बरे वाटले.

**<u>सदस्य, सुमित सोनकांबळे::–</u>** शेरीजी, आता तर विरोध करत होते.

**<u>सदस्य,श्री. शंकर लुंड:–</u>** माझे मतदान इंदिरा गांधी मार्केटसाठी आहे.

**<u>महापालिका सचिव:–</u>** असे नाही होत, आपण एकटे एका भुखंडासाठी मतदान नाही करू शकत, मतदान करणार, तसे वेगवेगळे येणार नाही, सगळयासाठी सारखे असेल.

**<u>सदस्य, सुमित सोनकांबळे::–</u>** शेरीजी, आपण आता विरोध करत होते, आता समर्थन करीत आहेत, वनवारीजी.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी::–</u>** हे मतदान कन्सल्टंट नेमण्यासाठी आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे::–</u>** पहिले त्याचे ऐकून घ्या नंतर मतदान करा.

**<u>महापालिका सचिव</u>**:– आपण परत ऐका परत नविन कन्सल्टंट नेमायचा आहेत यासाठी हा प्रस्ताव मतदानासाठी ठेवत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. कांचन लुंड:–</u>** मॅडम इंदिरा गांधी मार्केटचे वेगळे मतदान घ्यावे माझे त्यासाठी विरोध नाही आहे बाकी जे व्ही.टी.सी. ग्राऊड बोट क्लब.

**<u>महापालिका सचिव</u>**:– ३१ मतदान आहे.

**<u>प्रस्तावाच्या बाजूने मते:– ३१</u>**

१) श्रीम. पंचम कालानी

२) श्री. जीवन इदनानी

३) श्री. जमनादास पुरस्वानी

४. श्री. राजेश वदारिया

५. श्री. किशोर वनवारी

६. श्री. हरेश जग्यासी

७) श्री. दिपक सिरवानी

८) श्रीम. कविता पंजाबी

९) श्रीम. इंदिरा उदासी

१०) श्रीम. दिप्ती दुधानी

११) श्रीम. ज्योती चैनानी

१२) श्रीम. ज्योती बठिजा

१३) श्री. शंकर लुंड

१४) श्रीम. मिना सोनेजी

१५) श्रीम. अर्चना करनकाळे

१६) श्रीम. जयश्री पाटील

१७) श्री. महेश सुखरामनी

१८) श्रीम. लक्ष्मी सिंग

१९) श्रीम. आशा बिराडे

२०) श्रीम. डिप्पल ठाकुर

२१) श्रीम. जया माखिजा

२२) श्रीम. कविता गायकवाड

२३) श्रीम. रेखा ठाकुर

२४) श्री. रवि जग्यासी

२५) श्री. रविंद्र बागुल

२६) श्रीम. छाया चक्रवर्ती

२७) श्रीम. शुभागीनी निकम

२८) श्रीम. सविता तोरणे

२९) श्रीम. दिपा पंजाबी

३०) श्रीम. गीता साधनानी

३१) डॉ. प्रकाश नाथानी

**महापालिका सचिव**:— आणि जे हया प्रस्तावाच्या बाजूने सगळयांनी हात वर केलेत. त्यांचे तटस्थ घेते.

---

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे::—** सभा त्याग करा जाऊ दे.

**महापालिका सचिव**:— आमचे गणक मतदान मोजतात आणि तिने मला ३१ आकडा सांगितला आहे मॅडम तुमचे तटस्थ किंवा विरोध जे काही असेल ते मी घेते नंतर, एकतीस आहे बरोबर ३१ आहे मॅडम सोडून एकतीसच आहे. मी मोजल्या आता हया प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावे. माझे मते २३ आहेत, २३ आहेत.

**प्रस्तावाच्या विरोधात मते:— २३**

१) श्री. धनंजय बोडारे

२) श्री. रमेश चव्हाण

**३**) श्री. सुनिल सुर्वे

४) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

५) श्रीम. वसुधा बोडारे

६) श्रीम. राजश्री चौधरी

७) श्रीम. मिताली चान्पूर

८) श्रीम. लिलाबाई आशान

९) श्रीम. पुष्पा बागुल

१०) श्रीम. ज्योती गायकवाड

११) श्रीम. ज्योती माने

१२) श्रीम. शुभांगी बहेनवाल

१३) श्री. स्वप्नील बागुल

१४) श्री. सुमित सोनकांबळे

१५) श्री. भगवान भालेराव

१६) श्रीम. सुरेखा आव्हाड

१७) श्री. राजेंद्र चौधारी

१८) श्रीम. संगिता सपकाळे

१९) श्री. शेखर यादव

२०) श्री. भारत राजवानी

२१) श्रीम. कविता बागुल

२२) श्री. प्रमोद टाले

२३) श्रीम. अंजली साळवे.

**सदस्य, श्री..धनंजय बोडारे**:—पहिल्या कन्सल्टंटचे काय झाले? हे विचारलेले प्रश्न आयुक्त साहेब तुम्ही दखल घ्यायची.

**महापालिका सचिव**:— तेवीस मते आहेत, आणि तटस्थ कोणी असेल तर त्यांनी कृपया हात वर करावे. कोणी तटस्थ नाही, हा ठराव बहुमताने पारीत झाला असे मा. पीठासीन अधिकारी सांगत आहेत आणि त्यांनी दुसरा विषय सुरू करायला सांगितला आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :—** व्हि.टी.सी. क्रिडा संकूल, बोटक्लब व इंदिरा गांधी भाजी मार्केट हे भुखंड ''बांधा, वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर विकसित करणे व त्याकरीता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांची नेमणूक करणे.

**प्रस्तावना:—**

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना १९७४ साली शासनाने मंजुर केली असून एकुण मंजुर आरक्षणातील १६० आरक्षित भुखंड सन १९८६—८७ दरम्यान प्रशासक,

उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालयामार्फत उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यात ताबेपावतीद्वारे देण्यात आले होते. तथापि, या भुखंडांच्या मिळकतपत्रिकेवर वा सनदेमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेचे नांव लावण्यात आलेले नव्हते. व्हि. टी. सी. क्रिडा संकुल, क्षेत्रफळ २२३२३.८७ चौ.मी., बोटक्लब, क्षेत्रफळ १४९२९.४० चौ.मी. व इंदिरा गांधी भाजी मार्केट, क्षेत्रफळ ५८२४.७७ चौ.मी. या भुखंडांच्या सनद (मालकी हक्क) महानगरपालिकेच्या नावे दिनांक १२/१०/२०१८ रोजी करण्यात आलेले आहेत. व आजरोजी महानगरपालिका हे भुखंड विकसित करू शकते. यापूर्वी वरील भुखंडाचे मालकीहक्क प्राप्त झाले नसल्याने महासभेने मान्यता देवुनही हे भुखंड विकसित करता येवु शकलेले नाहीत.

आजरोजी वरील तिन्ही भुखंडांचे मालकी हक्क प्राप्त झाल्याने महानगरपालिका ते विकसित करू शकते. महानगरपालिकेची बिकट आर्थिक स्थिती लक्षात घेता '' बांधा, वापरा व हस्तांतरीत करा '' या तत्वावर विकसित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार बांधकाम नकाशे व प्राकलने तयार करणेसाठी नेमणूक होणे आवश्यक आहे. यासाठी याबाबतचा प्रस्ताव महापालिकेच्या महासभेपुढे ठेवुन त्यावर महासभेत चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**विशेष महासभा ठराव क्र: ४०** **दिनांकः— २/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद मा. हिंदू हृदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकूल, बोटक्लब व इंदिरा गांधी भाजी मार्केट, इतर भुखंड विकसित करणेकरीता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागारांची नेमणूक करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे**:— नाही तर उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एक मिनीट .....

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :–** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/ कर्मचा–यांना वर्ष २०१७–२०१८ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजूरी देणे.

---

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:–** पॉईंट ऑफ ऑर्डर, एकच मिनीट.

**सदस्य, श्री..धनंजय बोडारे**:– शासकीय भुखंड आता ताब्यात आल्यावर त्याच्यावर डोळा लक्ष देत होते त्यांचेच इथे चालेले आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:–** पॉईंट ऑफ आर्डर बोनसचे होऊ दया.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:–** एकच प्रश्न जो शेवटी....

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:–** मा. महापौरजी इतिवृत्ताची वाट न पाहता ऑर्डर पाहिजे.

**सदस्य,श्री.सुनिल सुर्वे:–** आयुक्त साहेबाने दिवाळीच्या पहिले अनुकंपा तत्वावरील कामगाराना ऑर्डर देणार म्हणून. त्याचे काय झाले? आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:–** इतिवृत्ताची वाट न पाहता झाले पाहिजे.

या वेळी शिवसेना पक्षातील नगरसेवक, आर.पी.आय. पक्षातील नगरसेवक व कॉंग्रेस पक्षातील नगरसेवक सभागृहातून बाहेर गेले.

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २:–** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/ कर्मचा–यांना वर्ष २०१७–२०१८ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजूरी देणे.

**प्रस्तावना:–**

सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना सन २०१७ – २०१८ या वर्षा करिता सानुग्रह अनुदान वाटप करणे बाबत दिनांक. २४/१०/२०१८ रोजी मा. महापौर, सो

यांच्या अध्यक्षते खाली महापालिकेचे पदाधिकारी व कामगार संघटेनेचे पदाधिकारी यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार दिपावळी सणानिमित्त (बोनस)/सानुग्रह अनुदान रू. १४,२००/— दिवाळीपूर्वी देण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आलेले आहे.

सन २०१६—१७ मध्ये रू. १३,०००/— इतके सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले होते. मा.महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार रू. १४,२००/— वाटप करावयाचे असल्यास, कर्मचा—यांनी संख्या अंदाजे २५०० आहे. त्यानुसार वित्तीय वर्षे २०१८—१९ च्या अंदाजपत्रकात सानुग्रह अनुदानासाठी ३,५०,००,०००/— इतकी तरतुद करण्यात आलेली आहे अंदाजित रक्कम रू. ३,५५,००,०००/— कोटी इतकी रक्कम लागणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सादर करणेत येते की, वित्तीय वर्ष २०१७—२०१८ साठी सर्व महापालिका कर्मचा—यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) सदरचे सानुग्रह अनुदान गट''अ''''ब''''क'' व ''ड'' मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षण कर्मचारी ठोकवेतन, वैद्यकिय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये कंत्रीटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

२) जे कर्मचारी ३१ मार्च २०१७ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २०१७ — २०१८ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलीली असेल असे कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

३) दिनांक १/४/२०१७ ते ३१/३/२०१८ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास अपात्र असतील.

४) सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

रूपय १४,२००/—

———————————— × हजर दिवस

३६५ दिवस

५) कर्मचा—यांच्या सेवा कालवधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजूर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.

६) सानुग्रह अनुदानासंदर्भात शासनाने वसूलीबाबत निकाल दिल्यास सदर रक्कम एक रकमी वसुल करण्यात येईल.

७) जे अधिकारी/कर्मचारी ३१ मार्च २०१७ नंतर सेवेत होते असे गट ''अ'' ''ब'' ''क'' व ''ड'' मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतनावरील कर्मचारी वैद्यकिय आरोग्य विभागातील योजनेमध्ये (हिवताप/आरोग्य सेवक) (प्रकल्पामध्ये) कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी, प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी व प्रजनन व बाल आरोग्य केंद्रावरील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, सुधारीत क्षय रोग नियंत्रण कार्यक्रम, शासकीय अधिकारी व कर्मचारी, दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, व उपरोक्त सर्व २०१७—२०१८ साठी दिवाळी पुर्वी सानुग्रह अनुदान कर्मचा—यास

वाटप करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा.महासभेकडे मान्यतेसाठी सादर.

**विशेष महासभा ठराव क्रः ४१** **दिनांकः— २/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तींवर गट “अ”, “ब”, “क”, व “ड” मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी ठोकवेतन, सर्व शिक्षा अभियानाचे कर्मचारी, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वर्ष २०१७—२०१९ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान नियमानुसार अदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः—** आयुक्त साहेबांनी सांगितले होते, की अनुकंपावरील लोकांना दिवाळीच्या आगोदर अपॉइंटमेंट देणार. त्याचे काय झाले, साहेबांनी अजून पर्यंत अपॉइंटमेंट दिलेली नाही.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :— आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. ३:—** स्वच्छ सर्वेक्षण २०१९
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा मुक्त शहराना तारांकित मानांकन देण्याबाबत.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** इतिवृत्ताची वाट न पाहता पास,पास,पास, तिन्ही विषय इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. ३ :—** स्वच्छ सर्वेक्षण २०१९
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा मुक्त शहराना तारांकित मानांकन देण्याबाबत.

**प्रस्तावना:—**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा मुक्त शहरांना तारांकित मानांकन देण्याबाबत नगर विकास विभाग यांचे कडील दिनांक ०२ जून २०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार, संपूर्ण भारत देश ऑक्टोबर, २०१९ पर्यंत स्वच्छ करण्याच्या उद्‌देशाने दिनांक ०२ ऑक्टोबर २०१४ पासून ''स्वच्छ भारत अभियान'' देश भरात राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी संदर्भाधीन दिनांक १५ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये संपूर्ण राज्यात '**मिशन मोड**' पध्दतीने सुरु आहे. या अभियांतर्गत शहरे ''**हगणदारी मुक्त**'' करणे घनकचरा व्यवस्थापनतंर्गत ''**स्वच्छ**'' करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करुन राज्याचा नागरी भाग दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी ''हगणदारी मुक्त'' घोषित करण्यात आला आहे. आता या अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनातंर्गत शहरे ''स्वच्छ'' करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, नागरी भागात व सार्वजनिक ठिकाणी काही प्रमाणत होत असलेल्या अस्वच्छतेमुळे नागरिकांकडून प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसून येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता एकूणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकित मानांकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (A protocol for making cities Garbage Free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आली आहे कचरामुक्त शहरांना तारांकित मानांकनाची नियमावली राज्य शासन स्विकारीत असून ती राज्यातील सर्व शहरांना लागू करण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर स्टार रेंटींगचे टुलकिट नुसार प्रत्येक शहराचे सन्मानिय सदस्य व शहरातील नागरीकाकडून त्यांच्या प्रभाग, त्यांच्या शहर स्वच्छते संबंधी १ ते ७ स्टार रॅटींग मध्ये कुठल्या स्टार रेंटींग घेत होता त्याकरीता सोबत जोडलेल्या नमुन्या मध्ये माहिती मागविणेबाबत कळविण्यात आलेला आहे. तरी सर्व सन्मानिय सदस्य/सदस्या व शहरातील नागरीकाकडून टुलकिट नुसार माहिती मागविण्यात आलेली होती.

तसेच स्टार रेंटींगचे टुलकिट नुसार १ ते ७ स्टार रेटींगचे प्रमाण पत्र प्राप्त करणेसाठी १,३ व ४ स्टार रेटींग करीता राज्य शासनाकडून व २, ५ व ७ स्टार रेटींग करीता केंद्र शासना मार्फत समिती शहराला परिक्षण करुन शहराला स्टार रेटींग देणार आहे व शहर कुठल्या स्टार रॅटींग मध्ये येत आहे त्याकरीता प्रभाग सदस्यांकडून तारांकित मानाकनाबाबत घेषणापत्र सादर झाल्यानंतर सबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी ठराव पारित करुन सार्वजनिक घोषणा करु शकतील व त्यानंतर स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन नागरीकांचे १५ दिवसाचं आत आक्षेप मागविणे बाबत कळविण्यात आलेले आहे. जर कोणाच्या आक्षेप नसल्यास तर कोकण विभागाकडुन समिती येवून सर्व कागदपत्रांबाबत संपुर्ण माहिती देवून राज्य शासनास माहिती देणार व राज्या शासनाकडुन समिती शहरात येवून प्रशिक्षण करुन शहराला स्टार रेटींगच्या प्रमाणपत्र देणार आहे.

सबब उक्त संदर्भिय पत्रानुसार इकडील कार्यालयातुन जा.क्र.उमपा/आवि/उप—आयु/८५/१८ दिनांक २०/०७/२०१८ रोजीच्या आदेशान्वये मा. महापालिका सदस्य/सदस्या यांच्या मार्फत स्टार रेटींग च्या अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार खालीलप्रमाणे मा. महापालिका सदस्यांकडून स्टार रॅटींग प्राप्त झालेल्या आहे.

| अ.क्र. | स्टार | सदस्यांकडुन प्राप्त रॅटींग |
|---|---|---|
| १ | ७ — स्टार रॅटींग | ६ |
| २ | ५ — स्टार रॅटींग | १७ |
| ३ | ४ — स्टार रॅटींग | १० |
| ४ | ३ — स्टार रॅटींग | १९ |
| ५ | २ — स्टार रॅटींग | १६ |
| ६ | १ — स्टार रॅटींग | ८ |

तसेच प्रभाग सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तारांकिंत मानांकनापैकी जे निम्न तारांकित मानांकन असेल तेच तारांकित मानांकन त्या शहराचे तारांकित मानांकन म्हणून पडताळणीसाठी ग्राहय धरण्यात येईल. उल्हासनगर महानगरपालिकातर्फे सन्मानिय सदस्यांच्या अहवालानुसार उल्हासनगर शहर १ स्टार रेंटीग मध्ये मोडत आहे.

तरी शासनाने दिलेल्या मार्गदशक सुचनेनुसार मा. महासभेच्या मंजुरी घेऊन शासनास तात्काळ अहवाल सादर करण्यातबाबत शासनाकडून निर्देश देण्यात आले आहे. त्यानंतर राज्य शासना मार्फत समिती शहराला परिक्षण करुन शहराला स्टार रेटींग देणार आहे. त्याकरीता मा. महासभेच्या समोर उल्हासनगर शहरासाठी १ स्टार रेटींग मिळणेबाबत मान्यतेस्तव सादर.

**विशेष महासभा ठराव क्र: ४२** **दिनांकः— २/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा मुक्त शहराना तारांकित मानांकन देण्यास उल्हासनगर शहरासाठी १ स्टार रेटींग मिळणेस मंजुरी देवून शासनास तात्काळ अहवाल सादर करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—** अनुकंपावरील लोकांचे काय झाले?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** अनुकंपा तत्वावरचा मागच्या मीटींगमध्ये सांगितले होते दिवाळीच्या अगोदर आढावा घेण्यात येईल माझे स्तरावर आढावा घेण्यात आलेला आहे. प्रोसेसमध्ये आहे दिवाळीनंतर नियमाप्रमाणे त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:–</u>** साहेब शब्द बुडवता आहे, दिवाळीच्या अगोदर देतो म्हटले होते आपण,दया त्यांना, अजूनही दोन दिवस आहेत दया त्यांना.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:–</u>** पॉइंट ऑफ ऑर्डरवरती परवानगी घेतली आहे, मा. महापौर मॅडम, उप महापौर सर, आयुक्त साहेब, पॉइंट ऑफ ऑर्डरवरती एका विषयावर बोलायचे आहे स्वच्छ भारत अभियान चांगल्या प्रकारे होत आहे परंतु आपले वार्ड ऑफीसर याच्यावरती लक्ष देत नाही. वार्ड ऑफीसरांची डयुटी आहे सफाई आणि पाणी यावरती लक्ष देणे. त्यांचे फक्त आणि फक्त लक्ष अनधिकृत बांधकामावरतीच जात आहे. स्पेशली चार नंबर प्रभाग समिती श्री. गोवारी सर पहिली गोष्ट जे हया प्रभाग समितीचे ऑफीसर आहेत, त्याची कॅपॅबलीटी आहे का? त्यांची पोस्ट आहे का? वार्ड ऑफीसर बनायची. ही माझी आपल्याला विनंती आहे. दुसरी गोष्ट जेव्हा सफाई अभियानाचा विषय चालला होता, आम्हाला त्यांची उपस्थिती विचारण्यात आली तेव्हा तेथिल दोन मिनीट, सर प्रभाग समितीचे जे अधिकारी आहेत त्याच्यावरती आपले लक्ष ठेवणे फार जरूरीचे आहे. स्पेशली ४ नंबर वार्डचे जे आहेत त्यांचे फार वाईट अनुभव आम्हाला आहे.आणि सर आपण नविन आले आहात प्रत्येक गोष्ट, एक वेळेस बोलतो की नगरसेवकांची डयुटी आहे, हेड ऑफ मुकादम, आणि हेड ऑफ वालमन बनलेली आहे. जोपर्यत आम्ही कोणतेही काम करत नाही, प्रॉपरली कामे होत नाहीत.आणि हे काम प्रभाग अधिकारीचेही आहे सर, त्या दिवशी आम्ही स्वच्छता अभियान घेतले, मी आपल्यांना विडीओ सुध्दा पाठविला. तेथील एसआय यांना विचारले, उपस्थिती किती आहे. असेच ४० असे सांगत आहेत. आणि आम्ही गणती केली तर प्रत्येक्षात फक्त २७ कामगार होते. हे काम वार्ड ऑफीसरांचे सुध्दा आहे. आणि वार्ड ऑफीसर फक्त हसत असताना दिसत असतात. कोणीही काम करण्याची तयारी दाखवत नाही. हया वार्ड ऑफीसरांवरती आपण चांगल्या प्रकारे लक्ष दयायला पाहिजे, पहिली गोष्ट सर, ते कॅपॅबल आहेत किंवा नाही वार्ड ऑफीसर बनण्यासाठी हे आम्हाला सांगावे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** सर, मी यांच्या बोलण्यास समर्थन करीत आहे. हया काही दिवसात व्हॉटस ॲपवर येत आहे. बॅरेक नं. ४३६ मधील एक गरीब महिला होती, ती मतीमंद होती त्या अविकसीत बृध्दीमुळे गेली, त्यांची जागा हडप करण्याचे चालले आहे हे पूर्ण मिडीयावरती येत आहे. अवैध निर्माणाच्या बाजूने आम्ही बोलत नाही. कारणी की या शहराच्या लोकांकडे जागा आहेत त्याचे काही टाइटल नाही आहे. त्यामुळे ती जागा वरती घेतात तेव्हा आम्ही काही बोलत नाही. परंतु एखादया मतीमंद महिलेच जर कोणी जागा हडप करत असेल त्यावेळीसमाजात काम करण्याचे एक कर्तव्य बनत असते. की आपण तपासणी केली पाहिजे. कोणी जर एखादयाची जागा हडप करत असेल, सोशल मिडीयावरती ही वार्ता जास्त होत आहे आणि बॅरेक नं. ४३६ आहे मी ठामपणे सांगत आहे, मी कुमावत यांच्याशी फोनवरती बोललो हे प्रभाग अधिकारी आहेत. त्याना मी विचारले की हया बाबतची मला माहिती दया परंतु ही दु:खद बाब आहे की, हे मला महासभेमध्ये घ्ययची गरज नव्हती. मी त्यांना तिथे विचारू शकत होतो, हा महासभेचा विषय नाही आहे आपल्याकडून सुध्दा सोडविला असता, कारण त्यांनी घेतला म्हणून मी काढला सर, हे छोटे छोटे विषय महासभेमध्ये घेण्याची गरज नाही. प्रभाग अधिकारीने चानाक्ष असले पाहिजे आणि त्यांनी सांगितले पाहिजे ही हे काय आहे.समाजामध्ये अशा काही गोष्टी होत असतील तर आम्हाला बोलावे लागते, कृपया सर याकडे लक्ष देण्यात यावे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u>** मा. आयुक्त जी याविषयी मला बोलायचे आहे की व्हॉट इज द डयुटी ऑफ वार्ड ऑफीसर? मी महानगरपालिका अधिनियमाचे पुस्तक वाचले पहिली ओळ काय लिहिली आहे आपण प्रशिक्षण घ्या, सर.व्हॉट आर द डयुटी ऑफ वार्ड ऑफीसर? पहिले पहिले लिहिले आहे पाणी, इनकोचमेंट, वार्डमध्ये पाणी येत की नाही. १९ वार्ड त्याच्याकडे येत असतात. तर १९ वार्ड मध्ये त्यांनी काम केले पाहिजे. लोकांकडे जावे, जनता दरबार लावला पाहिजे. नगरसेकांना बोलविले पाहिजे. आपण डयुटीज वाचा पुस्तक वाचा. सर त्यांना पहिले पुस्तक वाचून घ्यावे. ज्या ठिकाणी विटा किंवा रेती टाकली जाते त्या ठिकाणी पहिले जात असतात. व्हॉट आर द डयुटी ऑफ वार्ड ऑफीसर? डिफाईन तर करा सर, आणि गोल मैदान येथे किती दिवसापासून पाणी येत नाही. शेवटी काय होणार? मागील २२ मीटींग झालेल्या आहेत या माहानगरपालिकेमध्ये १६ मीटीगामध्ये हे एकच अदयाप चालत आहे. गोल मैदानामध्ये पाणी येत नाही हार्ट ऑफ द सिटी, आयुक्त साहेब अजून किती ओरडणार? एक ॲन्जोप्लास्टी तर झालेली आहे. आयुक्त साहेब गोल मैदान येथे पाण्याचे लिकेज सुध्दा आहे. लिकेज सुध्दा बनविण्यात यावे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मा. महापौर आयुक्त साहेब, एक मिनीट ....

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सचिव मॅडम राष्ट्रगीत सुरू करा.

**महापालिका सचिवः—** मा. महापौरानी राष्ट्रगीत घ्यायला सांगितले आहे, कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.५६ वाजता महापौर तथा पिठासिन अधिकारी श्रीम. पंचम उमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका